(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ.शी./मु.शी.: हरकतीच्या मुद्यासंबंधी

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. काल बुधवार, दिनांक 21 नोव्हेंबर, 2007 रोजी कै.प्रमोद नवलकर यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली त्यामुळे आम्ही हा मुद्दा काल उपस्थित केलेला नव्हता. मंगळवार, दिनांक 20 नाव्हेंबर, 2007 रोजी नियम 289 अन्वये सभागृहाचे कामकाज स्थगित करुन शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि त्यामुळे निर्माण होणारे प्रश्न, त्या आधारे व्याजाचे दर, नापिकी, कर्जबाजारीपणा आणि शेतकऱ्यांची कर्जमुक्ती यासंबंधी नियम 93 अन्वये प्रस्ताव आम्ही दिलेला होता. आम्ही या प्रस्तावाला नियम 289 चा आधार दिला होता व तातडी असल्यामुळे नियम 93 चा प्रस्ताव चर्चेला घ्यावा अशी मागणी केली होती. मागील तीन दिवसात 34 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आणि हा विषय गंभीर असून आतापर्यंत 1500 पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. माननीय सभापतींनी या प्रस्तावाबाबत बोलत असताना आम्ही दिलेले कारण योग्य वाटत असल्यामुळे आमचा प्रस्ताव अमान्य केला नाही. सभागृहाचे कामकाज स्थगित करुन त्यांच्या दालनामध्ये बैठक झाली. त्या बैठकीत या प्रश्नावरील चर्चेला सहमती देण्यात आली. परंतु हा प्रश्न महत्वाचा असल्यामुळे चर्चेच्या वेळी सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्री व माननीय उपमुख्यमंत्री उपस्थित राहणे आवश्यक आहे अशी मागणी करण्यात आली होती. माननीय मुख्यमंत्री व माननीय उपमुख्यमंत्री नागपूरबाहेर असल्यामुळे या प्रश्नावरील चर्चा त्यांच्या उपस्थितीत करणे योग्य राहील असे त्यावेळी सत्तारुढ पक्ष, विरोधी पक्ष आणि माननीय सभापती यांच्यात एकमत झाले. त्यामुळे हा प्रश्न हाऊसची प्रॉपर्टी झालेला आहे आणि तो विषय लेगवर आहे. काल आम्ही हा विषय उपस्थित करणार होतो. परंतु सभागृहाची प्रथा, परंपरा आणि संकेत लक्षात घेता एखाद्या सदस्याचे निधन झाल्यानंतर कितीही महत्वाचा विषय असला तरी तो त्या दिवशी उपस्थित केला जात नाही. या प्रथा आणि परंपरेला अनुकूल असे वागणे आमच्याकडून अपेक्षित आहे. त्यामुळे काल या विषयावर आम्ही भाष्य केले नाही, चर्चा केली नाही. जो विषय हाऊसची प्रॉपर्टी झाली, जो प्रस्ताव लेगवर आहे, माननीय सभापतींनी तो अमान्य केला नाही असे असताना विधीमंडळाने आजच्या कामकाजपत्रिकेवर बाब क्रमांक-10 वर नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा दाखविलेली आहे. आमचा प्रस्ताव हा अल्पकालीन चर्चेमध्ये कसा रुपांतरित झाला? माननीय सभापतींनी सभागृहात तत्वत: मान्य केले की, हा विषय महत्वाचा आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ MAP/ 10:00

श्री.नितीन गडकरी.....

नियम 289 चा प्रस्ताव अमान्य केला नाही. तो प्रस्ताव आता सभागृहाची प्रॉपर्टी आहे. असे असताना नियम 97 मध्ये हा प्रस्ताव कसा रुपांतरित झाला? सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे, सत्तारुढ पक्षातर्फे दिलेला प्रस्ताव देखील महत्वाचा आहे. वक्फ बोर्डाच्या जमिनी काही नेत्यांनी हडप केल्या त्याबद्दलची भावना सत्ताधारी पक्षातील सदस्यांना व्यक्त करावयाची आहे. मी त्याबद्दल जरुर समर्थन देतो. परंतु माझे म्हणणे असे आहे की, सभागृहाचे सर्व कामकाज स्थगित करुन शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमुळे निर्माण झालेले प्रश्न, कर्जमुक्तीचा विषय इतर कामकाज बाजूला सारुन चर्चेसाठी घ्यावा याण्साठी आम्ही नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या रुपाने दिला होता तो प्रिन्सीपली माननीय सभापतींनी मान्य केला आणि त्यांच्यासोबत झालेल्या बैठकीत त्यांनी चर्चा करण्याचे मान्य केले. माननीय उपमुख्यमंत्री, माननीय मुख्यमंत्री यांच्यासमोर चर्चा उपस्थित करावयाची असे निश्चित झालेले आहे. तो विषय बाजुला ठेवून नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावावर चर्चा करणे योग्य होणार नाही. म्हणून सभागृहाचे आजचे सर्व कामकाज स्थगित करुन नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावावर चर्चा करावी आणि ही चर्चा संपल्यानंतर नियमित कामकाज घेण्यात यावे, त्याबद्दल आमचा आक्षेप असणार नाही. कामकाज हे नियमाने चालले पाहिजे. नियम व कायदे विचारात घेता नियम 260 चा प्रस्ताव अगोदर चर्चेला घेणे योग्य होणार नाही. आम्ही दिलेला प्रस्ताव हाऊसची प्रॉपर्टी झालेला आहे, माननीय सभापतींनी तो प्रस्ताव अमान्य केलेला नाही, नियम 289 चा प्रस्ताव लेगवर आहे. माननीय उपमुख्यमंत्री व माननीय मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत चर्चा करावी असे मान्य झाले असताना तो विषय लांबणीवर टाकणे योग्य नाही. या संदर्भात योग्य ती दुरुस्ती करावी आणि आजचे सर्व कामकाज स्थगित करुन नियम 289 अन्वये माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो प्रस्ताव दिलेला आहे त्यावर चर्चा घेण्यात यावी.

(नंतर श्री.जुन्नरे...

अशुद्धीत पत्र / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सन्माननीय उपसभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी हरकतीचा जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. आजच्या कार्यक्रमपत्रिकेवर पहिला नियम 260 अन्वये प्रस्ताव दाखवण्यात आलेला आहे. या ठरावाला आमचा विरोध नाही परंतु आजची कामकाज पत्रिका जेव्हा आमच्या हातात आली त्यावेळी आम्हाला असे दिसून आले की, शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी, शेतक-यांना कर्जमुक्ती द्यावी यासाठी आम्ही नियम 289 प्रस्ताव दिला होता तो कामकाजपत्रिकेत दहाव्या क्रमांकावर दाखवला गेलेला आहे. तसेच आम्ही जो 289 च्या प्रस्ताव दिला होता त्याला नियम 97 मध्ये रुपांतरित करण्यात आलेले आहे. नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा केली जात असते. त्यामुळे आम्ही जो नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव दिला होता तो नियम 97 मध्ये रुपांतरित करण्यात आला. हा काय प्रकार आहे ? शेतक-यांना कर्ज मुक्ती द्यावी यासाठी मंगळवारी माननीय सभापतींबरोबर या प्रस्तावाच्या संदर्भात नियम 289 अन्वये चर्चा होईल असे ठरले होते, यासंदर्भात एकमुखी निर्णय देखील झाला होता. त्यावेळेस मी अशी सूचना केली होती की, सत्ताधारी पक्षाला या प्रस्तावाच्या संदर्भात आवश्यकता वाटल्यास त्यांनी कॅबिनेटची बैठक घ्यावी व शेतक-यांचा प्रश्नाला न्याय द्यावा, शेतक-यांचा प्रश्न मार्गी लावावा व त्यासंदर्भात दोन्ही सदनात प्रस्ताव आणून दोन्ही सदनात या प्रस्तावावर चर्चा घडवून आणून सर्व शेतक-यांचे कर्ज माफ करण्याचा दृष्टीने निर्णय घ्यावा व घेतलेला निर्णय केंद्र सरकारकडे पाठवावा अशा प्रकारची सूचना मी मंगळवारी केली होती या प्रस्तावाच्या वेळेस सर्व कामकाज बाजूला सारून या प्रस्तावावर चर्चा घडवून आणावी. परंतु हे सरकार या प्रस्तावापासून शीर्षासन का करीत आहे हे काही समजत नाही. सभागृहाची दिशाभूल करण्याचे काम या ठिकाणी सुरु आहे. शेतक-यांच्या जीवनमरणाचा प्रश्न डावलला जात आहे, नको त्या विषयाला चूड देली जात आहे, आग लावण्याचे काम केले जात आहे. अशा प्रकारच्या अनिष्ट प्रथा या सभागृहात सुरु झालेल्या आहेत. आज आपण सभागृहाचे कामकाज सकाळी 10.00 वाजता सुरु केलेले आहे, सभागृहाचे कामकाज केव्हाही सुरु करा यासंदर्भात आम्हाला काही म्हणावयाचे नाही, परंतु सभागृहाचे काम सुरु होताच शेतक-यांच्या जीवन मरणाचा प्रश्न असलेल्या 289 च्या प्रस्तावावर चर्चा घ्यावयास पाहिजे होती परंतु तसे न होता मुस्लीम समाजाचे आर्थिक सामाजिक प्रश्न सोडवण्याच्या संदर्भातील नियम 260 अन्वयेचा

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

प्रस्ताव आजच्या कार्यक्रमपत्रिकेवर पहिल्यांदा दाखवण्यात आलेला आहे. शेतक-यांच्या प्रश्नाच्या संदर्भात चर्चा झाल्यानंतर आपण हा प्रस्ताव चर्चेला घेतला असता तर आम्ही त्याला विरोध केला नसता. शेतक-यांचा प्रश्न मार्गी लावल्याशिवाय, नियम 289 प्रस्ताव ऑन लेग असतांना, त्या दिवशी अशा प्रकारचा निर्णय झाला असतांना, हा निर्णय होत असतांना विधिमंडळाचं सर्व अधिका-यांना यासंदर्भात सूचना दिल्या असतांना आजच्या कार्यक्रमपत्रिकेत नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव पहिल्यांदा कसा काय दिलेला आहे? अधिका-यांनीच ही कामकाज पत्रिका बनवलेली आहे अशा प्रकारची कार्यक्रम पत्रिका बनवण्याची त्यांना प्रेरणा कोणी दिली, सभागृहाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न कोण करीत आहे या सर्वांचा तपास होण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे यासंदर्भात मला नम्रपणे असे सूचवावयाचे आहे की, गरीब शेतक-यांना कर्जाच्या खाईतून बाहेर काढण्यासाठी आम्ही जो नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव दिला होता तो पहिल्यांदा घ्यावा व या प्रस्तावावर चर्चा होऊन उत्तर आल्यानंतर नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव घेतला व त्यावर साधक बाधक चर्चा झाली तरी त्याला आमची हरकत राहणार नाही. साधक बाधक चर्चा होण्यासाठीच हे सदन आहे, सदनाचा मूळ उद्देश तोच आहे. महाराष्ट्राच्या शेतक-यांच्या जीवनमरणाचा प्रश्न ऐरणीवर असतांना, शेतक-यांच्या रोज आत्महत्या होत असतांना सदनाची दिशाभूल करण्याचा निर्णय कशासाठी घेतला आहे याचाही खुलासा होण्याची आवश्यकता आहे. माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय उपमुख्यमंत्री सदनात असतांना शेतक-यांच्या प्रश्नावर चर्चा घडवून आणावी अशा प्रकारची मागणी आम्ही मंगळवारी केली होती. नियम 289 चा प्रस्ताव ऑन लेग असतांना त्याला कामकाजपत्रिकेत दहाव्या क्रमांकावर दाखवण्यात आलेले आहे. शेतक-याच्या जीवन मरणाच्या प्रश्नावर चर्चा होईल त्या दिवशी दुसरे कोणतेही कामकाज न होता केवळ शेतक-यांच्या जीवन मरणाच्या प्रश्नावरच चर्चा घ्यावी अशा प्रकारची माझी विनम्र सूचना आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य नितीन गडकरी यांनी जो हरकतीचा मुद्दा मांडला त्याला पाठिंबा देऊन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, शेतक-यांच्या जीवन मरणाच्या प्रश्नाच्या संदर्भात जेव्हा चर्चा झाली होती तेव्हा आपण सुध्दा त्या चर्चेच्या वेळी उपस्थित होता. त्यामुळे शेतक-यांच्या जीवन मरणाच्या प्रश्नाच्या संदर्भात आजच्या कामाकाजाच्या सुरुवातीलाच या विषयावरील चर्चा सुरु करण्यासाठी, आपण माननीय सभापती महोदयांबरोबर चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करावी अशी माझी विनंती आहे. मला आपल्यावर टीका टिपणी करवयाची नाही. आजच्या कामकाज पत्रिकेत जो बदल झालेला आहे तो नजरचुकीने सुध्दा होऊ शकतो, त्यामुळे माननीय सभापती महोदयांशी यासंदर्भात बोलून निर्णय घ्यावा अशी विनंती आहे. शेतक-यांच्या आत्महत्याचा विषय हा संवेदनशील विषय आहे.

यानंतर श्री. अजित.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

त्यांच्या कर्ज मुक्तीचा प्रश्न सर्वांच्या जिव्हाळ्याचा आहे. अल्प संख्याकांच्या विकासाचा प्रश्न देखील महत्वाचा आहे. त्यास आमचा विरोध नाही. त्यावर चर्चा करण्याची आमची सुध्दा इच्छा आहे. आमचा विरोध फक्त कामकाजपत्रिकेत क्रम दाखविण्यात आलेला त्यास आहे. आम्ही नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला असताना आणि माननीय सभापतींकडे झालेल्या मिटींगमध्ये ठरलेले असताना, त्यास बगल देऊन सभागृहाची प्रॉपर्टी कुठे रिजेक्ट झाली हे आम्हास समजले पाहिजे. तेव्हा माझी आपणास विनंती आहे की, आपण या संदर्भात निर्णय द्यावा किंवा सभागृहाचे कामकाज दहा मिनिटांकरिता स्थगित करून माननीय सभापतींकडे चर्चा करु या.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनामध्ये नियमांची दिशाभूल करण्याची एक नवीन प्रथा आपण का करीत आहोत हे मला माहीत नाही. आम्ही माननीय सभापतींच्या विरोधात अविश्वासाचा प्रस्ताव दिलेला आहे. याठिकाणी अशापध्दतीचे वातावरण का निर्माण होते हे मला समजत नाही. या आसनावरून माननीय सभापतींनी निर्णय दिला होता की, नियम 289 अन्वये दिलेला प्रस्ताव संवेदनशील आहे यास मी सहमत आहे आणि या चर्चेला माझ्याकडून मान्यता देत आहे. त्यावेळी त्यांनी नियम 289 वाचला होता. तो नियम पुढीलप्रमाणे म्हटले आहे :-

"कोणत्याही सदस्यास सभापतींच्या संमतीने कोणताही नियम विधानपरिषदेपुढील कोणत्याही विशिष्ट प्रस्तावास तो लागू करतांना स्थगित करण्यात यावा असा प्रस्ताव मांडता येईल आणि प्रस्ताव संमत झाला तर संबंधित नियम त्या वेळेपुरता स्थगित होईल."

माननीय सभापतीनी त्या दिवसाचे कामकाज स्थगित करून त्यांची शेतकऱ्यांबद्दल असलेल्या संवेदनेस मान्यता दिली होती. नियम 289 मध्ये एक वाक्य आहे की, "..... आणि प्रस्ताव संमत झाला तर संबंधित नियम त्या वेळेपुरता स्थगित होईल."

सभापती महोदय, याठिकाणी कृतज्ञता व्यक्त करतो की, सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना आम्ही दिलेल्या प्रस्तावाच्या बाजूने होत्या. शेतकऱ्यांबद्दल सरकार काय भूमिका घेते हा सरकारचा विषय आहे. त्या दिवशी सर्व पक्षाच्या सदस्यांनी शेतकऱ्यांबद्दलच्या भावनास मूक संमती दिली होती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

याबद्दल मी पुनश्च कृतज्ञता व्यक्त करतो. तेव्हा सभागृहापुढे अत्यंत महत्वाचा विषय असताना आणि अधिवेशन सुरु झाल्यापासून चार दिवसांत सात शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या असताना या अधिवेशनात तरी आम्हा शेतकऱ्यांना कर्ज मुक्ती मिळेल या अपेक्षेने शेतकरी पाहत आहेत.....

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी मांडलेल्या हरकतीच्या मुद्यावर मी बोलत आहे. हरकतीच्या मुद्यावर हरकत घेता येत नाही आणि या सभागृहाचा तसा नियम देखील नाही असे मला वाटते.

सभापती महोदय, आम्ही नियम 289 अन्वये अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नावर प्रस्ताव दिलेला असताना कामकाजपत्रिकेवर प्रथम नियम 260 अन्वये प्रस्ताव दाखविण्यात आलेला आहे. नियम 260 हा सार्वजनिक हितसंबंधांच्या बाबीवरील चर्चेचा आहे. आम्ही दिलेला विषय देखील सार्वजनिक हिताचा आणि सर्वांच्या दृष्टीने जिव्हाळ्याचा आहे. हे दोन्ही विषय महत्वाचे असले तरी सचिवांनी काय मार्गदर्शन केले हे मला माहीत नाही. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सूचना केल्याप्रमाणे आपण दहा मिनिटांकरिता सभागृहाचे कामकाज स्थगित करून आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेचा क्रम काही नजर चुकीने झाला असेल तर ते पहावे अशी मी आपणास विनंती करतो.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, याठिकाणी उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांवर माननीय सभापती निर्णय देतील, त्याविषयी मी बोलत नाही.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे...

परंतु याचा अर्थ या बाजूच्या सत्ताधारी बाकावरील सन्माननीय सदस्यांची मुकसंमती आहे असा होत नाही.

श्री.दिवाकर रावते : ठीक आहे. ते परत घेऊ.

श्रीमती उषाताई दराडे : शेतकऱ्यांच्या आत्महत्या बंद होण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्याचा मुद्दा वेगळा आहे. परंतु कोणत्या विषयावर केव्हा चर्चा घ्यायची हा माननीय सभापतींचा अधिकार असतो. त्यामुळे सन्माननीय सदस्य सांगतात, त्याप्रमाणे सत्ताधारी बाकावरील सन्माननीय सदस्यांची मुकसंमती होती, असा त्याचा अर्थ होत नाही. अशाप्रकारचे माझे सबमिशन आहे. याबाबत कुठल्या पध्दतीने चर्चा घडवून आणावयाची हा माननीय सभापतींचा अधिकार आहे.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, मी या विषयावर जास्त बोलू इच्छित नाही. याठिकाणी सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी जी सूचना केली त्यामध्ये थोडा बदल करुन त्यांची सूचना मान्य करावी, अशी माझी विनंती आहे. त्यांनी सूचना केली की, 10 मिनिटांकरिता सभागृहाची बैठक स्थगित करुन माननीय सभापतींच्या दालनांत गटनेत्यांची बैठक घ्यावी व निर्णय घ्यावा. याबाबत माझे असे म्हणणे आहे की, सभागृह स्थगित न करता गटनेत्यांची बैठक घ्यावी. सभागृहाची बैठक स्थगित करु नये.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, याठिकाणी नियमाचा मुद्दा असून हा विषय जिवंत आहे. परवा सभागृहामध्ये नियम क्रमांक 289 प्रमाणे सभागृहाचे सर्व कामकाज स्थगित करुन शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमुळे निर्माण झालेला कर्जमुक्तीचा विषय जिवंत आहे व तो हाऊसची प्रॉपर्टी झालेला आहे. परंतु कै.प्रमोद नवलकरांचे निधन झाल्यामुळे काल सभागृहामध्ये आम्ही हा विषय काढला नाही. त्यावेळी माननीय सभापतींनी याच खुर्चीवर बसून सांगितले होते की, आपल्या विषयावर चर्चा झाली पाहिजे. परंतु आज मुख्यमंत्री येथे उपस्थित नाहीत, ते समोर असताना चर्चा झालेली योग्य होईल. समजा, काल कै.नवलकरांचे निधन झाले नसते तर कालच या विषयावर चर्चा होणार होती. कै.नवलकरांचे निधन झाल्यामुळे काल आपण सभागृहामध्ये दुसरे कामकाज घेतलेले नाही. परंतु याठिकाणी माननीय श्री.राणे साहेबांच्या म्हणण्यानुसार जर त्यांची सूचना मान्य केली तर तो नियमांचा भंग होईल. नियम 289 चा जो प्रस्ताव आहे, तो हाऊसची प्रॉपर्टी झालेला आहे. त्या कन्व्हर्जनचे माननीय सभापतींकडून प्रथम रिजेक्शन व्हावयास पाहिजे,

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

परंतु तसे झालेले नाही. विषय आपण ॲक्सेप्ट केलेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा विषय जिवंत असताना आपण याठिकाणी दुसऱ्या विषयावर चर्चा घेणे नियमबाहय होईल, असे माझे मत आहे.

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.नितीनजी गडकरी यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे, त्याबाबत मी बोलणार आहे. त्यांनी याठिकाणी असा मुद्दा उपस्थित केला की, सभागृहासमोर आता कोणता विषय आणि कोणता प्रस्ताव जिवंत आहे आणि त्या जिवंत प्रस्तावावर चर्चा चालू असताना दुस-या विषयावर चर्चा करण्यात येऊ नये. सभापती महोदय, या सभागृहामध्ये येऊन मला एकच वर्ष झालेले आहे. परंतु या एका वर्षामध्ये मी पाहिलेले आहे की, ज्यावेळी या सभागृहामध्ये सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मराठीच्या प्रस्तावावरील चर्चा घडवून आणली, त्यावेळी त्या प्रस्तावावर चर्चा चालू असताना अन्य किती प्रस्तांवावर चर्चा घेण्यात आली याचे त्यांनी स्मरण करावे. त्यावेळी सभागृहामध्ये भिवंडी नगरपालिकेतील कचऱ्यासंबंधीच्या प्रस्तावावर चर्चा घेण्यात आली होती, ती चर्चा 3-3 अधिवेशनांमध्ये पुढे गेली होती. नंतर त्या विषयावर चर्चा झालेली असून याचे स्मरण सन्माननीय सदस्यांनी करावे. कोकणातील प्रश्नांसंदर्भात....(अडथळा) कोणत्या प्रस्तावावरील चर्चेस प्राधान्य द्यावे व कोणत्या प्रस्तावास प्राधान्य देऊ नये, याबाबतचा निर्णय हा पीठासीन अधिकाऱ्यांचा आहे. याठिकाणी माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, माननीय सभापती महोदयांनी शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भातील प्रस्तावावरील चर्चेस नकार दिलेला नाही. नियम 289 अन्वये त्यांनी तो प्रस्ताव स्वीकारलेला आहे. म्हणून हासुध्दा अधिकार माननीय सभापतींचा असल्याने कोणता प्रस्ताव पहिल्यांदा घ्यावा, या दृष्टीकोनातूनच त्यांनी ही विशेष बैठक घेतलेली आहे. त्यामुळेच त्यांनी सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांचा प्रस्ताव विशेष बैठकीमध्ये घेतलेला आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की, प्रथम आपण या विषयावर चर्चा घ्यावी व नंतर शेतकऱ्यांच्या आत्महत्ये विषयीच्या प्रस्तावावर चर्चा घ्यावी.

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी नियम क्रमांक 289 चा उल्लेख केला. त्यांचे असे म्हणणे आहे की, 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे व तो ऑन लेग असल्यामुळे त्यावर प्रथम चर्चा व्हावयास पाहिजे.

नंतर श्री.रोझेकर.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ.....

सभापती महोदय, महाराष्ट्र विधानपरिषद नियम 289 मी या ठिकाणी वाचून दाखवितो. तो असा आहे की, "कोणत्याही सदस्यास सभापतींच्या संमतीने कोणताही नियम विधानपरिषदेपुढील कोणत्याही विशिष्ट प्रस्तावास तो लागू करतांना स्थगित करण्यात यावा असा प्रस्ताव मांडता येईल आणि प्रस्ताव संमत झाला तर, संबंधित नियम त्या वेळेपुरता स्थगित होईल" अन्य नियम स्थगित करण्यासंदर्भातील हा नियम आहे. परंतु, सभागृहात जी चर्चा घेतली जाते ती नियम 260 अन्वये किंवा नियम 91 अन्वये किंवा इतर नियमान्वये घेतली जाते. त्यामुळे चर्चा घेण्याचे नियम वेगळे आहेत. नियम 289 एवढेच सांगतो की, माझा विषय जो मी उपस्थित केला आहे, तो सभागृहात ताबडतोब चर्चेस यावयास हवा, नियम 289 अन्वये अन्य नियम स्थगित करावेत, माझा विषय अन्य विषयांच्या अगोदर चर्चेला घ्यावा, असा त्याचा अर्थ आहे. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.नितीन गडकरी यांनी नियम 289 चा अर्थ काय लावला, हे मला माहित नाही. परंतु, वस्तुस्थिती ही अशी आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, एखाद्या सन्माननीय सदस्याने नियम 289 अन्वये प्रस्ताव दिल्यानंतर तो रिजेक्ट करावा वा मान्य करावा, हे माननीय सभापतींचे अधिकार आहेत. सन्माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ यांनी नियम 289 चा जो अर्थ सांगितला आहे, तोही बरोबर आहे. परंतु, एकदा नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव मान्य झाल्यानंतर त्या विषयावर चर्चा झाली पाहिजे, असे आम्ही सांगितले. ज्यावेळी नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाबाबत सभागृहात चर्चा झाली त्यावेळी माननीय सभापती महोदयांनी सांगितले होते की, प्रिन्सिपली मान्य आहे कारण हा विषय महत्वाचा आहे. हा प्रस्ताव रिजेक्ट केल्याचे त्यावेळी माननीय सभापतींनी सांगितले नव्हते. त्यानंतर सभागृहाचे कामकाज दिवसभरासाठी स्थगित झाले. सभागृहात आलेला हा विषय हाऊसची प्रॉपर्टी झाला. एकदा हाऊसची प्रॉपर्टी झालेला विषय रिजेक्ट करावयाचा असेल तर सभागृहातच करावा लागतो. समजा हा विषय हाऊसची प्रॉपर्टी झाला नसता आणि माननीय सभापतींनी त्यांच्या चेंबरमध्ये हा विषय रिजेक्ट केला असता तर तो त्यांचा अधिकार आहे. परंतु, एकदा हा विषय हाऊसची प्रॉपर्टी झाल्यानंतर व माननीय सभापतींनी हा विषय अद्याप सभागृहात रिजेक्ट केलेला नसल्यामुळे अद्याप तो जीवंत आहे. सन्माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ यांनी नियम 289 चा जो अर्थ सांगितला आहे, तोही बरोबर आहे.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

सभापती महोदय, आता दुसरा विषय असा आहे की, याच विषयावर माननीय सभापती महोदयांच्या दालनात बैठक झाली, त्याचा उल्लेख या ठिकाणी करणे बरोबर होणार नाही. सत्तारुढ पक्षाचे नेते आणि विरोधी पक्षाचे गटनेते चर्चेसाठी एकत्र बसले होते, माननीय उपसभापती महोदयही त्या बैठकीला उपस्थित होते. त्या बैठकीत असा मार्ग निघाला की, माननीय मुख्यमंत्री व माननीय उपमुख्यमंत्री आज उपस्थित नाहीत, हा विषय महत्वाचा आहे, चर्चा करण्याची सत्तारुढ पक्षाची तयारी आहे, या चर्चेला उत्तर देण्याकरीता माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री उपस्थित असतील त्यावेळी चर्चा करणे योग्य होईल. काही कामानिमित्ताने माननीय मुख्यमंत्री व माननीय उपमुख्यमंत्री बाहेर गेले होते, त्यामुळे आम्ही या सूचनेला संमती दिली. असे ठरले की, माननीय मुख्यमंत्री व माननीय उपमुख्यमंत्री येतील त्यावेळी त्यांच्या उपस्थितीत चर्चा करावी. अशारितीने नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाचा विषय जीवंत होता, तो रिजेक्ट झाला नव्हता. सभापती महोदय, पुढील परिस्थिती अशी बदलली की, काल अचानक ज्येष्ठ नेते श्री.प्रमोद नवलकर यांचे दु:खद निधन झाले. या सभागृहाचे असे संकेत आहेत की, सभागृहात शोकप्रस्ताव मांडल्यानंतर कोणताही महत्वाचा विषय असला तरी शोक प्रस्तावाव्यतिरिक्त कोणत्याही विषयावर सभागृहात बोलावयाचे नसते. या संकेतांचा आदर करुन आम्ही काल एक शब्दही काढला नाही. सभागृहाच्या नेत्यांनी शोक प्रस्ताव मांडला, विरोधी पक्षाने अनुमोदन दिले, शोक प्रस्ताव संमत झाला, सभागृहाने दिवंगत प्रमोद नवलकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आणि सभागृह दिवसभरासाठी स्थगित झाले.

सभापती महोदय, आज अधिवेशनाचा तिसरा दिवस सुरु झाला. काल आम्ही विषय काढू शकलो नाही, काढावयास हवा होता. परंतु, सभागृहाच्या प्रथा, परंपरा व संकेत लक्षात घेऊन हा विषय काढणे आम्हाला अप्रस्तुत वाटले. नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावावर हा विषय किती तातडीचा आहे वगैरे म्हणणे आम्ही मांडले, हा विषय हाऊसची प्रॉपर्टी झाला, माननीय सभापतींनीही प्रिन्सिपली मान्य केले, विषय रिजेक्ट केला नाही. एवढेच नव्हे तर, माननीय सभापतींच्या दालनात जी बैठक झाली त्यामध्येही त्यांनी या विषयावर चर्चा झाली पाहिजे, असे सांगितले. माननीय मुख्यमंत्री येतील त्यावेळी चर्चा घेण्यास संमती दिली, विरोधी पक्ष, सत्तारुढ पक्ष

..3.....

अशासकीय प्रत / ऑफ रेकॉर्ड नाही

श्री.नितीन गडकरी.....

यांची सहमती झाली व निर्णय झाला. आज पुन्हा फ्रेश सभागृह सुरु झाले आणि अचानक कार्यक्रम पत्रिका बदलली. काही तांत्रिक कारणांमुळे राहून गेले असेल म्हणून मी कोणाला दोष देणार नाही. आम्हालाही हे वाटते की, अल्पसंख्यांकांचा विषय महत्वाचा आहे. हा विषयही महत्वाचा असल्यामुळे त्या विषयावरील चर्चेला आमचे समर्थन आहे. परंतु, एक प्रस्ताव ज्याला आम्ही आधार दिला होता, चार शेतक-यांनी परवा आत्महत्या केली, गेल्या आठवडयात 37 शेतक-यांनी आत्महत्या केल्या, विषय तातडीचा आहे, चर्चेला आधार आहे, गंभीर परिस्थिती असल्यामुळे माननीय सभापतींनीही प्रिन्सिपली या विषयावरील चर्चा स्वीकारली होती. त्यामुळे या प्रस्तावावर चर्चा झाल्यानंतर अन्य कामकाज घेण्यास आमची काहीही हरकत नाही. म्हणून माझी माननीय सभापतींना विनंती आहे की, शेतक-यांच्या आत्महत्यांचा विषय संवेदनशील आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी दाखविलेल्या संवेदनशीलतेबाबत त्यांना मी धन्यवाद देतो. त्यांचे अभिनंदन यासाठी करतो की, त्यांनी अतिशय चांगला विषय मांडला. अशी संवेदनशीलता दाखविणा-या नेत्यांचे अभिनंदन केले पाहिजे. या विषयावर केवळ त्याच संवेदनशील आहेत, सत्तारुढ पक्षच संवेदनशील आहे असे नाही तर आम्हीही तेवढेच संवेदनशील आहोत. हा विषय आम्हालाही तेवढाच महत्वाचा वाटतो. त्यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या भावना व्यक्त केल्या, लोकशाहीची बूज ठेवली, त्यामुळे त्यांचे अभिनंदन करतो आणि अशा संवेदनशील मनाला धन्यवाद देतो. त्यामुळे दोन्ही बाजुचे सन्माननीय सदस्य एकमताचे असल्यामुळे प्रथम शेतक-यांच्या आत्महत्यासारख्या संवेदनशील विषयावर चर्चा घ्या आणि त्यानंतर पुढचे कामकाज घ्या. दोन्ही बाजुच्या सदस्यांचे एकमत असल्याने व ते संवेदनशील असल्यामुळे शेतक-यांची आत्महत्या या विषयावरील चर्चा आता सुरु करावी, अशी माझी विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.बोरले.....

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मला प्रामुख्याने दोनच गोष्टींचा उल्लेख करावयाचा आहे. मला विधानपरिषद नियम 289 आणि विधानपरिषद नियम 260 संदर्भात बोलावयाचे आहे. ज्या परिस्थितीमध्ये नियम 289 रद्द करुन सभागृहातील इतर कामकाज बाजूला ठेऊन ही जी चर्चा घेण्याचा निर्णय झाला तो या सभागृहामध्ये झाला आणि सभापती महोदय आपणही त्याला मान्यता दिलेली आहे. नियम 289 चा प्रस्ताव लेगवर असतांना सभागृहातील इतर कामकाज रद्द करुन तो प्रस्ताव घ्यावा, त्याला प्रायॉरिटी द्यावी अशा प्रकारची चर्चा झालेली असतांना आज सभागृहाची विशेष बैठक सकाळी 10.00 वाजता बोलाविण्यात आली. खरे म्हणजे शेतक-यांचा प्रश्न चर्चेला यावयास पाहिजे होता. परंतु तो चर्चला आला नाही. आजच्या कार्यक्रम पत्रिकेवर नियम 260 अन्वये प्रस्ताव दाखविलेला आहे. नियमाप्रमाणे 289 चा प्रस्ताव सभागृहामध्ये असतांना नियम 260 अन्वये दुसरा प्रस्ताव चर्चेला घेणे उचित नाही. माझी आपल्याला अशी विनंती आहे की, नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावावरील चर्चा होऊ द्या आणि त्यानंतर इतर प्रस्तावांवर चर्चा घ्यावी. त्या चर्चेमध्ये आम्ही देखील सहभागी होऊ. त्या प्रस्तावावर सभागृहामध्ये जी मते व्यक्त होतील त्या पद्धतीने आम्ही सुध्दा आमची मते व्यक्त करु आणि तो लोकप्रतिनिधींचा अधिकार आहे. सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे म्हणाल्या की, त्यांची मुक संमती आहे याचा अर्थ संमती असा धरता येणार नाही, असा त्यांनी त्याचा अर्थ लावला. मग नियम 289 च्या प्रस्तावाला तुमचा विरोध होता असा आम्ही त्याचा अर्थ लावायचा काय ? याचा खुलासा व्हावा एवढीच माझी विनंती आहे.

श्री.धोंडीराम राठोड : सभापती महोदय, ही सभागृहाची विशेष बैठक आहे. अल्पसंख्यांकांच्या महत्वाच्या प्रस्तावावर चर्चा होऊ द्यायची नाही, असे विरोधी पक्षाच्या सदस्यांना वाटते काय ? शेतकरी आमचे सुध्दा आहेत आणि तुमचे सुध्दा आहेत. मग आम्ही दिलेल्या नियम 260 च्या प्रस्तावावर तुम्ही चर्चा का होऊ देत नाहीत.

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, शेतक-यांचा प्रश्न महत्वाचा आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हा शेतक-यांचा अपमान आहे. एकाही मुसलमानाची आत्महत्या झालेली नाही. तुम्ही चाटुगिरी करता काय ? हे बरोबर नाही.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, शेतक-यांच्या आत्महत्या सत्ताधारी पक्षाला महत्वाच्या वाटत नसतील तर त्यांनी तसे सांगावे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आमच्यावर असा हेत्वारोप केलेला आहे की, अल्पसंख्यांकांच्या प्रस्तावावर चर्चा होऊ नये म्हणून आम्ही हे करीत आहोत. परंतु याच सभागृहाच्या सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी संवेदनशील मनाचा परिचय दिला. त्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सन्माननीय सदस्या आहेत. कदाचित शेतक-यांच्या आत्महत्यांच्या प्रश्नाबाबत राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस पक्षामध्ये अंतर असण्याची शक्यता आहे की काय, याची मला माहिती नाही. पण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सदस्यांनी शेतक-यांच्या आत्महत्यांच्या प्रश्नाबद्दल संवेदनशीलतेचा परिचय दिल्यावर काँग्रेस पक्षाचे सदस्य उभे राहून त्यांच्यावर हेत्वारोप करतात की, त्यांनी या विषयावर चर्चा करु नये, हे बरोबर नाही. सभापती महोदय आम्ही अल्पसंख्यांकांच्या प्रस्तावावरील चर्चेला तयार आहोत. आम्हाला वक्फ बोर्डाचा घोटाळा बाहेर काढायचा आहे, ज्यांनी कब्रस्तान, इदगाह, दर्ग्याच्या जमिनी हडप केलेल्या आहेत त्याचा घोटाळा आम्हाला बाहेर काढायचा आहे. मुसलमानांना मुक्त करायचे आहे, त्यांना न्याय मिळवून द्यायचा आहे. मुसलमानांना न्याय मिळवून देण्यामध्ये आम्ही सहभागी आहोत. परंतु सभापती महोदय, हा आरोप बरोबर नाही. हा आरोप रेकॉर्डवरुन काढून टाकावा.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापति महोदय, यह प्रस्ताव मंगलवार को भी आया था. मंगलवार के दिन सभागृह में श्रद्धांजलि का कोई प्रस्ताव नहीं था. फिर भी 289 का प्रस्ताव आने की वजह से सभागृह का कामकाज पूरा नहीं हो पाया. सच्चर कमेटी का नाम आता है तो इस तरह से किया जाता है. यह सब जानबूझकर किया जा रहा है सच्चर कमेटी के बारे में यदि इनके दिल में मोहब्बत होती.....

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

सभापती : कृपया सन्माननीय सदस्यांनी जागेवर बसावे.

यानंतर कु.जयश्री.....

अशुद्धित प्रत / शीघ्रलेखाची नाही

(गोंधळ)

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी उठून बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.अरविंद सावंत : जानबुझकर..... जानबुझकर ? शेतक-यांच्या आत्महत्येचा विषय हा जानबुझकर मध्ये आणला ? अस कसं म्हणू शकता आपण ?

सभापती : अशा परिस्थितीमध्ये मला सभागृहाचे कामकाज करणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 10 वाजून 31 मिनिटांनी 10 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

यानंतर श्री.गागरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थागितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

उपसभापती : आता ज्या विषयावर सभागृहात चर्चा सुरु होती. त्याबाबत माननीय सभापती महोदयांच्या दालनात सर्वपक्षीय नेत्यांची बैठक चालू आहे. ही बैठक संपल्यानंतर सभागृहाचे कामकाज साधारणत: 11.00 वाजता सुरु होईल. त्यामुळे सभागृहाची बैठक मी 15 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 10 वाजून 43 मिनिटांनी 15 मिनिटांसाठी स्थगित झाली)

.....यानंतर कु.धनश्री

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

उप सभापती : माननीय सभापतींच्या दालनात या विषयाच्या संदर्भात अजूनही चर्चा सुरु आहे. माननीय सभापतींनी बोलावलेल्या बैठकीला, सत्ताधारी पक्षाच्या गट नेत्यांनी हजर राहावे अशी मी विनंती करतो. सदर बैठक सुरु असल्यामुळे मी सभागृहाची बैठक पंधरा मिनिटाकरीता स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक 11 .00 वाजता 15 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभागृह स्थगितीनंतर ---)

सभापतीस्थानी - माननीय उपसभापती

उपसभापती : मी सभागृहापुढील कामकाजास सुरूवात करतो. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी त्यांचा प्रस्ताव मांडावा. ...

(सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान प्रस्ताव मांडण्यास उभ्या राहतात ..)

(विरोधी पक्ष सदस्य त्या विरोधात 'वेल'मध्ये येऊन घोषणा देऊ लागतात .. अडथळा ..)

उपसभापती : प्रथमत: सर्व सन्माननीय सदस्यांनी आपापल्या जागांवर जाऊन शांत बसावे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, माननीय सभापतींच्या दालनामध्ये या विषयाच्या संदर्भात जी सर्व पक्षीय गटनेत्यांची बैठक झाली त्या बैठकीमध्ये या विषयवर संपूर्ण चर्चा झाली. त्यामध्ये असे ठरविण्यात आले की, 289 अन्वये दिलेला जो प्रस्ताव आहे तो विधान परिषदेचे नियमित कामकाज सुरू झाल्यानंतर म्हणजेच प्रश्नोत्तराचा तास झाल्यानंतर घेण्यात येईल. तेव्हा आता मी सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांना विनंती करतो की, त्यांनी आपला प्रस्ताव येथे मांडावा.

(विरोधी पक्ष सदस्य 'वेल' मध्ये येऊन घोषणा देऊ लागतात .... गोंधळ ...)

पृ.शी. : सच्चर समितीच्या शिफारशी राज्यात अमलात आणणे.

मु.शी. : सच्चर समितीच्या शिफारशी राज्यात अमलात आणणे याबाबत श्रीमती फौजिया खान, सर्वश्री कपिल पाटील, अरूण गुजराथी, मुझफ्फर हुसेन, जैनुद्दीन जव्हेरी, एम.ए.अजीज, उल्हास पवार, भास्कर जाधव, राजन तेली, गिरीश गांधी, प्रतापसिंह मोहिते-पाटील, यशवंतराव गडाख, सुधाकर गणगणे, रणजितसिंह मोहिते-पाटील, जितेंद्र आव्हाड, संजय दत्त, श्रीमती उषा दराडे, श्रीमती सुधा जोशी, श्रीमती मंदा म्हात्रे, वि.प.स. यांचा नियम 260 अन्वये प्रस्ताव.

--

(यानंतर श्री. सरफरे .... के 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

Formatted: Left

(विरोधी पक्षाचे माननीय सदस्य "वेल" मध्ये उभे राहून घोषणा देतात.)

(गोंधळ व घोषणा)

प्रा. फौजिया खान (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडते.

"राज्यातील लोकसंख्येच्या 10 टक्क्यांहून अधिक असलेला मुस्लिम समाज शैक्षणिक, सामाजिक, आर्थिकदृष्टया मागासलेला असणे, मुस्लिम ओबीसींच्या सवलती लागू करुनही त्यांची अंमलबजावणी न होणे, जात पडताळणीमध्ये निर्माण होणारे अडथळे, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाची अपूरी तरतूद आणि तिही पूर्ण खर्च न होणे, प्रशासनातला या समाजाचा 2 टक्क्यांहून कमी असलेला वाटा, मुस्लिम ओबीसी, दलित मुस्लिम आणि एकंदर मुस्लिम स्त्रिया यांचे शिक्षणातले अतिशय खालावलेले प्रमाण, उच्च शिक्षणाच्या समान संधीचा अभाव असणे, सच्चर कमिटीने मागासवर्गीय मुस्लिमांचा प्रश्न अधोरेखित करणे, परिणामी सच्चर कमिटीच्या शिफारशी राज्यात अंमलात आणण्याची आवश्यकता, दलितांमधील आणि भटक्या-विमुक्तांमधील मुस्लिमांची स्थिती अत्यंत अवनत होणे, या विशिष्ट वर्गासाठी (मुस्लिम दलित व मुस्लिम भटके-विमुक्तांसाठी) छत्रपती शिवरायांचे निष्ठावान सहकारी वीर मदारी मेहतर यांच्या नावाने स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्याची तसेच दलित मुस्लिमांचा समावेश अनुसूचित जातीत करण्यासाठी राष्ट्रपतींना शिफारस करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने दखल घेऊन तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

(गोंधळ व घोषणा)

(सत्ताधारी पक्षाचे माननीय सदस्य उभे राहून घोषणा देतात.)

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

सभापतीस्थानी माननीय उपसभापती

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्रीमती फौजीया खान यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय माननीय सभापतींच्या आसनासमोरील वेलमध्ये येऊन जोरजोराने घोषणा देत असतात.)

श्रीमती फौजीया खान : जो 15 पॉइंट प्रोगाम है, उस पर राज्य सरकार को अमल करना चाहिए. सच्चर समिती की 2 टाईप की शिफारस है, General policy Initiatives and Specific Policy Initiatives. मेरा यह मुद्दा है कि General policy Initiatives के संबंध में सच्चर समिति ने जो सिफारिशें की है, वे मुस्लिम समाज के हित में तो है ही बल्कि सभी समाज के हित में भी है. क्योंकि उन सिफारिशों में कहा गया है कि National Data Bank बनाया जाना चाहिए. जिसके अन्तर्गत निम्न सिफारिशें की गई है, Resources and authority to access data from agencies* government departments.

Assessment and Monitoring Authority :- evaluate development benefits to different SRCs through various programs.

Enhancing legal basis for providing equal opportunities: - to eliminate Perception of discrimination.

Equal opportunity Commission: - Grievances of deprived groups UK Relation Act, 1976.

Enhancing participation in Government

Formulating and implementing new nomination procedures - appropriate State Laws like Andhra Pradesh ensure minority representation in local bodies.

Establishing a more rational procedure for delimitation of Constituencies.

shared spaces

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय माननीय सभापतींच्या आसनासमोरील वेलमध्ये येऊन जोरजोराने घोषणा देत असतात.)

Linking Incentives to Diversity: - 'Diversity Index' Incentives

Common public spaces sensitization Related Initiatives - Remedial Classes, reading rooms Health Personnel, teachers, police, Security Personnel

दुसरी Specific Policy Initiatives है. इसके अन्तर्गत निम्न सिफारिशें की गई है,

Education - Free Education in respect of State

Content of Textbooks :- Process of Scrutiny Community Study Centers, High quality Government Schools, Girl School, Urdu Schools

Technical training: - Education for non-matriculates and dropouts

Pre entry to IITS VIII- Must Focus on emerging market needs.

extended to madarasas

Initiatives for Higher Education: - Diversity Admission to most backward in recognized universities to alternate administration criteria.

Hostels / Boarding Houses इ Special funds

Teacher training programmes

Interventions to support urdu medium: - 3 lg. formula Teachers, Textbooks Optional Subject.

Madarasas : Mainstream education : - Link to required education Recognition of Madarasas eligibility for civil resources,

Enhancing access to bank Credit Government Programs :- Simple regulation on the lines of one adopted by U.S.

Open branches - Sanctions or disbursements for minorities in reports

Entrepreneurial Trainings - NABARD

श्रीमती फौजीया खान..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

Micro credit scheme, Selection Panels, 15 point Program - 20 % Minority population units, blocks, Centrally sponsored Schemes, Centrally Planned Scheme, Interventions skill based,Infrastructure Development, Community Initiative.

इन सब सिफारिशों पर पूरी तरह अमल किया जाना चाहिए, यह हमारी मांग है. इन सिफारिशों पर शासन कुछ नहीं कर रहा है ऐसा नहीं है. शासन कर रहा है.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनासमोरील वेलमध्ये येऊन जोरजोराने घोषणा देत असतात.)

यानंतर श्री भोगले.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

(सत्ताधारी पक्षाच्या बाजूने अनेक सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात)

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित करण्याची परवानगी मागितली आहे, मी ती निश्चितपणे देईन. परंतु मी या ठिकाणी सभागृहाचे कामकाज चालवित असताना आपले म्हणणे ऐकून घेण्यासाठी सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना शांतता बाळगण्याची विनंती केली आहे. हरकतीच्या मुद्यावर माझा निर्णय दिल्यानंतर सभागृहाचे कामकाज सुरळीतपणे चालविण्यासाठी सहकार्य करावे एवढीच माझी विनंती आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी हरकतीचा मुद्दा मांडावा.

श्री दिवाकर रावते : आपके समाज में चार शादी करने की इज़ाजत है.....

श्री जैनुद्दीन जव्हेरी : आपने गुजरात में दंगों में मुस्लिम समाज के लोगों को मार डाला. क्या उस समय हमारे समाज के महाराष्ट्र के लोगों ने यहां कुछ बोला ? सम्माननीय सदस्य श्री पाशा आप कुछ बोलिए न, हिजड़ा बना दिया .... क्या हम किसी समाज का विरोध कर रहे हैं ?

श्री अनिस अहमद : सम्माननीय सदस्य श्री रावते जी को मुस्लिम समाज की माफी मांगनी चाहिए.

उपसभापती : याठिकाणी जे वक्तव्य करण्यात आलेले आहे ते रेकॉर्डवरुन काढण्यात येईल.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मला हरकतीचा मुद्दा मांडू द्यावा.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

उपसभापती : मी सभागृहाची बैठक दुपारी 12.00 वाजेपर्यंत तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 11 वाजून 53 मिनिटांनी दुपारच्या 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

(गोंधळ)

उपसभापति: आपको सभागृह चलाना है या बंद करना है ?

(गोंधळ)

उपसभापति : वही चल रहा है. उन्होंने पाईंट ऑफ आर्डर निकाला तो मैंने उनको बोला कि आप बोलिए.

(गोंधळ)

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी हरकतीच्या मुद्यावर विचार मांडण्यासाठी उभा आहे. या सदनामध्ये गंभीर वातावरण निर्माण झाले आहे किंवा गंभीर वातारण निर्माण केले गेले आहे असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही. खरे म्हणजे आम्ही नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव शेतक-यांच्या कर्जमाफीसाठी दिला होता. आम्ही दिलेल्या प्रस्तावाला प्रायोरिटी न देता आपण नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाला प्रायोरिटी देऊन तो सकाळच्या सेशनमध्ये आणला गेला. या पेक्षाही गंभीर स्वरुपाचा प्रस्ताव आम्ही या सदनात दिलेला आहे आणि तो म्हणजे माननीय सभापतींच्या अविश्वासावरील प्रस्ताव. खरे म्हणजे नियमाप्रमाणे अनुच्छेद 183 ची नोटीस देऊन त्याला 14 दिवस सुध्दा पूर्ण झालेले आहेत. या सदनामध्ये प्रथम तो प्रस्ताव प्रथम चर्चेस यावयास पाहिजे होता. परंतु या प्रस्तावाला देखील प्रायोरिटी दिली गेली नाही. या सदनाच्या कामकाजात तो प्रस्ताव तुम्हाला महत्वाचा वाटत नाही. परंतु नियम 260 अन्वये अल्पसंख्यांक समाजाच्या संदर्भात जो प्रस्ताव आहे तो कामकाजाच्या सुरुवातील मांडला गेला व या प्रस्तावाला आजच्या कामकाजपत्रिकेत प्रायोरिटी दिली गेली. आमचा प्रश्न एकच आहे की, शेतक-यांचा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे, शेतक-यांच्या आत्महत्येचा प्रश्न आहे, विदर्भात तसेच महाराष्ट्रात शेतकरी रोज आत्महत्या करीत आहेत. शेतक-यांच्या आत्महत्या थांबाव्यात, शासनाने शेतक-यांना कोठे तरी रिलीफ द्यावा या उद्देशाने आम्ही हा प्रस्ताव येथे मांडला होता. यासंदर्भात जो प्रस्ताव दिला होता तो आता आम्ही मागे ठेवला आहे. परंतु येथे आता निराळेच कामकाज सुरु झालेले आहे. अशा प्रकारे कामकाज होत असल्यामुळे माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, आम्ही माननीय

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ SBT/ KTG/ प्रथम श्री. भोगले..... 12.00

श्री. मधुकर सरपोतदार.....

सभापतींविरुध्द जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याला प्रायोरिटी देण्यात यावी व त्यावर चर्चा घ्यावी त्या विषयावर चर्चा करण्यास आम्ही तयार आहोत. नियम 260 अन्वयेचा जो प्रस्ताव आपण या ठिकाणी चर्चेला घेतला आहे, त्या चर्चेला सुरुवात देखील झालेली असली तरी नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव आता पाठीमागे ठेवावा. शेतक-यांच्या जीवनमरणाचा जो प्रश्न आहे, यासंदर्भात विधानसभेत चर्चा देखील सुरु झालेली असतांना आपल्या सदनात या विषयावर चर्चा का सुरु होत नाही ? यासंदर्भात खुलासा करण्यात यावा व नंतर नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव आहे तो नंतर घेतला जावा. आम्ही या ठिकाणी माननीय सभापती महोदयांच्या संदर्भात जो अविश्वासाचा प्रस्ताव दिलेला आहे त्यावर प्रथम चर्चा घेण्यात यावी. जर आपण शेतक-यांच्या आत्महत्येच्या प्रस्तावास चर्चा करण्याची परवानगी दिली तर आम्ही त्या प्रस्तावाला प्रायोरिटी ताबडतोब देणार नाही आम्ही हा प्रस्ताव नंतर मांडू त्यामुळे आमच्या अविश्वासाच्या प्रस्तावाला आपण प्रायोरिटी द्यावी आणि सुरु असलेली नियम 260 अन्वयेची चर्चा येथेच स्थगित करावी अशी विनंती आहे.

यानंतर श्री. अजित.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी जो हरकतीचा मुद्दा मांडलेला आहे त्या संदर्भात मी निर्णय देत आहे.

पहिली गोष्ट अशी की, नियम 289 अन्वये जो प्रस्ताव देण्यात आलेला आहे तो प्रश्नोत्तराचा तास झाल्यानंतर घ्यायचे असे ठरले होते. माननीय सभापतींकडे चर्चा झाली त्या अनुषंगाने निर्णय इ ालेला आहे. नियमित कामकाजापूर्वी विशेष बैठक ठेवावी किंवा कसे हा अधिकार माननीय सभापतींचा आहे. त्याप्रमाणे माननीय सभापतींनी काल सभागृहाचे कामकाज संपताना या बदलाबाबत सभागृहाला अवगत केले होते. तेव्हा नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव कामकाजपत्रिकेवर अचानकपणे दाखविलेला नाही.

दुसरी गोष्ट म्हणजे सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी सांगितले की, आम्ही माननीय सभापतींविरुध्द अविश्वासाचा प्रस्ताव दिलेला आहे. यासंदर्भात सांगू इच्छितो की, माननीय सभापतींविरुध्द अविश्वासाचा प्रस्ताव दिल्यानंतर तो प्रस्ताव प्रलंबित ठेवावा असे कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत शिक्कामोर्तब झालेले आहे. तेव्हा आता अचानकपणे हा प्रश्न उपस्थित करणे योग्य ठरणार नाही. सन्माननीय सदस्या प्रा.फौजिया खान यांनी त्यांचे भाषण पुढे सुरू करावे.

श्रीमती फौजिया खान : माननीय सभापति महोदय, सच्चर समिति में जो उल्लेख किया गया है उस बारे में मैं कहना चाहती हूं कि हमारे संविधान में बैकवर्ड क्लास शब्द नहीं है बल्कि बैकवर्ड कास्ट को प्रमाण माना गया है. लेकिन मुस्लिम समाज में जातियां न होने के कारण मुस्लिम समाज का समावेश ओ.बी.सी में करना मुश्किल हो रहा है. इसकी वजह से यह देखने में आ रहा है कि ओ.बी.सी. के कई ग्रुप ऐसे हैं जिनका समावेश केन्द्र सरकार की लिस्ट में है लेकिन राज्य सरकार की लिस्ट में नहीं है और जिस ग्रुप का समावेश राज्य सरकार की लिस्ट में है उनका समावेश केन्द्र सरकार की लिस्ट में नहीं है. हिंदू समाज में ओ.बी.सी. समाज का प्रमाण 52 प्रतिशत है जबकि मुस्लिम समाज में यह प्रमाण सिर्फ 4.4 प्रतिशत ही है. इसलिए यह कहना कि मुस्लिम समाज को पूरा फायदा मिल रहा है,यह गलत है. हमारा कहना है कि धर्म के आधार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान..

पर भेदभाव नहीं किया जाना चाहिए. मैं आपको बताना चाहूंगी कि मुस्लिम धर्म के मेहतर समाज को ओ.बी.सी. में रखा गया है जबकि हिंदू धर्म के भंगी समाज को अनुसूचित जाति में रखा गया है. इसी तरह का भेदभाव दूसरी जातियों में भी दिखायी देता है. यह भेदभाव दूर करने के लिए शासन द्वारा धोरणात्मक निर्णय लेना चाहिए. संविधान के अनुसार जिन लोगों को जो सुविधा मिलनी चाहिए, उनको पूरी सुविधा दिलाने के लिए सरकार द्वारा उचित निर्णय लिया जाना आवश्यक है.मैं बताना चाहूंगी कि हिंदू ओ.बी.सी. की टक्केवारी 12 प्रतिशत है जबकि मुस्लिम ओ.बी.सी. की टक्केवारी सिर्फ एक प्रतिशत है.पब्लिक सेक्टर और सरकारी विभागों में यह प्रमाण एक टक्के से भी कम है. इस बारे में विचार करना जरुरी है. पिछले 15 पाईंट प्रोग्राम का तो कोई फायदा ही नही हुआ. अब नया 15 पाईंट प्रोग्राम आया है जिसमें प्रधानमंत्री महोदय ने कहा है कि स्पेसिफिक गोल्स हैं और टाइम बाउंड प्रोग्राम है. हर डिपार्टमेंट को डायरेक्टिव भी दिए गए हैं.रिजर्व बैंक को डायरेक्टिव आये हैं पंचायत समिति और हाउसिंग डिपार्टमेंट को डायरेक्टिव आये हैं.आय.सी.डी.एस. को डायरेक्टिव आये हैं.आंगनवाडी,बालवाड़ी ओर एजुकेशनल स्कॉलरशिप के बारे में भी डायरेक्टिव दिए गए हैं.अरबन डॅवलपमेंट के बारे में डायरेक्टिव आये है. हर जिले में मॉयनरिटी वेल्फेयर कमेटी बनाने के बारे में डायरेक्टिव आये है. यह बात ठीक है कि महाराष्ट्र सरकार बहुत कुछ कर रही है.मायनारिटी कमीशन के माध्यम से पैसा दे रही है. पब्लिक सर्विस कमीशन द्वास पुलिस भर्ती और विभिन्न विभागों में नौकरियों के संबंध में मुस्लिम समाज के लोगों को मदद कर रही है.मौलाना आजाद आर्थिक विकास महामंडल भी अब अच्छा काम करने लगा है. वहां पर स्टाफ की कमी है ओर इन्फ्रास्ट्रक्चर की कमी है. आप यदि कमेटी की सिफारिश मंजूर करते हैं तो वहं का काम और अच्छा हो जाएगा. हमारा कहना है कि इसके लिए कम से कम 5 सौ करोड़ रुपए का प्रावधान होना चाहिए.

(गोंधळ)

यानंतर श्री पुरी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

उपसभापती : कृपया सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आता घ्यावयाच्या प्रस्तावासंबंधी आपण निर्णय दिला. कामकाज सल्लागार समितीला मी व सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.मधुकर सरपोतदार उपस्थित होतो. त्या बैठकीमध्ये अविश्वासाचा ठराव प्रलंबित ठेऊ अशाप्रकारचा कुठलाही निर्णय झालेला नाही. संसदीय कार्य मंत्री, श्री.हर्षवर्धन पाटील यांनी आमच्याशी चर्चा केली होती व आमच्या प्रस्तावासंबंधीची तारीख नंतर ठरवू, असे ते बोलले होते, त्यामुळे आम्ही थांबलो होतो. परंतु तो प्रस्ताव प्रलंबित ठेऊ असा कुठलाही निर्णय त्या बैठकीमध्ये झालेला नाही. त्यामुळे कृपया माझी हात जोडून विनंती आहे की, आपण जो निर्णय दिला, तो रेकॉर्डवरुन काढून टाकावा.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीस मी आणि सन्माननीय विरोधी पक्षनेते, श्री.पांडुरंग फुंडकर दोघेही उपस्थित होतो. त्यावेळी सुरुवातीस माननीय सभापती महोदयांनी त्यांच्या राजीनाम्याचा प्रश्न उपस्थित केला होता, त्यावेळी मला त्यावर भाष्य करावयचे होते, तत्पूर्वी वैधानिक कामकाज मंत्री, श्री.हर्षवर्धन पाटील यांनी मला असे सांगितले की, आपल्याशी व माननीय विरोधी पक्षनेत्यांशी बोलून त्यानंतर प्रस्तावाबाबत काय करावयाचे यासंदर्भात तारीख ठरवू. एवढीच त्यावेळी चर्चा झाली होती. परंतु हा विषय प्रलंबित ठेवण्याचा कुठलाही निर्णय कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये झालेला नाही. त्यामुळे याठिकाणी आता आपण जो उल्लेख केला तो रेकॉर्डवरुन दूर करुन त्यात दुरुस्ती करावी व आता ज्या प्रस्तावावर चर्चा चालू आहे, ती संपल्यानंतर आमच्या प्रस्तावावर चर्चा घेण्यात येईल असा निर्णय द्यावा. परंतु याठिकाणी आता जो निर्णय झाला त्यासंदर्भातील मजकूर आजच्या दैनंदिन कामकाजातून काढावा अन्यथा त्यात दुरुस्ती करावी, अशी माझी विनंती आहे.

श्री.अनिस अहमद : सभापति महोदय, यहां पर एक माननीय महिला सदस्य बोल रही हैं और उनको यहां पर बोलने नहीं दिया जा रहा है. यह बात क्लियर हो गयी है कि भारतीय जनता पार्टी सच्चर कमेटी की रिपोर्ट का विरोध कर रही है.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात.)

नंतर श्री.रोझेकर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : माझा खुलासा सन्माननीय सदस्यांना अपेक्षित असल्याने प्रथम मी खुलासा करतो. आताच मी आदरणीय ज्येष्ठ नेते, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांच्या हरकतीच्या मुद्यावर निर्णय दिला. त्यानंतर विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर व सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी एक बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली की, कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये प्रस्ताव प्रलंबित ठेवण्याविषयी काहीही झालेले नाही. याबाबत संसदीय कार्यमंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांचाही दाखला त्यांनी दिला. कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत जे झाले आणि त्यानंतर मी जो निर्णय या ठिकाणी दिला तो विसंगत आहे, असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे व ते रेकॉर्डवरुन काढून टाकावे, अशी त्यांची मागणी आहे. जरुर ते चुकीचे असेल तर रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात येईल. तत्पुर्वी आपण असे करु की, स्वत: विरोधी पक्षनेते, ज्येष्ठ सदस्य श्री.नितीन गडकरी, सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर सरपोतदार, दिवाकर रावते, संसदीय कार्यमंत्री, या सभागृहाचे नेते सर्वजण माननीय सभापतींकडे जाऊ, कामकाज सल्लागार समितीमध्ये नेमके काय झाले याची शहानिशा करु, तोपर्यन्त माझे विधान मी राखून ठेवतो.

(दोन्ही बाजुचे सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

आपण असत्य बोलत आहात असे मी बोललो का ? परंतु, मी जे सांगितले तेही असत्य आहे, असे म्हणण्याचे कारण नाही. माझ्याकडे कामकाज सल्लागार समितीचे कार्यवृत्त आले आहे, ते असत्य आहे, असे आपण म्हणू शकू काय ?

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपल्या वक्तव्याचा आम्हाला अपमान वा अधिक्षेप करावयाचा नाही. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी खुलासा केला आहे की, संसदीय कार्यमंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांच्याबरोबर चर्चा झाली आहे. आपण जे बोलला ते चुकीचे नाही परंतु रेकॉर्ड चुकीचे असेल तर आपल्याला चुकीचे ब्रिफ होऊ शकते. आपण हे सांगितलेही आहे की, चुकीचे असेल तर रेकॉर्डवरुन काढून टाकतो. आता एवढीच विनंती करतो की, या बाबीशी विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर व सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य श्री.मधुकर सरपोतदार हे दोघेही संबंधित आहेत, ते स्वत: माहिती देत आहेत यापेक्षा दुसरा पुरावा काय असू शकतो ? त्यामुळे त्यांनी जे सांगितले ते ग्राहय धरुन चुकीचे दुरुस्त केले तर बरे होईल.

....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : मी अगोदरच सांगितले आहे की, माझे विधान मी राखून ठेवतो.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, या सभागृहाच्या काही प्रथा व परंपरा आहेत. त्याचबरोबर नियमही आहेत. आता कार्यक्रमपत्रिकेवर जो विषय आहे तो नियम 260 अन्वये सच्चर समितीच्या अहवालासंदर्भात दिलेला प्रस्ताव आहे. चर्चा कोणत्या पद्धतीने घ्यावी यासंदर्भातील वाद नाही तर कोणती चर्चा प्रथम घ्यावी या अर्थाने चर्चेला सुरु झाली आहे. पलिकडच्या बाकावरील सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, शेतक-यांच्या आत्महत्येसंदर्भातील विषय प्रथम चर्चेला घ्यावा. इकडच्या सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, शेतक-यांच्या आत्महत्येसंदर्भात चर्चा झाली पाहिजे, त्याबद्दल दुमत असण्याचे काही कारण नाही. पण कार्यक्रम पत्रिकेवर जो विषय आहे त्यासाठी आज स्पेशल सिटिंग आहे व त्यानुसार चर्चा व्हावी, असे आमचे म्हणणे आहे. परंतु, आता हा विषय मागे पडला आहे. नवीनच विषय समोर आला आहे. जे विषय पूर्वी चर्चेला नव्हते ते समोर यावयास लागले आहेत. या सभागृहाचे माननीय सभापती यांच्यासंदर्भात दिलेल्या ठरावासंबंधिचा विषय आला आहे. एकदा पीठासीन अधिका-यांनी निर्णय दिला की त्या निर्णयाविरुध्द बोलले जात नाही, कोणत्याही सदस्याला तशी परवानगीही दिली जात नाही. परंतु, आज सकाळपासून आम्ही पाहतो आहोत की, सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी हरकतीच्या मुद्याव्दारे तीन वेळा विषय उपस्थित केले. एका प्रस्तावावर किती वेळा हरकतीचा मुद्दा उपस्थित करता येतो, हे देखील पाहिले गेले पाहिजे.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / शीघ्रलेखनी नोंद

श्री.भास्कर जाधव .....

सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांना आपण भाषण करण्याची परवानगी दिली. नियम 260 च्या प्रस्तावावर चर्चा सुरु झाली. प्रस्तावावर चर्चा सुरु झाल्यानंतर आपण पुन्हा मागे गेलो. चक्र उलटया दिशेने फिरत आहे. प्रत्यक्षपणे नियम 260 च्या प्रस्तावावर चर्चा सुरु झालेली आहे. आता आपल्याला मागे जाता येणार नाही. सभागृहाचे कामकाज नियमाप्रमाणे झाले पाहिजे. विधानपरिषद नियम 15 (2) आपण वाचला पाहिजे. विधानपरिषद नियम 15 (2) मध्ये असे म्हटलेले आहे की, "सचिव दिवसाच्या कामकाजाची क्रमवार यादी तयार करतील आणि तिची एक प्रत प्रत्येक सदस्याला आधीच्या कामाच्या दिवशी पाठवतील. त्या त्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमवार यादीत दाखल न केलेले कोणतेही कामकाज सभापतींच्या परवानगीशिवाय कोणत्याही बैठकीत करण्यात येणार नाही." याचा अर्थ एकदा कार्यक्रम पत्रिका ठरली की, त्या कार्यक्रम पत्रिकेतील कामकाजाचा क्रम बदलण्याचा अधिकार पीठासीन अधिका-यांना आहे. म्हणून आम्ही म्हणू ते धोरण असे सभागृहात चालणार नाही. सभागृह नियमाप्रमाणे चालले पाहिजे, सभागृह प्रथा, परंपरेप्रमाणे चालले पाहिजे. पीठासीन अधिका-यांचे स्थान सर्वोच्च आहे. त्यांच्या निदेशाप्रमाणे सर्व झालेले आहे. नियम 260 च्या प्रस्तावावर सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान चर्चा करीत आहेत. म्हणून नवीन विषय सभागृहात चर्चेला येणार नाही. नियम 260 च्या प्रस्तावावर चर्चा करावी आणि सभापती महोदय, आपल्या निर्णयाबद्दल जे विधान करण्यात आलेले आहे, आपल्या निर्णयानंतर जे भाष्य करण्यात आलेले आहे ते कामकाजातून काढून टाकावे, अशी माझी मागणी आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

श्रीमती फौजिया खान : माननीय सभापति महोदय, शासन कुछ नहीं कर रहा है, ऐसी बात नहीं है, शासन तो बहुत कुछ कर रहा है लेकिन समस्या तो उन योजनाओं को अच्छी तरह से इम्पलीमेंट करने की है. लाल फीताशाही की समस्या है. इसके लिए सरकार जिम्मेदार है यह मैं कहना चाहती हूं. इस वजह से शासन के ऊपर से लोगों का विश्वास उठता जा रहा है. इसलिए इस बारे में गंभीरता से सोचने की जरुरत है. अध्यक्ष महोदय, सच्चर समिति की सिफारिशों को अमल करने के बारे में सभी विभागों को आदेश दिए जाने चाहिए. इस दिशा में

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान...

सख्त कदम उठाने का निर्णय लेना चाहिए. जब तक सख्त कदम नहीं उठाए जाएंगे तब तक प्रभावी तरीके से अमल नहीं हो सकेगा. अगर शासन की इच्छा शक्ति हो तो जो काम 60 साल में नहीं हो सका वह सिर्फ 6 महीने में हो सकता है. मैं कुछ डिमांड यहां पर रखना चाहती हूं. शासन यदि इन मांगों पर अमल करता है तो मुमकिन है कि मुस्लिम समाज को न्याय मिल सकेगा. मेरी पहली मांग यह है कि सच्चर समिति की रिपोर्ट के अनुसार महाराष्ट्र में मुस्लिम समाज का सर्वे किया जाना चाहिए, दूसरी डिमांड यह है कि मुस्लिम समाज के विभिन्न वर्गों के एक्सपर्ट लोगों का एक स्टडी ग्रुप बनाया जाना चाहिए जो 15 पाईंट प्रोग्राम का अच्छी तरह से अभ्यास कर सके और सरकार को एक प्रोग्राम दे सके. तीसरी डिमांड यह है कि शासन को इम्पलीमेंटेशन प्रोग्राम पब्लिश करना चाहिए ताकि मुस्लिम समाज के लोगों को उसकी जानकारी मिल सके. मैं शासन से एक और आग्रही मांग करना चाहती हूं कि शासन ने महिला धोरण बनाकर जो क्रांतिकारी निर्णय लिया है उसी प्रकार से अल्पसंख्यक धोरण सरकार द्वारा बनाया जाना चाहिए, एक और मांग मैं करना चाहूंगी कि अल्पसंख्यकों को लीगल सेफगार्ड मिलना चाहिए. जिस प्रकार से केंद्र सरकार ने अल्पसंख्यक मंत्रालय स्थापित किया है उसी प्रकार से महाराष्ट्र सरकार द्वारा भी अल्पसंख्यक मंत्रालय स्थापित किया जाना चाहिए. जब तक संवैधानिक रुप से मुस्लिम समाज को सेफगार्ड नहीं मिलेगा तब तक भेदभाव दूर नहीं होगा. इसलिए मुस्लिम समाज को सेफगार्ड मिलना चाहिए, यह मेरी मांग है. आज समाज संवेदनशील है. आज समाज जागरुक किया गया है, इसलिए उनकी आशा और आकांक्षाएं बढ़ गयी हैं, इसलिए समाज आशा की नजर से शासन की ओर देख रहा है कि शासन हमें क्या देने वाला है. आज अगर शासन मुस्लिम समाज को कुछ देता है तो मुस्लिम समाज निराशा से बच जाएगा. लेकिन आज मुस्लिम समाज को कन्फयूज किया जा रहा है. साम्प्रदायिक धोरण वाले लोग हमदर्द बन रहे हैं. भेड़िये आज बकरे की खाल ओढ़कर उनके दोस्त बन रहे हैं. पिछले 60 साल का हिसाब वे लोग मांग रहे हैं जिनके पक्ष का जन्म ही मुस्लिम विरोध के लिए हुआ है. सच्चर समिति का अहवाल पढ़कर जिनकी आंखों में आंसू आ रहे हैं उन्हें गुजरात के नरसंहार की चीखें सुनायी नहीं दे रही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान...

हैं. यह ताज्जुब की बात है. लेकिन उनके आंसू मगरमच्छ के आंसू हैं. इसलिए शासन मुस्लिम समाज की प्रगति के संबंध में धोरणात्मक निर्णय लेकर मुस्लिम समाज को दिलासा देना चाहिए. सरकार मेरी मांगों पर गौर करे, इतना कहकर मैं अपना भाषण समाप्त करती हूं. जय हिंद, जय महाराष्ट्र.

यानंतर कु.जयश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

22-11-2007 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) T - 1

JPK/ D/ KTG प्रथम श्री.बोरले..... 12:25

(घोषणा)

(गोंधळ)

उपसभापती : या परिस्थितीमध्ये सभागृहाचे कामकाज चालविणे मला शक्य नाही,त्यामुळे मी सभागृहाची बैठक दुपारी एक वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12 वाजून 28 मिनिटांनी, दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित करण्यात आली.)

यानंतर श्री.गागरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

<u>नियम 289 अन्वये देण्यात आलेला प्रस्ताव</u>

सभापती : सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, मधुकर चव्हाण, डॉ.दीपक सावंत, सय्यद पाशा पटेल, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री प्रकाश शेंडगे, गोपीकिसन बाजोरीया, विनोद तावडे, वि.प.स. यांनी माझ्याकडे शेतकऱ्यांच्या आत्महत्या व कर्जमुक्ती या विषयावर चर्चा करण्यासाठी आजचे संपूर्ण कामकाज तहकूब करण्यासाठी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. या प्रस्तावावर चर्चा करणे योग्य आहे की अयोग्य आहे या याबाबत सुरुवातीस विरोधी पक्ष नेता श्री.पांडुरंग फुंडकर हे बोलतील.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, गेल्या तीन दिवसांपासून 289 चा प्रस्ताव आम्ही सभागृहात देत आहोत. या राज्यामध्ये मागील 5-6 वर्षांपासून शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. या प्रस्तावाचे महत्व यासाठी आहे की, नागपूर येथे हिवाळी अधिवेशन सुरु होताना पंतप्रधान पॅकेज, मुख्यमंत्री पॅकेज जाहीर झाल्यानंतर याच आठवडयात 36 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. विधिमंडळाचे अधिवेशन सुरु होण्याच्या आधल्या दिवशी बुलढाणा, अकोला व यवतमाळ या तीन जिल्हयातील शेतकऱ्यांनी गळफास लावून आत्महत्या केलेल्या आहेत. अधिवेशन सुरु असताना शेतकरी मरत आहेत. अन्नदात्या शेतकऱ्याला जीव द्यावा लागतो अशी परिस्थिती असल्यामुळे नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. या सभागृहात सार्वजनिक तातडीच्या व महत्वाच्या विषयावर म्हणजे कोठे दंगल झाली किंवा दरोडा पडला तर 289 प्रस्तावाअन्वये चर्चा झालेली आहे. परंतु सध्या राज्यात अन्नदाता शेतकरी रोज मरत आहेत. हे अधिवेशन चालू असताना एका आठवडयात 36 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. अधिवेशनाच्या आधल्या दिवशी व काल परवाही शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. हा सार्वजनिक महत्वाचा विषय आहे. पंतप्रधान व मुख्यमंत्री यांचे पॅकेज जाहीर होऊनही या राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबलेल्या नाहीत. त्यामुळे याशिवाय या अधिवेशनात दुसरा कोणताही महत्वाचा विषय नाही. त्यामुळे सभागृहाचे इतर कामकाज बाजूला सारुन शेतकऱ्यांच्या आत्महत्या व कर्जमाफी या प्रस्तावावर चर्चेला परवानगी द्यावी.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MAP/ D/

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आम्ही आज 289 अन्वये प्रस्ताव दिलेला असून गेल्या 3-4 दिवसापासून आम्ही शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रश्नावर सभागृहात चर्चा घडवून आणण्याचा प्रयत्न करीत आहोत. उद्देश असा आहे की, नागपूर ही महाराष्ट्राची उपराजधानी केली आहे. येथे वर्षातून एकदा अधिवेशन व्हावे व ते कमीतकमी सहा आठवडयाचे असावे. अशा प्रकारची तरतूद नागपूर ॲक्टमध्ये केलेली आहे. असे असतानासुध्दा नागपूर येथील हिवाळी अधिवेशन खूप घाईगर्दीत घेतले जाते.

..... यानंतर कु.धनश्री

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार.....

या वर्षी अधिवेशन 3 डिसेंबरला सुरु करण्याऐवजी 19 नोव्हेंबर, 2007 रोजी सुरु करण्यात आले. यामुळे कामकाजावर बरीच मर्यादा आली. अधिवेशनाच्या तारखेमध्ये बदल करण्याचे कारण गुजरात मधील निवडणुका असे सांगण्यात आले. गुजरात हे निराळे राज्य आहे व महाराष्ट्रराज्य हे निराळे राज्य आहे. आपल्या राज्यामध्ये अनेक ज्वलंत समस्या आहेत. या ज्वलंत समस्यांना न्याय द्यावयाचा असेल तर, या नागपूरच्या अधिवेशनात शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संदर्भात उपाययोजना शोधणे आवश्यक आहे. विशेषत: विदर्भातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत, यासंबंधी या अधिवेशनात इलाज शोधून या आत्महत्या आपण थांबविल्या पाहिजेत. आज शेतकऱ्यांची मानसिकता बदलण्याची आवश्यकता आहे, त्यांना दिलासा देण्याची आवश्यकता आहे. शेतकरी हा आपला अन्नदाता आहे. परदेशातून गहू आयात करण्यापेक्षा आपल्या देशातील गहू, आपल्या देशात वापरला जावा ही या मागची आमची भूमिका आहे. आम्ही पहिल्या दिवशी हा प्रस्ताव आणला होता. आपण तो प्रस्ताव मान्य देखील केला. त्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत. केवळ प्रश्नोत्तराचा तास बाजूला ठेवून या प्रस्तावावर चर्चा घ्यावी एवढा मर्यादित स्वरुपाचा हेतू या नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावामागे नाही. आम्ही आमच्या प्रस्तावामध्ये असे स्पष्ट लिहिले आहे की, सभागृहातील सगळे कामकाज बाजूला ठेवून शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रश्नास प्राधान्य द्यावे. त्यासाठी सभागृहामध्ये प्रथम चर्चा घडवून आणावी व काही तरी इलाज शोधून काढावा की, ज्यामुळे शेतकरी आत्महत्या करण्याच्या विचारापासून दूर जाईल. त्यांची आत्महत्या करण्याची मानसिकता बदलेल आणि शेतकऱ्यांचे कुटुंब सुखी राहील. या उद्देशाने हा प्रस्ताव येथे चर्चेकरिता आणण्यात आला आहे.

आज मला खूप आश्चर्य वाटत आहे, आज सकाळी दहा वाजता सदनाचे कामकाज सुरु झाले. रोजचे कामकाज बाजूला सारुन शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रस्तावावर अग्रक्रमाने चर्चा घ्यावी असे ठरले असताना, तसेच माननीय सभापती महोदयानी देखील त्यास अनुमती दिलेली असताना सकाळी 10.00 वाजता नियम 260 अन्वये दुसरा प्रस्ताव आणण्यात आला. गेल्या दोन दिवसापासून रोज नियम 289 अन्वये हा प्रस्ताव कामकाजपत्रिकेमध्ये देण्यात येत असूनही सकाळी जी विशेष बैठक बोलावण्यात आली होती त्यामध्ये नियम 260 अन्वये प्रस्ताव घेण्यात आला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार.....

कोणत्याही प्रश्नावर, नियम 260 असो, नियम 97 असो किंवा नियम 93 असो, आम्ही चर्चा करायला नेहमीच तयार असतो. फक्त कोणत्या विषयावरील चर्चा प्रथम घ्यावी व कोणत्या विषयावरील चर्चा त्यानंतर घ्यावी हे ठरवून ध्यावे लागते. नियम 260 अन्वये, सच्चर कमिटीच्या शिफारशीसंदर्भातील चर्चा या अधिवेशन काळातच व्हावी यानंतर होऊ नये अशाप्रकारचा आमचा अजिबात हेतू नव्हता.

मला येथे एवढेच सांगावयाचे आहे की, या सदनामध्ये चर्चा करण्याकरिता अनुकूल वातावरण असले पाहिजे. या सदनामध्ये असलेले सत्ताधारी सन्माननीय सदस्य किंवा विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य असो या सर्वांचा सहभाग आवश्यक आहे. या सर्वांनी आपापली मते मांडावी व विचारांचे आदान प्रदान केल्यानंतर त्याच्यावर निर्णय व्हावा हाच आमचा उद्येश होता. या उद्येशानेच आम्ही असा आग्रह धरला होता. परंतु दुर्दैवाने प्राथम्यक्रम ठरविताना नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाला प्राथम्य देण्यात आले. नियम 289 अन्वये ठरविण्यात आलेल्या प्रस्तावाला, नियमित अधिवेशनापेक्षा हे अधिवेशन निराळे आहे असे सांगून बाजूला ठेवले. वास्तविक पाहता कोणत्याही विषयावर निरनिराळी मते मांडून, निरनिराळे विचार मांडून यासंदर्भात निर्णय घेण्याची आमची तयारी आहे. परंतु प्राथम्यक्रम ठरविताना प्रथम काय घ्यावयाचे व त्यानंतर काय घ्यावयाचे हे ठरविण्याची आवश्यकता आहे. मला वाटते की, सर्वच सन्माननीय सदस्य या गोष्टीशी सहमत होतील. या प्रस्तावावरील चर्चा या अगोदरच झाली असती तर सभागृहामध्ये मागील दोन ते तीन तास जे वातावरण होते ते तसे राहिले नसते. विधानसभेमध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा झाली असती व त्यानंतर या सदनामध्ये या विषयावर चर्चा झाली असती व तेथे् दिलेले उत्तरच या सदनामध्ये देण्यात आले असते तर That becomes a futile exercise. म्हणून तसे होऊ नये याकरिता सभापती महोदय, आम्ही आग्रह धरला होता. शेतकऱ्यांच्या वेदना समजून त्या संदर्भात निर्णय घेण्यात यावा म्हणून आमची अशी सूचना आहे की, विदर्भातील शेतकऱ्याच्या वाढत्या आत्महत्या पहाता सर्व कामकाज बाजूला करुन शेतकऱ्यांच्या आत्महत्या, शेतकऱ्यांचे प्रश्न, शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याच्या दृष्टीकोनातून जी चर्चा घेण्यात येत आहे, ती चर्चा त्या संदर्भातच मर्यादित ठेवावी आणि हा प्रस्ताव आपण स्वीकारावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

यानंतर श्री. सुंबरे.....

अशासकीय प्रस्ताव/शिफारशीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख (अमरावती विभग पदवीधर) : सभापती महोदय, या ठिकाणी नियम 289 अन्वये जो प्रस्ताव देण्यात आलेला आहे तो स्वीकारणे कसे योग्य आहे हे सांगण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये, महाराष्ट्राची सतत प्रगती होत असताना ज्या टप्प्यावर आपण गेलो होतो त्यावेळेस याचा आढावा आपल्याल घेता येईल. केवळ प्रश्नोत्तराचा तास तहकूब करून हा प्रश्न चर्चेला का घ्यावा एवढ्याच पुरतेच मी येथे बोलणार आहे. सभापती महोदय, ही एक अत्यंत अभूतपूर्व अशी स्थिती या राज्यात निर्माण झालेली आहे. महाराष्ट्रातील काही भागातील शेतकरी त्यांच्यात उपजीविकेच्या साधनांमध्ये आलेल्या प्रचंड तणावामुळे जीवनमुक्तीचा मार्ग स्वीकारू लागले आहेत. एखाद् दुसरी अपवादात्मक आत्महत्या असेल तर गोष्ट वेगळी. पण गेल्या एक दोन वर्षामध्ये या प्रश्नाने राज्यात गंभीर स्वरूप धारण केले आहे. राज्याच्या काही जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांमध्ये हा तणाव अधिक असल्याचे आयडेंटीफाय झाले आहे आणि हे आयडेंटीफाय राज्य पातळीवर नाही तर राष्ट्रीय पातळीवर झालेले आहे. म्हणजे हे आयडेटीफाय आपण केलेले नाही तर केंद्र सरकारने केलेले आहे. त्यांनी जो याचा अभ्यास केला त्यातून उपजीविकेच्या साधनांवर तणाव आलेला आहे हे त्याचे कारण असल्याचे समोर आले आणि आता आपण त्याचा आढावा घेण्याच्या स्थितीत आलो आहोत. 1960 सालापासून जो विकास या राज्यात झालेला आहे तो पाहता ज्या स्थितीत आपण आज आलो आहोत वा तोंड देत आहोत त्यासाठी काही कायम स्वरूपी तर काही तात्पुरत्या स्वरूपातील उपाय योजना कराव्या लागणार आहेत. या अत्यंत लांच्छनास्पद स्थितीला तोंड द्यावे म्हणून आज आपल्याला आपल्यापुढील सगळे कामकाज बाजूला सारून ही चर्चा घेणे आवश्यक झाले आहे. या संबंधात उभय बाजूच्या सन्माननीय सदस्यांना जाणीव आहे की, या बाबतीत चर्चा होऊन सदस्यांकडून आपापली मते मांडली जावीत. त्यातून मग यासाठी कायम स्वरूपाच्या उपाय योजना काय आहेत, तात्पुरत्या उपाय योजना काय आहेत, हे कोणाचे कर्तृत्व आहे, कशामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे या सर्वाची चर्चा येथे झाली पहिजे. या संबंधात माननीय पंतप्रधान देखील या राज्यात येऊन, पाहणी करून गेले. त्यांनी काही पॅकेजही दिले. त्यनंतर त्यांचे जे निवेदन आले आहे त्यात आम्ही कर्जमाफ करतो असेही सांगण्यात आल्याचे समजते. त्यासाठी एक समिती देखील नेमली गेली. तिचा अहवाल आला. देशाच्य कृषी मंत्र्यांनीही सांगितले की, आम्ही शेतकऱ्यांचे सारे कर्ज माफ करणार अहोत. त्याची फाईल पाठविली गेली पण पुढे काहीही झाले नाही. तेव्हा या संबंधात

..... डब्ल्यू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नेमकी काय परिस्थिती आहे हेही या चर्चेतून समोर येऊ शकेल. या सभागृहाच्या एका सन्माननीय सदस्यांनी या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी गेले काही दिवस खास मेहनत केली. हे कर्तृत्त्व महाराष्ट्र राज्याने निर्माण केलेले आहे आणि म्हणून महाराष्ट्र सरकारनेच त्यावर निर्णय घेतला पाहिजे. म्हणूनच सभापती महोदय, 1960 पासून आज 2007 पर्यंत या राज्यामध्ये जो काही विकास झाला आहे त्यातून शेतकऱ्यांच्या उपजीविकेच्या साधनांवर प्रचंड तणाव निर्माण झाला आहे त्यावर उपाय योजना सुचविण्याच्या दृष्टीने, त्यामागील कारणमिमांसा समजून घेण्यासाठी तरी या वर चर्चा होण्यासाठी आपण या प्रस्तावान्वये चर्चेला परवानगी दिली पाहिजे. अत्यंत घाईने थोड्या दिवसाचे हे अधिवेशन होत आहे पण तरीही या सत्र कालवधीत आपण याकडे लक्ष दिले तर या तणावाखाली असलेल्या शेतकऱ्याला त्यातून थोडासा तरी दिलासा मिळेल, समाधान मिळेल की, आमच्याबाबत येथे चर्चा झाली, त्यातून आमच्यासाठी काही निर्णय घेतले गेले असे वाटेल. म्हणून मी आपल्याला विनंती करतो की, आजच प्रश्नोत्तराचा त्रास तहकूब करून अपण या प्रस्तावावर चर्चा घडवून आणावी.

श्री. आर.आर.पाटील (उपमुख्य मंत्री) : सभापती महोदय, या सदनामध्ये शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या आणि त्यांच्या समोरील अडीअडचणी या विषयावर चर्चा होण्यासाठी अगदी पहिल्या दिवसापासून मागणी आहे. शेतकऱ्यांची देखील तशी इच्छा आहे. जेणे करून शेतकऱ्यांपुढील अडीअडचणीं संबंधात सरकारने केलेल्या उपाय योजना लोकांपर्यंत पोहोचाव्यात. म्हणून आजचा प्रश्नोत्तराचा तास तहकूब करून जी चर्चा येथे विरोधी पक्षाकडून मागण्यात आलेली आहे त्याच्याशी आम्ही देखील सहमत आहोत. तरी आपण या चर्चेला आता लगेचच सुरूवात करावी अशी मी आपणास विनंती करतो.

सभापती : या ठिकाणी माननीय विरोधी पक्षनेता आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी जो नियम 289 खाली प्रस्ताव दिलेला आहे, त्यात नमूद केले आहे की, आज ज्या पद्धतीची भयावह परिस्थिती आहे, राज्यात अनेक शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत, विशेषत: विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. शेतकऱ्यांच्यावर अनेक कर्जांचा बोजा वाढतो आहे आणि त्यामुळे या परिस्थितीवर सर्वंकष चर्चा व्हावी अशी आपल्या सर्वांचीच मागणी आहे. ...

(यानंतर श्री. सरफरे .... एक्स 1 ..

अशासकीय प्रत / अशासकीय प्रत

सभापती...

याठिकाणी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर सरपोतदार, प्रा. बी. टी. देशमुख आणि सभागृहाचे नेते सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांनीही ही चर्चा तातडीने व्हावी या अनुषंगाने आपले मनोगत व्यक्त केले. सभागृहाच्या आजच्या कामकाजाच्या क्रमातील बाब क्रमांक 10 वर सुध्दा ही चर्चा दाखविण्यात आली आहे. सदरहू चर्चेची सूचना सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी परवाच्या दिवशी दिली आहे. ही चर्चा अत्यंत महत्वाची असल्यामुळे ती याठिकाणी घेत असतांना आजचे तारांकित प्रश्न आणि अन्य कामकाज संपूर्ण दिवसभरासाठी मी तहकूब करीत आहे. आणि शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या असलेल्या त्यांच्या तीव्र भावना त्यांनी याठिकाणी सातत्याने मांडून शेतकऱ्यांच्या जिव्हाळयाच्या समस्या या सभागृहामार्फत सोडविण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत. त्यादृष्टीने मी या चर्चेला याठिकाणी परवानगी देत आहे. त्याचप्रमाणे या ठिकाणी चर्चा होत असतांना माननीय उपसभापतींनी यासंबंधी जो निर्णय राखून ठेवला आहे, तो निर्णय ते देतील. त्यानंतर जर गरज लागली तर एखादे वाक्य बोलावयास मी जरुर सभागृहामध्ये येईन. आता सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी चर्चेला सुरुवात करावी.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या सभागृहामध्ये विधानसभेचे कामकाज ऐकण्याची सोय करण्यात आली आहे काय? आम्हाला याठिकाणी विधानसभेमध्ये सुरु असलेले कामकाज ऐकावयास मिळत आहे.

सभापती : मी त्या बाबीमध्ये लक्ष घालतो.

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, सभागृहापुढील इतर कामकाज लॅप्स झाले आहे काय?

सभापती : आज फक्त नियम 97 अन्वये देण्यात आलेली चर्चा होईल व ती आजच पूर्ण होईल. उर्वरित सर्व कामकाज आज स्थगित करण्यात आले आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण आता चर्चेला परवानगी दिली आहे. मला आपणाकडून फक्त एवढाच खुलासा पाहिजे की, ही चर्चा विधानपरिषद नियम 289 अन्वये दिलेल्या नोटिशीनुसार होणार आहे की नाही?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना सांगू इच्छितो की, नियम 289 मध्ये असे म्हटले आहे की, "कोणत्याही सदस्यास सभापतींच्या संमतीने कोणताही नियम विधानपरिषदेपुढील कोणत्याही विशिष्ट प्रस्तावास तो लागू करतांना स्थगित करण्यात यावा असा प्रस्ताव मांडता येईल आणि प्रस्ताव संमत झाला तर संबंधित नियम त्या वेळेपुरता स्थगित होईल." आज याठिकाणी विदर्भातील सर्वसामान्य गोरगरीब शेतकऱ्यांच्या, जनतेच्या जिव्हाळयाचा, तातडीचा व महत्वाचा प्रश्न असल्यामुळे या प्रश्नाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे याकरिता या सदनाचे नियम तहकूब करुन ही चर्चा तातडीने घेण्यासाठी हा नियम 289 आहे. मी नियम 97 अन्वये चर्चा उपस्थित करण्यास परवाच्या दिवशी आपणास परवानगी दिली आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नियम 289 खाली ही चर्चा कां नाही?

सभापती : सभागृहाचे अन्य नियम तहकूब करुन एखादा विषय हायेस्ट प्रॉयॉरिटीवर चर्चेकरिता घेण्यासाठी नियम 289 मध्ये तरतूद आहे.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आपण नियम 97 अन्वये चर्चा घेतली तर या प्रस्तावावर चर्चा होईल पण आम्हाला शासनाकडून स्पेसिफिक जो निर्णय पाहिजे तो होणार नाही. शासनाने एक तर सांगावे की....

श्री. आर. आर. पाटील : चर्चा सुरु झालेली आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : आपण पॉझिटिव्ह उत्तर देणार असाल तर हरकत नाही. आपण नियम 97 अन्वये चर्चा करतो. शेतकऱ्यांच्या प्रश्नाच्या बाबतीत आपण गांभीर्य ठेवावे. आपणही शेतकरी आहात.

श्री. दिवाकर रावते : आपण पॉझिटिव्हपणाचा आव आणत असाल तर कर्ज मुक्तीचा निर्णय घेतला असे सांगावे. त्यामुळे बाकीचे कामकाज होईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या प्रस्तावाचे गांभीर्य जाऊ नये हा आमचा उद्देश आहे. माननीय सहकार मंत्री या ठिकाणी उपस्थित असणे आवश्यक आहे.

सभापती : या प्रश्नाशी संबंधित जे मंत्रिमहोदय असतील त्यांना सभागृहात उपस्थित ठेवण्याची शासनाची जबाबदारी आहे.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, विधानसभेमध्येही चर्चा सुरु आहे त्यामुळे या सभागृहात राज्यमंत्री उपस्थित राहतील.

श्री. मधुकर सरपोतदार : माननीय कॅबिनेट मंत्र्यांना या सभागृहात बोलवावे.

सभापती : या ठिकाणी सभागृहाचे नेते उपस्थित आहेत तसेच माननीय विरोधी पक्ष नेतेही उपस्थित आहेत.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आमची एकच इच्छा आहे की, "वादे वादे जायते तत्व बोध:" असे होऊ नये.

सभापती : शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने दोन्ही बाजू गांभीर्याने विचार करणाऱ्या आहेत. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी चर्चेला सुरुवात करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : विदर्भात गेल्या वर्षभरात 1500 च्या वर शेतकऱ्यांच्या झालेल्या आत्महत्या

मु. शी. : विदर्भात गेल्या वर्षभरात 1500 च्या वर शेतकऱ्यांच्या झालेल्या आत्महत्या याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, मधुकर चव्हाण, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री पाशा पटेल, प्रकाश शेंडगे, गोपीकिसन बाजोरिया, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. अरविंद सावंत, ॲड. अनिल परब, सर्वश्री विनोद तावडे, जगदिश गुप्ता, केशवराव मानकर, सागर मेघे, सुरेश जेथलिया, परशुराम उपरकर व संजय केळकर, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

सभापती : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. सूचना देणारे माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर आपली सूचना मांडतील आणि भाषण करतील.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो.

"गेल्या वर्षभरात विदर्भातील जवळपास 1500 हून अधिक शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या, या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना कारणीभूत ठरणाऱ्या राज्य शासनाच्या अखत्यारित असणाऱ्या जिल्हा सहकारी बँका, सेवा सहकारी सोसायट्या आणि भूविकास बँका यांनी शेतकऱ्यांकडून त्यांच्या मूळ कर्जाच्या 5 ते 10 पट व्याजाची वसुली करुन शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणे, शेतकऱ्यांना 6 टक्के दराने कर्ज पुरवठा करण्याची घोषणा शासनाने करुनही त्याची अंमलबजावणी झालेली नसणे, शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी राज्य शासनाने डिसेंबर, 2005 मध्ये आणि भारताच्या पंतप्रधानांनी जून 2006 मध्ये पॅकेज जाहीर करुनही शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबण्याऐवजी त्यात वाढ होणे, उद्योग क्षेत्रामध्ये रिझर्व्ह बँकेच्या धोरणाप्रमाणे एक रकमी कर्ज फेड योजनेअंतर्गत (OTS) उद्योगपतींना व व्यावसायिकांना मिळणारे लाभ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, नागरी बँका आणि भूविकास बँकांनी शेतकऱ्यांच्या बाबतीत लागू न केल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

असुरक्षितता निर्माण होऊन त्यांच्यावर आत्महत्या करण्याची ओढवलेली पाळी, यावर शेतकऱ्यांना पूर्णपणे कर्जमुक्त करणे हा एकमेव पर्याय असल्यामुळे त्यादृष्टीने राज्य शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, सदरहू प्रस्ताव खरे म्हणजे गेले तीन दिवस आम्ही नियम 289 अन्वये सूचना देऊन या ठिकाणी मांडण्याचा प्रयत्न करीत आहोत. सभापती महोदय, शेतकऱ्यांचे दुर्दैव असे आहे की, गेली चार वर्षे नागपूरचे अधिवेशन असो किंवा मुंबईचे अधिवेशन असो प्रत्येक अधिवेशनामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर चर्चा चालू आहे. त्यावर नुसतीच चर्चा होते. त्या चर्चेला उत्तरे दिली जातात. एखादे पॅकेज जाहीर केले जाते परंतु चर्चा चालू असताना आत्महत्या मात्र थांबलेल्या नाहीत. मी असे म्हणणार नाही की, आघाडी सरकार आल्यापासूनच आत्महत्या होत आहेत. त्यापूर्वीही आत्महत्या होत होत्या. परंतु आत्महत्यांचे प्रमाण इतक्या मोठ्या प्रमाणात कधीही वाढले नव्हते. सन 2001 मध्ये 378 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. 2002 मध्ये 393, 2003 मध्ये 396, 2004 मध्ये 494, 2005 मध्ये 468, 2006 मध्ये 486 आणि 2006-07 मध्ये आतापर्यंत 1001 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...)

आता नोव्हेंबर महिन्यामध्ये आपण ही चर्चा करीत आहोत. 1 जानेवारी 2007 पासून राज्यामध्ये जवळपास 1 हजार शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. या ठिकाणी हा प्रस्ताव आणण्याचे कारण काय ? दरवर्षी आपण नागपूरचे हिवाळी अधिवेशन डिसेंबर महिन्यामध्ये घेत असतो. हे अधिवेशन देखील 3 डिसेंबरला घेण्याचे आधी ठरलेले असताना ते नोव्हेंबरमध्ये का घेण्यात आले ? त्याबाबतीत गुजराथच्या निवडणुकांचे कारण देण्यात आले. खरे म्हणजे गुजराथ आणि महाराष्ट्राचा तसा काही संबंध नाही. असे असताना गुजराथमधील निवडणुकांसाठी डिसेंबरमधील अधिवेशन नोव्हेंबरमध्ये आणले गेले. हे अधिवेशन नियोजित कार्यक्रमानुसार डिसेंबरमध्येच घेतले असते तर काही आकाश कोसळले नसते. या वर्षभरामध्ये राज्यातील जवळपास 1 हजार शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. सभापती महोदय, शेतक-यांच्या आत्महत्यासंबंधी चर्चा घडवून आणण्याबाबतचा प्रस्ताव आम्ही 289 खाली का दिला ? या राज्यामध्ये एखाद्या तरुणीवर बलात्कार झाला तर त्याबाबतीत स्थगन प्रस्ताव आणून चर्चा घडवून आणली जाते. मागे खैरलांजी प्रकरणामध्ये 4 लोकांचे खून झाले, दलितांवर अत्याचार झाले. त्या प्रकरणी या सभागृहामध्ये आपण स्थगन प्रस्ताव आणून चर्चा केली. सभापती महोदय, आपण स्वत: एका शेतक-याचे पुत्र आहात. आम्ही देखील शेतक-यांचे पुत्र आहोत. केवळ पुत्रच नाही तर शेतक-यांच्या नावाचे कुंकू लावून या सभागृहामध्ये आम्ही आलो आहोत. चार लोकांसाठी आपण या सभागृहाचे कामकाज स्थगित करतो. तर मग या राज्यातील 1 हजार शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या असताना सभागृहाचे कामकाज स्थगित करण्यासाठी आपण कचकच का करता ? शेतक-यांचा प्रश्न सभागृहामध्ये उपस्थित होऊ नये म्हणून सच्चर कमिटीचा प्रश्न आणता. मग सच्चर की शेतकरी असे भांडण लावण्याचा प्रयत्न करता, हे इष्ट नाही आणि याचेच मला अतिशय दु:ख होत आहे. या वर्षभरामध्ये राज्यातील 1 हजार शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. आता माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील हे पटापट माननीय पंतप्रधानांचे पॅकेज सांगतील, मुख्यमंत्र्यांचे पॅकेज सांगतील. सहकार मंत्री डॉ. पतंगराव कदम हे शेतक-यांसाठी नेहमीच 6 टक्के व्याजाची घोषणा करीत असतात. परंतु अद्यापही शेतक-यांना 6 टक्के दराने कर्ज मिळाले नाही. हा कृषिप्रधान देश आहे. हे राज्य शेतक-यांचे आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर महात्मा गांधींनी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...)

राज्यकर्त्यांना सांगितले होते की, या देशातील शेतीला उद्योगाचा दर्जा द्या. परंतु शेतीला उद्योगाचा दर्जा दिला गेला नाही. आज शेतकरी आत्महत्या का करीत आहेत याच्या मुळापर्यन्त कोणी जाण्याचा प्रयत्न करीत नाही. ज्या शेतक-यांनी आत्महत्या केल्या त्यांच्या वारसांना शासनाने 1 लाख रुपये दिले. म्हणजे या राज्यातील राज्यकर्त्यांनी शेतक-याच्या जिवाचे मोल हे फक्त 1 लाख रुपये इतके ठरविलेले आहे. शेतक-याच्या आत्महत्येच्या बाबतीत अनेक समित्या नेमल्या गेल्या, अनेक प्रकारचे रिपोर्टस् आले. परंतु त्या रिपोर्टप्रमाणे कार्यवाही मात्र झालेली नाही. या गंभीर प्रश्नाच्या मुळापर्यन्त हे शासन जाण्याचा प्रयत्नच करीत नाही. खरा प्रश्न हा आहे की, स्वातंत्र्यानंतरच्या 60 वर्षाच्या काळात शेतक-याच्या शेतीधंद्याला प्रमुख उद्योगाचे स्थान दिले गेले नाही. आज उद्योगपतींना देशामध्ये वाटेल तेवढया सवलती दिल्या जात आहेत. उद्योगपतींना कमी व्याजाने कर्ज दिले जाते, त्यांच्या कारखान्यात तयार होणा-या मालाची किंमत ठरविण्याचे अधिकार त्यानांच आहे, त्यांना सबसिडीही दिल्या जातात. त्यांनी तयार केलेला माल विकण्याचे स्वातंत्र्य त्यांना दिले गेले आहे. आज उद्योगाला प्राधान्य दिलेले आहे. हा देश शेतीप्रधान असून 70 टक्के माणसांची उपजीविका शेतीवर आहे. शेतकरीच अन्नधान्य निर्माण करुन देशातील लोकांना जगवित आहे. शेतक-याने कापूस पिकविला नसता तर आपण कापड घालू शकलो नसतो. आपल्याला स्वातंत्र्य मिळून 60 वर्षे झालेली आहेत. या स्वातंत्र्योत्तर 60 वर्षाचे फलित काय आहे ? तर आज शेतक-यावर उपाशी मरण्याची पाळी आलेली आहे, त्याच्यावर आत्महत्या करण्याची पाळी आलेली आहे. ....

...नंतर श्री. जुन्नरे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखनाची नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

शेतक-याला कर्ज बाजारी करण्यात आलेले आहे. सोनेरी मृगा प्रमाणे आपण शेतक-यांसाठी पॅकेज दिलेले आहे. या पॅकेजला "शेतक-यांच्या कर्जाचे पुनर्वसन" असे गोंडस नाव देण्यात आलेले आहे. ज्या शेतक-यावर 25 हजार रुपयांचे कर्ज होते त्यावरील व्याज माफ करण्यात आले व त्याला पुन्हा 25 हजार रुपये कर्ज देण्यात आले असे मिळून शेतक-याच्या नावावर पुन्हा एकंदर 50 हजार रुपयांचे कर्ज चढविण्यात आले. सभापती महोदय, शेतक-यांना पुन्हा कर्ज देऊन आपण शेतक-यांच्या आत्महत्या थांबवू शकणार नाहीत. शेतकरी आत्महत्या का करीत आहेत याची कारणे इंदिरा गांधी रिसर्च इन्स्टीटयूट तसेच टाटा इंस्टिट्यूट फंडसमेंटल रिसर्च या संस्थांनी दिलेली आहेत. त्यांनी सांगितले आहे की, शेतकरी कर्जबाजारी झाल्यामुळे आत्महत्या करीत आहे. या संस्थांनी शेतकरी कर्जबाजारी झाल्यामुळे आत्महत्या करीत आहेत हे सांगितले असतांना सुध्दा आपण पुन्हा शेतक-यांना कर्जबाजारी का करीत आहात ? सभापती महोदय, आज शेतक-याच्या मालाला योग्य भाव दिला जात नाही, शेतक-याला वीज, पाणी उपलब्ध करुन दिले जात नाही. ज्यावेळेस उद्योग पतींना उद्योग धंदे सुरु करावयाचे असतात तेव्हा त्यांच्यासाठी 11 के.व्ही. चे स्वतंत्र युनीट उभे केले जाते. परंतु महाराष्ट्र राज्यात आज सुध्दा 4-4 लाख शेतक-यांचे विजेचे अर्ज पेंडीग आहेत. शेतक-याने वीज कनेक्शनसाठी पैसे भरले तरी सुध्दा त्याला वीज कनेक्शन दिले जात नाही अशी परिस्थिती आहे. परवा मी बुलढाणा जिल्हयातील वीज मंडळाच्या कार्यकारी अभियंत्याला विचारले की, "शेतक-यांनी 6-6 महिने अगाऊ पैसे भरलेले असतांना देखील त्यांना कनेक्शन का दिले जात नाहीत" ? यावर कार्यकारी अभियंत्यांनी सांगितले की, "साहेब सद्या नोव्हेंबर, 2006 सालची यादी सुरु असून आता नोव्हेंबर, 2007 साल सुरु आहे." सभापती महोदय, शेतक-यांनी विजेच्या कनेक्शनसाठी एक-एक वर्ष अगोदर पैसे भरुन सुध्दा शेतक-यांना वीज कनेक्शन मिळत नाहीत अशी परिस्थिती आहे. विजेच्या संदर्भात अशी जर परिस्थिती असेल तर महाराष्ट्रातील शेतकरी कसा काय जगू शकेल? महाराष्ट्रातील शेतक-याला विजेचे कनेक्शन दिले तर त्याला वीज दिली जात नाही, वीज दिली तर लोडशेडींग केले जाते. आता ग्रामीण भागात 12-12,14-14,15-15 तासाचे लोडशेडींग केले जात आहे. जेव्हा शेतक-यांची परिषद

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर.....

असते तेव्हा मात्र हे कोणीही मंत्री येथे येत नाहीत. परंतु काही दिवसापूर्वी कापसाच्या दलालाच्या परिषदेला देशाचे मंत्री आणि महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री अकोला येथे आले होते. त्यावेळेस वस्त्रोद्योग मंत्री म्हणाले होते की, "गुजरातचा शेतकरी तंबाखू खावून कामाला लागतो परंतु महाराष्ट्रातील शेतकरी हातावर तंबाखू घेऊन चोळत बसतो, तो काम करीत नाही." सभापती महोदय, महाराष्ट्रातील शेतक-याने जर विजेच्या पंपाचे बटण दाबले आणि वीज नसल्यामुळे पंप चालू झाला नाही तर त्याने शेतात काय अजून कोणते काम करावयाचे? वीज नसल्यामुळे शेतकरी तंबाखू चोळण्याचे काम न करता अजून दुसरे कोणते काम करु शकतो. आपण महाराष्ट्रातील शेतक-यांच्या हाताला अजून दुसरे कोणते काम दिलेले आहे? महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी अकोल्याच्या परिषदेत वक्तव्य केले होते की, " महाराष्ट्रातील शेतकरी कापसामध्ये गोटे टाकतात, कापसावर पाणी मारतात, विदर्भातील शेतकरी आळशी आहे." त्यामुळे या वक्तव्याबद्दल माननीय मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्रातील शेतक-यांची या सभागृहात माफी मागितली पाहिजे. या प्रकरणाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी अकोला येथील परिषदेत माफी देखील मागितलेली आहे. महाराष्ट्र शासन शेतक-यांच्या जखमेवर मलम लावण्याच्या ऐवजी मीठ चोळण्याचे काम करीत आहे.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, मला हरकतीच्या मुद्यावर विचार मांडावयाचे आहेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुधाकर गणगणे साहेब हे सुध्दा अकोल्याच्या बैठकीत उपस्थित होता त्यामुळे आपण आता माननीय मुख्यमंत्र्यांची वकीली करु नका.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, मी सुध्दा अकोला येथील परिषदेत उपस्थित होतो. परंतु अकोल्याची परिषद केवळ दलालांसाठी नव्हती तर त्या परिषदेत व्यापारी, शेतक-यांचे प्रतिनिधी होते, राजकीय पक्षाचे लोक सुध्दा उपस्थित होते.

....3

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अकोला येथील परिषदेत एक सुध्दा शेतकरी नव्हता.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, अकोला येथे जी परिषद भरली होती त्या परिषदेचा मी साक्षीदार आहे. अकोल्याची परिषद केवळ दलालांसाठी नव्हती तर त्या परिषदेत व्यापारी, शेतक-यांचे प्रतिनिधी, राजकीय पक्षाचे लोक सुध्दा होते. एवढेच नव्हे तर या परिषदेत भारतीय जनता पक्षाचे एक खासदार सुध्दा उपस्थित होते. कृपया या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी राजकीय भाषण देऊ नये. कारण ही परिषद केवळ दलालांसाठी नव्हती. या परिषदेमध्ये शेतक-यांना सुध्दा बोलावण्यात आले होते. त्यामुळे कृपया विरोधी पक्ष नेत्यांनी सभागृहाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करुन एवढाच माझा हरकतीचा मुद्दा आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

शेतक-याला कर्ज बाजारी करण्यात आलेले आहे. सोनेरी मृगा प्रमाणे आपण शेतक-यांसाठी पॅकेज दिलेले आहे. या पॅकेजला "शेतक-यांच्या कर्जाचे पुनर्वसन" असे गोंडस नाव देण्यात आलेले आहे. ज्या शेतक-यावर 25 हजार रुपयांचे कर्ज होते त्यावरील व्याज माफ करण्यात आले व त्याला पुन्हा 25 हजार रुपये कर्ज देण्यात आले असे मिळून शेतक-याच्या नावावर पुन्हा एकंदर 50 हजार रुपयांचे कर्ज चढविण्यात आले. सभापती महोदय, शेतक-यांना पुन्हा कर्ज देऊन आपण शेतक-यांच्या आत्महत्या थांबवू शकणार नाहीत. शेतकरी आत्महत्या का करीत आहेत याची कारणे इंदिरा गांधी रिसर्च इन्स्टीटयूट तसेच टाटा इंस्टिट्यूट फंडसमेंटल रिसर्च या संस्थांनी दिलेली आहेत. त्यांनी सांगितले आहे की, शेतकरी कर्जबाजारी झाल्यामुळे आत्महत्या करीत आहे. या संस्थांनी शेतकरी कर्जबाजारी झाल्यामुळे आत्महत्या करीत आहेत हे सांगितले असतांना सुध्दा आपण पुन्हा शेतक-यांना कर्जबाजारी का करीत आहात ? सभापती महोदय, आज शेतक-याच्या मालाला योग्य भाव दिला जात नाही, शेतक-याला वीज, पाणी उपलब्ध करुन दिले जात नाही. ज्यावेळेस उद्योग पतींना उद्योग धंदे सुरु करावयाचे असतात तेव्हा त्यांच्यासाठी 11 के.व्ही. चे स्वतंत्र युनीट उभे केले जाते. परंतु महाराष्ट्र राज्यात आज सुध्दा 4-4 लाख शेतक-यांचे विजेचे अर्ज पेंडीग आहेत. शेतक-याने वीज कनेक्शनसाठी पैसे भरले तरी सुध्दा त्याला वीज कनेक्शन दिले जात नाही अशी परिस्थिती आहे. परवा मी बुलढाणा जिल्हयातील वीज मंडळाच्या कार्यकारी अभियंत्याला विचारले की, "शेतक-यांनी 6-6 महिने अगाऊ पैसे भरलेले असतांना देखील त्यांना कनेक्शन का दिले जात नाहीत" ? यावर कार्यकारी अभियंत्यांनी सांगितले की, "साहेब सद्या नोव्हेंबर, 2006 सालची यादी सुरु असून आता नोव्हेंबर, 2007 साल सुरु आहे." सभापती महोदय, शेतक-यांनी विजेच्या कनेक्शनसाठी एक-एक वर्ष अगोदर पैसे भरुन सुध्दा शेतक-यांना वीज कनेक्शन मिळत नाहीत अशी परिस्थिती आहे. विजेच्या संदर्भात अशी जर परिस्थिती असेल तर महाराष्ट्रातील शेतकरी कसा काय जगू शकेल? महाराष्ट्रातील शेतक-याला विजेचे कनेक्शन दिले तर त्याला वीज दिली जात नाही, वीज दिली तर लोडशेडींग केले जाते. आता ग्रामीण भागात 12-12,14-14,15-15 तासाचे लोडशेडींग केले जात आहे. जेव्हा शेतक-यांची परिषद

====2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

असते तेव्हा मात्र हे कोणीही मंत्री येथे येत नाहीत. परंतु काही दिवसापूर्वी कापसाच्या दलालाच्या परिषदेला देशाचे मंत्री आणि महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री अकोला येथे आले होते. त्यावेळेस वस्त्रोद्योग मंत्री म्हणाले होते की, "गुजरातचा शेतकरी तंबाखू खावून कामाला लागतो परंतु महाराष्ट्रातील शेतकरी हातावर तंबाखू घेऊन चोळत बसतो, तो काम करीत नाही." सभापती महोदय, महाराष्ट्रातील शेतक-याने जर विजेच्या पंपाचे बटण दाबले आणि वीज नसल्यामुळे पंप चालू झाला नाही तर त्याने शेतात काय अजून कोणते काम करावयाचे? वीज नसल्यामुळे शेतकरी तंबाखू चोळण्याचे काम न करता अजून दुसरे कोणते काम करु शकतो. आपण महाराष्ट्रातील शेतक-यांच्या हाताला अजून दुसरे कोणते काम दिलेले आहे? महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी अकोल्याच्या परिषदेत वक्तव्य केले होते की, " महाराष्ट्रातील शेतकरी कापसामध्ये गोटे टाकतात, कापसावर पाणी मारतात, विदर्भातील शेतकरी आळशी आहे." त्यामुळे या वक्तव्याबद्दल माननीय मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्रातील शेतक-यांची या सभागृहात माफी मागितली पाहिजे. या प्रकरणाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी अकोला येथील परिषदेत माफी देखील मागितलेली आहे. महाराष्ट्र शासन शेतक-यांच्या जखमेवर मलम लावण्याच्या ऐवजी मीठ चोळण्याचे काम करीत आहे.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, मला हरकतीच्या मुद्यावर विचार मांडावयाचे आहेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुधाकर गणगणे साहेब हे सुध्दा अकोल्याच्या बैठकीत उपस्थित होता त्यामुळे आपण आता माननीय मुख्यमंत्र्यांची वकीली करु नका.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, मी सुध्दा अकोला येथील परिषदेत उपस्थित होतो. परंतु अकोल्याची परिषद केवळ दलालांसाठी नव्हती तर त्या परिषदेत व्यापारी, शेतक-यांचे प्रतिनिधी होते, राजकीय पक्षाचे लोक सुध्दा उपस्थित होते.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अकोला येथील परिषदेत एक सुध्दा शेतकरी नव्हता.

...3

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, अकोला येथे जी परिषद भरली होती त्या परिषदेचा मी साक्षीदार आहे. अकोल्याची परिषद केवळ दलालांसाठी नव्हती तर त्या परिषदेत व्यापारी, शेतक-यांचे प्रतिनिधी, राजकीय पक्षाचे लोक सुध्दा होते. एवढेच नव्हे तर या परिषदेत

यानंतर श्री. अजित.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भारतीय जनता पक्षाचे एक खासदार सुध्दा उपस्थित होते. कृपया या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी राजकीय भाषण देऊ नये. कारण ही परिषद केवळ दलालांसाठी नव्हती. या परिषदेमध्ये शेतक-यांना सुध्दा बोलावण्यात आले होते. त्यामुळे कृपया विरोधी पक्ष नेत्यांनी सभागृहाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करुन एवढाच माझा हरकतीचा मुद्दा आहे.

यानंतर श्री. अजित.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी माननीय मुख्यमंत्र्याच्या संदर्भात जे काही मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे तो असत्य आहे. त्याचे कारण असे की, माननीय मुख्यमंत्री अकोला येथे गेले आणि मोठ्या मनाने मी शेतकऱ्यांची जाहीर माफी मागतो असे बोलले आहेत आणि तसे वर्तमानपत्रात छापून देखील आलेले आहे. त्या व्यासपीठावर सन्माननीय सदस्य देखील होते.

सभापती महोदय, शेतकऱ्यांना व्यापारी लुटतात याबाबत पणन मंत्र्यांनी सांगितले होते की, पुढील अधिवेशनात 100 क्विंटल घेतलेल्या सर्वांची यादी पटलावर ठेवण्यात येईल व जे गुन्हेगार असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, हे रेकॉर्डवर आहे. या घोषणेस तीन वर्षे झाली. माननीय मुख्यमंत्र्यांना शेतकऱ्यांबद्दल तळमळ असती आणि व्यापाऱ्यांबद्दल तिरस्कार असता तर त्यांनी ते आश्वासन का पाळले नाही असा प्रश्न निर्माण झालेला आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी बाहेर माफी मागितलेली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी या सभागृहात माफी मागितली पाहिजे एवढेच मी बोललो. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.सुधाकर गणगणे यांना वाईट वाटण्याचे काही कारण नाही.

श्री.विनोद तावडे: सभापती महोदय, मला एक माहिती जाणून घ्यावयाची आहे की, मघाशी सच्चर समितीच्या अहवालाबाबत समोरच्या बाकावरून काही सन्माननीय सदस्य मोठमोठ्याने बोलत होते ते सन्माननीय सदस्य याठिकाणी उपस्थित दिसत नाहीत.

श्री.पाडुंरंग फुंडकर : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे मूळ शोधण्याची गरज आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून 60 वर्षे झाली तरी शेतकऱ्यांना त्यांनी पिकविलेला माल विकण्याचे स्वातंत्र्य नाही. शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी पुरवठा होत नाही. त्यांना विद्युत पुरवठा केला जात नाही. विहिरीमध्ये पाणी असून देखील विजेअभावी तो शेतीला पाणी देऊ शकत नाही. शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी भू-विकास बँक व सहकारी सोसायट्यांचे 14 टक्के दराने कर्ज घ्यावे लागते. नापिकी झाली तर पीक विम्याचे पैसे मिळत नाहीत. एका बाजूला प्रचंड महागाई वाढत आहे. जीवनावश्यक वस्तूंचे दर वाढत आहेत. खत, बियाणे, कीटकनाशके औषधांचे दर वाढत आहेत. शेतमजुरीचे दर वाढत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना शेती करणे कठीण होऊन बसले आहे. शेती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

करण्यासाठी तो कर्जावर कर्ज घेत राहतो. त्यामुळे शेतकऱ्यांची अवस्था, तो कर्जात जन्माला येतो, कर्जात जगतो आणि कर्जातच मरतो अशी झालेली आहे. त्याच्या बारशासाठी कर्ज, शिक्षणासाठी कर्ज, लग्नकार्यासाठी कर्ज आणि मेल्यावर तेराव्यासाठी कर्ज अशी राज्यातील शेतकऱ्यांची अवस्था झालेली आहे. नापिकी, दुष्काळ, मोठ्या प्रमाणावर होत असलेले विजेचे भार नियमन, बिजेचे वाढलेले दर, न परवडणारे कर्जाचे व्याजदर यामुळे शेतकरी मेटाकुटीला आलेला आहे. बॅकेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करता येत नाही म्हणून तो सावकरांकडून कर्ज घेतो.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

माननीय आर.आर.पाटील साहेब आपण म्हणाला होतात की, "सावकारांना कोपरा पासून ढोपरापर्यंत सोलून काढू." परंतू आपण एका सानंदाला पकडू शकला नाहीत. त्याच्याविरुध्द 35 केसेस रजिस्टर असतानाही आपण त्यांस पकडू शकला नाहीत. आपले एस.पी. त्यांच्या वडिलांना हातही लावू शकले नाहीत. खुल्यादिलाने तो सावकार फिरत होता. माननीय गृहमंत्री महोदय, आपली पध्दती चुकलेली आहे. सह निबंधकांना व आपल्या पोलिसांना त्यांनी विकत घेतलेले असून अशाप्रकारे आपण सावकारांची मान पकडायची सोडून शेतकऱ्यांचीच मान पकडत आहात. त्याठिकाणी सह निबंधकांनी 95 टक्क्यांपेक्षाही जास्त केसेस अवैध ठरविल्या. असे असेल तर शेतकऱ्यांना न्याय कसा मिळेल ? त्या सावकाराने सह निबंधकांना व पोलिसांना मॅनेज केले. आज शेतकऱ्यांची हजारो एकरांची शेती सावकारांकडे पडलेली आहे. माननीय आर.आर.पाटील साहेब, आपण दोनदा घोषणा केली की, सावकारांसाठी कायदा आणू. अशाप्रकारची घोषणा करुन इ ाल्यानंतर 2005 चे अधिवेशन गेले, 2006 चे गेले व आता 2007 चेही जात आहे. सावकारांच्या पाशातून शेतकऱ्यांना मुक्त करण्याचा कायदा कधी आणणार आहात ? माझी याठिकाणी आपल्याला विनंती आहे की, सावकारांच्या पाशातून शेतकऱ्यांना सोडविण्याच्या दृष्टीने आपण आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये सदरचा कायदा किती दिवसात येणार याचा जरुर उल्लेख करावा. अशाप्रकारचा कायदा करीत असताना त्यातून सावकार सुटता कामा नये. त्यामध्ये आपण मधले मार्ग ठेवू नयेत. आज सावकार सह निबंधकांना व पोलीस स्टेशनलाच विकत घेत आहेत, असे कोणत्याही सावकाराला यापुढे करता येणार नाही अशाप्रकारचा कायदा आपण करावा. असे जर केले तरच राज्यातील शेतकरी वाचतील. आज राज्यातील शेतकरी थकबाकीदार झाल्यामुळे त्यांनी खाजगी सावकारांकडून कर्ज घेतलेले आहे व त्यामुळेच ते आत्महत्या करीत आहेत. सावकारांमुळेही राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत. सावकारांनी हजारो एकरांच्या शेतकऱ्यांच्या जमिनी खरेदी केलेल्या आहेत. मुलींच्या लग्नाची व्यवस्था होत नाही म्हणूनही त्यांनी सावकारांकडून कर्ज घेतलेले आहे. राज्यामध्ये फारच वाईट अवस्था आहे. सभापती महोदय, काही दिवसांपूर्वीच बुलढाणा जिल्हयात घटना घडली. एका म्हाताऱ्या शेतकऱ्याच्या दोन मुलींनी आत्महत्या केलेली आहे. तो शेतकरी 65 वर्षांचा म्हतारा असून त्यांच्या दोन मुली होत्या. त्यांची 10 एकरांची शेती आहे. सभापती महोदय, त्या मुलींनी कशासाठी आत्म्हत्या केली ? देशोन्नती

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

वर्तमानपत्रामध्ये छापून आलेले आहे की, "आता शेतकऱ्यांची मुलेही आत्महत्या करीत आहेत." मी ज्यावेळी त्यांच्या घरी गेलो त्यावेळी त्या म्हाताऱ्या शेतकऱ्याने मला सांगितले की, माझ्या एका मुलीचे शिक्षण बी.ए.पर्यंत झालेले होते व दुसरी मुलगी बारावीमध्ये शिकत होती. त्या शेतकऱ्यास या दोनच मुली होत्या. त्या शेतकऱ्याने मुलीचे लग्न करण्यासाठी तिला वर शोधला होता, परंतु त्या वराकडील मंडळींनी 2 लाख रुपयांचा हुंडा त्यांच्याकडे मागितला. त्या शेतकऱ्यांकडे फक्त 10 एकरच जमीन असून गेल्या 3 वर्षांपासून ती जमीन नापीक आहे. त्या जमिनीवर त्यांनी जिल्हा सहकारी बँकेकडून कर्ज घेतलेले आहे व खाजगी सावकारांकडूनही कर्ज घेतलेले आहे. शेती पिकलेली नाही, आता मुलींचे लग्न कसे करावे अशाप्रकारची चर्चा तो म्हातारा शेतकरी व त्याची म्हातारी बायको रोज करीत होते. ती चर्चा दाराच्या आडून त्या मुली रोज ऐकत होत्या. तीन दिवस त्या मुली चर्चा ऐकत होत्या, चौथ्या दिवशी त्यांनी पत्र लिहिले की, आमच्या जन्मदात्या आईवडिलांना आमच्यामुळे आत्महत्या करावी लागत आहे, त्यामुळे आमच्या जगण्यास काही अर्थ नाही, म्हणून त्या दोन्ही मुलींनी पंजाबी ड्रेसचा दुपट्टा बांधून विहिरीमध्ये जीव दिला. सभापती महोदय, याला कोण जबाबदार आहे ? आत्महत्येचे सत्र कधी संपणार आहे ? माननीय आर.आर.पाटील साहेब, गेले 8 वर्षे आपले राज्य आहे. आज महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची अवस्था दिवसेंदिवस वाईट होत चालली आहे. आपण पॅकेज जाहीर करीत आहात. माननीय मुख्यमंत्र्यांनी 1 हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. परंतु ते पॅकेज आपण बँकांसाठी जाहीर केले. शेतकरी सक्षम करण्यासाठी आपण पॅकेज जाहीर केलेले नसून बँका सक्षम होण्यासाठीच आपण पॅकेज जाहीर केलेले आहे. आज राज्यातील शेतकरी सक्षम न होता, बँकांचा वाढलेला एनपीए त्या पॅकेजमुळे कमी झालेला आहे. या पॅकेजचा लाभ कोणाला झाला ? आता सभागृहामध्ये माननीय श्री.हर्षवर्धन पाटील साहेब उपस्थित नाहीत. शेतकऱ्यांवर असे असे उपकार केले, असे ते म्हणाले. त्यांनी पुढे असेही सांगितले की, साडे तीन टक्के कापसाचे पैसे बँकांच्या माध्यमातून देऊ. हा पैसा आपण देता का ? कापूस एकाधिकार योजना सुरु झाल्याने तीन टक्के कपात आपण केली होती.

नंतर श्री.रोझेकर....

अशासकीय प्रत / अशासकीय प्रत

ते पैसे तुमच्या सरकारने बिनव्याजी वापरले, शेतक-यांना व्याज दिले नाही, ही एकूण रक्कम 7 कोटी रुपयांपर्यन्त गेली. ज्यावेळी मागणी झाली त्यावेळी तुम्ही पैसे परत केले. शेतक-यांचा हिशेब आम्ही केला. तुमचे सरकार आले, तुम्ही हिशेब केला नव्हता, मी पणन महामंडळाचा प्रशासक झालो, सर्व हिशेब केला, पासबुकामध्ये नोंद करुन घेतली. पॅकेजच्या नावाखाली शेतक-यांचाच पैसा तुम्ही परत केला. कसा जगेल शेतकरी ?

सभापती महोदय, पणन महासंघाला 200 कोटी रुपयांचा नफा होणार आहे. 200 नाही 400 कोटी रुपयांचा नफा होणार आहे, प्रामाणिकपणे तो तुम्ही वाटणार आहात काय ? मला माहिती मिळाली आहे की, हे पैसे तुम्ही लाल्या रोगाच्या अनुदानात वळते करणार आहात. लाल्या रोगाचे अनुदान वेगळे अनुदान आहे. पण महासंघातील पैसा हा शेतक-यांच्या मालकीचा पैसा आहे, हक्काचा पैसा आहे. पणन महासंघाला नफा झाला तर तो शेतक-यांचा आणि तोटा झाला तर पणन महासंघाचा, हे तत्व आपण मान्य केले आहे. मग हे पैसे तुम्ही लाल्या रोगाच्या अनुदानात कसे वळते करणार ? सरकारने मान्य केले होते, लाल्या रोगामुळे झालेल्या नुकसानीसाठी वेगळे अनुदान देणार आणि आता जर तुम्ही पणन महासंघाचा नफा यामध्ये वळता केला तर शेतकरी तुम्हाला कधीही माफ करणार नाही.

सभापती महोदय, मी पॅकेजसंबंधी बोलत होतो. माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेले पॅकेज हवेत विरले. नंतर माननीय पंतप्रधानांनीही पॅकेज जाहीर केले. 3700 कोटी रुपयांचे पॅकेज दिले. त्यावेळी असे वाटले होते की, आतातरी शेतक-यांची दुरावस्था दूर होईल. काय मिळाले शेतक-याला ? दारव्हा मतदारसंघातून निवडून आलेले विधानसभा सदस्य श्री.संजय राठोड यांनी माझ्या निवासस्थानाच्या बाजुला पंतप्रधान पॅकेजअंतर्गत शेतक-यांना वाटप केलेल्या साहित्याचे प्रदर्शन भरविले आहे. प्रदर्शनामध्ये शेतक-याला वाटप केलेली बैलगाडी, पंप, पाईपलाईन, शेतीची औजारे ठेवलेली आहेत. शेतक-याला देण्यात आलेल्या बैलगाडीची अशी अवस्था आहे की, 50 किलो वजन या बैलगाडीत टाकले तर गाडी खाली बसते. दिल्लीमेड इलेक्ट्रिक पंप शेतक-यांना देण्यात आले, कधी स्फोट होईल सांगता येणार नाही. माझी सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, त्यांनी जरुर या प्रदर्शनाला भेट द्यावी. टिफन तर असे दिलेले आहे की, त्यांचे दात हाताला लागतात, मी स्वत: ते हाताळले आहे. अशा पद्धतीचे साहित्य असल्यामुळे अनेक

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

शेतक-यांनी हे साहित्य सरकारला परत केले आहे. शेतक-यांनी सांगितले की, आम्हाला हे साहित्य नको.

सभापती महोदय, या सरकारने शेतक-यांचा सन्मान केला. कशा पद्धतीने केला ? शेतक-याला मुंबईला बोलावून त्यांना सोन्याचे पदक दिले. परंतु, नंतर उघडकीस आले की, ते पदक सोन्याचे नव्हते. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी चौकशीचे आदेश दिले. आता तर आम्हाला असे समजले आहे की, पदक देणे सरकार बंद करणार आहे. शेतक-याला अशारितीने फसवण्याचे काम केले. शेतकरी तुमच्या दारी पदक मागावयास आला होता काय ? त्या शेतक-याला 1 शाल द्या, श्रीफळ द्या, गुच्छ द्या, त्याचा सन्मान करा, तो खुष झाला असता. परंतु, सरकारची अशी भूमिका असेल तर शेतक-याला न्याय कसा मिळणार ?

सभापती महोदय, सरकारने जे पॅकेज दिले त्याचा कर्मचा-यांनी पूर्ण बटयाबोळ करुन टाकला. शेतक-यांपर्यन्त काहीही पोहोचले नाही. सन्माननीय सदस्य श्री.सुधाकर गणगणे या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांच्या आकोटमध्ये कृषि खात्याच्या गोडाऊनवर छापा पडला. सर्व आऊटडेटेड माल पकडला गेला. शेतक-यांना वाटण्यासाठी पंतप्रधान पॅकेजअंतर्गत एक्सपायर्ड इ ालेली औषधे, खते गोडाऊनमध्ये सापडली. ती जप्त करण्यात आली. खालच्या दर्जाच्या कृषि अधिका-यांना सस्पेंड केले गेले. केवळ आकोटमध्येच नाही तर जळगाव, बुलढाणा या जिल्हयांसह सर्व सहा जिल्हयात अशीच अवस्था आहे. कशाला पंतप्रधानांचे नाव बदनाम करीत आहात ?

सभापती महोदय, सरकारने वसंतराव मिशन आणले. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख साहेब आपल्याला कल्पना नसेल पण त्याची अवस्था अशी आहे की, दोन वर्षात चार वेळा महासंचालक बदलले गेले. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, सचिव दर्जाच्या अधिका-याची नेमणूक केली जाईल.

अशुद्धीसह प्रत / शीघ्रलेखाची नाही

यानंतर श्री.बोरले.....

श्री.पांडुरंग फुंडकर .....

आता तेथे सचिव स्तरावरील अधिकारी नाही. आता तेथे उपसचिव स्तरावरील अधिकारी पाठविलेला आहे. कसे काम चालेल ? पॅकेजचे तीन-तेरा वाजलेले आहेत. या सर्व परिस्थितीमध्ये शेतक-यांच्या आत्महत्या वाढत चालल्या आहेत. या सर्वांचे टार्गेट शेतकरी झाला, पॅकेजचे टार्गेट शेतकरी झाला, कर्जाचे टार्गेट शेतकरी झालेला आहे. आपल्या राज्यामध्ये उद्योगासाठी 4-6 टक्के दराने कर्ज पुरवठा केला जातो. शेतक-याला मात्र 14 टक्के दराने कर्ज काढावे लागते. मग तो शेतकरी कसा जगेल ? शेतक-यांना 6 टक्के दराने कर्ज पुरवठा करण्यात येईल, अशी सभागृहामध्ये घोषणा इ ाली होती. परंतु अद्याप आदेश निघालेले नाहीत. काल सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना मी विचारले असता त्यांनी मला सांगितले की, ओ.टी.एस. करण्यासाठी मी माझ्या बँकेपुरती परवानगी घेतलेली आहे. मी माझ्या बँकेत ओ.टी.एस. करणार आहे. इतर बँकांना ओ.टी.एस.चे आदेश पोहोचलेले नाहीत. या सर्व परिस्थितीचा विचार केला तर शेतकरी जगूच शकत नाही. शेतीधंदा तुटीचा झालेला आहे, हे तुमच्या नेत्यांनी मान्य केलेले आहे. केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार हे अकोला येथे कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटनासाठी आले होते. त्यावेळी श्री.शरद पवार यांनी असे सांगितले की, आता शेतक-याला कर्ज मुक्तीशिवाय पर्याय नाही. यासंदर्भात मी पंतप्रधानांशी बोलणार आहे. श्री.शरद पवार केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये आहेत. आमचे मुख्यमंत्री सांगतात की, शेतक-यांच्या कर्ज मुक्तीला माझा विरोध नाही. तुमचा विरोध नाही, केंद्रीय कृषीमंत्री श्री.शरद पवार यांचा विरोध नाही, मग विरोध कोणाचा आहे ? शेतक-यांचे कर्ज माफ झाले पाहिजे. शेतक-यांचे कर्ज माफ करण्याचा निर्णय घेण्यासाठी उशीर का लागतो ? मी आपल्याला विनंती करतो की, शेतक-यांना कर्ज मुक्त केल्याशिवाय कोणताही पर्याय नाही. आपल्या राज्यावर 1 लाख 45 हजार कोटी रुपयांचे कर्ज आहे. माझे असे म्हणणे आहे की, अन्नदात्या शेतक-यासाठी राज्यावर 10-12 हजार कोटी रुपयांचे कर्ज वाढू द्या. विदर्भातील 6 जिल्हयांसाठी 4 हजार कोटी रुपयांचे पॅकेज देण्यात आले. शेतक-यांना कर्ज मुक्त करण्यासाठी अजून 10-12 हजार कोटी रुपयांचे कर्ज वाढू द्या. परंतु शेतक-याला कर्ज मुक्त करा. शेतक-यांना कर्ज मुक्त करण्यासाठी केंद्र सरकार तयार आहे, केंद्रीय कृषीमंत्री तयार आहेत, मुख्यमंत्री तयार आहेत. मग अडचण कोणाची आहे ? विरोधी पक्षाला श्रेय नाही दिले तरी चालेल. विरोधी पक्षाला श्रेय मिळावे, अशी

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ प्रथम श्री.रोझेकर 13:55

श्री.पांडुरंग फुंडकर .....

आमची अपेक्षा नाही. श्रेय तुम्ही घ्या. परंतु शेतक-याला कर्ज मुक्त करा. मी आपल्याला इशारा देतो की, आता शेतक-यांच्या कर्ज मुक्तीचा लढा ऐरणीवर आलेला आहे. जो या राज्यातील शेतक-यांना कर्ज मुक्त करणार नाही, त्याला या राज्यातील शेतकरी निश्चितपणे माफ करणार नाहीत. सभापती महोदय, शेतक-यांना जी ॲफिडेव्हीट करुन दिली ती माझ्या जवळ आहेत. पंतप्रधान पॅकेज अंतर्गत शेतक-यांना किसान क्रेडीट कार्ड देण्यात आले. शेतक-याने किसान क्रेडीट कार्ड दाखविले की, त्याला 25 हजार रुपये कर्ज पुरवठा केला जाईल, असे सांगण्यात आले. दलाल तेथेही पोहोचले. त्यांनी शेतक-यांकडून किसान क्रेडीट कार्ड घेतले आणि त्यांना सांगितले की, तुम्ही त्रास घेऊ नका. आम्ही सरकारचे प्रतिनिधी आहोत. आम्हाला शासनाने आदेश दिलेले आहेत की, शेतक-यांच्या घरापर्यंत पैसे पोहोचले पाहिजेत. तुम्ही फक्त विथ्ड्रॉलवर सहया करा. त्यानंतर बँकेत जाऊन पैसे काढले जातात आणि शेतक-यांच्या घरी फक्त चार हजार रुपये पोहचविले जातात. सिंदखेड राजा तालुक्यातील श्री.उत्तम रामभाऊ सानप यांची यासंदर्भातील तक्रार माझ्याकडे आहे. उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्याकडे मी ती तक्रार देणार आहे. तुम्ही कोणती कारवाई करणार आहात ? पॅकेजचे तीन-तेरा वाजविणारे हे सरकार आहे. ज्या शेतक-याने आत्महत्या केली त्या शेतक-याच्या कुटुंबियांना एक लाख रुपये अनुदान दिले जाते. सभापती महोदय, अनुदान देण्याची पद्धत काय आहे ? आत्महत्या केलेल्या शेतक-याच्या कुटुंबाला 30 हजार रुपये रोख दिले जातात आणि 70 हजार रुपये त्या शेतक-याच्या नावाने पोस्टात जमा केले जातात.

यानंतर कु.जयश्री.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

सदर पैसे पोस्टामध्ये जमा केल्याबाबतचा बॉण्डही शेतक-याच्या ताब्यात देत नाही. या शेतक-याने दर महिन्याला बँकेमध्ये जायचे आणि सही केल्यानंतर त्या जमा केलेल्या रकमेवरील जे काही व्याज असेल तेवढे त्या शेतक-याला मिळते. सभापती महोदय, परवा माझ्याकडे एका आत्महत्या केलेल्या शेतक-याची पत्नी आली होती, तिने सांगितले की, "आमच्या नावे बँकेत जमा केलेल्या रकमेपैकी रु.30,000 मिळाले परंतु जे बॉण्डचे 70,000 रुपये आहेत, ते देण्यात यावे, कारण माझ्या मुलीचे ऑपरेशन करावयाचे असून त्याकरिता डॉक्टरांनी 40,000 रुपये खर्च सांगितला आहे. मी संबंधित पोस्ट मास्तरला फोन लावून बॉण्डचे 70,000 रुपये सदर महिलेला द्यावयास सांगितल्यानंतर त्या पोस्ट मास्तरने ते पैसे देता येणार नाहीत, कारण हा बॉण्ड पाच वर्षाचा आहे, हा बॉण्ड तीन वर्षाचा आहे त्यामुळे संबंधित शेतक-याच्या बॉण्डची मुदत जोपर्यंत पूर्ण होणार नाही तोपर्यंत त्याचे पैसे देता येणार नाहीत, असे सांगितले. सभापती महोदय, या शेतक-यांना जर बॉण्डचे पैसे मुदतपूर्व देता येत नसतील तर निदान तो बॉण्ड तरी द्या म्हणजे तो बॉण्ड इतर बँकेमध्ये गहाण ठेवून त्यांना पैसे मिळविता येतील आणि सदर आत्महत्या केलेल्या शेतक-याच्या पत्नीच्या मुलीचा जीव वाचविण्याचा प्रयत्न करता येईल. राज्यसरकारने शेतक-यासाठी जमा केलेल्या पैशातून जर त्याच्या कुटुंबियांची देखभाल होणार नसेल तर आणि ते पैसे तुमच्या तिजोरीतच ठेवणार असणार तर त्याच्या कुटुंबियांना त्या पैशाचा लाभ कसा होईल ? यासंदर्भात एक गंभीर प्रकरण तर माझ्या तालुक्यातच घडलेले आहे आणि त्या अनुषंगाने माननीय उप मुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील आपल्याला त्या ठिकाणी कारवाई करावी लागणार आहे. शिरोळा तालुक्यामध्ये एका हटकर नावाच्या शेतक-याने आत्महत्या केली. तहसिलदाराने त्यासंबंधीचा पंचनामा केल्यानंतर त्या शेतक-याच्या कुटुंबियांना पैसे घेऊन जाण्यासाठी बोलाविले. तहसिलदाराने त्या शेतक-याच्या पत्नीला एकूण 30,000 रुपयांची मदत जाहीर केली. परंतु उर्वरित 70,000 रुपयांचे काय केले ? तर तो 70,000 रुपयांचा चेक जिल्हाधिका-याने तहसिलदाराकडे पाठविला आणि तहसिलदाराने तो चेक आपल्या कारकुनाकरवी वटविण्याचा प्रयत्न केला. पोस्टात पैसे टाकण्याच्या निमित्ताने त्या चेकचे पैसे काढण्यात आले आणि 10 महिने त्या शेतक-याच्या बायकोला ते पैसे देण्यात आले नाही. या तहसिलदाराच्या कारकुनाकडे आत्महत्या

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

केलेल्या शेतक-याची पत्नी ज्यावेळी पैसे मागावयाला गेली, त्यावेळी त्यांनी सांगितले की, या चेकचे पैसे काढलेले आहेत, यावर सदर महिलेने त्या तहसिलदारास सांगितले की, याविरुध्द मी ॲफिडेव्हिट करीन, कोर्टात उभी राहीन. त्यानंतर तहसिलदाराने धावपळ सुरु केली कारण यासंदर्भात वर्तमानपत्रामध्ये देखील बातमी छापून आली होती. तहसिलदाराने तो पैसा त्या महिलेस देण्याचा प्रयत्न केला व आपल्यावरील येणारे मरण चूकविण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी जिल्हाधिका-यांनी एस.डी.ओ.नेमून चौकशी नेमली. सदर चौकशीअंती तहसिलदार, जिल्हाधिकारी, एस.डी.ओ. यांच्या संगनमताने याप्रकरणी संबंधित कारकुनास बळीचा बकरा बनवून त्याला सस्पेंड करण्यात आले. मग हे 70,000 रुपये कोणाच्या कस्टडीत होते आणि त्यासंदर्भात कारवाई मात्र बाबूवर करण्यात आली. याप्रकरणी संबंधित तहसिलदारावर मात्र अद्यापही कारवाई झालेली नाही. ती कारवाई आपण करणार आहात की नाही ? तालुक्याच्या ठिकाणी पैसे आल्यानंतर तहसीलदार सदर पैसे वाटपास जबाबदार असतो त्याकरिता केवळ बाबूवर कारवाई करुन शेतक-याला न्याय मिळणार नाही. यासंदर्भातील चौकशीच्या अहवालामध्ये एस.डी.ओ.असे लिहितो की," शेतकरी आत्महत्येप्रकरणी लिपिकच दोषी." यामध्ये खरा दोष कोणाचा? हे सभागृहाला समजले पाहिजे. आणखी एका प्रकरणात असे घडले की, एका शेतक-याने आत्महत्या केली, त्यांच्या कुटुंबियांना मिळणारे पैसे हे त्याच्या बायकोला देण्यात आले परंतु शेतक-याची बायको आणि मुलगा हे वेगवेगळे राहत आहेत. सभापती महोदय, आज एकूण 2000 शेतकरी अशा प्रकारे शासनाकडून मिळणाऱ्या मदतीपासून वंचित आहेत. यासंदर्भात वेगवेगळी कारणे सांगितली जातात, पंचनामे केले जातात आणि सांगितले जाते की, तो शेतकरी व्यसनी होता, दारुडा होता म्हणून त्याचा मृत्यू झाला तो कर्जबाजारी नव्हता, वगैरे वगैरे. शेतकरी कर्जबाजारी असून देखील कर्जबाजारी दाखविला जात नाही. म्हणून या निमित्ताने आमची मागणी अशी आहे की, केवळ थातुरमातुर डागडुजी करण्यापेक्षा, ठिगळं लावण्यापेक्षा एकच निर्णय घेऊन टाका. पॅकेज वगैरे सर्व आता जाऊ द्या आणि शेतक-यांचा सात-बाराचा उतारा पूर्णपणे कोरा करा. मुंबईमध्ये निवडणूकीच्या वेळी आपण शेतक-यांच्या कापसाला भाव देण्यासंबंधी एक घोषणा केली होती, आता आपण म्हणणार की ती इलेक्शनच्या वेळची घोषणा होती आणि आम्ही असे कुठे

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

म्हटलं होत की, कापसाला याच वर्षी 2700 रुपये प्रतिक्विंटल भाव देऊ. तसेच, आपण शेतक-यांच्या कर्जमुक्तीची घोषणा केल्यानंतर शेतक-यांचे सात-बाराचे उतारे याच वर्षी कोरे करुन टाकू, त्यांना कर्जातून मुक्त करु, असे अभिवचन दिले होते का ? असे म्हणाल. यासंदर्भात आम्ही आमच्या जाहीरनाम्यामध्ये तुमचा जाहीरनामा मांडणार नाही.

यानंतर श्री.गागरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .....

वीज मोफत नाही तर विकत द्या. 24 तास वीज द्या. वीज मोफत किंवा विकतही मिळत नाही. 18-18 तास लोडशेडींग केले जात असून महाराष्ट्राला अंधारात लोटले आहे. माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना मी सांगू इच्छितो की, तुम्ही एक तरी आश्वासन पूर्ण करा. तुम्ही काहीच करत नाही. संत गाडगेबाबत ग्रामस्वच्छता अभियान यासारख्या बिगरपैशाच्या योजना राबवून संपूर्ण गावाला झाडायला लावले. एखाद्या गावात काय चालले आहे असे विचारले तर सांगतात की, संत गाडगे महाराज ग्रामस्वच्छता अभियानात आम्ही भाग घेत असून गाव झाडत आहोत. अख्ख्या गावाच्या हातात तुम्ही झाडू दिला आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज निर्मलग्राम योजनाही चालू आहे. आता तंटामुक्त गाव अशी घोषणा केली आहे. माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना मी सांगू इच्छितो की, आपण फार हुशार माणसे आहात. अशा योजनांसाठी एक नव्या पैशाचा खर्च येणार नाही. त्यामुळे अशा कल्पना डोक्यातून निर्माण करुन त्या राज्यभर राबवित आहात. परंतु तंटामुक्त गाव समितीमध्ये 10 धटींगण आहेत. तेच त्या तंटामुक्त गावाचे प्रमुख व्हायला लागले आहेत. त्या गावातील दादा तंटामुक्त योजनेचा प्रमुख आहे. तो खरच गरीबाला न्याय देणार आहे का ? तो गरीबावर अन्यायच करणार आहे. परंतु आता तुम्ही ही कामे सोडून द्या. बाकीचे अभियान थोडसे बाजूला ठेवा व आता येणारी दोन वर्षे बळीराजाकडे लक्ष द्या. संत गाडगे महाराज व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्रामस्वच्छता अभियान व तंटामुक्त गाव या योजना चालूच राहतील. परंतु खऱ्या अर्थाने बळीराजाची पूजा या राज्यात झाली पाहिजे, ती होत नाही. त्यामुळे किमान एवढेतरी पुण्य घ्या. या शेतकऱ्यांना एकदा कर्जमुक्त करुन दाखवा. तुमच्यामध्ये डेअरींग आहे, तुम्ही ठरविले तर हा निर्णय घेऊ शकता. म्हणून आमची मागणी आहे की, शेतकऱ्यांचा सात-बारा उतारा कोरा करुन बळीराजाला कर्जमुक्त करावे एवढी मागणी करतो व माझे भाषण संपवितो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/

श्री.दिवाकर रावते (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, उशिरा का होईना, अनेक अडचणीतून का होईना, शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसंदर्भात या सभागृहात चर्चा सुरु करण्याबाबत आपण अनुमती दिल्याबद्दल मी मनापासून आपणास धन्यवाद देतो. चर्चेच्या अनुषंगाने मला कोणाला आव्हान करावयाची इच्छा नाही. परंतु शेतकऱ्यांच्या झालेल्या परिस्थितीची पाहणी पाहताना, दोषारोप करताना ते कोणावर व्यक्तिगत नसून धोरणावर आहेत, कृपया याची नोंद घ्यावी. शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्ती हा एकमेव विषय घेऊन आम्ही सदनामध्ये उभे आहोत.

.....यानंतर कु.धनश्री.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापतीस्थानी : माननीय उपसभापती

श्री. दिवाकर रावते.....

आमच्या सर्वांचा हा कळकळीचा विषय आहे. सरकार ज्या पाठींब्यावर उभे राहते व चालते, तो पाठींबा नसल्यावर काय होते हे आपण कर्नाटक राज्यामध्ये पाहिले आहे. आठ दिवसाची नौटंकी jराजकीय क्षेत्रामध्ये तेथे चालली. केवळ घटनेमध्ये तरतुद असल्यामुळे काय घडू शकते हे आपण पाहिले. म्हणून ज्या शेतकऱ्यांनी आपल्याला विश्वासाने निवडून दिलेले आहे, त्या शेतकऱ्यांचा आपण आधार आहोत अशी भावना येथे निर्माण होणे आवश्यक आहे.

मी अत्यंत नम्रतापूर्वक आपलला धन्यवाद देतो की, आपण सुरुवातीला ज्या भावना व्यक्त केल्या त्या रेकॉर्डवर आहेत, त्या फार मोलाच्या आहेत. शेतकऱ्यांच्या भावनेशी मी सहमत आहे म्हणून त्यास अनुमती देत आहे. सभापती महोदय, संपूर्ण कर्ज मुक्ती द्यावी अशी आग्रही भूमिका घेऊनच मी येथे चर्चेला सुरुवात करीत आहे. शेवटी वैधानिक माध्यमातून आग्रह धरण्यालाही काही मर्यादा असतात. चर्चा हे त्याचे मूळ माध्यम असते. माझ्याकडे श्री. प्रभाकर कुलकर्णी यांचा एक लेख आहे. त्या लेखाने मी माझ्या भाषणाची सुरुवात करतो. त्या लेखात असे म्हटले आहे की, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी काही राजकीय पक्षांनी आंदोलन सुरु केले आहे. कोणत्याही उपेक्षित घटकाला झुकते माप देऊन सहाय्य करणे ही सामाजिक न्यायाची भूमिका आहे. त्या अर्थी कर्जबाजारी शेतकऱ्याना कर्ज मुक्त करणे हे कार्य सामाजिक न्यायाशी सुसंगत आहे. औद्योगिक क्षेत्रातील नुकसानग्रस्त उद्योगांना राष्ट्रीयीकृत बँकांनी कर्ज माफ केले आहे. या माफीची रक्कम काही लाख कोटींची आहे. साखर उद्योग चांगल्या परिस्थितीत असताना, काही तोटयात गेलेल्या साखर कारखान्यांचे कर्ज माफ करण्यात आलेले आहे. अनेक सवलती, पुरेसा पुरवठा, व्याजाचे सवलतीचे दर आणि उत्पादन खचार्वर आधारित व पुरेसा फायदा मिळेल असे दर उत्पादनाला मिळत असताना उद्योग जर आजारी पडला तर त्याला कर्ज माफी मिळते. या सवलतीचा विचार केला तर उद्योगक्षेत्र हे उपेक्षित घटक आहे असे दिसत नाही. त्या तुलनेने शेतकरी सारख्या उपेक्षित घटकाला कर्जमाफी, व्याजमाफी का मिळू नये हा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

सभापती महोदय, गेले 4 -5 वर्षे या प्रश्नावर मी प्रामाणिकपणे विचार केलेला आहे. कोणतेही राजकारण न करता, शेतकऱ्यांकरिता जे करता येईल ते करण्याचा मी सदैव प्रयत्न केलेला आहे. मी एकूण 3 दिंडया काढल्या. या सदनामध्ये मी हा लढा लढविला आहे. मला मिळालेल्या अधिकारातून सरकारशी झुंज देण्याचा मी शक्य तो प्रयत्न केला. काही वेळा शाब्दिक चकमकी उडाल्या तर काही वेळेला समोरील सन्माननीय सदस्य नाराज होतील असेही शब्द माझ्या तोंडातून निघाले. माझे शब्द हे उत्स्फुर्त असतात, ठरविलेले नसतात. त्यामागील भावना ही शेतकऱ्यांच्या विवंचनेतून आणि आक्रोशातून आलेली असते. म्हणून सुरुवातीलाच मी हे आपणास सांगितले.

सभापती महोदय, तीन दिंडयांचे मनोगत मी आपणाला वाचून दाखविणार आहे. ही कर्जमुक्ती दिंडी मी का काढत आहे, यासंदर्भात मी अनेक शेतकऱ्यांना पत्र लिहिले. विदर्भामध्ये कास्तकाऱ्यांना कापसाचे चुकारे वेळेवर मिळत नव्हते. त्यातून निर्माण झालेल्या आत्महत्यांना सावरण्याकरिता सेवाग्राम ते शेगाव (554 कि.मी.) अशी कापूस दिंडी काढली. या दिंडीला शेतकऱ्यांचा लाभलेला प्रतिसाद एवढा प्रचंड होता की, सरकारला त्वरित चुकारे देण्यास भाग पाडले. या दिंडीमध्ये मी मौन पाळले होते. तरीही कर्जबाजारी शेतकऱ्यांचे दुर्दैव मात्र कर्जमुक्त होवू शकले नाही. कापूस दिंडीचा उद्देश संपन्न झाला. परंतु परिस्थितीवर मात करण्यास सरकारने कापसाला योग्य भाव न दिल्यामुळे शेतकरी कर्जबाजारीच राहिला. व्याज गेलं. मुद्दल राहिलं. त्यावर परत व्याज चढत राहिलं. नवीन कर्ज मात्र दूरच राहिलं. शेतकऱ्यांची हलाखी वाढत राहिली. परिणामी आत्महत्या वाढत राहिल्या. आत्महत्या रोखण्यासाठी अयशस्वी झालेल्या सरकारला शेतकऱ्यांच्या हालाखीची जाणीच नव्हती.

यानंतर श्री. सुंबरे.....

अशुधारित प्रत / रोखीसाठी नाही

श्री. रावते ...

त्याचकरिता परिस्थितीची जाणीव व्हावी, मायबाप सरकारला बोलते करावे आणि आपण काहीच देऊ शकत नसाल तरीसुद्धा माणुसकीचा गहिंवर द्यावा, आत्महत्याग्रस्त दुर्दैवी गरीब कुटुंबाचे अश्रू पुसावेत, त्याचवेळी आत्महत्येमुळे उद्ध्वस्त झालेल्य कुटुंबांना गावागावात जाऊन बळ द्यावे याकरिता 1250 कि.मी. शेगाव ते परभणी (कापूस दिंडी मंदीर) अनवाणी सांत्वन दिंडीतून आपल्या गावकुसापर्यंत पोचण्याचा प्रयत्न केला. माननीय शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांचा सांत्वनाचा संदेश दिला. अभागी भगिनींना मायेची साडी-चोळी दिली. त्याचवेळेस गावागावातून आत्महत्येच्या उंबरठ्यावर असलेल्या शेतकऱ्याला साद घातली. परिणाम - शेतकरी पॅकेज जाहीर झाले, तेही हतबल ठरले.

या दोन्ही दिंडीच्या वेळी आपण मला भेटलांत. माझं मनोबल वाढवलंत, मला आणि माझ्या सहकाऱ्यांना चालण्याचे बळ दिलंत. हेही आपल्याच कास्तकऱ्यावर आपलं असलेलं बोलकं मन होत. अबोल बोलणाऱ्या भावना होत्या. अन परिस्थितीची सामाजिक बांधिलकी असणार भान होतं. आजही मी ते माझ्या मनाच्या कोपऱ्यात आपुलकीने जपून ठेवलं आहे. कारण, त्यातूनच गाडगेबाबांचा दृष्टांत आहे. तुकडोजी बाबांची हाक आहे. परिस्थितीत बदल होतच नाही. आत्महत्या थांबतच नाहीत. माननीय शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे बोल आठवतात. कर्ज मुक्ती द्या. ही त्यांनी सरकारला घातलेली साद आठवते, आणि हाच आता अंतिम इलाज आहे असं शरद पवारही म्हणतात. मग करत का नाही ? याचे उत्तर सापडत नाही. सरकार तर शरद पवारांचे आहे. याच करिता, पुन्हा एकदा असाच शेतकऱ्यांसाठी पायी निघतो आहे. कर्जमुक्तीसाठी साद घालणारी कर्जमुक्ती दिंडी घेवून या वेळेला दिंडीत पालखी असेल ती संत श्री गाडगेबाबांची आणि संत श्री तुकडोजीबाबांची.

गुरूकुंज मोझरी ते नागपूर विधिमंडळाच्या नागपूर अधिवेशनावर ही दिंडी धडकणार आहे, शेतकऱ्यांचा आक्रोश घेऊन.

माननीय शिवसेना प्रमुखांचे आशीर्वाद असलेली, शिवसैनिकांचे बळ लाभलेली दिंडी, जरी माझ्या पावलाने चालत असली तरी, दिंडीच्या समारोपाचं नेतृत्त्व मात्र शिवसेनेचे कार्यकारी अध्यक्ष माननीय श्री.उद्धवजी ठाकरे करणार आहेत.

मागच्या दोन दिंडीसारखं या दिंडीला आशीर्वाद द्यावेत, बळ द्यावे. नागपूर येथे समारोपाला यावच. याकरिता हे पत्र. " ..... जेजे 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

सभापती महोदय, या दिंडीमध्ये माझ्याकडे एका शेतकऱ्याकडून सरकारला सांगण्यासठी म्हणून चिठ्ठी आली आहे त्यात त्याने आपल्या सहीनिशी अगदी नंबर देखील दिलेला आहे. 29 सप्टेंबर 2007, मोर्शी येथील शेतकऱ्याने आपल्या चिठ्ठीमध्ये लिहिले आहे की, "सन्माननीय श्री. रावते साहेब, आपल्याला मी आठवण करून देतो की, माननीय श्री.मनोहर जोशी राज्याचे मुख्यमंत्री झाले त्यावेळेस श्री.शरद पवार यांनी म्हटले होते की, आम्हाला एकाधिकार योजनेतून कापसाला 2600 रूपये भाव दिला पाहिजे. आज श्री.शरद पवार हे देशाचे कृषी मंत्री आहेत. परंतु तरीही आपला कापसाचा भाव 1700 रूपये आहे आणि गेल्या पाच वर्षामध्ये महागाई दुपटीने वाढली आहे. म्हणून कास्तकार मरत आहे. या वाढलेल्या महागाईचा विचार केला तर आज कापसाला 4 हजार रूपये भाव दिला गेला पाहिजे." खाली सही आहे - म.पा.मालप. सभापती महोदय, ही एक अत्यंत बोलकी आठवण त्या शेतकऱ्याने सांगितली आहे. सभापती महोदय, आम्ही ज्यांच्याकडे मागतो आहोत ते काही या विषयातील अनभिज्ञ नाहीत. आम्ही ज्यांच्याशी बोलतो आहे त्यांना या प्रश्नाची जाण नाही असेही नाही. किंबहुना संघर्ष हा ज्यांचा पिंड होता आणि ज्यांनी या महाराष्ट्राची जडण घडण केली आहे अणि महाराष्ट्रातील शेतकरी आणि महाराष्ट्राची भूमी सुजलाम सुफलाम केली, त्यासाठी कष्ट केले ते आदरणीय शंकरराव चव्हाण हेही शेतकऱ्याच्या कापसाला चांगल भाव मिळावा यासाठी रस्त्यावर उतरले होते. त्यावेळी ते माजी उपमुख्यमंत्री होते आणि येथे उपस्थित असलेल्या प्रा.बी.टी.देशमुख यांना आठवत असेल की, त्यांच्या त्या काळामध्ये मी येथे नव्हतो. पण चांदूर रेल्वे येथे श्री.शंकरराव चव्हाण, श्री.राजारामबापू पाटील इत्यादी नेत्यांची 'शेतकऱ्यांच्या कापसाला भाव देण्यासाठी' म्हणून दिंडी निघाली होती. आमच्या समोरच्या मित्रांना मी सांगेन की, ज्यांच्या आदर्शाने आज आपण येथे येऊन बसला आहात आणि हे हे आमचे नेते आहेत म्हणून आज अगदी छातीवर हात ठेवून सांगता त्या आपल्या नेत्यांनी देखील 1980 साली 22 डिसेंबरला विदर्भामध्ये कपूस उत्पादक शेतकऱ्यांना हलाखीतून बाहेर काढण्यासाठी दिंडी काढली होती. त्या दिंडीचे नेतृत्त्व केले होते श्री.शंकरराव चव्हाण यांनी आणि त्यावेळी राज्याचे गृह राज्यमंत्री होते आताचे आमचे सभापती माननीय श्री.शिवाजीराव देशमुख. त्यावेळी त्यांनी आंदोलन करणाऱ्या त्या सर्व मंडळींना अटक देखील केली होती. ...

(यानंतर श्री. सरफरे ... केके 1 ..

अशोधित प्रत / शीघ्रलेखी नोंद

श्री. दिवाकर रावते...

आणि ही अटक केल्यानंतर या सदनामध्ये चर्चा उपस्थित करण्यात आली. त्या चर्चेचे इतिवृत्त पटलावर असून आपण ते अवश्य वाचावे. आपल्या नेतृत्वाने जो संघर्ष केला आहे तो आपण एक कार्यकर्ता म्हणून आपल्याला नेहमी बळ देत असतो, त्यांना आपण आपले नेते मानतो, त्या नेत्यांनी हे सर्व केले असतांना त्यामधील एक नेते प्रा. एन.डी. पाटील हे कोल्हापूरमध्ये या वयामध्ये देखील शेतकऱ्यांकरिता संघर्षाच्या भावनेने बोलत असताना सातत्याने दिसतात. त्यामध्ये कापूस उत्पादक असो, किंवा ऊस उत्पादक असो, कोणताही उत्पादक असो. प्रा. एन.डी.पाटील हे दर आठवडयाला एखाद्या ठिकाणी संघर्षासाठी कुठेतरी दिसत असतात. माननीय श्री. शरद पवार हे तर देशाचे कृषी मंत्री आहेत. मी असे कसे म्हणेन की, त्यांना आमच्या मागण्यांची जाण नाही, मी असे माझे मत बनवावे की, मी जे काही म्हणत आहे ते त्यांना समजत नाही? असा विचार माझ्या मनामध्ये कसा येऊ शकतो की, त्यांना शेतकऱ्यांचा आक्रोश कळणार नाही. त्या आक्रोशासाठी ते रस्त्यावर उतरले होते, त्यांना तो आक्रोश कळणार नसेल तर ते झोपेचे सोंग घेत असावेत किंवा ढोंगी असावेत.ही दोनच अनुमाने त्यांना लागू आहेत.आपण काय करावे हे त्यांनीच ठरवावयाचे आहे. माझे असे म्हणणे आहे की, ज्याला आपण "जाणता राजा" म्हणतो तो ढोंगी कसा असेल? तो ढोंगी नसेल तर त्याने काही कामासाठी झोपेचे सोंग घेतले असेल? या तांत्रिक बाबी झुगारुन देऊन स्वाभिमानी महाराष्ट्राच्या या शेतकऱ्याला कर्जमुक्त करण्याचा एकमुखी निर्णय "देता का जातां" असे आम्ही म्हणत आलो. "देता कां जातो" असे सांगत आपण केंद्रामधील राजीनामा देऊन याठिकाणी परत यावे, माननीय श्री. शरदरावजी पवार आपण आला तर न भूतो न भविष्यती असे आपले आम्ही स्वागत करु. शेतकरी दिलखुलासपणे तुमच्या मागे उभा राहील, हाच खरा आमचा "जाणता राजा" आहे. हे पद लावीत असतांना त्या पदाला शोभेल असे त्या नेत्याने आपल्या कृतीतून दाखविले तर भविष्यातील आमची ही पिढी उभी राहील. आणि आपल्या वडिलांप्रमाणे झगडण्याकरिता नेहमी कार्यकुशल राहील. नेत्यांनी नेहमी आदर्श निर्माण करावयाचे असतात. त्यानिमित्ताने मी या दिंडीचा उल्लेख केला. राजकारणाच्या पलिकडे जाऊन मी दिंडी नेण्याचा प्रयत्न केला. त्या दिंडीवर माझा बॅनर होता. कारण माननीय शिवसेना प्रमुखांनी सन 2004 मध्ये जनतेला आश्वासन दिले होते की, आपण आम्हाला शिवशाही दिली तर मी तुमचा 7/12 कोरा करीन. अशाप्रकारची घोषणा केली. त्याचवेळी मी मोफत वीज देईन असेही सांगितले. संभाजीनगरला आमचे अधिवेशन झाले तेव्हा त्यांनी ती घोषणा केली. आणि लगेच येणाऱ्या निवडणुकीमध्ये चोरावर मोर होण्यासाठी आपल्यातील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. दिवाकर रावते...

त्यावेळच्या आज केंद्रामध्ये बसलेल्या काही बदमाश राज्यकर्त्यांनी सांगितले की, आम्ही कर्जमाफी देऊ आणि मोफत वीज देऊ. लोक म्हणाले की, हे तर देणारे बसले आहेत आणि हे सत्तेवर आल्यानंतर देऊ असे म्हणत आहेत म्हणून त्यांनी आपल्यावर विश्वास टाकला. त्यामुळे आपण सत्तेवर बसला. विश्वासघाताच्या सुध्दा मर्यादा असतात. लोकशाहीमध्ये आपल्याला जनतेने निवडून दिले त्या जनतेशी कसे बेईमान व्हावे,किती विश्वासघात करावा, किती खोटे बोलावे? अशाप्रकारे आपण राजकीयदृष्टया जनतेशी कां वागावे? मोफत विजेचे लोडशेडींग वाढत गेले, जनतेमध्ये संताप निर्माण झाला. आता तर अशी परिस्थिती निर्माण झाली की, लोक म्हणतात की, ठीक आहे आम्हाला अर्ध्या तासाची चालेल, भाकरी करु नका. इतकी त्यांना लोडशेडींगची संवय लावून टाकली आहे. त्यावेळचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे आज वीज मंत्री झाले आहेत. त्यांना केंद्रामध्ये एका पत्रकाराने प्रश्न विचारला की, आपण महाराष्ट्रामध्ये मोफत वीज देण्याबाबत सांगितले होते. आज केंद्रामध्ये वीज मंत्री झाला आहात आपण काय करणार आहात ? त्यांनी सांगितले की, निवडणुकीतील घोषणा या देण्यासाठी नसतात. सभापती महोदय, मला आनंद आहे की, माझ्या शेतकऱ्यांच्या प्रश्नावरील भाषणाला विधानसभागृहामध्ये माननीय श्री. गोपीनाथ मुंडे हे भाषण करुन पाठबळ देत आहेत याचे मी स्वागत करीत आहे.

(यानंतर श्री. बरवड)

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाची नोंद

22.11.2007 (असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही) KK-1

बरवड/पाटील पूर्वी श्री. सरफरे 2.20 वा

श्री. दिवाकर रावते.....

सभापती महोदय, श्री. सुशीलकुमार शिंदे साहेबांनी दिल्लीचा बडगा आमच्यावर मारला. दिल्ली अशीच आहे. दिल्लीत गेलेला माणूसही तसाच वागतो. महाराष्ट्राशी बेईमानी हे दिल्लीचे कर्तृत्व आहे. महाराष्ट्राला गुडघे टेकायला लावणे हे दिल्लीचे कर्तृत्व आहे. भिकेचा कटोरा घेऊन आल्यानंतर सुध्दा महाराष्ट्रातील लोकांना तुच्छतेने लेखणे ही दिल्लीची पुरवाई आहे. आमचे विलासरावजी देशमुख यांनी अकोल्यामध्ये सरळ सांगून टाकले. आपल्या मुख्यमंत्र्यांनी अकोल्यामध्ये काही पाठवले का ? ते अकोल्यामध्ये आले की फसतात. सन्माननीय सदस्य श्री. सुधाकर गणगणे साहेब त्यांना नेहमी अकोल्याला नेतात आणि नेहमी त्या ठिकाणी गोंधळ होतो. अकोल्यात गोंधळ कसा होतो ते मी सांगणार आहे. त्यांच्या नावाचे एक पत्र आहे. त्यांच्यावर गुन्हा दाखल होईल अशा स्वरुपाचे माझ्याकडे अकोल्यातील पत्र आहे. आमचे मुख्यमंत्री असे म्हणाले की, मोफत वीज आणि कर्जमाफी या निवडणुकीच्या घोषणा होत्या, ते काही देण्याकरिता नव्हते. त्यांच्या पक्षाच्या अध्यक्षा, माजी खासदार आणि माननीय महसूल मंत्र्यांच्या तारणहार, यांनी असे सांगितले की, ही प्रिन्टींग मिस्टेक होती. यातील कोणालाही असे वाटले नाही मी एक लोकप्रतिनिधी आहे आणि आज मला समाजात काही तरी स्थान आहे, मी आमदार आहे आणि आपण किमान त्यांना जाऊन विचारावे किंवा किमान निषेध करावा. पदे दिली नाहीत म्हणून त्यांचा धिक्कार करता मग शेतकऱ्यांकरिता त्यांचा धिक्कार करण्याचे सामर्थ्य तुमच्यापैकी एकानेही दाखविले नाही हा कसला पंगुपणा तुमच्यात आला आहे ? याचा विचार आणि चिंतन आपण करावे. त्यांनी सांगितले की, प्रिन्टींग मिस्टेक आहे. शेतकऱ्यांशी किती बेईमानी करावयाची ? आता आमचे माननीय विरोधी पक्ष नेते श्री. फुंडकर साहेब बोलले. माननीय आर. आर. पाटील यांनी या ठिकाणी काय सांगितले होते ? तुम्हा आम्हाला शाळेमध्ये विरुध्दार्थी शब्द लिहा असा प्रश्न असावयाचा. शरम या शब्दाला विरोधी शब्द काय आहे ? तसे ते या सभागृहामध्ये वागले. ते राज्याचे उपमुख्यमंत्री आहेत, गृहमंत्री आहेत. त्यांच्याबद्दल आदर ठेऊन बोलावे लागते. शरम या शब्दाला जो विरोधी शब्द आहे तसे ते वागले. ते दोन तीन वेळा तसे वागले. ते नेहमीच तसे वागतात. बारबालांच्या प्रकरणापासून त्यांना अशी मान हलवून खुणवण्याची सवय झालेली आहे. मघाशी त्यांचे तसेच चालले होते. या

...2...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

सदनामध्ये उभे राहून त्यांनी अधिकृतरित्या सांगितले की, आम्ही 2700 रुपये भाव देऊ असे म्हटले होते पण कधी देणार ते आम्ही कोठे सांगितले ? हे राज्यकर्ते आहेत काय ? जनतेशी इतकी बेईमानी ? जनतेने तुमच्यावर का विश्वास ठेवावयाचा ? देतो देतो असे आपण सांगता त्यामुळे मग आम्हाला म्हणावे लागते "देता की जाता, का घालू लाथा". त्या योग्यतेचे राज्यकर्ते ज्यावेळी निर्माण होतात तेव्हा जनतेचा असा आवाज निर्माण होतो. तसे बोलणे आमच्या संस्कृतीतही बसत नाही पण ज्या पध्दतीने आपण लोकांशी वागता त्यामुळे बोलावे लागते. भारनियमन हा विषय आता नकोसा झालेला आहे. त्या ठिकाणी दंडाच्या कारवाया वगैरे सर्व चालूच आहेत. तो वेगळा चर्चेचा विषय आहे.

सभापती महोदय, केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार साहेब यांना 13 एप्रिल, 2006 रोजी सादर झालेला स्वामीनाथन समितीचा अहवाल माझ्याकडे आहे. "The draft Report of the National Commission on Farmers Presented to Shri Sharad Pawar in New Delhi" चैत्र, एप्रिल, 13, 2006. हा सर्व अहवाल वाचून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. मी व्यक्ती म्हणून नव्हे तर केंद्रीय कृषी मंत्र्यांच्या संदर्भात सांगत आहे. या अहवालामध्ये पृष्ठ क्रमांक 29 वर असे म्हटले आहे की, "It also calls for a strategy for achieving a 4% growth rate in the agricutural through a mix of technology, credit, insurance and marketing support and knowledge Connectivity."

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....

माननीय सहकार राज्यमंत्री श्री. दांडेगावकरसाहेब हे या ठिकाणी उपस्थित आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, या अहवालामध्ये मार्केटिंग सपोर्ट हा महत्वाचा मुद्दा आहे. या राज्यामध्ये काय चालले आहे ? राजकारभाराकडे कोणाचे किती लक्ष आहे याकडे मी येणार आहे. सभापती महोदय, आज शेतक-यांच्या झालेल्या आत्महत्यांची 50 टक्के जबाबदारी ही कृषी मंत्र्यांवर आहे. 'The Commission has also called upon the State Government to initiate a speedy market reform to ensure assured and remunerative marketing opportunities by removing bottlenecks and scope for corruption and harassment of farmers' हा रिपोर्ट शासनकर्त्यांना माहीत आहे काय ? या राज्यातील राज्यकर्त्यांसाठी हे लिहिलेले आहे. 'Sharad Pawar thanked Professor Swaminathan and his team for making out such comprehensive draft and said that this should be extensively discussed with the State Governments and all stakeholders so that the workable plan of action may be chalked out for implementation' असे केन्द्रीय कृषीमंत्री श्री. शरद पवार यांनी राज्याला आदेश दिलेले आहेत. सभापती महोदय, काल एक घटना घडली. त्या ठिकाणी मंत्रिमंडळातील कोणीही मंत्री गेलेले नाहीत याचे मला वाईट वाटते. माझ्याकडे असलेले कात्रण मी आपणाकडे पाठवितो. काल अकोल्यामध्ये शेतक-यांनी मार्केट कमिटीसमोर बैठा संप केला. आपले अधिवेशन चालू असताना वाशिममध्ये वापा-यांनी खरेदी बंद केली. मार्केट कमिटसमोर शेतकरी आपला माल घेऊन उभे आहेत. काहीही तोडगा निघत नाही म्हणून शेतक-यांनी बैठा संप केला. तोडगा निघण्या ऐवजी शेतक-यांना पोलिसांच्या काठ्या आणि लाथा खाव्या लागल्या. सभापती महोदय, एका 70 वर्षाच्या वयोवृध्द शेतक-याला पोलीस कसे मारत आहेत हे दर्शविणारे एक कात्रण मी आपणाकडे पाठवितो. माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील उर्फ आबांचे पोलीस शेतक-यांना मारतात. केन्द्रीय कृषी मंत्री मार्केटिंग पॉलिसी सांगतात. राज्याचे पणन मंत्री हतबल होऊन इकडे तिकडे धावतात. या सदनामध्ये हे मंत्री मोठी भाषणे करण्याकरिता आणि थापा मारण्याकरिता येतात काय ? सभागृहामध्ये दिलेली 11600 आश्वासने अजून प्रलंबित आहेत. याबाबतीत पत्रकार विरोधी पक्षाला सारखी विचारणा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....

करीत असतात. सभापती महोदय, कोणीही मंत्री आपली जबाबदारी पार पाडीत नाही. एकदा लाल दिव्याची गाडी मिळाली की जबाबदारी संपली असे समजून फिरायला, राजकारण करायला ते मोकळे होतात. राजकारण करा, तुमचे ते काम आहे. परंतु हे सर्व करीत असताना राज्याची जी जबाबदारी आपणाकडे सोपविलेली आहे ती आपण पार का पाडत नाही ? शेतक-याच्या आत्महत्येच्या संदर्भात केन्द्रीय कृषी मंत्र्यांनी दिलेला अहवाल आपण का स्वीकारला नाही ? हे अधिवेशन चालू असताना मार्केट कमिटीला या शासनाची भीती वाटत नाही. पोलिसांना धाक नाही. अधिवेशन चालू असताना पोलीस शेतक-यांना लाठयांनी मारतात, त्यांच्या गुप्तांगावर लाथाबुक्क्यांनी मारतात. या शेतक-यांनी राज्यामध्ये कोठे आक्रोश करायचा ? सभापती महोदय, ही सर्व परिस्थिती या सभागृहामध्ये मांडायची झाली तर त्यासाठी कित्येक दिवस लागतील.

....नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

महाराष्ट्राच्या कृषिमंत्र्यांना स्वामीनाथन यांनी दोन ओळीचा सल्ला दिला आहे तो मी वाचणार आहे. कारण अहवाल खूप मोठा आहे. It reads as under: "It is suggested that a consortium of innovative farmers for Agricultural Transformation of Maharashtra." मला उत्तर देताना आता तुम्ही हा जो अहवाल दिला त्याप्रमाणे तुमच्या मंत्रीमहोदयांनी .." Under the Chairmanship of Minister of Agriculture may be formed." हे असे फॉर्मेशन केले आहे का? केले असेल तर कधी केले? त्याचे काय कार्य चालले आहे? कोण ते पहात आहे? शेतक-यांना काय फायदा मिळाला? हे सांगितले तर मेहेरबानी होईल. मरणाऱ्या शेतकऱ्यांना वाटेल सरकार काहीतरी आपल्याकरीता करीत आहे. हा अहवाल आपल्याला देऊन पाच वर्षे झाली. या अहवालावर काय केले हे सांगा?

सभापती महोदय, हा जो अहवाल माझ्या हातात आहे हा शेतकऱ्यांची सेवा आणि शेती वाचविणे असा त्याचा मराठी अर्थ होतो. In English, the wording is:"Serving farmers and saving farming ",जय किसान. It is in regard to Draft National Policy for farmers, Ministry of Agricultural, Govt. of India, dated 13th April,2006. या अहवालात काय म्हटले आहे? प्रिॲम्बल पृष्ठ क्रमांक-2 मध्ये म्हटले आहे की, "Farmers suicides are not only persisting but are tending to increase particularly in the Vidharbha region of Maharashtra."2006-2007 साली दिल्लीतील कृषि मंत्रालयाकडे हा अहवाल आलेला आहे. मंत्री वारंवार लोकांची दिशाभूल करण्यासाठी, स्वत:ची कातडी वाचविण्यासाठी आव आणण्याकरीता सांगतात की, आत्महत्या कमी झाल्या आहेत. तुम्हाला आणि मला बोलायला तोंड दिले आहे, बुध्दी दिली आहे म्हणून कोलांटउड्या मारतो. परंतु हा लेख आलेला आहे याचे काय करणार? या अहवालात काय म्हटले आहे? I will read out para 1.5 of that Report. It reads as under: "Farmers suicides are not only persisting but are tending to increase particularly in the Vidharbha region of Maharashtra. The suicides are driven by several factors that include debt from private moneylenders at high rates of interests, soaring in put costs, low output prices etc. etc. सावकारी व्याजासंदर्भात यात उल्लेख आहे. It further

..2..

श्री.दिवाकर रावते.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

reads as under: "Need for funds for non-farm expenditure, particularly, for health care and a complete loss of hope." म्हणजे विरोधी पक्षनेत्यांनी उल्लेख केल्याप्रमाणे घरातील लग्न व इतर कार्यासाठी लागणारा पैसा याचा उल्लेख यात करण्यात आला आहे. It is also stated that:" Unfortunately, the economic, ecological, technological and social problems facing small farmers are yet to receive the integrated attention they need." इंटिग्रेटेड हा शब्द वापरला आहे. सन्माननीय सदस्य श्री.गडाख यांच्या एका लेखाचा मी याठिकाणी संदर्भ घेणार आहे. Although, the NCF had recommended in its Second Report submitted in August,2005, a life saving package including the formation of "Hope Generation Team" of students by Agricultural Universities to visit suicide hotspots" हे सांगितले आहे एप्रिल, 2006 मध्ये. सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांचे दोन वर्षापूर्वीचे भाषण मला आठवते.

(नंतर श्री.जुन्नरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

सभापती महोदय, माननीय गृहमंत्री काही तरी इश्यू घेतात आणि थयथयाट करीत बसतात. आबा जेव्हा ग्रामविकास मंत्री होते तेव्हा संत गाडगेमहाराज अभियानमुळे ते नेहमी चर्चेत राहत होते, त्यानंतर उपमुख्यमंत्री झाले. उपमुख्यमंत्री झाल्यानंतर ते बारबालांमुळे चर्चेत आले, बारबालाचा विषय संपल्यानंतर आता ते सावकारीमुळे चर्चेत आहेत. आबा नेहमी सावकारांच्या संदर्भात बोलत असतात, सावकारी कायद्याच्या संदर्भात बोलत असतात परंतु पाच वर्षे झाली तरी देखील या शासनानाने सावकारी प्रतिबंधक कायदा काही केला नाही. आम्ही ग्रामीण भागात गेल्या बरोबर लोक बोलतात की, "आता आबा काय म्हणाले?" सभापती महोदय, प्रेसवाले फार हुषार असतात. शासनाचा कोणता विषय जनतेपर्यंत पोहचवायचा यामध्ये ते फार हुषार असतात. खरे म्हणजे महाराष्ट्रासाठी कै. माननीय यशवंतराव चव्हाण हे ख-या अर्थाने इन्स्पायरर आहेत परंतु माझ यासाठी केवळ शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे हे इन्स्पायरर आहेत. आबा एकदा बोलायला लागले की, ते एक दीड तास काही थांबत नाहीत त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. गडकरी साहेब त्यांना पोपट म्हणतात. पोपट बोलतो परंतु काही करीत नाही अशी परिस्थिती आहे. माननीय आबा सावकारांच्या संदर्भात बोलले होते की, "सावकारांना कोपरापासून ढोपरापर्यंत सोलून काढा, चौकात आणून सावकाराला फटके मारले पाहिजेत." सभापती महोदय, आंबाचा आदेश मी पाळला आणि सावकारला चौकात नेऊन फटके मारले तर काय होईल? पोलीस सावकाराला सोडून देतील आणि माझ्यावरच केस करतील. पाच वर्षे झाले तरी हे शासन सावकाराच्या संदर्भात कायदा करु शकले नाही. आबांचे उत्तरदायित्व काय आहे? आबा या ठिकाणी म्हणाले की, शेतक-यांची टिंगल टवाळी बंद करा. माननीय आबा म्हणाले होते की, शेतक-यांना कर्जमुक्ती देण्याच्या संदर्भात आम्ही पॉझिटीव्ह उत्तर देऊ. मी कालचे उदाहरण आपल्याला सांगू इच्छितो की, काल दुपारी माननीय आबा पंढरपुरला दुपारी 2.00 वाजता हेलिकॉप्टरने उतरले. आबा उतरल्या उतरल्या प्रेसवाल्यांनी विचारले की, " शेतक-यांच्या कर्ज मुक्तीच्या संदर्भात शासनाचे धोरण काय आहे?" त्यावेळेस आबांनी प्रेसवाल्यांना सांगितले की, "राज्याची आर्थिक परिस्थिती कर्जमुक्तीसाठी सक्षम नसल्यामुळे कर्ज मुक्तीच्या संदर्भात आम्ही त्याचा विचार करु शकत नाही". ख-या अर्थाने हे राज्य आर्थिक दृष्टया पंगू झालेले आहे असेच त्यांनी काल सांगितलेले आहे. आणि आज त्यांनी येथे सांगितले आहे की, शेतक-यांच्या कर्ज मुक्तीच्या संदर्भात आम्ही पॉझिटीव्ह उत्तर देऊ.

....2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

सभापती महोदय, हे सरकारच शेतक-यांची टिंगलटवाळी करीत आहे. आबांना शेतक-यांची टिंगलटवाळी करण्याचा काही एक अधिकार नाही. शेतक-यांना हे शासन काही मदत करेल असे आम्हाला वाटत नाही. माननीय आबांनी काल चंद्रभागेच्या काठी दुपारी 2.00 वाजता जे सांगितले होते ते आम्ही टि.व्ही. वर बघितलेले आहे. आज आबांना सावकारच नाही तर पोलीस सुध्दा घाबरतात की, नाही अशी परिस्थिती आहे. सानंदाच्या केसमध्ये कोर्टाने सुमोटो केस करण्याचे आदेश दिलेले असतांना सुध्दा शासनाने अद्यापर्यंत काहीही केलेले नाही. माननीय गृहमंत्र्यांचा काहीही धाक राहिलेला नाही. पोलीस तुमचे आता ऐकतात की, नाही हा प्रश्न निर्माण झालेला आहे. सभापती महोदय, जय किसानच्या रिपोर्टच्या संदर्भात सकाळच्या प्रेसच्या टीमने चांगल्या प्रकारची माहिती गोळा केलेली आहे. या संदर्भात सकाळच्या प्रेसमध्ये माहिती घेण्यासाठी मी गेलो होतो.

यानंतर श्री. अजित.....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

माननीय केंद्रीय मंत्री श्री.शरद पवार यांनी तो अहवाल वाचला असेल किंबहुना त्यांची त्यावर पूर्ण पकड आहे. दैनिक मुंबई सकाळ या वृत्तपत्राने विदर्भातील शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्यामागची कारणे शोधली. त्याचे त्यांनी एक पुस्तक काढलेले आहे. त्यामध्ये आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांचा स्वभाव कसा होता, तो निर्व्यसनी होता का, तापट होता का याची माहिती दिलेली आहे. श्रीमती मनिषा म्हैसकर यांनी शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्येच्या संदर्भात उर्दू भाषेत माहिती प्रसिध्द केलेली आहे. कोणीही मागणी केलेली नसताना त्यांनी ती माहिती उर्दू भाषेत प्रसिध्द केलेली आहे. त्या संदर्भात मी नंतर बोलणार आहे. मी पुन्हा दैनिक सकाळने काढलेल्या अहवालाकडे येतो. दैनिक सकाळने दिलेल्या अहवालात शांत स्वभावाचे शेतकरी 68.59 टक्के, स्वाभिमानी शेतकरी 24 टक्के, तापट स्वभावाचे शेतकरी 5 टक्के ही सर्व आकडेवारी प्रत्येक शेतकऱ्यांच्या घरी जाऊन आल्यानंतर दिलेली आहे. सचिन तेंडुलकर जसा 90 च्या पुढे गेल्यावर थरथरायला लागतो त्याप्रमाणे बोलून बोलून सरकारची जीभ विटाळायला लागली आहे. म्हणून शेतकऱ्यांनी दारू पिऊन आत्महत्या केली अशाप्रकारचे वक्तव्य सरकार करायला लागले. त्यावेळी मी तत्कालीन महसूल मंत्री यांना सांगितले की, "तुम्ही वयाने मोठे आहात, आमच्यापेक्षा तुम्हाला जास्त अनुभव आहे. तुम्ही तरी शेतकऱ्यांची अशाप्रकारे अवहेलना करू नका." पुढच्या निवडणुकीत शेतकऱ्यांनी त्यांना घरी पाठविले. दैनिक सकाळच्या अहवालात नमूद केले होते की, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची प्रकृती 95 टक्के निरोगी होती. 85 टक्के शेतकरी निर्व्यसनी होते. 78 टक्के शेतकरी मनमिळावू होते. माननीय श्री.शरद पवार यांच्या सकाळ या वृत्तपत्राने केलेल्या अहवालातील ही आकडेवारी आहे. तेव्हा श्री.शरद पवारांचा अपमान करायचा किंवा कसे हे त्यांच्याच पक्षातील सदस्यांनी ठरवावयाचे आहे. नापिकी, कर्जबाजारीपणा, अपुरा पतपुरवठा, शेती पूरक उद्योगाचा अभाव या कारणांमुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत. शेतीपूरक उद्योगाचा अभाव हा मुद्दा श्री.शरद पवार यांनी देखील उचलून धरला आहे. शेती मालास योग्य भाव मिळत नाही. दैनिक सकाळने जो निष्कर्ष काढलेला आहे तशाच प्रकारचा निष्कर्ष टाटा इन्स्टिटयुट ऑफ फंडामेन्टल रिसर्च व इंदिरा गांधी इन्स्टिटयुट ऑफ डेव्हलपमेंट रिसर्च या संस्थानी दिलेला आहे. श्री.सुरजित मिश्रा यांच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

अहवालातसुध्दा शेतकऱ्यांच्या आत्महत्या या नापिकी आणि कर्जबाजारीपणामुळे झालेल्या आहेत असे म्हटलेले आहे. श्री.दीपक शाह यांच्या अहवालात सुध्दा अशाच प्रकारची कारणे दिलेली आहेत.

सभापती महोदय, याठिकाणी पणन मंडळाचे अध्यक्ष डॉ.एन.पी.हिराणी उपस्थित आहेत. ते यवतमाळ जिल्ह्यातील आहेत. प्रशांत दामले यांचे "ही खरी बनवाबनवी" असे एक नाटक आहे. त्याप्रमाणे सरकारची बनवाबनवी चालू आहे. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी माझं काही चुकत असेल तर त्याबाबत त्यांनी मला अवगत करावे. राज्य सरकारने शेतकऱ्यासांठी 1075 कोटी रुपयांचे पॅकेज दिले. ही रक्कम कशाप्रकारे द्यावयाची यामुळे अर्थखात्यावर ताण आला म्हणून सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख चिंतेत आहेत.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

आपण फक्त राजकीय आखाडयाची चिंता करता. आज राज्याच्या मंत्रिमंडळातील मंत्री त्यांना विचारत आहेत, आमच्या खात्याचे "देता की जाता"? आमच्या खात्याच्या पुरवणी मागण्या का घेतल्या जात नाहीत, असे मंत्री विचारत आहेत. आज मंत्रिमंडळातील गृहमंत्री, श्री.आर.आर.पाटील साहेब, महसूल मंत्री, श्री.नारायण राणे ओरडत आहेत, इतरही काही मंत्री ओरडत आहेत आणि मंत्रिमंडळातील मंत्रीच हया बातम्या लिक करीत आहेत. मंत्रिमंडळातील कुठलाही निर्णय या बातमी बाहेर जाता कामा नये, अशाप्रकारचे घटनात्मक बंधन असते. आपण मंत्री होताना गोपनीयतेची शपथ घेता, तरीही अशाप्रकारच्या बातम्या लिक करता ? याठिकाणी अनुशेषाबाबत सतत बोलून आम्ही कंटाळलो, परंतु आपल्यात काहीच फरक पडत नाही. राज्याच्या ॲडव्होकेट जनरल यांना तर वकिलाची डिग्रीच कोणी दिली, हे मला कळत नाही. अहलुवालिया प्रकरणाच्या विरुध्द त्यांनी स्वत: मत मांडले. सरकारची बाजू घेण्याकरिता त्यांनी हे सर्व केले. ॲडव्होकेट जनरलच जर कायद्याची बूज राखत नसतील तर आपल्याला न्याय कसा मिळणार ? माननीय प्रा.बी.टी.देशमुख साहेब, आपण असे बोलू शकत नाही. आपण पॅकेजच्या संदर्भातील अग्रीम बंद केला. यासंदर्भातील हिशोब माननीय सहकार राज्यमंत्र्यांनी द्यावा. एक हजार 75 कोटी रुपयांचे पॅकेज 2 वर्षांसाठींचे होते. त्यामध्ये पहिल्या वर्षाचा व दुसऱ्या वर्षाचा शेतकऱ्यांना किती अग्रीम मिळाला असता ? माझ या दृष्टीने, तो पहिल्या वर्षासाठी 1300 रुपये आणि दुसऱ्या वर्षासाठी 1700 रुपये मिळाला असता. परंतु शेतकऱ्यांसाठी जे 3 हजार कोटी रुपये मिळणार होते, ते आपण त्यांना दिले नाही. त्या बदल्यात फक्त 1 हजार 75 कोटी रुपये दिले, परंतु याठिकाणी आपण पॅकेजच्या थापा मारत आहात, हे योग्य आहे का ? आपणांस जणाची मनाची तरी काही वाटत नाही का ? शेतकऱ्यांना बुडवल्याचे आपल्याला काहीच वाटत नाही ? आपण त्यांना 3 हजार कोटी रुपये दिले असते तर शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्या असत्या. परंतु ते आपण दिले नाहीत. 1600-1700 रुपये देऊन आपण अग्रीम थांबवला. सभापती महोदय, मी दोन वर्षांचा हिशोब काढलेला आहे. शेतकऱ्यांच्या हक्काचे 3 हजार कोटी रुपये दिलेले नाहीत. परंतु पॅकेज मात्र आपण मिरवत आहात, हे बरोबर नाही. या असल्या प्रवृत्तीला काय म्हणावयाचे ? सभापती महोदय, माझ्याकडे सुसाईड ऑफ फॉर्मर इन महाराष्ट्र, सुरजित सिंग

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

यांचा अहवाल आहे. तो आपल्याकडे आलाच असेल. सुरजित ॲण्ड अनादर्स इंदिरा गांधी इन्स्टिटयूट ऑफ डेव्हल्पमेंड रिसर्च, मुंबई यांनी जो आपल्याकडे अहवाल दिला, तो सुसाईड ऑफ फार्मर इन महाराष्ट्र बॅगराऊंड पेपर्स, सुरजित सिंग, संगिता श्रॉफ, दीपक शहा, विवेक देशपांडे यांचा आहे. यांच्या अहवालाच्या आधारावर आमच्या शेतकऱ्यांचे आपण वाटोळे केले. मनिषा म्हैसकर यांचाही अहवाल मी वाचणार आहे. याठिकाणी जे लिहिले आहे, ते अत्यंत दुर्दैवी आहे. ते वाचून आणि ऐकून अंगाची आग आग होते. अंजली पी.कुलकर्णी, विनायक देशपांडे, आर.बी.भटकुल यांचा हा अहवाल असून तो 2006 चा आहे, त्यामधील ओपिनिअन फक्त मी वाचणार आहे. याठिकाणी मी प्रत्येकवेळी सांगत आहे की, माननीय मुख्यमंत्री आणि सरकार पूर्णपणे बनवाबनवी तरी करीत आहे किंवा झोपण्याचे तरी सोंग घेत आहे. यातील हेतू आपण वाचावा. आत्महत्येसंबंधी आपल्याला अनेक लोक सांगत आहेत. आपणही आत्महत्या घडल्या, आत्महत्या घडल्या हेच सांगत आहात. अरे, आत्महत्या घडत आहेत ना. मग, ते आपले कर्तृत्व आहे का ? आत्महत्या घडत आहेत, त्याबद्दल आपल्याला काहीच वाटत नाही का ? माझा मुलगा एकदा नापास झाला, दोनदा नापास झाला, तीनदा नापास झाला, परंतु तो नापास झाला ना ? ते काही आपले कर्तृत्व आहे का ? नापास झाला ते आपण जाहीर करा. आत्महत्या ही काही शाबासकीची बाब आहे का ?

नंतर श्री.रोझेकर.....

अशुधारित प्रत / रोझेकरांची नाही

श्री.दिवाकर रावते.....

कर्जबाजारीपणा हा आत्महत्येमागील महत्वाचा मुद्दा आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. It has been stated that, "Indebtedness is the most common risk factor. It was identified in 66 per cent of the single risk factor and all the double and triple risk factors. Crop failure is identified in 25 per cent of the single risk factor." तिबार पेरणीची वेळ आली होती त्यासंबंधीचा हा उल्लेख आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी देखील याचा उल्लेख केला होता. पुढे असे म्हटले आहे की, "Another important risk factor happens to be daughter's or sister's marriage, which was identified in 13 per cent of the total cases. It needs to be reiterated that risk factor are not mutually exclusive. They can co-exist and even feed into each other aggravating the overall stress of an individual." श्री.मिश्रांनी असे म्हटले, " Only 8 per cent of the total public investment went to agriculture, and the actual investment in this sector fell about 40 per cent short of the planned level." सन्माननीय मंत्री महोदय आता आपल्याला उत्तरात सांगणार आहेत की, अंमलबजावणी केली, एवढे कोटी रुपये लग्नासाठी दिले वगैरे वगैरे. पण मला त्यांना सांगायचे आहे की, ज्या लोकांना लग्नासाठी पैसे दिले त्यांची सीआयडी चौकशी एकदा कराच. ज्यांची लग्न झाली आहेत तेच लोक उभे राहिले, बायकोलाच नवी नवरी म्हणून उभी केली, अनुदान लाटले. यामध्ये पुढा-यांची किती माणसे आहेत, किती कार्यकर्ते आहेत, किती बेकायदेशीर लाभार्थी आहेत, हे तुम्ही जाहीर करणार काय ? तुम्ही सीआयडी इन्क्वायरी केली तर सगळे पक्ष सोडून जातील, त्यामुळे इन्क्वायरी करण्याची तुमच्यामध्ये हिंमत नाही. एवढे कोटी रुपये दिले, तेवढे कोटी रुपये दिले, ही सगळी बनवाबनवी आहे. श्री.शहा पुढे म्हणतात.." and the actual investment in this sector fell about 40 per cent short of the planned level." माननीय कृषिमंत्री महोदय, हा आपला मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाखसाहेब आपण हा मुद्दा आपल्या भाषणामध्ये नेहमी मांडत असता. सरकारने यावर काय उपाययोजना केली ? आत्महत्या

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

कमी होत आहेत का ? अहवालात पुढे असेही म्हटले आहे की," It has already been established by some recent studies that while large and medium categories of farmers belonging to higher caste committed suicide.."अल्पभूधारकच नाही तर मोठे शेतकरी देखील आत्महत्या करीत आहेत, हा स्टडी पुढे आला आहे. " Due to a variety of socio-economic reasons independent of agriculture, the suicide committed by low caste farmers is mainly due to crop loss and indebtedness." मोठे शेतकरी आत्महत्या का करीत आहेत, हे पुढे सांगितले आहे. श्री.विवेक देशपांडे यांनी शेतक-यांचा बळी गेला आहे त्याबद्दल मत मांडले आहे. येथे मत बॅलन्स आहे, तेथे का बिघडले माहित नाही. " There is an urgent case of reduction of interest rates on farm loan, as Dr. Swaminathan suggests. The Government should also ponder waiving off part of the past loans," श्री.विवेक देशपांडे म्हणतात की, कर्ज माफ करावे. आता त्यांना ही संकल्पना पटली आहे. ते टॉपचे आहेत, मोठे असले पाहिजेत, सरकारने बोलाविले म्हणजे मोठेच आहेत. विदर्भातील पत्रकारांना कोण बोलावितो, मुंबईचे असतात, मोठे असतात, अे.सी.मध्ये असतात, असो. अहवालातील पुढचे स्टेटमेंट असे आहे की, "if not the whole of them. Also needed is relaxation in the condition for repayment of loans, the defaulting farmer should not disqualify for fresh loans at least for the next one year. " Shri Jawadhia says that the cotton federation and NCF have suggested hiking import duty on cotton to check dumping, but it does not seem to have found any favours with the Central Government."

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .....

केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार याकडे लक्षच देत नाहीत ? साखरेवरील इम्पोर्ट डयुटीचा प्रश्न आणि हा प्रश्न वादातीत निर्माण झालेला आहे. श्रीमती अंजली कुलकर्णी आणि श्री.विनायक देशपांडे यांचे जे मत आहे ते या अहवालातील पृष्ठ क्र.23 वर आहे. त्यांनी असे म्हटलेले आहे की, " Maximum sucides have been reported in Vidarbha particularly after a second crop failure and in some cases third also, left farmers with no chance to repay the loans. Even a hand-to-mouth existence was rendered difficult. Mounting debt owing to crisis in the crop is the most common reason for the suicides in Vidarbha." एवढया स्पष्ट शब्दातील हा अहवाल दिनांक 26.6.2006 रोजी राज्य शासनाकडे आलेला आहे. माझ्याकडे अनेक अहवाल आहेत. ते सर्वच अहवाल वाचलेच पाहिजेत असे नाही. कर्ज माफी हा मुद्दा मला ट्रेस करावयाचा होता. आत्महत्या का होत आहेत आणि याला कर्ज मुक्ती हा एकमेव मार्ग आहे, हे तज्ज्ञांनी अहवालामध्ये सांगितलेले आहे. हे सर्व अहवाल वाचल्यानंतर माझ्या असे मनात आले की, तज्ज्ञ लोक हे सांगत आहेत. सर्व सन्माननीय सदस्य हे वाचत नाहीत. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी एक महत्वाचा मुद्दा सांगितला होता. एका समितीवर 8-9 सदस्य होते. त्या समितीवर एकही मुस्लीम सदस्य नाही, असा त्यांचा मुद्दा होता. हा सरकारच्या धोरणाचा भाग आहे. पांडित्य हे जाती-पातीवर नसते. ते प्रत्येकाकडे मुळातच असते. ते प्रत्येकाला जन्मजात येते, कोणालाही येते. हा विषय मी फिरवत नाही. हे सर्व वाचल्यानंतर मी दिंडी काढली. त्यावेळी मला असे वाटले की, ही दिंडी शिवसेनेची असली तरी हा मुद्दा सर्व समाजाचा आहे. सकाळी सच्चर समितीच्या शिफारशींच्या संदर्भात आग्रही असणा-या माझ्या सर्व मित्रांना माझी हात जोडून नम्र विनंती आहे की, हे सर्व कशासाठी केले ? मी या भागातील लाखो शेतक-यांच्या संपर्कात आहे. मी त्यांच्याशी बोलतो, त्यांचे दु:ख ऐकून घेतो. शेतक-याचे घर कसे आहे हे सांगावे लागत नाही. त्या शेतक-याची राहण्याची पद्धत, त्याचे अंगण, त्याचे कपडे, त्याच्या चपला, त्याचे राहणीमान, त्याच्या घरामध्ये डोकावल्यानंतर त्याच्या कुटुंबातील त्याच्या बहिणींच्या अंगावर असलेले वस्त्र बोलके

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .....

असते. शेतक-याची गरिबी आणि श्रीमंती सांगण्यास दुसरे काही लागत नाही. यासंदर्भात त्याने आपल्याशी बोलावे याची गरजच पडत नाही. आपण त्याच्या घरी गेलो तरी आपल्याला त्याची गरिबी समजते. सन्माननीय सदस्य श्री.गिरीष गांधी सभागृहामध्ये उपस्थित आहेत, मी त्यांचा आदर ठेऊन बोलतो. ते या भागात पाणलोटची कामे करतात. हे सर्व ते बघतात. त्यांना वेगळे सांगण्याची गरज नाही. मग तुम्हाला हे का दिसत नाही ? माझा बॅनर जरी शिवसेनेचा असला तरी शिवसेनेच्या विचारांनी प्रेरीत होऊन मी हा विषय काढलेला होता. शेतक-यांना कर्ज मुक्ती मिळावी, शेतक-यांचा 7/12 चा उतारा कोरा व्हावा यासाठी आम्हाला सत्ता द्या, असा मी संपूर्ण शेतक-यांना शब्द दिला होता. सत्ता दिली नाही, हरकत नाही. तो विचार त्यांचा होता. त्यानंतर कर्ज मुक्तीचा विचार येऊ लागला. दोन महिन्यांपूर्वी संभाजीनगरला माननीय श्री.उद्धव ठाकरे यांनी सभा घेतली. त्यावेळी त्यांनी असे सांगितले की, शेतक-यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी कर्ज मुक्ती हा एकच इलाज आहे. त्यांनतर मी "देता का जाता" हे आंदोलन उभे करण्याचा निर्णय घेतला. मी कर्ज मुक्ती दिंडी काढली. संत गाडगेबाबांच्या भूमीमध्ये दगडाला हात लावून शेंदूर लावण्यापेक्षा त्यांच्या विचाराने चालून दगडातून बंधारा कसा निर्माण करता येईल हा विचार संत गाडगेबा आणि तुकडोजी महाराजांनी दिला त्यांच्या भूमीमध्ये त्यांना साजेशी आंदोलने उभी करायचे मी ठरविले आणि ती मी आज करुन दाखविलेली आहेत. कर्ज मुक्ती दिंडीतून ज्यावेळी आम्ही येत होतो त्यावेळी मला असे वाटले की, मला आशीर्वाद नकोत, त्या विचारांना आशीर्वाद पाहिजेत. मराठवाडयाचा आशीर्वाद मला माझ्यासाठी खूप मोठा वाटतो. म्हणून मी श्री.गंगाप्रसाद अग्रवाल यांना सांगितले की, तुमच्या सारखा सर्वोच्च नेता जर दोन शब्द बोलेला तर केवढा मोठा संदेश जाईल. मी त्यांना सांगितले की, तुमचे वय झालेले आहे. तुमच्या आशीर्वादामध्ये खूप मोठी ताकद आहे. नक्षलवादी जर चांगले काम करीत असतील तर तुमचे चांगल्या कामाला आशीर्वाद असले पाहिजेत आणि वाईट कामाला मात्र तुमचा निषेधच असला पाहिजे. श्री.गंगाप्रसादजी मला म्हणाले की, मी तुमच्याकरिता खास येईन. ते वयस्कर आहेत. ते हिंगोलीवरुन सेवाग्रामला आले, वर्ध्याला आले आणि तेथे तासभर थांबून माझ या दिंडीमध्ये फक्त मला आशीर्वाद देण्यासाठी आले. त्या

..3...

श्री.दिवाकर रावते .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परिस्थितीमध्ये माझ्या शेतक-यांना बघून ते एवढे भारावले की, त्या वयामध्ये देखील ते आमच्या बरोबर चार किलोमीटर चालले. हे अत्यंत गंभीर होते. मी ही बातमी पत्रकारांना सांगितली. ती बातमी वर्तमानपत्रामध्ये छापून आलेली आहे. अमेरिकेमध्ये फक्त 5 टक्के शेतकरी आहेत म्हणून आमचे पंतप्रधान जर असे म्हणत असतील की, या देशामध्ये 10 टक्केच शेतकरी असले पाहिजेत तर शेतीचे भवितव्य गंभीर आहे.

यानंतर कु.जयश्री.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

48,000 कोटी रुपये जर इंडस्ट्रीजकरिता कारखानदारांना माफ केले असतील, 50,000 कोटी रुपये इन्कम टॅक्सचे माफ केले असतील तर 13,000 कोटी रुपयांचे कर्ज असलेल्या लाखो कुटुंबातील शेतक-यांना ते माफ करण्याकरिता सरकारला कोणती अडचण आहे? हा प्रश्न मी माझ्या भाषणाच्या सुरुवातीलाच उपस्थित केला होता. लाखो कोटी रुपये जर आपण इंडस्ट्रीजकरिता माफ करु शकता तर शेतक-यांसाठी का नाही ? एन्रॉनचा इतिहास आहे तो जरी सांगितला तरी त्यामध्ये शेतक-यांचे कर्ज माफी होईल एवढे पैसे गेलेले आहेत. केंद्रसरकारने तो प्रकल्प चालू करण्याकरिता प्रयत्न केले आणि तो प्रकल्प चालूही झाला आणि त्यातून आपल्याला 2000 ते 2200 मेगावॅट वीज आपल्याला मिळायला लागली. मा. श्री. मोहन धारिया मला आर्शीवाद देण्याकरिता आले होते, मी म्हणालो की, माझ्यापेक्षा दिंडीला आर्शीवाद द्या. दिंडीतील विचारांना आर्शीवाद द्या. धारियांशी मी बोललो की, तुम्ही पुण्यामध्ये असतांना शेतक-यांकरिता आंदोलन केले होते, त्याप्रमाणे आता मी शेकऱ्यांसाठी काढलेल्या दिंडीकरिता येणार का ? त्यावर ते म्हणाले की, येईल. त्याप्रमाणे त्यांनी शेतक-यांचा मेळावा घेतला ते फक्त दिंडीत चालले अशातला भाग नाही तर त्यांनी सरकारला असे सांगितले की, सरकारने जर दिनांक 31 डिसेंबर, 2007 च्या आत कर्जमाफी दिली नाही तर मी यापेक्षाही व्यापक आंदोलन उभे करणार आहे. माननीय अण्णा हजारेंनी ज्याप्रमाणे भ्रष्टाचाराच्या विरोधात आंदोलन उभे केले होते त्याप्रमाणेच धारियाजीच्या नेतृत्वाखाली शेतक-यांच्या कर्जमाफीच्या संदर्भात व्यापक आंदोलन उभे राहणार आहे. या आंदोलनासाठी श्री.मोहन धारिया यांनी दिंडीत येऊन मला अशा प्रकारे आर्शीवाद दिले त्यावेळी मी त्यांना सांगितले की, दिवाकर रावते कोणी नाही, दिवाकर रावते महत्वाचा नाही. मी प्रामाणिकपणे शेतक-यांकरिता प्रयत्न करतो ते कोणी सांगते म्हणून नाही आणि काहीतरी मिळविण्यासाठी तर नाहीच नाही. नागपूरमधील अनेक लेखक आणि साहित्यिकांप्रमाणे ज्येष्ठ साहित्यिक आणि लेखक श्री.राम शेवाळकर मला म्हणाले की, मला तुमच्या दिंडीत सामील व्हावयाचे आहे. तुमच्या दिंडीतील विचार सगळीकडे गेला पाहिजे. यासंदर्भातील धारियाजींचा एक शब्द सर्वात महत्वाचा आहे, तो आम्हाला प्रेरणा देणारा आहे. कारण आज राज्यात शेतक-यांच्या वाढत जाणा-या आत्महत्यांमुळे आणिबाणीची परिस्थिती निर्माण व्हावयाला लागली आहे. या

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

शेतक-यांसाठी सर्व पक्षीय कार्यकर्ते तसेच आमदारांनाही एकत्र यावे लागेल आणि या परिस्थितीला तोंड देऊन या शेतक-यांना मुक्त करावे लागेल. शेतक-यांना कर्जमुक्त करण्यासाठी सर्व पक्षांना एकत्र यावे लागेल. शेतक-यांच्या कर्जबाजारीपणामुळे होणा-या आत्महत्या आणि त्यामुळे निर्माण होणा-या परिस्थितीला त्यांनी आणीबाणीची परिस्थिती असे शब्द वापरलेले आहेत. यासंदर्भात अनेक साहित्यिकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यापैकी श्री.राम शेवाळकर यांनी अशी घोषणा दिली आणि म्हणाले दिंडीमध्ये चालतांना असे बोला की, " पायी हळूहळू चला, मुखाने शेतकरी बोला,पायी हळू हळू चला, मुखाने कष्टकरी बोला." अशा प्रकारच्या घोषणा देत दिंडी चालवावी, अशी सूचना त्यांनी दिली. संघर्षातून उभ्या राहिलेल्या या शेतकरी संघटनेचा आम्हाला अभिमान आहे. अशा प्रकारे अनेक साहित्यिकांनी आपापल्या भावना व्यक्त केल्या. संघर्षातून उभ्या राहिलेल्या या संघटनेने ज्याप्रमाणे दुधाच्या दरवाढीमध्ये विजय मिळविला तो विजय अल्पसा, असमाधानकारक का असेना पण तो विजय मिळाला याचाही आम्हाला अभिमान आहे. विराट काँग्रेस मोर्चात त्यांनी पश्चिम महाराष्ट्रामध्ये जे सांगितले ते मी येथे सांगितले आणि मुलाखतीमध्ये मी ते वाचले म्हणून बोलत आहे. जीवे मारलं होत त्यांना, चार दिवस ते कोमामध्ये होते आणि त्याच्यातून ते वाचले आणि शेतक-यांनी स्वत:च्या खर्चाने ज्या पश्चिम महाराष्ट्रामध्ये पैशाच्या राशी ओतून निवडणूक जिंकावी लागते तेथे त्यांना आमदार केले, ते दिंडीमध्ये आले त्यांनी शेतक-यांच्या व्यथा बोलून दाखविल्या. श्री.रमेश देव हे नाटपरिषदेचे अध्यक्षही आले रंगकर्मीचे प्रतिनिधी म्हणून ते तर जिव्हारी लागेल असे बोलून गेले. मी शेतकरी होतो माझी आई शेतकरी होती, माझे वडील शेतकरी होते, माझ्या आईच्या डोक्यावर कर्ज होते, मी स्वत: शेतीमध्ये काम करीत होतो, म्हणून मला आत्महत्येची जाणीव आहे, आणि शेतक-यांना कर्जमुक्ती तातडीने मिळाली पाहिजे त्याकरिता मी या दिंडीमध्ये आलो आहे. या दिंडीमध्ये एवढया मोठया प्रमाणात भावना व्यक्त झाल्यानंतर या सरकारला असे वाटत असेल की, जर कर्जमुक्ती केली तर आपण स्वत::च्या पायावर कु-हाड मारुन घेऊ. परंतु जे रक्त ज्या भूमीत सांडणार आहे तेही या काळया आईवर सांडून तुम्ही तिला डागाळणार आहात. आणखी कोणत्या प्रकारे आणि किती जणांनी सांगावयाला पाहिजे. तज्ज्ञांचा अहवाल सर्व काही सांगतो,समाजातील सर्व घटक सांगत आहेत.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .....

सभापती महोदय, साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री.हातकणंगलेकर हे 82 वर्षाचे आहेत. ते माझ्याशी फोनवर बोलले. त्यांच्या डॉक्टरांनी सांगितले की, सांगलीपासून दूरचा प्रवास झेपणार नाही. तर ते म्हणाले की, याला माझा व सर्व साहित्यिकांचा पाठिंबा आहे, तुम्ही घरी या. हवे तर माझी चित्रफित काढून देतो. ती लोकांना दाखवा. शासनाला आणखी काय काय पाहिजे, तुम्हाला कोणी-कोणी सांगितले पाहीजे ?. यानंतर कर्जमुक्तीबाबत श्री.शरद पवार बोलले. मी अत्यंत खेदाने पॅकेजबाबत सांगतो, या पॅकेजचा पर्दाफास केला पाहिजे. आपणास एक फोटो दाखवतो. हा फोटो पहा व सांगा की, हा पत्र्याचा फाळ आहे का ? मी माझ्या हाताने हा फाळ वाकवितो. हा फाळ काय जमीन नांगरनार ? असे टी.व्ही.वर सुध्दा दाखविता येईल. असाच प्रकार बैलबंडीबाबत आहे. हे काय चालले आहे ? टाळूवरचे लोणी खाणारी नापाक औलाद या महाराष्ट्राच्या मातीमध्ये कशी काय जन्माला आली ?. तळतळाट होईल असे बोलले जाते. स्वच्छतागृहात पाईप दिले आहेत, ते पाय ठेवताच मोडले आहेत. पाण्यासाठी जास्त किंमत दाखवून कमी दर्जाचे इंजिन दिल्यामुळे त्या इंजिनचा स्फोट होत आहे. गांडूळ खताकरिता गोणपाट दिलेली आहेत. 500 रुपयांच्या ताडपत्र्या 2500 रुपयाच्या पॅकेजमध्ये दिलेल्या आहेत. किती खाणार आहात ?. तेथेही तुम्ही सोडत नाही. तुमच्यात ताकद असेल, तुम्ही प्रामाणिक असाल तर सी.आय.डी. चौकशी करा. बाराच्या भावात जे मंत्री जातील त्यांना जाऊ द्या. त्याची या महाराष्ट्राला काही पर्वा नाही. वणी येथेही आत्महत्या झाल्या कारण त्यांना हे पॅकेज नको होते. पॅकेजसाठी आत्महत्या झाली तरीही शासनाने काही केले नाही. तेथे कुटुंब उघडयावर आलेली आहेत. माननीय कृषी राज्यमंत्री तेथे भेट देण्यासाठी जाणार होते. परंतु याचे वाईट वाटते की, पॅकेजमधील सुमारे 200 कोटी रुपये खाऊन टाकले आहेत. नक्की किती रक्कम खाल्ली हे शासनाला माहिती आहे.

सभापती महोदय, माझ्याकडे "लोकराज्य" चा अंक आहे. याच्या मुख्य संपादीका श्रीमती मनिषा पाटणकर-म्हैसकर आहेत. त्या अत्यंत कर्तृत्ववान अधिकारी आहेत. त्यांनी वर्धा, सांगली येथे चांगले काम केले आहे. त्यांच्या कर्तृत्वाबद्दल मला खूप आदर आहे. अधिकाऱ्यांचे रँकिंग केले तर त्यात त्या बसतील अशा अधिकारी आहेत. चांगल्या अधिकाऱ्याला एकदा सरकारची भलामण करायची सवय लागली तर तो उध्वस्त कसा होतो, याचे हे मुर्तीमंत उदाहरण आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ KTG/ SBT/

श्री.दिवाकर रावते.....

लोकराज्यमधील पॅरा वाचून दाखून दाखवितो. "भारत सरकारच्या पाहणी अहवालामध्ये एका गावामध्ये 532 गावामध्ये निवडलेल्या 4119 कुटुंबांकडून माहिती गोळा करण्यात आली. या पाहणीमध्ये 300 किंवा त्यापेक्षा अधिक रुपये कर्जे असणाऱ्या कुटुंबांचा समावेश केलेला आहे. ज्या 25 टक्के कुटुंबाकडे कर्ज होते. त्या प्रत्येक कुटुंबाकडे सरासरी कर्ज 43 हजार 367 रुपये होते. शेतीमधील 26 टक्के स्वयंरोजगार आहे. त्यावरुन सरासरी कर्जाचे प्रमाण 48 हजार 057 आहे. हेच शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे हे मुळ कारण आहे. असे श्री.प्रफुल्ल शिंदे यांनी लोकराज्य या अंकात मत व्यक्त केलेले आहे.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती उषाताई दराडे)

अमरावती जिल्हयात 9 महिन्यामध्ये 125 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. 1 जानेवारी ते 31 सप्टेबर या कालावधीत 125 शेतकऱ्यांनी गळफास व विषारी औषध घेऊन आत्महत्या केलेल्या आहेत. मात्र त्यातून फक्त तीन शेतकरी पात्र ठरले. त्यांना शासनाकडून एक लाख रुपयांची मदत देण्यात आली. उर्वरित शेतकरी अपात्र ठरविण्यात आले. ही गंभीर परिस्थिती शासनाच्या अधिकाऱ्यांमुळे निर्माण झाली आहे. श्री.गोयल या अधिकाऱ्यांना जावे लागले. श्री.गोयल हे अमेरीकेत सरकारी खर्चाने एक महिना फिरले. असे अधिकारी महाराष्ट्रात कशाला पाठविता ?. अशा अधिकाऱ्यांना चौकात फोडले पाहिजे. ते अमेरीकेत सांगतात की, शेतकरी दारु पिऊन किंवा नशेमध्ये आत्महत्या करतात. झालेल्या आत्महत्या कशा खोटया आहेत, हे सांगत फिरतात.

यानंतर कु.धनश्री....

अशुद्धीत प्रत/ शीघ्रलेखा नाही

श्री. दिवाकर रावते.....

महाराष्ट्राची बेइज्जत घेंऊन हा माणूस महाराष्ट्रात सर्वत्र फिरला, याला काहीच वाटत नाही का ? मला एका पत्रकाराने सांगितले की, आपण आपले अनुभव लिहून ठेवा. मी त्यांना सांगितले मी लिहिणार नाही. उद्ध्वस्त कुटुंबियांची, माझ्या अनुभवांमुळे कदाचित एक चांगली कहाणी होऊ शकेल. हे पुस्तक लोक वाचतील आणि त्याचा चांगला खप होईल, त्याला कदाचित पुरस्कारही मिळेल. परंतु या गरीब जनतेचे अठराविश्व दारिद्रय वेशीवर टांगून त्यांची मानहानी माझ्याकडून कधीही होणार नाही. मी त्यांच्याबाबतीत काहीही लिहिणार नाही.

आमचे गोयल साहेब अमेरिकेमध्ये गेले. माननीय मुख्यमंत्री महोदय म्हणतात की शेतकऱ्यांच्या आत्महत्या आता घटल्या आहेत, तशी बातमी लोकमत या वृत्तपत्रात आलेली आहे सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर. पाटील आता सभागृहात हजर नाहीत त्यामुळे राज्यमंत्र्यांना यासंदर्भात उत्तर द्यावे लागेल. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याने लिहिलेले एक पत्र माझ्याकडे आहे. ते मी आपणास दाखवतो. या शेतकऱ्याने माननीय पंतप्रधान, माननीय मुख्यमंत्री, पोलीस इन्सपेक्टर, पोलीस पाटील या सर्वांना पत्र लिहिले होते. कृषी पदवीधर, श्री. भगिरथ यांच्याकडून नम्र निवेदन. मी खालील कारणामुळे देहत्याग, जलसमाधी घेत आहे. याची सर्वस्वी जबाबदारी आपली आहे. हे पत्र आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याने लिहिलेले आहे व त्या खाली आत्महत्या करण्याची कारणेही दिलेली आहेत. हा शेतकरी मोर्शी या तालुक्यातील आहे. हे पत्र त्यानंतर जप्त झाले. तुमच्या दरबारात आले. आत्महत्येस शेतकऱ्याला प्रवृत्त केले म्हणून आपण माननीय मुख्यमंत्र्यांवर खटला भरणार काय ? आपल्याकडे हिंमत असेल तर या प्रश्नाचे उत्तर द्यावे. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे हे लेखी पत्र आहे. इटस अ डायिंग स्टेटमेंट. कोर्टामध्ये देखील मृत्युपूर्व जबानी सत्य मानली जाते. हे पत्र नावानिशी लिहिलेले आहे.

सभापती महोदय, आणखी एका दुसऱ्या शेतकऱ्याने कर्जाला कंटाळून आत्महत्या केली. मी त्या शेतकऱ्याच्या घरी गेलो होतो. त्याचे नाव होते तानाजी क्षिरसागर. 21 हजार 195 रुपये एवढे कर्ज त्या शेतकऱ्यावर होते. सहकारी सोसायटीचा हा दाखला आहे. त्यांनी एक लाख रुपये

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

दिले आहेत व या पंचनाम्यामध्ये अपात्र ठरविले आहे. मी ज्यावेळी त्या मृतक शेतकऱ्याच्या घरी गेलो, त्या शेतकऱ्याच्या पत्नीला भेटलो. ती थोडीशी भ्रमिष्टासारखी वागत होती. तिला मी सांगितले, तुम्हाला काय अडचण आहे त्याबाबत तुम्ही माझ्याशी बोला. मी तुमची माहिती घेण्यासाठी आलो आहे. यावर त्या शेतकऱ्याची पत्नी म्हणाली, चपला आहेत पण ते घरात नाहीत. मघाशी एका अहवालात सांगितले होते, सालस शेतकरी. घरात यायचे चपला काढायचे आणि इथेच कुठे तरी अंगणात काम करायचे. त्यामुळे तिला वाटायचे की, चपला घरात आहे म्हणजे धनी घरात आहे. या आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याच्या पायातील चपला मी येथे आणल्या आहेत.

(सन्माननीय सदस्य आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पायातील चपला सभागृहात दाखवितात.)

त्या चपलावरील माती देखील अजून तशीच आहे. हे पाहून तुमचे काळीज हलत नाही काय ? त्यांनी अजूनही त्या चपला जपून ठेवलेल्या आहेत. देवघरासारखे त्यांनी या चपला जपून ठेवलेल्या आहेत. चपला असणे हेच तिच्यासाठी तिच्या पतीचे अस्तित्व होते. या चपला जशाच्या तशा आहेत. त्या खऱ्या आहेत की खोटया आहेत, या चपला त्याच घरातील आहे किंवा नाही याची आपण नंतर तपासणी करा. किती मानसिक संतुलन बिघडले आहे ? हे अतिशय असहय आहे. सभागृहाचा अवमान करण्याकरिता मी या चपला सभागृहामध्ये आणलेल्या नाहीत. त्या चपला परत तशाच नेऊन देण्याची मी जबाबदारी घेतली आहे; त्यामुळे मी त्या चपला तशाच स्वरुपात माती न झटकता परत देणार आहे.

यानंतर श्री. सुंबरे.....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाची नाही

श्री. रावते ....

आज सकाळी एक आत्महत्या झाली आहे. काय आपण कपाळकरंटे आहात. खरे तर तुम्ही आम्ही सगळेच शेतकऱ्यांसाठी रान पेटवून उठतो आहोत. पण तरीही महादेव दगडू ठाकरे, राहणार खामगाव, जिल्हा बुलढाणा यांनी 22 तारखेला म्हणजे आजच सकाळी आत्महत्या केली आहे. अशा या परिस्थितीला तुम्ही, हे सरकार जबाबदार आहे. सभापती महोदया, कृषी क्षेत्रामध्ये आघाडीवर असलेला महाराष्ट्र आज पिछाडीवर असल्याचे 'लोकमत'मध्ये आलेले आहे. त्यांनी त्यात म्हटले आहे की, गेल्या दशकातील कृषी उत्पादन 3.62 टक्क्यांवरून 1.85 टक्के वर घसरले आहे. परंतु याच कालावधीत महाराष्ट्रात नोंदविण्यात आलेली घट ही डोळे विस्फारणारी ठरेल. दशकापूर्वी देशात प्रगतीवर असणाऱ्या महाराष्ट्राचे कृषी उत्पादन 6.66 टक्क्यांवरून गेल्या 10 वर्षामध्ये .10 टक्क्यांवर आलेले आहे. तेव्हा कपाळ करंट्यांनो तुम्ही या राज्यातील शेतकऱ्यांचे वाटोळे केले आहे असे वाटत नाही काय ? सन्माननीय सदस्य श्री.गडाख साहेब, तुम्ही जे लिहिता त्याचा शेवटी या सरकारच्या दृष्टीने काय उपयोग होतो ? तुमच्याबद्दल, तुम्ही जे काही लिहिता त्याबद्दल आम्हाला जरूर आदर आहे. ...

तालिका सभापती (श्रीमती उषा दराडे) : सन्माननीय सदस्य श्री.रावते यांना मी सांगू इच्छिते की, आपण 2.46 वाजल्यापासून भाषण करीत आहात. आपल्याला वेळेचे भान यावे म्हणून मी दोन तीन वेळा घंटी वाजविली आहे. मी आपल्या लक्षात आणून देते की, अजून या प्रस्तावावर 22 सदस्यांना बोलावयाचे आहे. ...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, आज आपण सगळ्याच सदस्यांना मनसोक्त बोलू द्यावे .. हा विषयच असा आहे. ..

तालिका सभापती : तरीही आपण थोडेसे वेळेचे भान ठेवले तर याही गोष्टीचा विचार करता येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, एवढे हे सगळे मांडल्यानंतर आपल्यासह सर्वच जण हे मान्य कराल की, या ज्या आत्महत्या घडताहेत त्या कर्जबाजारीपणातून घडत आहेत. याबाबतीत मी खूप काही येथे वाचून दाखविले आहे. विदर्भातील आत्महत्यांच्या संख्याची वस्तुस्थिती देताना एक ज्येष्ठ पत्रकार श्री. विवेक देशपांडे, जे इंडियन एक्स्प्रेसचे पत्रकार आहेत, यंनी जो अहवाल दिलेला आहे त्याकडे मी आपले लक्ष वेधणार आहे. ते म्हणतात की, नागपूर ते बुलढाणा

डब्ल्यूडब्ल्यू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

या संपूर्ण परिसरात 1400 कि.मी.चा प्रवास करून जनआंदोलन समितीने जाहीर केलेल्या यादी नुसार प्रत्येक व्यक्तीच्या घरी जाऊन वस्तुस्थिती जाणून घेतली. यामध्ये त्यांना आढळून आले की, 10 पैकी 8 शेतकऱ्यांच्या आत्महत्या दुष्काळ-पूर-नापिकी, कर्जबाजारीपणा या सारख्या कृषी विषयक कारणांमुळे झालेल्या नाहीत. सभापती महोदय, असा बेशरमपणे हा अहवाल शासन आपल्या प्रकाशनातून छापत आहे. म्हणजे या आत्महत्या का होत आहेत याबाबत तुमचे बाकी सगळे तज्ज्ञ जे सांगतात ते चुकीचे आहे की त्यांचे डोके फिरलेले आहे ? देशाचे पंतप्रधान त्यासाठी पॅकेज देतात ते काय त्यांचे डोके फिरले आहे म्हणून ? आणि हे सारे केंद्र सरकारने आयडेंटीफाय केलेले आहे. असे असताना अपण कोठला तरी पत्रकार घेऊन अशा प्रकारच्या बातम्या वा अहवाल द्यायला सांगावयाचे. आता मी आमच्या पुरके साहेबांना विचारू इच्छितो की, विदर्भातील शेतकरी वडिलांच्या नावावर 7-12 असला तरी वडील थकल्यानंतर मुलेच सारा शेतीचा कारभार करीत असतात ना ? त्यासाठी कर्ज काढत असतात ना ? मग ही वस्तुस्थिती आपण का लक्षात घेत नाही ? पण ते न करता अशा प्रकारे श्रीमती मनीषा म्हैसकर यांच्या सारख्या प्रामाणिक अधिकाऱ्याच्या कामाचा अपमान करणारे लिखाण प्रसिद्ध करणारा हा शासकीय अंक, 'लोकराज्य' मी सभापती महोदया, आपल्या समोर फाडून टाकतो. आणि आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांचा जो अशा प्रकारे अपमान केला आहे त्याला तुम्ही उत्तर द्यावे अशी माझी आपल्याकडे आग्रही मागणी आहे. सभापती महोदया, आता शेवटी महत्त्वाच्या मुद्यावर मी येतो आणि नंतर माझे भाषण संपवितो. ...

(यानंतर श्री. सरफरे .... 3के 1 ..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाची नाही

श्री. दिवाकर रावते...

माननीय सदस्य श्री. गडाख साहेब हा आपला लेख आहे. मी आपले अनेक लेख वाचतो. ते वाचल्यानंतर मला खूप बरे वाटते. "शरद पवार यांचा सल्ला द्रष्टेपणाचा" असा लेखाचा मजकूर आहे. या लेखामध्ये आपण असे म्हटले आहे की, "देशात 35 ते 40 टक्के जमीन सिंचनाखाली आहे. महाराष्ट्रात 15 टक्के आहे, 85 टक्के जमीन जिरायती आहे, पडीक जमिनीचे प्रमाण वाढत आहे. नापिकीमुळे कर्ज वाढत आहे. ते फेडण्यासाठी जमिनीच्या 7/12 वरचे बोजे विक्रीच्या आड येतात. आत्महत्त्या वाढत आहेत, सरकार पॅकेज देते. पण त्याचा उपयोग होत नाही, इतर विकसित देशात कुठेही शेतीसाठी 3 ते 4 टक्क्यांच्या पुढे व्याजदर नाहीत. चीनमध्ये "शून्य" व्याजदर आहे. आपल्याकडे पाणी व विजेचे दर नेहमी वाढत असतात. तरीही टंचाई कायम आहे. आपल्याकडे ग्रामीण भागात 12 ते 14 तासापर्यंत वीज नसते. विजेअभावी हातातोंडाशी आलेली पिके करपून जातात." असे आमच्या या सभागृहातील माननीय सदस्यांनी मांडलेले मत आहे. आणि आपल्या सरकारच्या "लोकराज्य" या अंकामध्ये शेतकऱ्यांची अवहेलना करणाऱ्या बाहेर स्टॉलवर ठेवण्यात आलेले सर्व अंक विक्रीसाठी बंद करा. आपण जर ते बंद केले नाही तर आम्ही वाटेल ते करु, आणि मग त्याचा दोष तुमच्यावर येईल. शेतकऱ्यांचा अवमान करणारा अंक आपण विकायला बसला आहात. तो विकायचा बंद केला नाही तर काहीही घडेल हे आपण लक्षात ठेवावे. आपण शेतकऱ्याची एवढी निर्भत्सना करता? नाही तर माननीय श्री. गडाख साहेब चूक आहेत किंवा ते तरी खरे आहेत. किंवा ते चूक आहेत आणि माननीय श्री. गडाख साहेब खरे आहेत. आणि माननीय श्री. गडाख साहेब खरे असतील तर "लोकराज्य" अंकामध्ये लिहिलेले चूक आहे. माझ्या समोर हे सदस्य बसले आहेत त्यांनी लिहिलेले मी या ठिकाणी वाचून दाखविले आहे.

सभापती महोदया, त्यानंतर "कृषिमंत्र्यांचा आत्मघातकी सल्ला" हा लेख माझ्याजवळ आहे. म्हणजे आमचे आदरणीय श्री. शरद पवार साहेबांच्या सल्ल्यामध्ये म्हटले आहे की, "कृषिमंत्री शरद पवारांनी शेती सोडण्याचा सल्ला दिला आहे. शेती शेतकऱ्याला आणि देशाला तारु शकणार नाही, असे त्यांचे म्हणणे दिसते. परंतु जगातील सर्वात समृध्द जीवन जगणारे स्वीडन, हॉलंड, डेन्मॉर्क सारखे स्कॅडिनेव्हिअन देश मात्र शेतीप्रधान आहेत. केवळ सुखवस्तू समाजाचे प्रदर्शन मांडणाऱ्या अमेरिकेला मॉडेल मानणे चुकीचे आहे".अशाप्रकारे त्यांच्या सल्ल्यावर आलेले मत आहे. आणि म्हणून "कार्बनी ऊर्जास्त्रोतांचा वापर, बांधकाम, नगदी पिके, प्रचंड वस्तुनिर्मिती यामुळे जंगलांचा, परिसंस्थांचा नाश होत आहे. ग्लोबल वॉर्मिंग, जैव विविधतेचा होणारा नाश यामुळे जग विनाशाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/

श्री. दिवाकर रावते...

उंबरडयावर उभे आहे. या विनाशाकडे होणारी वाटचाल थांबविण्याऐवजी, ती गतिमान करणारे "सेझ ा" आणि "कॉर्पोरेट" शेतीसारखे विनाशकारी प्रकल्प हाती घेऊन शेती सोडण्याचे सल्ले देणे हे आत्मघातकी आहे. " अशाप्रकारे केंद्रीय कृषिमंत्र्यांच्या मतावर मत व्यक्त करण्यात आले आहे. आमचे आबा सावकाराला कोपरापासून ढोपरापर्यंत फोडणार होते, त्यासाठी ते कायदा आणणार होते. तसे त्यांनी म्हणून दाखविले होते. त्यांनी असे म्हटले की, सावकारीवर निर्बंध आले आहेत. पण 2007 सालचे हे वृत्त आहे. त्यात म्हटले आहे की, "गेल्या वर्षी उचललेल्या पीक कर्जांची अर्ध्या अधिक शेतकऱ्यांनी अद्यापही बँकांना परतफेड केलेली नाही. त्यामुळे अशा शेतकऱ्यांना थकबाकीदार घोषित करुन या हंगामात बँकांनी पीक कर्ज नाकारले. त्यामुळे यंदा पॅकेज प्रभावित सहा जिल्हयातील पाच लाखापेक्षा अधिक शेतकऱ्यांवर पुन्हा सावकाराच्या दारी जाण्याची वेळ आली आहे." सभापती महोदया, मी शासनाच्या धोरणावर टीका करीत आहे. आता मी घरचा आहेर कॉग्रेसला देत आहे, राष्ट्रवादी कॉग्रेसला देत नाही. "सहकारी बँका परतपुरवठा करण्यात कमी पडल्यानेच शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या" असे कोण म्हणत आहे? "खाजगी सावकारांचा त्रास, उत्पादन खर्चाशी निगडीत दराचा अभाव, कापसाचे दर, अर्थकारण दलालांच्या हाती असल्याने व विदर्भातील सहकारी बँका शेतकऱ्यांना पतपुरवठा करण्यात अयशस्वी ठरल्याने विदर्भ तसेच खानदेशात आठ जिल्हयांत शेतकऱ्यांनी मोठया प्रमाणात आत्महत्त्या केल्याचा निष्कर्ष प्रदेश कॉग्रेसच्या त्रिसदस्यीय सत्यशोधन समितीने काढला आहे" जर हे कॉग्रेस समितीचे म्हणणे आहे तर तुम्ही त्या सरकारी अंकामध्ये कसे छापले? हा तुमचा अहवाल आहे. ही समिती कुणी नेमली होती? कॉग्रेसच्या प्रभारी श्रीमती अल्वा ताई यांनी ही नेमली होती. केंद्रामध्ये आपले पद राहिले पाहिजे म्हणून मी महाराष्ट्रामध्ये काय करीत आहे हे सांगण्याकरिता त्यांनी हा अहवाल नेऊन दिला.

(यानंतर श्री. बरवड)

अशुधारित मत / शीघ्रलेखाकरीता नाही

श्री. दिवाकर रावते .....

"शेतकऱ्यांचे 30 हजार रुपयांचे कर्ज पूर्ण माफ करण्याचा प्रस्ताव, आत्महत्या रोखण्यासाठी काँग्रेसकडून सूचना" अशा शीर्षकाखाली एक बातमी आलेली आहे. आपल्याला आज बचाव नाही. कर्जमाफीबद्दल कोणालाही बचाव नाही अशी परिस्थिती आपणच निर्माण केलेली आहे. या बातमीमध्ये असे म्हटले आहे की, "शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी शेतकऱ्यांची 30 हजार रुपयांपर्यंतची कर्जे पूर्ण माफ करण्याचा प्रस्ताव पुढे आला असून त्याचा अभ्यास करण्यासाठी राज्य सरकारला सुचविण्यात आले आहे." महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीच्या प्रवक्त्यांनी पत्रकारांशी बोलताना ही माहिती दिली. त्यांनी अशी माहिती दिली की नाही याबाबत निवेदन करावे. काँग्रेस पक्षाच्या प्रवक्त्यांनी माहिती दिली की, अशा प्रकारचे सुचविले आहे. काँग्रेसने याचा अहवाल सरकारला दिलेला आहे की, हे कर्ज माफ करा. हे दिवाकर रावतेच बोलतो असे नाही तर सगळेच बोलत आहेत. काँग्रेसही तेच म्हणत आहे. शेवटी आपल्याबद्दलची तीव्रता किती झालेली आहे ? 300 रुपयांच्या कर्जाचा अहवाल मी या ठिकाणी मांडत असताना सरकारने दिलेले अनुदानाचे चेक शेतकऱ्यांनी जाळले आणि फाडून टाकले. नागपूरच्या एका बातमीत म्हटले आहे की, पंतप्रधानांच्या पॅकेजमधून चेक बाऊंस झाल्याची घटना ताजी असताना कृषीभूषण दादासाहेब खोब्रागडे यांना दिलेले सुवर्णपदक चांदीचे निघाल्याने या फसवणुकीविरोधात शेतकऱ्यांनी सरकारच्या नावाने शिमगा केला. नुकसानभरपाईपोटी सरकारने दिलेले तुटपुंज्या रकमेचे चेक शेतकऱ्यांनी आज तलाठी कार्यालयावर धडक देत जाळून टाकले. संताप कोठे चालला आहे ते आपण लक्षात घ्यावे. आज चेक जाळले आहेत, उद्या आणखी काय जाळतील, कोणाला जाळतील हे सांगू शकत नाही एवढा संताप निर्माण होत आहे. आपण एक गोष्ट लक्षात ठेवावी की, आगीतून ठिणग्या निर्माण होतात पण एक ठिणगी आग निर्माण करते. ही आग निर्माण करणारी ठिणगी आहे आणि ती आपले सरकार जाळून टाकील हे आपण लक्षात ठेवावे. ही शेतकऱ्याची आग तुमचे सरकार जाळल्याशिवाय राहणार नाही. एवढी ठिणगी आता पडलेली आहे. श्री. शरद पवार साहेब या महाराष्ट्राला फसवत आहेत असे अधिकृतरित्या विधान मी या ठिकाणी करीत आहे. केंद्रीय मंत्री श्री. शरद पवार हे या महाराष्ट्राला फसवत आहेत. श्री. विलासराव देशमुख अकोल्यात येऊन

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

शेतकऱ्यांची टिंगलटवाळी करतात. आपण फार उत्साहित झालात. श्री.शरद पवार साहेब असे म्हणाले की, मी केंद्राला कर्ज माफीचा प्रस्ताव दिलेला आहे. ते ऐकून किती आनंद झाला ? दिवाकर रावते यांनी दिंडी काढली. एका ठिकाणी श्री. जयंत पाटील साहेब जे म्हणाले ते मला एका पत्रकाराने सांगितले. मी दिंडीमध्ये होतो. श्री. शरद पवार साहेबांनी असे सांगितले की, मी केंद्राकडे मागणीचे पत्र दिले आहे. आमच्या श्रीमती भावनाताई गवळी खासदार आहेत त्यांनी 4 डिसेंबर, 2006 ला केंद्र सरकारला खासदार म्हणून प्रश्न विचारला की, तामिळनाडूच्या सरकारने शेतकऱ्यांना कर्जमुक्त केले आहे त्याप्रमाणे इतर राज्यांचे प्रस्ताव आपल्याकडे आले तर आपण करणार काय ? त्यावर आदरणीय श्री. शरद पवार साहेबांनी मंत्री म्हणून 4 डिसेंबर, 2006 ला असे उत्तर दिले की, इतर राज्यांनी प्रस्ताव दिल्यास केंद्र सरकार मदत करील. तुम्हाला प्रस्ताव घेऊन जाऊ नका असे कोणी सांगितले होते ? नुसती शिट्टी मारली तरी दणादणा धावत जाता. श्री. जयंत पाटील असे म्हणाले श्री. शरद पवार साहेब आता कर्जमाफी करणार आहेत. श्री. दिवाकर रावते यांना क्रेडीट घ्यावयाचे आहे म्हणून त्यांनी दिंडी काढली आहे.

यानंतर श्री. भोगले ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

यांना चालून पाय सोलून घ्यायला कसे वाटेल? गंमत म्हणून माणूस करतो का? राजकारणात क्रेडिट घेण्याकरीता वर्षानुवर्षे काय चालले आहे हे मी बघतो ना! मी जीवनात कधीही ढोंग करणार नाही. मी घराघरात जातो, त्यांची दु:ख बघतो, त्यांचे अश्रू पाहतो. सन्माननीय श्री.शरद पवार साहेबांनी जे उत्तर दिले ते रेकॉर्डवर आहे आणि महाराष्ट्रात येऊन सांगतात की पत्र दिले. मी सन्माननीय सदस्य श्री.गिरीष गांधी यांना माहितीसाठी सांगू इच्छितो, काल दिनांक 21 नोव्हेंबर, 2007 रोजी चंद्रपूरचे खासदार श्री.हंसराज अहिर यांनी लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासाला केंद्र सरकारकडे कर्जमाफीचा कोणताही प्रस्ताव विचाराधीन आहे का? असा प्रश्न उपस्थित केला होता. त्याला कृषि मंत्रालयाने एका शब्दात उत्तर दिले जी नही . किती फसवाल महाराष्ट्राला? संसदेच्या रेकॉर्डवर आहे. श्री.शरद पवार साहेबांना या राज्यातले लोक जाणता राजा म्हणतात, तो आदर व्यक्त करण्यासाठी तरी अशी बनवाबनवी करु नका. ग्रामीण भागातील शेतकरी तुमच्याकडे केंद्राचे कृषिमंत्री म्हणून आदराने पाहतात. संरक्षण मंत्री म्हणून केंद्रात गेल्यानंतर हिमालयाच्या संरक्षणासाठी सह्याद्री धावून गेला म्हणून आम्ही जल्लोष केला होता. मग असाच जल्लोष शेतक-यांनी करावा यासाठी तुम्ही असे विपरित का वागता?

श्री.भास्कर जाधव : चंद्रपूरच्या खासदारांनी लोकसभेत कोणता प्रश्न विचारला होता हे पुन्हा एकदा सांगितले जाईल का?

श्री.दिवाकर रावते : केंद्र सरकारकडे कर्जमाफीचा कोणताही प्रस्ताव विचाराधीन आहे का?

श्री.भास्कर जाधव : प्रस्ताव राज्याकडून गेला नसेल तर त्याला नाही असेच उत्तर दिले जाईल.

श्री.दिवाकर रावते : पँट सुटली आता शर्ट कशाला काढून घेता?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदया, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते हे माझे जूने नेते आहेत. त्यांचा मी नेहमी आदर करीत आलो आहे आणि करीत राहणार. या सभागृहात सदस्य म्हणून त्यांचा जो अधिकार आहे आणि सन्मान आहे तशाच पध्दतीने या सभागृहात बसलेल्या प्रत्येक सदस्याला तेवढाच अधिकार, तेवढाच हक्क आणि सन्मान असणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे प्रत्येक सदस्यांवर कॉमेंट करीत आहेत. ते भाषण करीत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

असताना मी पॉईंट ऑफ ऑर्डरच्या रुपाने त्यांचा प्रश्न समजावून घेण्याचा प्रयत्न केला. परंतु ते पँट सुटली आणि आता शर्ट काढून घेता असे बोलले.

श्री.दिवाकर रावते : तुम्हाला वाईट वाटले असेल तर मी शब्द मागे घेतो.

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना विनम्रपणे विनंती करु इच्छितो की, ते मांडत असलेले प्रश्न, त्यांच्यामागील त्यांची मेहनत, त्यांचा असलेला अनुभव, शिवसेना पक्षात असताना त्यांनी घेतलेली जबाबदारी, त्या पक्षाकरीता ते पार पाडीत असलेली जबाबदारी मी जवळून बघत आहे. दिंडी काढणे हे सोपे काम नाही. पायाला फोड आणणे हे सोपे काम नाही. त्यांच्याकडे प्रचंड माहिती आहे. प्रत्यक्ष अनुभव आहे. असे असताना त्यांनी जर मुद्देसूद विचार मांडले तर त्यांच्यासारखा उत्कृष्ट वक्ता या सभागृहात असू शकत नाही. परंतु ते प्रत्येक शब्दामागे उदाहरण देताना उद्विग्न होऊन आरोप प्रत्यारोप करतात. त्यांचे भाषण सुरू झाल्यापासून दीड तास कोणता असा सदस्य त्यांचे भाषण ऐकण्यासाठी सभागृहात बसला आहे? वक्ता असा असला पाहिजे, ज्यावेळी तो असा विषय मांडतो त्यावेळी कोणत्याही सदस्याची सभागृहातून उठून जाण्याची हिंमत होता कामा नये. आम्ही नेहमी तुमचा मान राखतो. माझा अवमान करण्याचा प्रयत्न करु नये. माझा मान कसा राखायचा हे मला चांगले माहित आहे.

(नंतर श्री.जुन्नरे....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखनी नोंद

तालिका सभापती श्रीमती उषा दराडे : सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी जे शब्द उच्चारलेले आहेत ते त्यांनी मागे घेतलेले असल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांना माझा मुद्दा समजला नाही, मला त्यांच्यावर टीका करावयाची नव्हती परंतु माझा मुद्दा समजला नाही हे माझे दुर्दैव आहे असे मी समजतो. शेतक-यांना कर्जमुक्ती मिळावी एवढाच माझा विषय आहे. कर्जमुक्तीच्या संदर्भातील काही सायटेशन्स आहेत ती मी या ठिकाणी मांडलेली आहेत. आता शेतक-यांकडे कर्ज मुक्तीशिवाय दुसरा कोणताही पर्याय राहिलेला नाही. सभापती महोदया, मी माननीय शरद पवार साहेबांवर वैयक्तिक टीका कधीही केलेली नाही, ते या राज्याचे मुख्यमंत्री होते, संरक्षण मंत्री म्हणून त्यांनी काम पाहिलेले आहे आणि आता ते देशाचे कृषी मंत्री आहेत. मी या ठिकाणी राज्यसरकारची चूक दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. राज्य शासनाची चूक दाखविणे हे सन्माननीय सदस्यांचे काम आहे, ते काम मी केलेले आहे. परंतु मी शेतक-यांची दु:खे स्वत: डोळयांनी पाहिलेली आहेत त्यामुळे या ठिकाणी मी संताप व्यक्त केलेला आहे. माझ्या बोलण्याने सन्माननीय सदस्यांना दु:ख झाले, त्याबद्दल मी माफी मागतो, मला आपल्याला दुखावण्याचा कोणताही उद्देश नव्हता

सभापती महोदया, कर्जमुक्तीच्या संदर्भात राज्यसरकारने प्रस्ताव पाठविला तर केंद्रसरकार त्याचा पॉझिटीव्ह विचार करेल असे माननीय शरद पवार साहेब म्हणाले होते. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रातील शेतक-यांच्या कर्जमुक्तीच्या संदर्भात केंद्रसरकारकडे आतापर्यंत प्रस्ताव का पाठविला नाही ? हीच माझी व्यथा आहे. शेतक-यांना कर्ज मुक्ती मिळावी यासाठी केंद्रासरकारकडे राज्यानी प्रस्ताव पाठविलेले आहेत काय ? असा प्रश्न संसदेत विचारला असता सभागृहात सन्माननीय मंत्री कांतीलाल धुरिया यांनी सांगितले की, "नाही" अशा प्रकारचा प्रस्ताव राज्यसरकाकडून केंद्राकडे आलेला नाही. माननीय अर्थमंत्री श्री. जयंत पाटील म्हणतात की, रावते दिंडी काढतात, पदयात्रा काढतात श्रेय घेतात, परंतु वित्तमंत्री प्रत्यक्षात शेतक-यांसाठी काहीही करीत नाही ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदया, माननीय राष्ट्रपती अमरावती येथे आल्या होत्या तेव्हा त्यांचा सत्कार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

करण्यात आला. राष्ट्रपती म्हणून महाराष्ट्राच्या आव्हानांवर चर्चा करतांना त्यांनी विदर्भातील शेतक-यांच्या संदर्भात चिंता व्यक्त केली. परंतु माहिती व जनसंपर्क महासंचालक श्रीमती मनिषा म्हैसकर म्हणतात की, शेतक-यांच्या 10 आत्महत्या पैकी 8 आत्महत्या या बोगस आहेत. यासंदर्भात मी जास्त न बोलता एवढेच सांगू इच्छितो की, शासनाने शेतक-यांना कर्जमुक्ती देऊन शेतक-यांना दिलासा द्यावा.

सभापती महोदया, आघाडी सरकारने महाराष्ट्रावर 1 लाख 36 हजार कोटी रुपयांचे कर्ज केलेले आहे. आमचे सरकार सत्तेवर होते तेव्हा 42 हजार कोटी कर्ज होते परंतु या 42 हजार कोटी रुपये कर्जामध्ये अगोदरच्या सरकारचे 16 हजार कोटी रुपये कर्ज होते. आपण जेव्हा सत्तेवर आला तेव्हा शिवसेना-भाजप सरकारने महाराष्ट्राला कर्जामध्ये बुडवले, महाराष्ट्र राज्य कर्जबाजारी केले, असे म्हणून हिणवत होता परंतु आपण 1 लाख 36 हजार कोटी रुपयांचे कर्ज करुन महाराष्ट्राला कर्जात बुडवले आहे. आपण एवढे मोठे कर्ज काढून महाराष्ट्रातील जनतेसाठी काय केले ? याची माहिती देण्याची आवश्यकता आहे. आपण जे एवढे मोठे कर्ज महाराष्ट्रावर केलेले आहे त्यातून महाराष्ट्राचा विकास काय झाला आहे? याची माहिती देण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

आज सिंचनाचा प्रश्न तसाच आहे. परवा माननीय केंद्रीय मंत्री श्री.शरद पवारच म्हणाले की, "सिंचनाच्या प्रश्नामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत." राज्यात रस्त्यांचा विकास होत नाही, कारखानदारी दुसऱ्या राज्यात जात आहे, त्यामुळे बेकारी वाढत आहे. पूर्वी राज्याचा कृषि रेशिओ 6.6 होता तो आता 0.01 वर आलेला आहे. ही आमच्या राज्याचा प्रगती आहे. अशा परिस्थितीत राज्य चालवित असताना शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्यासाठी आणखी 13-14 हजार कोटी रुपयांचे कर्ज काढून त्यांना थोडा दिलासा द्यावा. पण आपल्या राज्यास कोणीही कर्ज देत नाही. युतीच्या सरकारने राज्य सोडले त्यावेळी राज्य A+3 होते. त्यामुळे कोणीही डोळे झाकून कर्ज देत होते. पण आता राज्याचा नॅशनल ग्रिडींग ट्रिपल डी असल्यामुळे कोणीही कर्ज देण्यास तयार होत नाही अशी आपल्या राज्याची परिस्थिती आहे. राज्यावर कर्जाचा डोंगर आहे त्यामध्ये आमच्या गरीब शेतकऱ्यांसाठी आणखी 13-14 हजार कोटींचे कर्ज काढून शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी.

सभापती महोदया, राज्यात होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या संदर्भात माननीय उच्च न्यायालयाने काय म्हटले आहे ते दैनिक सकाळ वृत्तपत्रात आले आहे. ते मी सभागृहास वाचून दाखवितो.

" विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी कर्जावरील व्याजमाफी व इतर योजना राबविण्यात आल्या असल्या तरी त्या दीर्घकालीन उपाययोजना नाहीत. त्यामुळे राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या आत्महत्येसारख्या गंभीर समस्येवर दीर्घकालीन उपाय शोधण्यावर भर द्यावा अशा शब्दात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने आज केंद्र व राज्य शासनाला सुनावले. न्यायालयाच्या या वक्तव्यामुळे पंतप्रधान पॅकेज आणि राज्य शासनाच्या पॅकेजच्या मूळ उद्देशावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दीर्घकालीन योजना सांगण्यासाठी शासनाला चार आठवड्यांचा कालावधी देण्यात आला आहे."

सभापती महोदया, तामिळनाडू राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी शपथ घेतल्यानंतर त्यांनी प्रथम शेतकऱ्यांची कर्जमाफी केली. त्यांनी अर्थमंत्र्यांना विचारले नाही की सचिवांना विचारले नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

आपले राज्यकर्ते तशी हिम्मत दाखवतील काय ? आपण शेतकऱ्यांची कर्ज माफी करीत असाल तर ते श्रेय आपण घ्यावे. मी माझ्या खांद्यावरील पालखी खाली ठेवतो. पण आपण शेतकऱ्यांची कर्जमाफी करावी. सन्माननीय सदस्य श्री.भास्करराव जाधव यांना सांगू इच्छितो की, शेतकऱ्यांच्या कर्जमाफी शिवाय दुसरा मुद्दा नाही. तामिळनाडू राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे आपल्या राज्य निर्णय घेऊ शकत नाही ही आपली व्यथा आहे. अशाप्रकारचा निर्णय घेण्यास आमचे सहकार्य पाहिजे असल्यास आम्ही ते देण्यास तयार आहोत. आपण माननीय केंद्रीय मंत्री श्री.शरद पवार यांच्या हस्ते कर्जमाफीचा निर्णय घेणार असाल तर आम्हाला देखील आनंद होईल. श्री.शरद पवार हे महाराष्ट्राचे नेतृत्व आहे. माझी सरकारला विनंती आहे की, या प्रश्नावर उत्तर देताना त्यांनी पॅकेजचा उल्लेख करू नये. पॅकेज हे ढोंग आहे. मला शेतकऱ्यांबद्दल कळकळ आहे म्हणून मी मघाशी ते पुस्तक याठिकाणी फाडले आणि ते पुस्तक उचलण्यासाठी आलेल्या कर्मचाऱ्याला सांगितले की, ते तेथेच राहू दे. तेव्हा सरकारने उत्तर देताना शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार आहोत अशाप्रकारचा निर्णय झालेला आहे असे याठिकाणी घोषित करावे. मंत्रिमंडळात निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी एक-दोन महिन्यांनी केली तरी चालेल, पण आपण कर्जमाफी करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. मला याठिकाणी कोणालाही दुखवावयाचे नाही. मला शेतकऱ्यांबद्दल असलेल्या कळकळीतून मी त्यांच्या व्यथा याठिकाणी मांडलेल्या आहेत. तेव्हा सरकारने शेतकऱ्यांची कर्जमाफी करावी अशी पुनश्च एकदा मागणी करून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवधीर) : सभापती महोदया, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, स्वातंत्र्य चळवळीचे थोर सेनानी दादाभाई नैरोजी यांनी ब्रिटीश राज्यकर्त्यांना उद्देशून म्हटलेल्या एका वाक्याचा उल्लेख याठिक्राणी करावासा वाटतो. त्यांनी म्हटले होते की, "महमंद गझनीने या देशावर 18 वेळा स्वाऱ्या केल्या असे इतिहासकार सांगतात. पण या 18 ही स्वाऱ्यांमध्ये त्यांनी लुटून नेली तेवढी लूट तुम्ही दरवर्षी लुटून नेत आहात. आम्ही मेलो काय किंवा जगलो काय ? दरवर्षी 2 कोटी पौंडाचे धन इंग्लंडला पाठविले पाहिजे. दरवर्षी होणाऱ्या या रक्तस्त्रावाबद्दल हिंदुस्थान देश मृत्यूपंथाला लागला तर त्यात नवल काय ?"

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख...

सभापती महोदया, सन 1960 पासून ते 2007 पर्यंतचा आपण इतिहास पाहिला तर मृत्यूपंथाला लागण्याचा अंदाज आलेला नाही. आज आपण शेकडो शेतक-यांना मृत्यूच्या खाईत टाकलेले असून ही अत्यंत संतापजनक परिस्थिती आहे, ती आपल्याला विचारात घ्यावयाची आहे. एक सिध्दांत आहे, तो असा आहे की, 'Every income of the Government is the expenditure of people and every expenditure of the Govt., is the income of the people.' गेल्या 60 वर्षापासूनचा इतिहास पाहिला तर एका भागामध्ये इनकम आहे आणि शासनाचे एक्सपेन्डीचर आहे आणि दुसऱ्या भागामध्ये या उलट परिस्थिती असल्याचे आपल्याला आरशामध्ये पहावयास मिळते. हा विषय आज चर्चेच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये सभागृहामध्ये आलेला आहे. एक्सपेन्डीचरबाबत मी केवळ दोन उदाहरणे देतो. याठिकाणी उदाहरण दिलेच पाहिजे. कारण त्याशिवाय तो विषय स्पष्ट होणार नाही. "विकसित भागामधील एका जिल्हयामध्ये जेवढे कृषिपंप आहेत, तेवढे अमरावती विभागातील 5 ही जिल्हयांमध्ये नाहीत." म्हणजे, शासन पैसे खर्च करीत असताना किती असमतोलाचे धोरण ठेवते, हे याचे उदाहरण आहे. अशाप्रकारच्या धोरणास सातत्य आहे. सन 1960 पासून 2007 पर्यंत दरवर्षी या प्रगतीत वाढ होत आहे. खर्च कसा होतो आणि उत्पन्न कसे मिळते, याचे मी ताजे उदाहरण देतो व नंतर सिध्दांतावर बोलतो. यावर्षी सर्वात जास्त नुकसान अमरावती जिल्हयाचे झालेले आहे. त्याठिकाणी हजारो एकरांचे नुकसान होऊन वित्त आणि जीवित हानी झालेली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांची दिनांक 21 जुलै, 2007 रोजी अमरावतीला विभागीय कार्यालयामध्ये बैठक झाली. त्या बैठकीमध्ये सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी म्हटले की, आमच्या जिल्हयात 2-3 नद्या अशा आहेत की, ज्या 30-40 मिटर नुसत्या गाळाने भरलेल्या आहेत. दरवर्षीच्या पुरामुळे बेशरमांची झाडेही त्याठिकाणी उगवत असून त्या पूर्णपणे भरुन गेल्या आहेत. आता पूर परत आला की, पाणी खाली असणाऱ्या कसदार जमिनीमध्ये, नांगरलेल्या जमिनीमध्ये जाईल. कारण पुराचे पाणी कडक जागा सोडून नरम जागेमध्ये प्रथम जात असते. आज तेथील हजारो एकरांची जमीन पुराच्या पाण्यामुळे खरडून जात आहे. त्यासंबंधीचे पंचनामेही झालेले आहेत. याबाबतीतील मदतीची मागणीही काटकसरीची असते, ती मदत शासन निर्णयामुळे येईलच असे वाटल्यामुळेच तो

..2....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख....

विचार फार आग्रहाने झालेला नाही. त्या बैठकीमध्ये एक मागणी मात्र सत्ताधारी पक्षांच्या आमदारांसह, इतर सर्व पक्षांच्या आमदारांनी केली, ती म्हणजे, 1-2 जेसीबी मशीन देण्याबाबतची. कारण, नद्या उपसण्याची फार आवश्यकता आहे. आमच्या जिल्हयामध्ये वर्धा, पेढी, भूलेश्वर अशा तीन-चार नद्या आहेत. आज या सर्व नद्या भरुन गेलेल्या आहेत. माननीय सुदाम देशमुख साहेब, खालच्या सभागृहामध्ये होते, ते गंमतीने म्हणायचे की, "आमची भूलेश्वर नदी उपवली असून ती आता दिसतच नाही." सभापती महोदया, आमदारांनी याबाबत मागणी केल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी जो विनोद केला, तो मी याठिकाणी सांगणार नाही. कारण, त्यामुळे गैरसमज होण्याची शक्यता आहे. परंतु त्यांनी या प्रश्नास न्याय देण्याचा प्रयत्न केला व अधिकाऱ्यांना सांगितले की, ताबडतोब या कामाला सुरुवात करा, या कामास पावसाळा संपल्याबरोबर सुरुवात झाली पाहिजे, अशाप्रकारचे आदेश त्यांनी दिले. स्वाभाविकपणे सभागृहामध्ये हा प्रश्न मांडला,

नंतर श्री.रोझेकर.....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख.....

स्वाभाविकपणे पुनर्वसन मंत्री श्री.पतंगराव कदम हे सभागृहातील चर्चेला उत्तर देत होते. दिनांक 11 जुलै 2007 रोजी झालेल्या बैठकीतील मुख्यमंत्र्यांचे विधान मी कोट केले आणि 19 जुलै 2007 रोजी सभागृहाच्या चर्चेमध्ये माननीय सहकार मंत्री काय म्हणाले ? ते म्हणाले की, परवाच 5 कोटी रुपये जिल्हाधिका-यांकडे पाठविले आहेत त्यामधील 1 कोटी रुपये ताबडतोब जे.सी.बी.साठी वापरा असे आदेश आजच्या आज दिले जातील. 19 जुलै 2007 रोजी दिलेले आजच्या आजचे आदेश आजसुध्दा पोहोचलेले नाहीत. पुनर्वसनाची पहाणी करण्यासाठी उपमुख्यमंत्री महोदय मराठवाडयाला आले, त्यांच्यासमोर प्रश्न मांडला गेला, 5 जुलै 2007 रोजी त्यांनी घोषित केले, निकष बाजूला ठेवून आम्ही या कामाला ताबडतोबीने सुरुवात करु. या क्षणापर्यन्त काम सुरु झालेले नाही. यापुढे काय होणार ? बेशरमची झाडे वाढतील आणि नद्या भरल्या जातील. दरवर्षी हाच प्रकार होतो आहे.

सभापती महोदय, माझ्या हाती एक शासन निर्णय आहे. मुख्यमंत्र्यांनी बैठक घेतली नाही, उपमुख्यमंत्र्यांनी घेतली नाही, सन्माननीय मंत्री श्री.पतंगराव कदम यांनी सांगितले नाही, सभागृहात प्रश्न आला नाही, 3 सप्टेंबर 2007 रोजी शासन निर्णय निघाला. काय दिले त्यातून ? अतिवृष्टी म्हणजे काय हे महाराष्ट्रामध्ये डिफाईन केले आहे. 24 तासात 62 मिलिमिटर पाऊस पडला तर अतिवृष्टी झाली, असे समजले जाते. शासन निर्णय असा निघाला की, विकसित भागातील या दोन जिल्हयात जरी 24 तासात 65 मिलिमिटर पाऊस पडला नसला तरी ही मदत देण्यात यावी. कोटयावधी रुपये केवळ दोन जिल्हयात दिले गेले. शासन निर्णय निघाला, निधी पाठविला गेला, मदत दिली गेली, घरीही पोहोचली. जिल्हयांचे नांव मी या ठिकाणी सांगत नाही.

श्री.जयंत प्र.पाटील (बसून) : सांगली जिल्हा असेल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी खाली बसून सांगितले असले तरी जिल्हयाचे नाव बरोबर आहे. त्यांना या गोष्टीची माहिती दिसते, त्यांचा मी आभारी आहे. मी त्या नावांचा पुनरुच्चार करीत नाही. परंतु, माझी विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांनी हा शासन निर्णय जरुर पहावा. सातत्याने हा मार बसल्यामुळे व उपजिविकेची साधने प्रचंड तणावाखाली असल्यामुळे कास्तकार मृत्युपंथाला लागले. दादाभाई नौरोजी यांनी 'मृत्युपंथ' हा शब्द वापरला होता तो या ठिकाणी तंतोतंत लागू पडतो. कास्तकारांच्या शेती व्यवसायाचे तीन भाग आहेत.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख.....

अतितणावाखाली असलेले, तणावाखाली असलेले व अजिबात तणाव नसलेले. ठिबक सिंचन 90:10, तुषार सिंचन 90:10 अशा 90:10 ची दोन-चार जिल्हयात पंगत बसते, त्यांचे झाले की पंगत उठते. या तणावाचे हे चित्र आज महाराष्ट्राच्या समोर आलेले आहे. वाईट याचे वाटते की, हे सहा जिल्हे महाराष्ट्र शासनाने आयडेंटिफाय केलेले नाहीत. पंतप्रधानानी नेमलेल्या समितीने निरनिराळया चार राज्यात अतितणावाखाली असलेले 31 जिल्हे आयडेंटिफाय केले, त्यातील हे सहा जिल्हे आहेत. मला आनंद वाटतो आणि शासनाला धन्यवाद देतो की, महाराष्ट्रामध्ये सर्व शेतक-यांची सरमिसळ करुन मदत देण्याचे तत्व त्यांनी नाकारले. शेतकरी या व्यवसायाचेही काही प्रश्न आहेत. उत्पादित मालाला भाव हा समस्त शेतकरी वर्गाचा प्रश्न आहे. अनेक लोक या निमित्ताने शेतकरी का मरतात याचा विचार करीत आहेत. त्याचे उत्तर देशाच्या पंतप्रधानांनी दिलेले आहे आणि कृषिमंत्र्यांनीही दिलेले आहे.

यानंतर श्री.बोरले.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख.....

ज्यावेळी माननीय पंतप्रधांनी नागपूरला प्रेस कॉन्फरन्स घेतली त्यावेळचे ते उत्तर आहे. माननीय पंतप्रधानांनी प्रेस कॉन्फरन्स घेण्यापूर्वी 10 ते 15 दिवस अगोदर आम्ही एक शिष्टमंडळ घेऊन त्यांच्याकडे गेलो होतो. त्यांनी आम्हाला असे सांगितले होते की, मी यासाठी एक समिती नेमलेली आहे. त्या समितीचा अहवाल आल्यानंतर तुमच्या ज्या मागण्या आहेत त्यासंदर्भात आम्हाला निर्णय घेता येईल. माननीय पंतप्रधान नागपूरला आल्यानंतर त्यांच्या ऑफिसियल प्रेस रिलीजची कॉपी माझ्याकडे आहे. कारणे अनेक आहेत. त्यातील मुख्य कारण सिंचनाचा अभाव हे आहे आणि हे कारण माननीय पंतप्रधानांच्या ऑफिसियल प्रेस रिलीजमध्ये आहे. 15 ऑगस्ट, 2007 रोजी देशाच्या पंतप्रधानांनी लाल किल्ल्यावरुन जे भाषण केले त्यावेळी त्यांच्या भाषणामध्ये फक्त विदर्भाचा उल्लेख होता. त्यांनी हे कारण त्यांच्या भाषणात नमूद केलेले आहे. तरीही लोकांना कारण कळत नसतेल तर ते कर्मदरिद्रीपणाचे लक्षण आहे असेच म्हटले पाहिजे. अजून कोणी कारण द्यावयास पाहिजे ? देशाच्या कृषी मंत्र्यांनी लोकसभेत हे उत्तर दिले आणि परवा त्यांनी ते उत्तर पुन्हा रिपीट केले आणि सांगितले की, याबाबतचा प्रस्ताव माझ्या विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे. या चर्चेच्या निमित्ताने राज्य शासनाने ठामपणे भूमिका घेतली पाहिजे आणि ती यासाठी घेतली पाहीजे की, हा आपल्या कर्तृत्वाचा परिणाम आहे. श्री.विलासराव देशमुख हे आज आपल्या राज्याचे मुख्यमंत्री आहेत आणि श्री.आर.आर.पाटील हे उपमुख्यमंत्री आहेत. 1960 पासून तर 2007 पर्यंत एकही वर्ष असे नाही की, ज्या वर्षामध्ये या तणावाच्या कारणांमध्ये वृद्धी झालेली नाही. मी आकडेवारी देऊन-देऊन थकलो. आज मी अजिबात आकडेवारी वाचत नाही. आपण जर 1960 पासून 2007 पर्यंतचा इतिहास काढला तर, कोणा एका व्यक्तीला दोष देण्याचा हा प्रश्न नाही. या चर्चेच्या निमित्ताने आपल्याला संपूर्ण राज्याच्या वाटचालीचा आढावा घ्यावयास मिळाला याचा आपल्याला आनंद वाटला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे मी एका गोष्टीबद्दल जरुर आभार माणतो. कर्जाच्या बाबतीत माननीय पंतप्रधानांच्या स्टेटमेंटमध्ये काय नमूद केलेले आहे, ते मी आपल्याला सांगू इच्छितो. त्या स्टेटमेंटची प्रत माझ्याकडे आहे. शेतक-यांच्या आत्महत्यांच्या कारणांविषयी ते बोलले. ते असे म्हणाले की, आम्ही व्याज माफ करतो. परंतु कर्ज

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख.....

माफीचा निर्णय समितीचा अहवाल आल्यानंतर घेऊ. कर्ज माफीचा निर्णय होण्यासाठी किती दिवस लागतील ? लोकशाहीचा हा अंगभूत स्थायीभाव आहे की, अनेक वेळा चांगल्या निर्णयाचे बाळांतपण सुखरुप पार पाडण्यासाठी एका मिडवाईफची गरज असते आणि ती मिडवाईफ म्हणजे आंदोलन. अतिवृष्टीचे वगैरे सोडा. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी मनापासून धन्यवाद देतो की, त्यांनी हा प्रश्न ऐरणीवर आणला. कर्ज माफी हा तात्पुरता उपाय आहे, तो ताबडतोबीने झाला पाहिजे. या चर्चेच्या निमित्ताने मी कायम स्वरुपी उपाय योजनांच्या संदर्भातील विषय मांडणार आहे. तुम्ही तो ऐका किंवा नका ऐकू. पण त्याशिवाय उपाय नाही अशी माझी धारणा आहे. अतितणाव असलेल्या लोकांना हे सांगितले पाहिजे की, प्रादेशिक असमतोलाच्या विषारी वृक्षाला आलेली ही आत्महत्यांची कटू फळ आहेत. त्याचे प्रायश्चित्त म्हणून आम्ही 24 तासात कर्ज माफ करीत आहोत. कोणत्याही अर्थव्यवस्थेत कर्ज माफी ही कायम स्वरुपी उपाययोजना होऊ शकत नाही आणि मेल्यानंतर अनुदान देण्याचा तर संकोचच वाटणार नाही. अनुदान द्यावे लागते. तो प्रायश्चित करण्याचा एक भाग आहे. पण हे होऊ नये यासाठीचा एक उपाय या तणावग्रस्त भागातील 55 आमदारांच्या बैठकीमध्ये जे निर्णय झाले त्यामध्ये समाविष्ट आहे. त्याची प्रत माननीय प्रतप्रधानांना देण्यात आलेली आहे. त्याची प्रत राज्याच्या मुख्यमंत्र्यांना दिलेली आहे. त्याची प्रत राज्याच्या राज्यपालांना दिलेली आहे. कारणे अनेक आहेत. मुख्य कारण लक्षात आल्यानंतर ते ताबडतोबीने नष्ट करणे हा आतापर्यंतचा प्रधान उपाय आहे.

यानंतर कु.जयश्री.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख.....

लोक इतक्या सहजपणे बोलून जातात की, जोडधंदा करा, अरे! जोडधंदा काय करायचा, येथे शेतक-याला स्वत:ला पिण्यासाठी पाणी नाही आणि तो ढोरांना पिण्यासाठी पाणी कोठून पाजणार ? अध्यक्ष महाराज, या ठिकाणी मी एक उदाहरण देऊ इच्छितो की, मी ज्या तालुक्यात राहतो, त्या तालुक्यामध्ये ज्या दिवशी मी या सभागृहात आलो त्या दिवशी पाहिले की, 100 टक्के नगरपालिकेच्या पिण्याच्या पाण्याच्या योजना बोअरवेलवर अवलंबून आहेत. पाच लाख लोकसंख्येच्या गावामध्ये कोठेही भुपृष्ठावर जलाशये नाहीत. सन 1940 पासूनच्या परिस्थितीचा आढावा घेतला तर पिण्याच्या पाण्याचे उद्भव भूपृष्ठावरील जलाशयामध्ये उपलब्ध असतील तर लोकांचे पारंपारिक उद्योग समृध्द होतात आणि पिण्याचे उद्भव हे बोअरवर अवलंबून असतील तर ते पारंपारिक उद्योग उद्ध्वस्त होतात. अमरावती जिल्हयातील एका तालुक्यातील सदस्य डी.पी.डी.सी.मध्ये विनंती करावयाला आले की, निदान ढोरांना तरी पिण्यासाठी हौद बांधून द्या. यापूर्वी या गावातील लोक कधी पिण्याच्या पाण्याचा नळदेखील मागावयाला यायचे नाहीत, त्या गावामध्ये आज ही परिस्थिती आलेली आहे. यानिमित्ताने मी अशी विनंती करु इच्छितो की, पिण्याच्या पाण्याच्या कायमस्वरुपी उपाययोजनांसाठी शासनाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. तसेच ज्या तात्पुरत्या उपाययोजना आहेत त्या सुरुवातीला 24 तासात राबविणे आवश्यक आहे, अन्यथा लोकांच्या रोषाला व असंतोषाला शासनाला सामोरे जाण्याशिवाय गत्यंतर राहणार नाही. म्हणून हा जो जलसिंचनाचा अनुशेष आहे, तो जितक्या लवकर होईल तितक्या लवकर दूर केला पाहिजे त्यासाठी या 55 आमदारांनी बैठक घेऊन जे निवेदन तयार केलेले आहे, त्या निवेदनामध्ये असा उपाय सूचविलेला आहे की, जलसिंचन अनुशेषापोटी शेतक-यांना सानुग्रह अनुदान द्या, मेल्यानंतर त्याला एक लाख रुपये देण्यापेक्षा मरण्याच्या अगोदर जाहीर प्रतिज्ञा करुन त्यांना सांगा की, हा जो अन्याय तुमच्यावर झालेला आहे, तो आम्ही केलेला आहे. 90 टक्के शेती सिंचनाखाली आलेले जिल्हे या महाराष्ट्रामध्ये आहेत आणि 10 टक्के सुध्दा शेती सिंचनाखाली न गेलेले देखील जिल्हे या महाराष्ट्रामध्ये आहेत. एक हेक्टरच्या सिंचनाची कॉस्ट 2 लाख आहे, त्यांना सानुग्रह अनुदान द्या. अनुदानाचा आकडा मी सांगत नाही. सांगितले तेवढे दिले पाहिजे असेही नाही. हे अनुदान जलसिंचन अनुशेषाच्या प्रमाणामध्ये आहे सर्वांना सारखे अनुदान ही बोगस भाषा आहे.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख .....

आत्महत्या करीत असलेल्या लोकांना सुध्दा सिंचनाचा अनुशेष त्रास देत होता म्हणून त्यांनी आत्महत्या केल्या, ज्या दिवशी सिंचनाचा अनुशेष दूर होईल त्या दिवशी ते सानुग्रह अनुदान बंद करा आणि त्या शेतक-याला सांगा की, त्याच्या शेताच्या पाटाला पाणी आल्यानंतर तुला प्यावयाला पाणी मिळत नाही की, तुझ्या ढोराला पाणी मिळत नाही, का नाही तू दोन म्हशी पाळत ? हे कोण कोणाला बोलतो हे आपल्याला कळत नाही आणि आपण काय बोलता हे त्याला कळत नाही. आपण शेतक-यांना सांगता की, जोडधंदा करा, जोडधंदा करा मग तो म्हणतो की, अरे ! जोडधंदा काय तुम्हीच करता आम्ही करत नाही का ते म्हणतात की, कोणीतरी विमानातून गेले आणि त्याला शेतात कोणीही दिसले नाही मग ते म्हणाले की, येथे कोणी शेतात काम करीत नाहीत. इथले लोकं भले अयबी आहेत, कोरडवाहूच्या शेतीमध्ये दिवाळीनंतर मृगाच्या धारा पडेपर्यंत काहीही काम नसते हे त्या विमानातून जाणा-या पठ्ठयाला माहितच नाही. ज्या ठिकाणी बारमाही सिंचनाची व्यवस्था होते तेथील लोक घर सोडून शेतातच राहावयाला जातात आणि जर कोठे लग्नाला जावयाचे झाले तर अर्धा-एक तास जाऊन येतात आणि परत जातात परंतु कोरडवाहू शेतकरी लग्नाच्या ठिकाणी दोन - तीन दिवस मुक्काम ठोकण्यासाठी जातो. मी आपल्याला सांगितले की, सर्वांना सारखी वागणूक द्या, हे म्हणणे चुकीचे आहे. मी मुद्दाम हा विषय सभागृहामध्ये मांडू इच्छितो कारण मूळ कारण जर आपल्या लक्षात आले असेल तर त्याचा निपटारा करण्याची उपाययोजना आपण जाहीर केली पाहिजे. आपण निर्माण केलेले हे पाप आहे, हे लक्षात घेता दरवेळी केंद्रशासनावर जबाबदारी ढकलण्याचा प्रयत्न करता कामा नये. पंतप्रधानांच्या एका श्री.मिश्रा नावाच्या आदर्श अधिका-याने असा अहवाल देऊन त्यामध्ये म्हटले आहे की, ही इतकी घमेंडखोर ॲटिट्यूड आहे की, त्यामुळे हे पैसे दिले जात नाही, विदर्भाचे पैसे विदर्भाला दिले जात नाही, हा एक लॅकॅसिटीकल ॲटिट्यूड आहे,असे शब्द वापरलेले आहेत.

यानंतर श्री.गागरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख .....

सभापती महोदय, आपण पहिले काम केले की, मागील 50-60 वर्षामध्ये निर्माण झालेला असमतोल दूर करण्यासाठी राज्य शासनाने उपाययोजना शोधून पुढाकार घेऊन अंमलबजावणी केली पाहिजे. केंद्र सरकारने मदत दिली याबद्दल आभार जरुर मानले पाहिजेत. परंतु नुसत्या तेवढया मदतीवर आम्ही अवलंबून राहू असे म्हणणे हे अत्यंत चुकीचे आहे. झालेल्या पापाचे क्षालन म्हणून कर्जमुक्ती ताबडतोब जाहीर केली पाहिजे. आपण तात्पुरत्या उपाययोजना करीत आहात हे लक्षात ठेवले पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत कर्जमुक्ती ही कायमस्वरुपी उपाययोजना कधी होऊ शकत नाही. परंतु ती करण्याशिवाय गत्यंतर नाही, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. येथे कायमस्वरुपी उपाययोजना सांगितली आहे ती योजना 55 आमदारांच्या सहयानिशी पंतप्रधान, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व राज्यपालांना सादर केलेली आहे. ठाम आवाजात सांगा की, तुमचा हा अनुशेष भरुन निघाल्यावर एक रुपयाही मदत तुम्हाला मिळणार नाही. ज्याचा अनुशेष जास्त आहे, त्यांना जलसिंचनाचा व इतर अनुशेष भरुन काढण्यासाठी नियमानुसार कमी-जास्त अनुदान मिळेल. अति तणावात असलेले सहा जिल्हे शासनाने आयडेंटीफाय केलेले आहेत. परंतु तणावात असलेले जिल्हे अजूनही आयडेंटीफाय केलेले नाहीत. त्यामुळे ते जिल्हे आयडेंटीफाय करावेत. पंतप्रधानांच्या भेटीच्या वेळी जी चर्चा झालेली आहे, ती भावना सोडून द्या. कारण महाराष्ट्राचे राज्य तुम्हाला करावयाचे आहे. पंतप्रधान 4 राज्यातील 31 जिल्हयांचा विचार करणार आहेत. तात्पुरत्या उपाययोजना ताबडतोब करा. त्यामध्ये पहिला नंबर कर्जमुक्तीचा असला पाहिजे. दुसरी बाब म्हणजे जलसिंचनांच्या प्रमाणात अनुदान दिले पाहिजे. ज्या ठिकाणी जलसिंचन सरासरीवर आले असेल तेथे अनुदान ताबडतोब बंद करा. शेतकरी मेल्यावर अनुदान देण्यापेक्षा शेतकरी मरणार नाही यासाठी अनुदान द्या. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ D/

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदया, सभागृहात कोणत्याही प्रस्तावावर चर्चा सुरु असताना विरोधी पक्षाने चर्चेस सुरुवात केली असेल तर, विरोधी पक्षाच्या एका सदस्याचे बोलणे झाल्यानंतर सत्ताधारी पक्षाच्या एका सदस्यास बोलण्याची संधी मिळाली पाहिजे. कारण विरोधी पक्षाचे पाच-पाच वक्ते बोलून झाल्यानंतर आम्हाला बोलण्याची पुरेशी संधी कशी मिळणार आहे ?.

तालिका सभापती : दोन्ही बाजूच्या सदस्यांना बोलण्याची संधी मिळणार आहे. यानंतर माननीय सदस्य श्री.जगदीश गुप्ता बोलतील.

श्री.जगदीश गुप्ता (अमरावती स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, अतिशय महत्वाच्या विषयावर माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी व विरोधी पक्षाच्या सर्व सन्माननीय नेत्यांनी व सदस्यांनी अतिशय गंभीर विषय मागील तीन दिवसांपासून मांडलेला आहे. आज या विषयावर चर्चा सुरु झालेली आहे. या विषयावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. प्रामुख्याने हा विषय विदर्भाचा आहे. माननीय जेष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सांगितले की, त्यातल्या त्यात केंद्रशासनाने पाच जिल्हे केंद्राने आयडेंटीफाय केलेले आहेत.

यानंतर कु.धनश्री.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जगदीश गुप्ता .....

विदर्भातील शेतकरी हा अत्यंत अडचणीत आहे. यासंदर्भात येथे सभागृहामध्ये चर्चा सुरु आहे. मागील अनेक वर्षापासून सातत्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढत चालले आहे ही निश्चितच चिंतनीय बाब आहे. सभापती महोदय, या जिल्हयामध्ये म्हणजे विदर्भामध्येच आम्ही जन्माला आलो, या परिसरातच आम्ही लहानाचे मोठे झालो. मला आठवते आमच्या लहानपणी म्हटले जायचे की, वऱ्हाड म्हणजे सोन्याची कुऱ्हाड. हे पाच जिल्हे पूर्वी किती समृद्ध होते ते आम्ही पाहिले आहे. परंतु हळूहळू ते चित्र आता बदलत चालले आहे. ज्या शेतकऱ्याच्या भरवशावर संपूर्ण जिल्हयाचा कारभार चालायचा, आर्थिक उलाढाली व्हायच्या, ते आता हळूहळू बंद होत चालल्या आहेत, किंबहुना या जिल्हयांना पोसणारा शेतकरीच आता प्रचंड संकटात आलेला आहे.

वास्तविक, विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य, प्रा. बी.टी. देशमुख यांनी आता या संदर्भात अनेक चांगले विचार मांडले. मला असे वाटते त्यांनी मांडलेल्या विचारातून विदर्भातील शेतकऱ्यांच्या भावना सभागृहासमोर आलेल्या आहेत. त्या भागातील सामाजिक क्षेत्रामध्ये, राजकीय क्षेत्रामध्ये काम करणारा एक कार्यकर्ता म्हणून माझ्याही काही भावना मांडण्याचा मी थोडक्यात प्रयत्न करणार आहे.

मागील दोन ते तीन अधिवेशनामध्ये विधानसभेमध्ये व विधानपरिषदेमध्ये सातत्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्या या विषयावर सातत्याने चर्चा करण्यात आली. या विषयासंदर्भात नागपूर अधिवेशनामध्ये कमीत कमी एक दिवस तरी चर्चा होत असते. चर्चा झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सभागृहात चर्चा झाल्यानंतर कधी हे पॅकेज कधी ते पॅकेज जाहीर करण्यात येते. हेपॅकेज जाहीर करीत असताना त्यामध्ये कशाप्रकारची फसवेगिरी करण्यात येते याविषयी आताच सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी त्यांचे विचार मांडले आहेत. हे पॅकेज देत असताना माझे असे मत आहे की, कोणतीही कंपनी चालवित असताना किंवा कोणताही परिवार चालवित असताना त्या संस्थेच्या प्रमुखाची जी भूमिका असते ती अत्यंत महत्वाची असते. प्रमुखाने जर जिद्दीने काम केले तर त्याच्या हाताखाली असणारे कर्मचारी अधिकारी देखील तसेच जिद्दीने

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जगदीश गुप्ता .....

काम करतात. परंतु वरचे लोक जर थातुरमातूर काम करत असतील, लोकांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम करीत असतील तर त्यांच्या हाताखालील लोक देखील तशाच प्रकारचे काम करतील. याची ज्वलंत उदाहरणे माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी या सभागृहामध्ये मांडलेली आहेत.

अमरावती जिल्हयातील एक दोन उदाहरणे मी येथे आपणासमोर मांडू इच्छितो. शेतकऱ्यांचे भले करण्यासाठी आपण कृषि विभागाची स्थापना केलेली आहे. कृषि विभागामध्ये असलेले अधिकारी, कर्मचारी यांचा जर आपण अभ्यास केला तर आपल्याला त्यासंदर्भात आकलन होईल. वेगवेगळया कमिटयांच्या माध्यमातून आत्महत्यांची अनेक प्रकरणे समोर आलेली आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्येची अनेक प्रकरणे समोर आलेली आहेत. पॅकेजद्वारे हजारो कोटी रुपये शेतकऱ्यांकरिता जाहीर केले जातात. हे पैसे शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केल्यानंतर देखील थोडया फार प्रमाणातही शेतकऱ्यांना दिलासा मिळत नाही,याची आपण जर चौकशी केली तर आपणाला याबद्दल माहिती मिळेल. खरे तर मला कळतच नाही आपण कोणासाठी काम करीत आहोत.

मी आपणास सांगू इच्छितो की, अंजनगाव सुर्जी येथील डॉ. गावंडे यांनी माझ्याकडे एक अर्ज दिला होता. अंजनगाव सुर्जी येथील महालक्ष्मी कृषी बीज भंडार यांच्याबद्दल त्यांनी एक तक्रार त्य अर्जाच्या माध्यमातून कृषि उपसंचालक यांच्याकडे नोंदविली. ही तक्रार अतिशय गंभीर स्वरुपाची आहे. सुपर फॉस्फेट हे खत त्या जिल्हयामध्ये शेतकऱ्यांना उपलब्ध नाही. परंतु त्याच नावाचे डुप्लिकेट खत, दुसऱ्या जिल्हयामधून आणून शेतकऱ्यांना सर्रासपणे विकण्याचे पाप हे कृषि केंद्र करीत आहे. यासंदर्भात अनेक तक्रारी करण्यात आल्या होत्या. मी देखील नियम 93 च्या सूचनेमधून ही बाब समोर मांडणार होतो.

यानंतर श्री. सुंबरे.....

अशुद्ध प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. जगदीश गुप्ता ....

परंतु आज या चर्चेच्या निमित्ताने मी हा विषय आपल्यासमोर मांडत आहे. या डॉक्टर गावंडे यांनी प्रत्येक ठिकाणी याबाबत तक्रारी नोंदविल्या आहेत. पोलीस ठाण्यामध्ये देखील तक्रार दिली की, या केंद्रातील माल जप्त करव. परंतु त्या तक्रारींवर कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाही. उलट त्यांनी आपल्या पत्रामध्ये हे सांगितले आहे की, आम्ही तक्रारी केल्या की, कृषी अधिकाऱ्यांची लॉटरी लागल्यासारखे असते. ते कृषी अधिकारी लगेच तेथे जाऊन त्यांच्याशी संगनमत करून आपले बरे-वाईट करून घेतात. सभापती महोदया, खताच्या माध्यमातून शेतकऱ्यांना माती मिळत असेल आणि त्यामुळे त्यांच्या शेतात काही पिकले नाही आणि परिणामी त्यासाठी त्याने काढलेल्या कर्जाचा बोजा वाढत जात असेल तर निश्चितपणे ते शेतकरी आत्महत्येकडे वळल्याशिवाय राहणार नाहीत. सभापती महोदया, मी दुसरे उदाहरण देतो. याच अमरावती जिल्ह्यातील भातकुली तलुक्यतील गणोरी गाव आहे. तेथे लाद्यांसाठी अनुदान जहीर केले आहे. त्याचे पंचनामे देखील झाले आहेत. दीड महिना झाला पण अद्याप अनुदान दिले गेलेले नाही. मी स्वत: संबंधित अधिकाऱ्यांना फोन केल्या नंतर देखील त्या अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे अनुदान मिळालेले नाही. म्हणजे हे अधिकारी कोणाच्या भरवशावर लोकप्रतिनिधींना देखील मानत नाहीत, त्यांना कोणाचे पाठळ आहे हा संशोधनचा विषय आहे. यामुळे लोकप्रतिनिधींवरील विश्वासदेखील हळूहळू लोकांचा उडत चालला आहे. लोकप्रतिनिधी काही विषय घेऊन लोकांना समजाविण्यास गेला तर त्यांच्यावर देखील लोकांचा विश्वास राहिलेला नाही. त्यामुळे जे प्रमुख खुर्चीवर बसलेले आहेत त्या राज्यकर्त्यांना माझी या निमित्ताने विनंती आहे की, असे जे आपले अधिकारी आहेत त्यांना जोवर आपण दहशत बसेल अशी शिक्षा देत नाही तो पर्यंत आपण अशी कितीही पॅकेजेस दिली तरी ती कोणत्याही कामाची राहणार नाहीत. पंतप्रधान पॅकेजमध्ये जे साहित्य आलेले आहे त्याची सगळी माहिती आपल्या समोर आलेलीच आहे, त्यामुळे त्याबद्दल मी आता काही बोलणार नाही. पण यामध्ये जे कोणी जबाबदार असलेले सगळे लोक आहेत त्यांना त्यांची जागा दाखविणे आवश्यक आहे अन्यथा यापेक्षा देखील वाईट परिस्थिती आल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदया, त्यानंतर सिंचनाचा विषय आहे. केंद्रीय मंत्री माननीय श्री.शरद पवार यांनी देखील हे मान्य केले आहे की, सिंचनाचा फार मोठा बॅकलॉग असल्याने या परिसरामध्ये आत्महत्या वाढलेल्या आहेत. या संबंधातील वेगवेगळ्या मतांनुसार कर्जमुक्तीशिवाय याला पर्याय

..... 3जे 2 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाही ही बाब पुढे आल्यानंतर आता त्याबद्दल शासनानेच निर्णय घेण्याची वेळ आली आहे.

सभापती महोदया, पशुधनाच्या बाबतीत देखील असेच आहे. मध्यंतरी सेवाक्षेत्रात काम करणाऱ्या एका संस्थेने यवतमाळ जिल्ह्यात या संबंधात सर्वे केलेला आहे. त्यात त्यांना आढळून आले की, त्या सगळ्या भागातील पशुधन खतम होत आहे. त्यांची संख्या कमी होत असताना मोठ्या प्रमाणात वेगवेगळे प्रश्न निर्माण होत आहेत. त्यांनी गावामध्ये किती घरांमध्ये किती पशू आहेत, किती परिवारामध्ये पशुधन आहेआणि ज्यांच्याकडे आहे त्यांची आर्थिक स्थिती कशी आहे आणि ज्यांच्याकडे पशुधन नाही त्यांची आर्थिक परिस्थिती कशी आहे याची माहिती देखील त्यांनी आपल्या अहवालात दिलेली आहे. शेती आणि पशुधन हे एकमेकांशी किती निगडित आहेत हेही त्यांनी त्यात दाखवून दिलेले आहे. दुर्दैवाने कृषी खात्याकडून पशुधनाच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचे लक्ष पुरविले जात नाही. शासनाचा नियम आहे की, कामाचा बैल असेल तर त्याला कत्तलखान्यात नेता येत नाही, त्याची कत्तल करता येत नाही. परंतु सगळे काही मॅनेज केले जाते. जी चांगली जनावरे आहेत, ज्यांच्यामध्ये काम करण्याची क्षमता आहे, ती जनावरे काम करण्यास योग्य नाह असे प्रमाणपत्र देऊन कत्तलखान्यात विकण्याचे प्रकार सर्रास सुरू आहेत. सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांना मी आठवण करून देऊ इच्छितो की, आपल्या काळामध्ये संपूर्ण गोवंश हत्याबंदीचा कायदा झाला होता. ...

(यानंतर श्री. सरफरे .... 3के 1...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाचा नाही

श्री. जगदीश गुप्ता...

त्याची अंमलबजावणी झाली असती तर थोडयाफार प्रमाणात या परिसरातील शेतकऱ्यांचे पशुधन जीवंत राहिले असते आणि त्या माध्यमातून खत मिळाले असते आणि जमिनीची पोत निश्चितपणे `वाढलेली दिसली असती. या चर्चेच्या माध्यमातून माझी शासनाला विनंती आहे की, हे पशुधन वाचविण्यासाठी आपण निश्चितपणे कठोर व चांगली उपाय योजना केली नाही तर ग्रामीण भागातील पशुधन संपेल. जमिनीची पोत सुधारण्याकरिता आपण रासायनिक शेतीवरुन सेंद्रीय शेतीवर आलो आहोत. जर पशुधन नष्ट झाले तर आपल्याला सेंद्रीय खत मिळणे दुर्मिळ होणार आहे. म्हणून हे पशुधन वाचविणे गरजेचे आहे. या सर्व बाबींचा विचार करीत असतांना आपल्याला पशुधन दुर्लक्षित करता येणार नाही.

सभापती महोदया, त्याचप्रमाणे सिंचनाचा अनुशेष असतांना आज त्या परिसरामध्ये सिंचनाची थोडीफार व्यवस्था आहे. परंतु त्याठिकाणी लोडशेडींगमुळे शेतीला पाणी देता येत नाही व सिंचन करता येत नाही. आणि म्हणून विहिरीमध्ये पाणी असतांना बीज नसल्यामुळे शेतातील हरभऱ्याचे पिक नष्ट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशाप्रकारे विदर्भातील शेतकऱ्याला या शासनाने कोंडीत पकडले आहे.सिंचनाची पुरेशी व्यवस्था करण्यात आलेली नाही. याबाबत माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी आमच्या हक्काचा विकासाचा पैसा दुसरीकडे वळविण्यात आल्यामुळे आमच्यावर अन्याय झाला आहे. आणि लोडशेडींगमुळे आमच्यावर सातत्याने अन्याय होत आहे. राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या होत असतांना केंद्रीय मंत्री हवाई मार्गाने जात असतांना त्यांना खाली शेतकरी दिसत नाही. आणि त्यांचे समर्थन या राज्याचे माननीय मुख्यमंत्री करीत असतील तर निश्चितपणे ती लाजिरवाणी गोष्ट आहे. या राज्याचे माननीय मुख्यमंत्री म्हणतात की, विदर्भातील शेतकरी पाटीलकी करतात. अशाप्रकारे विदर्भाच्या शेतकऱ्यांची टिंगल या महाराष्ट्राच्या प्रमुख व्यक्तीकडून होत असेल तर या महाराष्ट्र शासनाकडून न्याय मिळेल असे मला वाटत नाही.

या सदनाचे ज्येष्ठ माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सडकेवर येऊन शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडण्याकरिता आंदोलन केले. हे आंदोलन केल्याशिवाय आमच्यावरील अन्याय दूर होणार नाही. आणि म्हणून या चर्चेच्या माध्यमातून एकच मागणी आहे ती म्हणजे संपूर्ण कर्जमुक्ती झाली पाहिजे. शेतकऱ्यांना कर्जमुक्त करुन त्यांचे 7/12 चे उतारे कोरे करावेत अशी आग्रहाची मागणी करुन आणि आपण मला बोलण्याकरिता संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कमलकिशोर कदम (नांदेड स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्त्यांबाबतच्या गंभीर प्रश्नावर या सभागृहामध्ये चर्चा होत आहे. हे कां झाले किंवा हे कसे झाले? याचे कितीही विस्तृत वर्णन केले तरी या प्रश्नाची सोडवणूक कशी करावी या दृष्टीकोनातून चर्चा झाली तर ती योग्य ठरेल असे मला वाटते. गेल्या आठ-पंधरा दिवसापूर्वी या देशाचे कृषि मंत्री माननीय श्री. शरद पवार यांनी घोषणा केली की, कर्जमुक्तीशिवाय शेतकऱ्यांना पर्याय नाही.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. कमलकिशोर कदम ....

देशाचे माननीय पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी यावर विचार करावाच लागेल असे ज्यावेळी सांगितले त्यावेळी दिंड्या सुरु झाल्या. त्याला आमची काही हरकत असण्याचे कारण नाही. एका महत्वाच्या प्रश्नावर देशाचे कृषी मंत्री एक भूमिका घेतात, माननीय पंतप्रधान त्याबद्दल काळजी व्यक्त करतात त्याबद्दल महाराष्ट्रातील विरोधी पक्षांनी सुध्दा काही काळजी दाखवली आणि दिंडी काढली तर आमची अजिबात हरकत नाही. परंतु तुम्ही काय केले ? तुम्हीच जबाबदार आहात. देता की जाता ? घेता की बघू ? ही संसदीय भाषा नाही एवढीच मला विनंती करावयाची आहे. देण्याघेण्याची भाषा आम्हाला येत नाही. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राजकारणाची एक संस्कृती आहे. त्या संस्कृतीमध्ये आम्ही वाढलो आहोत. आम्हाला लोकांची कामे करणे माहीत आहे. स्व. यशवंतरावजी चव्हाण हे आमचे आदर्श आहेत. त्यांनी सत्तेचे विकेंद्रीकरण करुन शेवटच्या माणसाच्या हातात, शेतकऱ्यांच्या हातात सत्ता दिली. ग्रामपंचायत, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा उभारल्या. बाबारे ही सत्ता तू घे. तुझे प्रश्न सोडविण्यासाठी, तुला मजबूत करण्यासाठी हा आमचा प्रयत्न आहे, असे त्यांनी सांगितले होते. स्व. वसंतरावजी नाईक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. आज आम्ही एकएक नाव घेत असताना आमची छाती गर्वाने फुगून येते. 1972 ते 1974 या तीन वर्षामध्ये ज्यावेळी सातत्याने दुष्काळ पडला होता, कोठेही पाणी दिसत नव्हते त्यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री रानोमाळ फिरत होते. शेतकऱ्यांना सांगत होते की, मी तुमच्या मागे आहे. सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांना माहीत आहे. दुष्काळामध्ये रात्री बेरात्री फिरुन त्यांनी शेतकऱ्यांना वाचविले. त्या दुष्काळामध्ये त्यांनी लाखो लोकांना काम दिले. स्व. वसंतरावजी नाईक यांनी या महाराष्ट्रावर जे उपकार केले ते कधीही विसरता येणार नाहीत. त्यावेळी आम्ही अमेरिकेतून आलेला निकृष्ट दर्जाचा गहू खात होतो. त्यावेळी स्व. इंदिराजी गांधी यांनी सांगितले की, आपल्याला स्वयंपूर्ण झाले पाहिजे. स्व. वसंतरावजी नाईक यांनी ते आव्हान स्वीकारले आणि या महाराष्ट्राला शेतीमध्ये स्वयंपूर्ण केले. त्यांनी महाराष्ट्रामध्ये हरितक्रांती केली. श्री. शरद पवार साहेबांनी महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांचा सात बारा अनेकदा कोरा केला आहे. त्यांनी बंडींगचे कर्ज माफ केले. महाराष्ट्रामध्ये जे हजारो पाझर तलाव दिसतात त्याबाबत श्री. शरद पवार यांनी सूचना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/

डॉ. कमलकिशोर कदम ....

केली होती. आज आपल्या स्वामीनाथन समितीने सांगितले की, "He is father of horticulture revolution." शेतकऱ्यांना आपल्या पायावर मजबूतपणे उभे करण्यासाठी फळबागांची क्रांती महाराष्ट्रामध्ये श्री. शरद पवार यांनी आणली. स्व. वसंतदादा पाटील हे शेतकऱ्यांचा सखा होते, मित्र होते. त्यांच्या घराचे दरवाजे रात्रंदिवस उघडे राहावयाचे हे आपल्यापैकी अनेकांना माहीत आहे. अशा संस्कृतीमध्ये वाढलेले आम्ही शेतकऱ्यांचे शत्रू नाही. आम्ही शेतकऱ्यांचे मित्र आहोत. आपण नव्याने शेतकऱ्यांचे मित्र बनू पाहात आहात त्याचे स्वागत आहे. सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेब, मी सुरुवातीला सांगितले की, आपण हा प्रश्न उपस्थित केला तसेच माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी हा प्रश्न उपस्थित केला त्याबद्दल आनंद आहे. शेतकऱ्यांच्या डोक्यावरचे कर्ज उतरले पाहिजे. त्यातून शेतकरी मुक्त झाला पाहिजे. त्यांना मोकळा श्वास घेता आला पाहिजे ही आमची इच्छा आहे. आपण जो प्रस्ताव मांडला त्याच्या विरोधी आम्ही आहोत असे अजिबात नाही. यावर एकत्रितपणे गांभीर्याने चर्चा झाली पाहिजे. सगळ्यांना आपणच जबाबदार आहात असे म्हणणे बरोबर नाही. याला आपण सगळे जबाबदार आहोत. ज्यावेळी मी पहिल्यांदा विधानसभेमध्ये आलो

यानंतर श्री. भोगले ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कमलकिशोर कदम.....

त्यावेळेला आमदारांचे मानधन 300 रुपये होते, पाच वर्षांनी ते 500 रुपये झाले आणि रावते साहेब आज आम्ही भत्ते म्हणून 44 हजार रुपये प्रत्येक महिन्याला घेतो. कोण जबाबदार आहे? सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख साहेब समोर बसले आहेत म्हणून सांगतो. 1966 साली प्राध्यापकांचा पगार 240 रुपये होता, दहा वर्षात तो 700 रुपये झाला, पुढच्या दहा वर्षात 2200 रुपये झाला, नंतर 8000 रुपये झाला आणि सहाव्या वेतन आयोगात 32 हजार रुपये होऊ घातला आहे. याला कोण जबाबदार आहे? शेतकरी आत्महत्या करणार नाही तर काय करेल? खाली भूक वाढली आहे. भुकेने होरपळत आहे. तुमचे भोग वाढतात त्याला तुम्ही-आम्ही जबाबदार आहोत. जबाबदारी टाळून पुढे जाता येणार नाही.

सभापती महोदय, यावर एवढ्या सहजासहजी विचार करुन जमणार नाही. या सभागृहात चिंतन करणाऱ्या लोकांची एक समिती बनवावी आणि यातून काही मार्ग निघत असेल तर तो काढण्याचा प्रयत्न करावा, तरच हा प्रश्न सुटेल. आम्ही तुमच्यावर आणि तुम्ही आमच्यावर ताशेरे ओढून हा प्रश्न सुटणार नाही. बजेट इन ब्रीफमधील काही आकडेवारी मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो. म्हणजे शेतकरी भिकेला का लागला हे कळेल. रेव्हेन्यू रिसिप्ट 1999 साली 25 हजार कोटी रुपये होते त्यावेळी युती सरकारचे राज्य होते आणि कर्मचाऱ्यांच्या वेतन, भत्ते व व्याजावर एकूण उत्पन्नाच्या 80 टक्के.....

प्रा.बी.टी.देशमुख : सन्माननीय सदस्यांनी कर्मचाऱ्यांबद्दल जरुर बोलावे. परंतु कर्मचाऱ्यांच्या वेतनामुळे अनुशेष वाढलेला नाही.

श्री.कमलकिशोर कदम : आमच्या भावना समजून घ्याव्यात एवढेच आमचे म्हणणे आहे. प्रश्न असा आहे की, शेतकरी कर्जबाजारी झालेला आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : एखाद्या वेळेला बोलणे ठीक आहे. कर्मचाऱ्यांचा अनुशेषामध्ये संबंध कुठे येतो? हा विषय दुसरीकडे वळविण्याचा प्रयत्न आहे. वाढलेल्या अनुशेषाबद्दल बोलायचे नसेल तर बोलू नये.

श्री.कमलकिशोर कदम : सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख साहेब, कोणाचाही अनादर करण्याचा माझा हेतू नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : मूळ विषयाला बगल देऊ नये.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्रीमती उषा दराडे) : सभागृहात प्रत्येक सन्माननीय सदस्याला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : कर्मचाऱ्यांच्या वेतनामुळे अनुशेष वाढला हे बोलण्याचा त्यांना अधिकार नाही.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदया, राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना वेतन देण्याबाबत आदरणीय श्री.शरद पवार या राज्याचे मुख्यमंत्री असताना एक लेखी करार राज्य सरकारी कर्मचा-यांच्या युनियनचे प्रतिनिधी आणि राज्य सरकार यांच्यामध्ये झाला. ज्या ज्यावेळेला केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना वेतन आयोग लागू होईल किंवा वेतनामध्ये वृध्दी होईल तसतशी ती राज्य सरकारी कर्मचा-यांना लागू केली जाईल हा करार आपलेच आदरणीय नेते श्री.शरद पवार यांच्या मान्यतेने झाला.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदया, अतिशय विनम्रपणे सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम यांनी सांगितले की, तुम्ही आम्ही एकत्र येऊन हा प्रश्न सोडविला पाहिजे. तुम्ही आमच्यावर आणि आम्ही तुमच्यावर ताशेरे ओढण्यापेक्षा हा शेतकऱ्यांचा गंभीर प्रश्न कसा सोडविला जाईल एवढी चांगली मांडणी करीत असताना संघटित लोकांना न्याय मिळतो आणि ग्रामीण भागातील असंघटित लोकांना न्याय मिळत नाही हा फरक दाखविण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्यामुळे त्यांना रोखता येणार नाही.

(नंतर श्री.जुन्नरे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. कमलकिशोर कदम : समाजातील कोणत्याही वर्गाचा अनादर करण्याचा किंवा आक्षेप घेण्याचा माझा मुद्दा नाही.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदया, त्यांनीच जी.आर. काढला जेव्हा ते शिक्षणमंत्री होते. कर्मचा-यांच्या पगाराबद्दल जरुर टीका करावी आमचे काही म्हणणे नाही परंतु त्यामुळे अनुशेष वाढला हे म्हणणे योग्य नाही.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदया, कर्मचा-यांच्या आणि आमदारांच्या वेतनाची तुलना करण्याची आवश्यकता नाही.

तालिका सभापती : आपल्याला बोलण्याची संधी मिळेल त्यावेळी आपण आपले विचार जरुर मांडावेत.

श्री. कमलकिशोर कदम : सभापती महोदया, मी अतिशय नम्रपणे सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य बी.टी.देशमुख ज्या वर्गाचे प्रतिनिधीत्व करतात त्याबद्दल मला काही बोलावयाचे नाही. परंतु या सभागृहात बोलण्याचा मला अधिकार द्यावा. या सभागृहात शेतक-याच्या कर्जबाजारीपणाची खूप चर्चा झालेली आहे. का झाले, कोण झाले, कोण जबाबदार यासंदर्भात आम्ही काही बोललो नाही. आपण त्याचे रोगनिदान करावयास लागला याचा आम्हाला आनंद आहे. आम्ही सगळे मिळून याला न्याय देऊ शकलो तर हा प्रश्न सोडविण्याचा मोठा आनंद होईल. परंतु हा प्रश्न सोडवतांना आम्हाला घेऊन प्रश्न सोडवावा. पण महाराष्ट्राची साधनसंपत्ती मर्यादीत आहे हे आपल्याला विसरुन चालणार नाही. मर्यादित असलेली साधनसंपत्ती आपल्याला योग्य प्रकारे वापरावी लागणार आहे. महाराष्ट्र शासनाकडे नोटा छापण्याचा कारखाना नाही. मला आपल्याला एकच सांगावयाचे आहे की, संघटीत वेतनाच्या कर्मचा-याच्या वेतनावर, भत्त्यावर, पेन्शनवर आणि व्याजावर महाराष्ट्र सरकारच्या तिजोरीतील 80 टक्के पैसे खर्च होतात. हितसंबंध दुखावयास लागले की, सर्व आडवे येतात. त्यावेळी तुम्हा कोणालाही शेतक-याची आठवण येत नाही हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. मला या विषयावर फार मोठे भाषण करावयाचे नाही, विरोधी पक्षाला विश्वासात घेऊन सरकार जर कर्जमुक्तीच्या संदर्भात मार्ग काढणार असाल तर मला तो मार्ग हवा आहे, मला भाषण करण्याची हौस नाही. मी आपल्याला एकच सांगू इच्छितो की, 1999 मध्ये पगाराचा खर्च एकूण महसुली उत्पन्नाच्या 80 टक्के होता. सन 2001 मध्ये 84 टक्के खर्च

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कमलकिशोर कदम.....

पगारावर झालेला आहे, सन 2001-2002 मध्ये 88 टक्के खर्च पगारावर झालेला आहे. सन 2002-2003 मध्ये 87 टक्के खर्च पगारावर झालेला आहे, सन 2004-2005 मध्ये 85.47 टक्के खर्च पगारावर झालेला आहे. सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख साहेब उपस्थित आहेत आता सहावा वेतन आयोग लागू झाल्यानंतर सहाव्या वेतन आयोगाच्या संदर्भात ते मागण्या मांडणार आहेत. सहाव्या वेतन आयोगामध्ये कर्मचा-यांचे पगार 40 टक्क्याने वाढणार आहेत. सहाव्या वेतन आयोगामुळे महाराष्ट्र शासनावर 20 हजार कोटी रुपयांचे ॲरिअर्स आपण मागणार आहात. हे सर्व पैसे महाराष्ट्र शासन कोठून आणणार आहे ? शेतक-याचे 7 हजार कोटी रुपयांचे कर्ज फेडण्यासाठी हे सरकार महाग झाले आहे. असे असतांना आपण आपल्या मागण्या रेटून नेत आहात हे कोठे तरी थांबले पाहिजे.

तालिका सभापती : आपल्यालाही चर्चा एक मिनिटासाठी थांबवावी लागणार आहे. आता कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त संसदीय कार्य मंत्री वाचून दाखविणार आहेत.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. / मु.शी.: कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सभागृहाला सादर करणे व संमत करुन घेणे.

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्यमंत्री) : मी आपल्या अनुमतीने कामकाज समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो. "कामकाज सल्लागार समितीच्या 22 नोव्हेंबर, 2007 रोजी भरलेल्या बैठकीत शुक्रवार दिनांक 23 नोव्हेंबर, 2007 ते गुरुवार दिनांक 29 नोव्हेंबर 2007 पर्यंतचा विधानपरिषदेच्या कामकाजाचा कार्यक्रम पुढील प्रमाणे ठरविण्यात आला आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

22-11-2007 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) 3O-1

AJIT/ D/ पूर्वी श्री.जुन्नरे.... 16:40

श्री.हर्षवर्धन पाटील.....

नोव्हेंबर 2007

शुक्रवार, दिनांक 23 : सभागृहाची बैठक सकाळी 11.00 वाजता

1) नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) अनियम निरसित करण्यासंबंधातील शासकीय ठरावावरील चर्चा पुढे सुरू.

2) शासकीय विधेयके.

3) अशासकीय कामकाज (ठराव)

शनिवार, दिनांक 24 : बैठक होणार नाही.

रविवार, दिनांक 25 : सुट्टी

सोमवार, दिनांक 26 : 1) सच्चर समितीच्या शिफारशी अमलात आणण्यासंबंधातील प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू.

2) शासकीय विधेयके.

मंगळवार, दिनांक 27 : 1) सन 2007-08 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (पहिला दिवस)

2) निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप

3) सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव

4) शासकीय विधेयके

बुधवार, दिनांक 28 : 1) सन 2007-2008 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस)

2) शासकीय विधेयके

गुरूवार, दिनांक 29 : 1) पुरवणी विनियोजन विधेयक

2) विरोधी पक्षाचा प्रस्ताव

3) शासकीय विधेयके.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्रीमती उषा दराडे) : कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदया, कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहास संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, शुक्रवारी फक्त अशासकीय कामकाज ठेवतो. परंतु त्यादिवशी यु.एल.सी.आणि शासकीय विधेयके ठेवलेली आहेत हे बरोबर नाही. आपण ते कामकाज सोमवार, दिनांक 26 नोव्हेंबर रोजी ठेवावे अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदया, या संदर्भात कामकाज सल्लागार समितीमध्ये चर्चा झालेली आहे. आपण काल सुध्दा अपवाद म्हणून दिवसाचे कामकाज स्थगित करण्याचा निर्णय घेतला होता. तेव्हा माझी विनंती आहे की, सभागृहाने कामकाज सल्लागार समितीचे कार्यवृत्त मंजूर करावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, या प्रस्तावाला आमचा विरोध आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : विदर्भात गेल्या वर्षभरात 1500 च्या वर शेतकऱ्यांच्या झालेल्या आत्महत्या

मु. शी. : विदर्भात गेल्या वर्षभरात 1500 च्या वर शेतकऱ्यांच्या झालेल्या आत्महत्या याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, मधुकर चव्हाण, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री पाशा पटेल, प्रकाश शेंडगे, गोपीकिसन बाजोरिया, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. अरविंद सावंत, ॲड. अनिल परब, सर्वश्री विनोद तावडे, जगदिश गुप्ता, केशवराव मानकर, सागर मेघे, सुरेश जेथलिया, परशुराम उपरकर व संजय केळकर, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

(चर्चा पुढे सुरू.....)

श्री.कमलकिशोर कदम : सभापती महोदया, सरकारी कर्मचाऱ्यांवर मोठ्या प्रमाणावर खर्च होत आहे. तुमचे सरकार असो वा आमचे सरकार असो. हा संघटीत वर्ग वाढीव पगार मिळण्याबाबत आग्रही असतो, याबाबत गंभीरपणाने विचार करण्याची वेळ आलेली आहे....

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे की, आम्ही पुन: पुन: लक्षात आणून देऊन सुध्दा सन्माननीय सदस्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनासंबधी बोलत आहेत. त्यांना असे बोलण्याचा अधिकार नाही.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांना माहिती मांडण्याचा अधिकार आहे. सन्माननीय सदस्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनाविषयी उल्लेख करीत आहे. त्यांचा त्यास विरोध नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांचा अधिकार मी नाकारू शकत नाही. त्यांना दिशाभूल करावयाची असेल तर त्याचा निषेध म्हणून मी सभात्याग करीत आहे. हे प्रादेशिक असमतोलाचे कारण आहे काय ?

(सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख बहिर्गमन करतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कमलकिशोर कदम : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी माझे पूर्ण भाषण ऐकून घेतले असते तर मला बरे वाटले असते. राज्यावरील कर्ज कोठेपर्यंत वाढविणार आहोत ? 25 हजार कोटीपासून 60 कोटीपर्यंत ? यामध्ये आमचा वित्तमंत्री म्हातारा होऊ नये म्हणजे झाले. कर्ज काढले तर ते तीन वर्षात दुप्पट होते. व्याजाचे दर काय आहेत ? आपण कोठून पैसा द्यायचा,

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : तुमचे बोला. आपले वित्तमंत्री कसे म्हातारे झाले ते सांगा.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांना त्यांचे मत व्यक्त करु द्या.

श्री.कमलकिशोर कदम : आम्ही आपल्यावर टीका करीत नाही. दुप्पट पैसा जगामध्ये कुठेही दिला जात नाही. आपण म्हणता की, आपल्याला माहिती करुन काय करावयाचे आहे ? परंतु तो सगळा भार राज्याच्या वित्तमंत्र्यांवर पडत आहे. गेली 5-7 वर्षे हा सातत्याने प्रयत्न चालू आहे की, हे सगळे कर्ज कसे फेडावे ? यासंदर्भातील आकडेवारीची चर्चा माननीय रावते साहेब मी आपल्यासोबत बसून करेन. यामध्ये राजकीय दृष्टीकोन न ठेवता आपण चर्चा करु. 60 हजार कोटी रुपयांचे उत्पन्न वाढले, परंतु त्यामध्ये पगारावरील खर्चाचा आकडा 60-65 टक्क्यांवर आलेला आहे. याठिकाणी दुप्पटीने उत्पन्न वाढलेले आहे परंतु तरीही ए.जी. म्हणतात की, पगारावर 1 हजार कोटी रुपये जात आहेत. मी याठिकाणी कागदपत्रांच्या आधारे बोलत आहे. म्हणूनच माझा रोष आमच्या सरकारमधील मंत्र्यांवरसुध्दा आहे. आपण हे किती दिवस सहन करणार ? राज्याची 80 टक्के साधनसामुग्री मुठभर कर्मचाऱ्यांसाठी खर्च करीत आहात, ते कर्मचारी तरी किती आहेत ? ते 20 लाख आहेत. महाराष्ट्राच्या 10 कोटी लोकसंख्येमध्ये 20 लाख म्हणजे 2 टक्के आहेत. त्या लोकांवर आपण महाराष्ट्राची 80 टक्के साधनसामुग्री खर्च करता आणि ग्रामीण भागात राहणाऱ्या 70-80 टक्के जनतेवर 10-15 टक्केही खर्च करता की नाही, याबाबत मला शंका आहे. हा मुलभूत प्रश्न सोडवण्याची आपली तयारी आहे का ? माननीय रावते साहेब, आपण "हो" म्हणा. आपण याठिकाणी प्रस्ताव मांडला आहे. माझी अपेक्षा आहे की, आपण आणि आपल्या सहकाऱ्यांनी सगळयांनी मिळून हे कमी केले पाहिजे, अशी भूमिका घेतली पाहिजे. एक नियम असतो, कुठल्याही संस्था चालवायची असेल तर खर्च हा 30 टक्क्यांच्यावर गेला नाही पाहिजे. याबाबतीत आपली तयारी आहे का ? हा संपूर्ण खर्च 80 टक्क्यांवरुन 30 टक्क्यांवर आणला पाहिजे...(अडथळा) रावते साहेब, आपण म्हणता, "देता की जाता" आज आपण शेतकऱ्यांची बाजू घेऊन "देता की जाता" असे बोलत आहात. उद्या आपण कर्मचाऱ्यांच्या बाजूने पुन्हा बोलाल की, "देता की जाता." परंतु आपल्याला कारभार करावा लागतो व तो मर्यादित संपत्तीमध्ये करावा लागतो. आपल्याला दीर्घकाळाचे ध्येय ठेऊन काम करावे लागते. हे आव्हान आम्ही स्वीकारलेले आहे. माननीय वसंतदादा पाटील यांनीही एकवेळ

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कमलकिशोर कदम.....

असे आव्हान स्वीकारले होते. प्रचंड जनसमुदायांना देण्यासाठी त्यांच्याकडे पैसे नव्हते, परंतु हे जे मुठभर लोक आहेत की जे दमदाटी करुन पैसे काढून घेत आहेत....यासाठी प्रा. बी.टी.देशमुख साहेब उठून गेले. आपल्याकडे 20 हजार कोटी रुपये ॲरिअर्स देण्यासाठी आहेत, परंतु शेतक-यांचे कर्ज माफ करण्यासाठी 7 हजार कोटी रुपये नाहीत, हे योग्य नाही. आपण कर्मचाऱ्यांना 20 हजार कोटी रुपये कुठून देणार आहात ? ज्यावेळी पाचवा वेतन आयोग लागू झाला त्यावेळी 7 हजार कोटी रुपये द्यावे लागले. सरकार त्यातून अजूनही उठू शकलेले नाही. शेतकऱ्यांच्या वाईट परिस्थितीला ही सगळी परिस्थिती कारणीभूत आहे.

नंतर श्री.रोझेकर.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कमलकिशोर कदम.....

सगळी सोंगे करता येतात, पैशाचे सोंग करता येत नाही. तिजोरीत पैसा नसेल तर अर्थमंत्री काय करणार ? 20 हजार कोटी रुपये असलेले उत्पन्न 60 हजार कोटी रुपयांवर त्यांनी आणले आहे. त्यांनी कर लादले तर तुम्ही व्यापा-यांची बाजू घ्याल आणि म्हणाल की, 'देता की जाता.' असे राजकारण करु नका. महाराष्ट्राच्या हिताचे राजकारण करायचे असेल तर एकत्र बसून निर्णय घ्यावा लागेल. या महाराष्ट्रातील 7 कोटी शेतकरी आज अडचणीत आहेत, भिकेला लागले आहेत, आत्महत्या करीत आहेत, कर्जबाजारी झाले आहेत. त्या शेतक-यांसाठी तुम्ही, आम्ही एकत्र बसू. कर्मचा-यांचे पगार 30 टक्क्यांनी कमी केले तर काही बिघडत नाही. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख साहेब रागारागाने निघून गेले. आज मी तुम्हाला सांगतो की, एका प्राध्यापकाचा पगार 32 हजार रुपये आहे, तो 25 हजार रुपये झाला तर ते मरत नाहीत. आज शिपायाला सुध्दा 10 हजार रुपये पगार आहे. मला माहित आहे की, उद्या सरकारी कर्मचारी संघटितपणे विरोध करतील. पण आम्ही त्यांची काळजी करीत नाही. शेतकरी आत्महत्या करीत असताना या गंभीर प्रश्नावर आपण प्रस्ताव आणला आहे. कायमस्वरुपी मार्ग काढावयाचा असेल तर साधनसंमत्तीचे न्याय वाटप करा. सरकारचे उत्पन्न 60 हजार कोटी रुपयांचे असेल तर 30-40 कोटी रुपये शेतीसाठी राखून ठेवा. त्यासाठी विरोधी पक्षाचीही मदत लागणार आहे, अन्यथा उद्या ते राजकारण करतील. कर्मचा-यांना विश्वासात घेऊन सांगितले पाहिजे की, पगार कमी करावे लागतील, शेतकरी वाचला पाहिजे, त्यावेळी तुम्ही हे 'टोपी' राजकारण करु नका म्हणून मी विनंती करीत आहे. अग्रिकल्चर ॲण्ड अलाईड सर्व्हिसेस आणि इरिगेशन ॲण्ड फ्लड कंट्रोल अहवालात हे दाखवून दिले आहे की, 52 हजार कोटी रुपयांच्या बजेटमध्ये शेतीवर 2782 कोटी रुपये आणि पाटबंधा-यावर 1318 कोटी रुपये ठेवलेले आहेत. म्हणजे 5 टक्के निधी देखील या दोन महत्वाच्या बाबींसाठी ठेवलेला नाही. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख नेहमी सांगतात की, अनुशेष वाढला आहे, अनुशेष वाढला आहे, अनुशेष वाढला आहे. पंरतु, मी सांगतो की, हा अनुशेष कधीच कमी होणार नाही. 20-25 हजार रुपयांनी सरकारी कर्मचा-यांचे पगार कमी करा, एका वर्षात अनुशेष दूर होईल. नुसता अनुशेष वाढला असे म्हणून काय होणार ? 2 टक्के संघटित लोकांनी हिस्सा घ्यावयाचा आणि बाकीच्या 98 टक्के असंघटित शेतकरी वर्गाला फाशी घ्यावयास प्रवृत्त

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कमलकिशोर कदम.....

करावयाचे यासाठी कोणी एकटा जबाबदार नाही, आम्हीही जबाबदार आहोत, तुम्हीही जबाबदार आहात. आपण दोघेही जबाबदार असू तर दोघांनी मिळून यातून काहीतरी मार्ग काढला पाहिजे. तो मार्ग शेतक-यांच्या हिताचा असला पाहिजे. संघटित वर्गाला थोडा त्रास सहन करावा लागला तरी त्यांना सांगितले पाहिजे की, महाराष्ट्र 10 वर्षे तरी तुम्हाला एवढा पगार देऊ शकणार नाही. कोणीतरी हे बोलले पाहिजे. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब, हे तुम्ही बोला. सरकारी बांधवांना विनंती राहील की, शेतक-यांना फाशीला जाण्यापासून वाचवा. मला विश्वास आहे की, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब आणि सर्व सन्माननीय सदस्य या मागणीचे समर्थन करतील. आता थोडया वेळापूर्वी पाशा पटेल किधर है, किधर है अशी विचारणा होत होती. तेही तुम्हाला सांगतील. शेतक-यांसाठी तुम्ही संघटित व्हा आणि महाराष्ट्रातील 80 टक्के साधनसामुग्री शेतक-यांवर खर्च करा.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कमल किशोर कदम .....

विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, आज शेतकरी आत्महत्या करीत आहेत, सत्तारुढ पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी आणि विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी एकत्र बसून विचार करावा आणि यातून मार्ग काढावा, अशी आज वेळ आलेली आहे. उच्च न्यायालयाने सुध्दा सांगितलेले आहे की, यावर कोणी तरी एकत्र बसले पाहिजे आणि यातून कायम स्वरुपी मार्ग काढला पाहिजे. शेतक-यांचे 7/12 चे उतारे कोरे करा. श्री.शरद पवार साहेब मुख्यमंत्री असतांना त्यांनी शेतक-यांचे 7/12 चे उतारे कोरे केले. श्री.अे.आर.अंतुले साहेब मुख्यमंत्री असतांना त्यांनी देखील शेतक-यांचे 7/12 चे उतारे कोरे केले होते. आता पुन्हा तीच परिस्थिती आलेली आहे. दर 10 वर्षांनी 7/12 चे उतारे कोरे करणे शक्य होणार नाही. माझी अशी विनंती आहे की, जोपर्यंत 50 टक्के साधनसंपत्ती शेती आणि शेतक-यांवर खर्च होणार नाही तोपर्यंत शेतकरी कर्ज मुक्त होऊ शकत नाही. खास करुन मला विरोधी पक्षाला विनंती करावयाची आहे की, आपण जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याची नैतिक जबाबदारी आपण स्वीकारावी. शेतक-यांना कर्ज मुक्त करण्याचा आपण मार्ग काढू, एवढी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, प्रस्तावाची मागणी करतांना ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी अशी मागणी केली की, या प्रस्तावाच्या माध्यमातून शेतक-यांना कर्ज मुक्त करण्याची शिफारस राज्य शासनाने केंद्र सरकारला करावी व तसा ठराव सभागृहामध्ये पास करावा. त्यावेळी काही सन्माननीय सदस्यांनी असे म्हटले की, आपल्याला कर्ज माफ करण्यासाठी केंद्र सरकारला शिफारस करण्याची गरज नाही. कारण या राज्यामध्ये या राज्याचे माजी मुख्यमंत्री श्री.अे.आर.अंतुले यांनी 1980 साली शेतक-यांचे कर्ज माफ केले होते. त्यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर ताबडतोब 15 दिवसात शेतक-यांचे कर्ज माफ केले आणि त्यांनी सांगितले की, मी केंद्र सरकारला तशी शिफारस करीत आहे. सभापती महोदय, शेतक-यांची फसवणूक थांबविली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे. तामिळनाडू राज्यात सी.पी.आय. आणि सी.पी.एम.ए. पक्ष सत्तारुढ झाल्यानंतर त्यांनी त्याच दिवशी तेथील शेतक-यांचे कर्ज माफ केले. त्यांनी निवडणुकीमध्ये जनतेला कर्ज माफ करण्याचे आश्वासन दिले आणि जनतेने त्यांना कौल दिला. मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर त्यांनी ताबडतोब शेतक-यांचे कर्ज माफ केले. तामिळनाडू राज्यामध्ये शेतक-यांचे कर्ज माफ झालेले आहे. मग महाराष्ट्रामध्ये का होऊ शकत नाही. सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या मुद्यांची मी पुनरावृत्ती करणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी बरीच आकडेवारी दिली. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख सुध्दा या प्रस्तावावर बोलले. शेतक-यांच्या मालाला किफायतशीर भाव मिळाला पाहिजे, ही प्रामुख्याने मागणी आहे. त्यासाठी राज्य शासन काय करीत आहे ? मी सभागृहामध्ये अनेक वेळा सहकार क्षेत्रातील भ्रष्टाचाराबाबत बोललो. मी निश्चितपणे सांगेन की, ज्यावेळी शेतक-यांच्या मालावर प्रक्रिया करणारे प्रोसेसिंग युनिट व्यवस्थित चालतील त्यावेळी ख-या अर्थाने शेतक-यांच्या शेती मालाला किफायतशीर भाव मिळू शकतील. आज महाराष्ट्रात काय परिस्थिती आहे. महाराष्ट्र राज्यात परिस्थिती वाईट आहे. सन्माननीय सदस्य श्री.कलम किशोर कदम यांनी सांगितल्याप्रमाणे साखर कारखाने असोत, सूतगिरण्या असोत किंवा प्रोसेसिंग युनिट असोत यांची परिस्थिती महाराष्ट्रात गंभीर आहे. त्यामुळे या संस्था ख-या अर्थाने शेतक-यांच्या मालाला भाव देऊ शकत नाहीत. त्यामुळे महाराष्ट्राची ही

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील .....

परिस्थिती झालेली आहे. महाराष्ट्रामध्ये 12 कारखाने असे आहेत की, अहमदनगर येथील पद्मश्री विखे-पाटील सहकारी साखर कारखान्याची 146 कोटी रुपये थकबाकी आहे. नांदेड येथील सहकारी साखर कारखान्याची 104 कोटी रुपये थकबाकी आहे. सातपुडा येथील श्री.पी.के.अण्णा पाटील सहकारी साखर कारखान्याची 99 कोटी 51 हजार रुपये थकबाकी आहे.

यानंतर कु.जयश्री.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्रीमती उषाताई दराडे) : सभागृहाची वेळ पाच वाजेपर्यंत होती. सभागृहाच्या अनुमतीने सभागृहापुढे जो प्रस्ताव आहे त्यावरील चर्चा संपेपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदया, ही आकडेवारी आपण पाहिली तर असे लक्षात येईल की, कारखान्याचे 11 कोटी रुपये आणि त्याचे बाय प्रॉडक्टस् आहेत त्यासाठी बँकेची एकूण 250 कोटी रुपये थकबाकी आहे. श्री.पी.के.अण्णा पाटील यांचा देखील कारखाना याच्यामध्ये आहे, हा पैसा कोणाचा आहे आणि या बँकेच्या बैठकीमध्ये ज्यावेळेला यासाठी आणखी 25 कोटी रुपये द्यावयाचे ठरले त्याला विरोध केला हा पैसा कोणाचा ? कारखान्याचे जे जे युनिट्स आज कर्जबाजारी आहेत आणि ते शेतक-यांच्या उत्पादनावर चालतात, ते युनिट या ठिकाणी शेतक-यांना 500 रुपयांपेक्षा जास्त भाव देऊ शकत नाहीत. सभापती महोदय, या महाराष्ट्रातील सर्व आकडेवारी देऊन मी आपला व सभागृहाचा वेळ घेत नाही. या राज्यामध्ये एकूण 188 साखर कारखाने आहेत त्यापैकी सहकारी साखर कारखाने 166 आहेत तर 22 कारखाने खाजगी आहेत. 188 कारखान्यांपैकी 21 कारखाने अवसायनात आहेत. त्यांची परिस्थिती आज काय आहे ? सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम ही संस्कृती कोणाची ? आज 100 कोटी रुपयांचे कर्ज इ ालेले कारखाने, शेतक-यांचे कारखाने कारखानदार फक्त 3 कोटी रुपयांना विकत घेत आहेत, असे जर झाले तर या राज्यामध्ये शेतक-यांना काय मिळणार आहे? त्यांना काही मिळू शकणार नाही. या परिस्थितीमध्ये मी आमच्या बँकेमार्फत 30 कारखान्यांना फायनान्स केलेले आहे. सन्माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांच्या कारखान्याला मी 10 कोटी रुपये दिले, त्यांचा आजपर्यंत एकही हप्ता चुकला नाही. म्हाडाचे श्री.बबनराव शिंदे माझ्याकडे अर्ध्या अर्ध्या टक्क्यासाठी येतात आणि म्हणतात, व्याज माफ करा, प्रोसेसिंग फी कमी करा कारण त्यांना खरोखरच व प्रामाणिकपणे कर्ज फेडावयाचे आहे. परंतु राज्यभराचा विचार केला तर आज महाराष्ट्रामध्ये काय परिस्थिती आहे? सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख हे माझ्या वडिलांपासूनचे सदस्य आहेत सांगतांनाही डोळ्यात पाणी येते की, महाराष्ट्रामध्ये या परिस्थितीमध्ये जे काही चाललेले आहे, ती लूट चाललेली आहे, ही लूट आज थांबली पाहिजे. सभापती महोदय, या ठिकाणी मी सांगेन की,सक्षम अशा पतसंस्थेवर कारवाई करा,श्री.पी.के.अण्णा पाटील सांगतात की, पतसंस्थेवर कारवाई करा परंतु ज्यांनी कारखाने लुटले

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ D यापूर्वी श्री.बोरले..... 17:00

श्री.जयंत प्र.पाटील.....

त्यांना जनतेसमोर उघडे नागडे करा व त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. हे जोपर्यंत शासन करीत नाही तोपर्यंत सहकार क्षेत्रात चांगले काम करणा-या नेत्यांकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलणार नाही. परंतु शासन हे करीत नाही म्हणून अशा नेत्यांवर अन्याय होत आहे. त्यांच्याकडे बघण्याचा लोकांचा दृष्टीकोन वेगळा होत आहे, ही परिस्थिती बदलली पाहिजे. माननीय मंत्री श्री.अनिल देशमुख आणि सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख या ठिकाणी श्री.माणिकराव ठाकरे यांचा कारखाना माननीय मंत्रिमहोदय श्री.विनय कोरे यांनी चालविण्यास घेतला आणि पहिल्याच वर्षामध्ये पाच लाख रुपयांचे उत्पादन काढले आता याच्यामध्ये काय सांगावे ?

यानंतर श्री.गागरे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील .....

हे कोडे आम्हाला कळाले नाही. ही लुट जनतेला समजली पाहिजे, तुम्ही लोकांना सांगितले पाहिजे. मी या विषयावर पोटतिडकीने बोलत आहे, मला व्यक्तिगत कोणाविषयी बोलायचे नाही. मी माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना सांगू इच्छितो की, श्री.वसंतराव नाईक व श्री.वसंतदादा पाटील यांचे आपण नाव घेता. वसंतदादा सहकारी साखर कारखान्याची काय परिस्थिती आहे ? तेथील कर्मचाऱ्यांना तीन वर्षाचा पगार मिळालेला नाही. ज्यांनी महाराष्ट्रात सहकार चळवळ उभी केली व वाढविली. सहकारी साखर कारखानदारी वाढविली. त्या वसंतदादा सहकारी साखर कारखान्यामध्ये तीन वर्षे कामगारांना पगार मिळत नाही. कारण 200 कोटीचे कर्ज आहे. पगार कसा मिळणार ? एकीकडे चांगले कारखाने झालेले आहेत ते चालतात, दुसरीकडे चालत नाहीत. हे कोडे आपल्याला उलगडले पाहिजे. याची चौकशी केली पाहिजे. निश्चितपणे वेगळा फरक आपणास जाणवेल. माझ्याकडे सर्व कारखान्यांची आकडेवारी असून मी फक्त या विषयावरच बोलणार आहे. सुतगिरणीमध्ये काही कारखाने गेले. परंतु माननीय सदस्य श्री.गणपतराव देशमुख जी सुतगिरणी चालवितात त्या सुतगिरणीस रोज 5 लाख रुपये नफा होतो. गेल्या 15 दिवसापूर्वी 12 लाख रुपये दिवसाला नफा मिळत होता परंतु सध्या आंतरराष्ट्रीय बाजारात कमी भाव असल्यामुळे दररोज 5 लाख रुपये नफा होत आहे. श्री.गणपतराव देशमुख यांना जे जमले ते कोल्हापूरला का जमत नाही ? वाळव्यामध्ये श्री.सुरेश देशमुख यांना का जमत नाही ? हे जनतेपुढे आणा व सांगा की, हा फरक का आहे ? हा फरक आपण सांगितला तर निश्चितपणे भाव मिळू शकतो. मी माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, श्री.गणपतराव देशमुख यांची सुतगिरणी अकोला किंवा बीड येथून कापूस खरेदी करते. स्वत: कापूस घेऊन शेतकऱ्यांना वजन-काटयावरच 2600 रुपये रोख भाव देतात. बाकीच्या सुतगिरण्यांची लाईट बीलेसुध्दा आपल्याला भरता येत नाही ही परिस्थिती आहे. शेतकरी कसा वर येईल ? या सुतगिरण्या व साखर कारखाने कोणाच्या पैशावर उभ्या राहिल्या आहेत हे पाहिले तर असे लक्षात येईल की, त्या सरकारी शेअर भांडवलावर उभ्या राहिल्या आहेत. 20 ते 50 टक्के शेअर भांडवल या सभागृहाने व सरकारने दिलेले आहे. परंतु त्याची परिस्थिती आज भयानक आहे. माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना मी सांगू इच्छितो की, मी हे सर्व जवळून बघितले आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/

श्री.जयंत प्र.पाटील .....

तुम्हाला ही संधी मिळाली नाही. कारण तुमच्या वडीलांबरोबर मी शेतकऱ्यांच्या मालाला किफायतशीर भाव मागणीच्या लढयामध्ये भाग घेतलेला आहे. मी ज्यावेळी तासगावला आलो तेव्हा लहान होतो. त्यावेळी शेतकऱ्यांच्या मालाला हमीभावापेक्षा जास्त भाव मिळाला पाहीजे यासाठी आम्ही फिरलो. शेगावपासून नागपूरपर्यंत आम्ही त्यांच्याबरोबर दिंडीमध्ये चालत आलो. परंतु परिस्थिती काही बदलली नाही. नंतर वेगळे चित्र झाले. मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, या गोष्टीचा विचार करताना अजून एक विचार आपण करु शकतो. वैद्यनाथ कमिटीने 15 हजार कोटी रुपयांची मदत सोसायटया सक्षम बनविण्यासाठी केलेली आहे. या ठिकाणी आपण कर्जमाफी घेऊ शकतो. हया रकमेपैकी सोसायटया व बँकांना सध्या प्रत्यक्ष पैसे मिळालेले आहेत. म्हणून मी माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी यांना सांगितले आहे की, याबाबतचे मुद्दे घेऊन तुम्ही या विषयावर सविस्तर बोला. कारण तुम्ही विस्तृतपणे व व्यवस्थित मांडू शकता. वैद्यनाथ कमिटीची मदत सोसायटी लेवलवर मिळाली आहे. त्यांना एकच ठराव करायचा आहे की, या मदतीतून तुम्ही शेतकऱ्यांना सात-बारा उतारा निरंक करा म्हणजे 50 टक्के कर्जमाफी अशा प्रकारे होईल. हा मुद्दा बरोबर आहे की नाही याबाबत मी चर्चा केली असता समजले की, ही कल्पना चांगली आहे. वैद्यनाथ कमिटीचे पैसे आले तरी आमच्या बँकेचा 100 टक्के वसूली करण्याचा संकल्प आहे. या महिन्यामध्ये साडेचार कोटी रुपये आमच्या बँकेला मिळणार आहेत. मी शेतकऱ्यांच्या सात-बारा उताऱ्यावरील बोजा निरंक करणार आहे. मंत्री महोदयांनी त्याचा विचार केला पाहिजे. वैद्यनाथ कमिटीप्रमाणे शासनाने केंद्र शासनाकडे जाऊन मदत घ्यावी. राज्याला जास्त रक्कम खर्च करण्याची गरज नाही. मी माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम यांना सांगू इच्छितो की, आपणास याचे राजकीय भांडवल करायचे नाही. प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या पदरात काय देता येईल, त्यासाठी आपणास काही करावयाचे आहे ?. म्हणून वैद्यनाथ कमिटीने ज्या शिफारशी केलेल्या आहेत. त्या शिफारशी आपल्याला कशा लागू होतील, शिफारसी लागू करताना सोसायटीला व बँकेला फायदा होण्यापेक्षा प्रत्यक्ष शेतकऱ्याला कसा फायदा होईल हे बघण्याचे काम तुम्ही आम्ही केले पाहिजे.

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

यानंतर कु.धनश्री.....

अशुद्ध मुद्रित प्रत / शीघ्रलेखी टिप्पणी नाही

DVG/ प्रथम श्री. गागरे.. 17:10

श्री. जयंत प्र. पाटील.....

या ठिकाणी बोलण्यासाठी वेळ अपूरा आहे, त्यामुळे मी मुद्दयांची पुनरावर्ती करणार नाही. जे प्रोसेसिंग युनिट आहे, ते कार्यक्षम कसे होतील, त्यांना आर्थिक मदत कशी मिळेल याचा आपण विचार केला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. कमलकिशोर कदम यांनी आताच सांगितले त्याप्रमाणे सरकारी कर्मचाऱ्यांना आपण सांगू की,या वर्षी तुम्हाला वेतन वाढ दिली जाणार नाही किंवा एक महिन्याचा पगार तुम्ही आम्हास द्या. त्याप्रमाणे कर्मचाऱ्यांच्या युनियनशी चर्चा करु. निश्चितच या ठिकाणी यामुळे काहीतरी फरक पडेल. म्हणूनच सभापती महोदय, शेतकऱ्यांना केवळ कर्जमाफी देऊन हा प्रश्न सुटणार नाही. यापूर्वी दोन वेळा शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात आली होती. एकदा श्री. अंतुले यांचे सरकार असताना व दुसऱ्यांदा श्री. मधुकर दंडवते यांचे सरकार असताना शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात आली होती. आता तिसऱ्यांदा शेतकऱ्यांकरिता कर्जमाफी मागण्यात येत आहे. यानंतर पुन्हा दोन वर्षांनी किंवा चार वर्षांनी शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी मागण्याची वेळ येईल. आपण जोपर्यंत शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव देण्याची यंत्रणा राज्यामध्ये उभी करत नाही तोपर्यंत या ठिकाणी चर्चा करुन काही उपयोग होणार नाही. म्हणून आपण यासंदर्भात ठोस असा कार्यक्रम, नियोजनबध्द कार्यक्रम तयार केला पाहिजे. आणखी एक शेवटचा मुद्दा मांडून मी माझे भाषण संपविणार आहे.

अकरा वर्षांनी 27 कारखान्यांना पैसे दिले, अकरा वर्षानंतर त्या कारखान्यांना मंजुरी दिली. त्यासाठी सरकारने 150 कोटी रुपये दिले. एका - एका कारखान्याला 20-20 कोटी रुपये कर्ज दिले. यामुळे हे कारखाने व्हाएबल होणार आहेत काय ? 40 कोटी रुपयाचा कारखाना उभा राहू शकतो . माननीय श्री. जयप्रकाश दांडेगावकर आपण काय बघत आहात ? सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर पाटील यांच्या कारखान्याकरिता 40 कोटी रुपयाचा खर्च करण्यात आला. माननीय श्री. हर्षवर्धन पाटील यांच्या कारखान्याकरिता 20 कोटी रुपयाचा खर्च, माननीय श्रीमती सुर्यकांता पाटील यांच्या कारखान्याकरिता 80 कोटी रुपयांचा खर्च करण्यात आाल. तोच कारखाना तीच एजन्सी आणि तोच भाग याविषयी मला तरी या पंधरा वर्षामध्ये कधीही कळले नाही आणि यापुढेही कळेल असे मला वाटत नाही. ही तफावत कशी आहे, ती

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ 17:10

श्री. जयंत प्र. पाटील.....

तफावत कोणी बंद करणार आहे की नाही ? हा मूळ मुद्दा आहे. ही तफावत दूर करण्याचे काम आपण केले पाहिजे. महाराष्ट्रातील शेतकरी सरकारकडे आज वेगळया नजरेने बघत आहे. तो एका अपेक्षेने शासनाकडे बघत आहे. शासनाने विदर्भातील शेतकऱ्यांना कर्ज माफी द्यावी. पुन्हा शेतकरी कर्जबाजारी होणार नाही यासाठी या अधिवेशनामध्ये शासन काय करणार आहे हे येथे आजच्या चर्चेच्या निमित्ताने आम्हाला आणि महाराष्ट्रातील जनतेला हे कळले पाहिजे. विशेषत: विदर्भातील शेतकरी या अधिवेशनाकडे अपेक्षेने बघत आहे. मी माननीय उपमुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, या चर्चेवरील उत्तर आपण आज दिले नाही तरी उद्या किंवा परवा दिले तरी आमची काही हरकत नाही. परंतु मंत्रीमंडळाने सामुदायिकपणे मिळून यासंदर्भात निर्णय घ्यावा. आम्ही ज्या वेळी आमच्य मतदारसंघात, आमच्या जिल्हयात परत जाऊ, त्यावेळी सांगू शकू की, शासनाकडून आम्ही तुमच्यासाठी काही तरी मिळवून आणले आहे. या निर्णयामुळे शेतकरी पुन्हा कर्जबाजारी होणार नाही याची काळजी हे शासन कसे घेणार आहे, त्यासंबंधी कोणता कार्यक्रम आखणार आहे याची माहिती आम्हाला देण्यात यावी. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

यानंतर श्री. सुंबरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरूण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या प्रस्तावाच्या संदर्भात माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. आज देखील या महाराष्ट्रा 66 टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत आणि या 66 टक्के लोकांसाठी केवळ कृषी खात्याचे बजेट पाहिले तर ते 200-250 कोटीपेक्षा जास्त नाही. म्हणून मध्यंतरी अशाच एका चर्चेमध्ये बोलताना मी म्हटले होते की, कृषी खात्यासाठी वेगळा अर्थसंकल्प करू या. कृषी खात्यासाठी मला माहिती आहे की, पाटबंधारे खात्याची काही रक्कम आहे आणि ती त्यात मिळावी आणि विजेच्या बाबतीतील देखील रक्कम मिळावी. परंतु नेमका किती निधी कृषी खात्यासाठी उपलब्ध होतो आहे ते जनतेलाही कळले पाहिजे. 66 टक्के लोकांसाठी कृषी खात्याला विजेचा आणि पाटबंधाऱ्यासाठीचा किती निधी मिळतो हे शेतकऱ्याला समजले पाहिजे. कारण आज शेतकऱ्याला भांडवलाची भूक आहे, पाण्याची तहान आहे आणि विजेची गरज आहे. पण त्याला भांडवलदेखील मिळत नाही म्हणून 80 हजार कोटी रूपयांचे कर्ज देशात देण्यात येते. त्यासाठी 1 लाख 60 हजार कोटी रूपये देण्याचा निर्णय झाला आणि या वर्षाला 200 लाख कोटी रूपयांचे कर्ज शेतकऱ्यांना देण्यात येईल. परंतु हे दिल्यानंतरही काय परिस्थिती राहील याचा विचार झाला पाहिजे. सभापती महोदय, महाराष्ट्राच्या शासनाचे मी अभिनंदन करीन की, केंद्र सरकारने व्याजाच्या संदर्भात 7 टक्क्यांचा निर्णय घेतल्यानंतर आपण देखील 6 टक्के देण्याचा निर्णय घेतला आणि जे शेतकरी वेळेवर कर्ज फेड करीतील त्यांना 2 टक्के पर्यंत सूट दिली जाणार आहे. म्हणजे 4 टक्के पर्यंत आपण आलात. या संदर्भात चीनचा विचार केला तर तेथे शून्य टक्के व्याज आहे. म्हणजे शेतकऱ्यांना त्यांनी घेतलेल्या कर्जावर व्याज द्यावे लागत नाही. मी म्हणतो की, याच पद्धतीने जाण्याच्या दृष्टीने आपण नियोजन करा. अगदी आता नाही पण पुढील 4-5 वर्षामध्ये टप्प्याटप्प्याने प्रथमत: 4 टक्के, नंतरच्या वर्षी 3 टक्के याप्रमाणे दर कमी करून 5 वर्षामध्ये अशी परिस्थती महाराष्ट्रात आणा की, महाराष्ट्रातील शेतकऱ्याला कर्जावर व्याज द्यावे लागणार नाही. या प्रमाणे नियोजन करणे अत्यावश्यक आहे.

सभापती महोदय, त्यानंतर मला आणखी 10-15 मुद्दे येथे मांडावयाचे आहेत. त्यामध्ये मला बियाणांपासून सुरूवात करावी लागेल. आज देखील बोगस बियाणे मोठ्या प्रमाणात विकली जात आहेत. त्या बाबतीत कडक असा अधिनियम पाहिजे होता. पण तो केंद्र सरकारच्या माध्यमातून किंवा राज्य सरकारच्या माध्यमातून तो कायदा आपण अजून देखील करू शकलो नाही. त्यामुळे बोगस बियाणे दिले गेले तर त्या शेतकऱ्याची आत्महत्या झालीच म्हणून समजा. म्हणून या बाबतीत देखील शासनाने लक्ष दिले पाहिजे. ..... 3व्ही 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुजराथी ....

त्यानंतर खतांबाबत मी सांगेन. आजची परिस्थिती अशी आहे की, 95 टक्के रासायनिक खते वापरली जातात, नैसर्किक खते उपलब्धच नाहीत. परिणामत: ही रसायनिक खते वापरून वापरून शेवटी अशी परिस्थिती येते की, त्या जमिनीची उत्पादनक्षमता ही कमी कमी होत जाते. आज पंजाब आणि उत्तरेकडील राज्यांमध्ये सेंद्रीय खतांच्या वापरामुळे उत्पादन क्षमता कमी झाली आहे, तेथील गव्हाचे देखील पीक कमी झाले आहे. तेव्हा खतांचा योग्य पुरवठा, ज्यावेळेस पाहिजे तेव्हा पुरवठा झाला पाहिजे. त्याचबरोर नैसर्गिक खते कशी शेतकऱ्याला उपलब्ध होतील याचाही विचार करणे अत्यंत गरजेचे आहे.

सभापती महोदय, माझा पुढील मुद्दा हा अनुदानासंबंधातील आहे. आज इतर देशांमध्ये 26 ते 54 टक्के अनुदान शेतकऱ्याला मिळते. 100 रूपयांचा माल 122 रूपयाला अनुदानामध्ये विकला जाते. भरतामध्ये मात्र हे अनुदान केवळ 14 रूपये आणि काही पैसे आहे. याचा देखील आपल्याला विचार करावा लागेल. सभापती महोदय, आज शेतीचे क्षेत्रदेखील कमी होत आहे. याबाबतची आकडेवारी काही मी देत नाही. मात्र 80 टक्के शेतकऱ्याकडे आज 2 टक्के पेक्षा जास्त क्षेत्र नाही. त्यामुळे मग तो तेथे मशिनरीचा वापर कशा प्रकारे करू शकेल याचाही विचार आपण केला पाहिजे. म्हणून याची दखील पुढील काळात आपल्याला घ्यावी लागेल.

सभापती महोदय, या सदनातील एकही सदस्य असे म्हणणार नाही की, शेतकऱ्यांना कर्ज माफी देऊ नका. परंतु ती दिल्यानंतर पुढील काळामध्ये तो शेतकरी पुन्हा कर्जबाजारी होणार नाही, त्याचा 7-12 कोरा राहील याची दक्षता शासनाला घ्यावी लागेल. आम्ही आज कर्जमाफी करतो असे म्हटल्यावर टेबले बडविली जातील पण ती केवळ मलमपट्टी होणार आहे. तो काही कायम स्वरूपी उपाय नव्हे. तेव्हा ज्याची इच्छा आहे की मी माझे कर्ज फेडीन तर त्याला त्याबद्दल प्रोत्साहन दिले पाहिजे पण ज्याकडे कर्ज फेड करण्याची शक्तीच नाही त्यांनाच केवळ आपण कर्ज माफी द्यावी. आपण 16 हजार केटी रूपये यासाठी दिले तर त्यातील माझ्या माहितीप्रमाणे 4 हजार कोटी रूपये महाराष्ट्रातील सहकारी विकास संस्थांना मिळणार आहेत. ..

(यानंतर श्री. सरफरे .... 3W 1 ..

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी...

हा पैसा मिळत असतांना तो शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार नाही. विकास संस्थांची परिस्थिती सुधारली पाहिजे, याकरिता थकबाकीची रक्कम त्यांना मिळाली पाहिजे. परंतु जो शेतकरी कर्जबाजारी आहे त्यालाही त्याचा फायदा मिळेल यासाठी आपल्याला काही करता येईल काय? याचा विचार केला पाहिजे. आपण ही रक्कम शेतकऱ्याच्या खात्यावर जमा केली तर कर्जमाफीच्या संदर्भात फार मोठया प्रमाणात त्याचा उपयोग होऊ शकेल.

सभापती महोदय, पीक विमा योजनेच्या संदर्भात सांगावयाचे झाले तर आजपर्यंत या देशामध्ये, राज्यामध्ये ज्या ज्या पीक विमा योजना होत्या त्या सदोष निघाल्या. पीक विमा योजना ही सुसंगत बनविली पाहिजे. कमी पाऊस पडला किंवा जास्त पाऊस पडला तरी त्याठिकाणी येणाऱ्या प्रत्येक पिकाचे नियोजन करुन त्यानुसार पीक विमा घेण्यासंदर्भात शासनाने विचार करावा. मी एका अग्रलेखामध्ये वाचले होते की, व्याजाचे दर हे पावसाच्या टक्केवारीवर अवलंबून असले पाहिजे. 100 टक्के पाऊस पडला तर 6 टक्के व्याज, 80 टक्के पाऊस पडला तर 5 टक्के व्याज, 60 टक्के पाऊस पडला तर 4 टक्के व्याज आणि 20 टक्के पाऊस पडला तर शून्य टक्के व्याज. असे अनेक ऑप्शन त्याठिकाणी मांडण्यात आले होते. कोणती योजना कशापध्दतीने उभारावयाची याचा देखील शासनाने विचार केला पाहिजे. याठिकाणी माननीय कृषि राज्यमंत्री उपस्थित आहेत. त्यांना मी विनंती करतो की, पीक विमा योजनेच्या संदर्भात आपण अभ्यास करुन ही योजना पुढे कशी नेता येईल याचा विचार केला पाहिजे. 5-25 शेतकरी एकत्र आणून आणि त्यांच्या सोसायटया करुन जोपर्यंत आपण पूरक व्यवसाय निर्माण करीत नाही तोपर्यंत शेतकऱ्याला शेती परवडणारी नाही याचाही आपण विचार केला पाहिजे. त्याचप्रमाणे जोपर्यंत नवीन तंत्रज्ञान आणि नवीन मशिनरी आपण शेतामध्ये वापरीत नाही तोपर्यंत शेती परवडणारी नाही. राज्यातील 4 कृषि विद्यापीठांमध्ये गेल्या 5-10 वर्षात शेती संदर्भात किती संशोधन झाले? ते संशोधन शेतकऱ्याच्या बांधापर्यंत पोहोचले की नाही? आपल्याला शॉर्ट डयुरेशन क्रॉप काढता येईल काय? मूगाचे पिक 60 दिवसात येते ते 25 दिवसात येईल काय? चवळीचे पिक 28 दिवसात आले पाहिजे यादृष्टीने कृषि विद्यापीठामध्ये संशोधन झाले पाहिजे. त्याचप्रमाणे राज्यामध्ये लहान कोरडवाहू शेतकरी आहेत...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>कॅबिनेट मंत्री सभागृहामध्ये उपस्थित नसल्याबद्दल हरकतीचा मुद्दा</u>

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आता सभागृहामध्ये एकही कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत. त्याकरिता आपण सभागृहाचे कामकाज 5 मिनिटाकरिता तहकूब करावे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, सभागृहामध्ये एकही कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत. आपण याबाबतीत जरा लक्ष द्यावे अशी माझी विनंती आहे...

उपसभापती : ठीक आहे, मी सभागृहाचे कामकाज 5.30 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

(5.23 ते 5.30 सभागृह स्थगित)

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ. शी. : विदर्भात गेल्या वर्षभरात 1500 च्या वर शेतकऱ्यांच्या झालेल्या आत्महत्या

मु. शी. : विदर्भात गेल्या वर्षभरात 1500 च्या वर शेतकऱ्यांच्या झालेल्या आत्महत्या याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, मधुकर चव्हाण, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री पाशा पटेल, प्रकाश शेंडगे, गोपीकिसन बाजोरिया, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. अरविंद सावंत, ॲड. अनिल परब, सर्वश्री विनोद तावडे, जगदिश गुप्ता, केशवराव मानकर, सागर मेघे, सुरेश जेथलिया, परशुराम उपरकर व संजय केळकर, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

(चर्चा पुढे सुरु)

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, कृषी विद्यापीठांचे संशोधन हे प्राधान्याने कृषी विभागासाठी, शेतकऱ्यांसाठी आणि अल्पभूधारकांसाठी असले पाहिजे. त्यासंदर्भात विचार झाला पाहिजे. आयात-निर्यात धोरण शेतकऱ्यांना कसे अनुकूल राहील यासंदर्भात चर्चा झाली पाहिजे. जीडीपीच्या संदर्भात पाहिले तर त्यामध्ये शेतीचे किती योगदान आहे हे आपण सांगू शकत नाही. ते योगदान फार कमी असल्यामुळे आपण शेतीकडे किती प्रमाणात लक्ष दिले आहे हे आपल्या लक्षात येते. या पंधरा सोळा मुद्यांचा परामर्श घेण्यासाठी मी उभा होतो. माझे मुद्दे संपलेले असल्यामुळे मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: माननीय सभापतींवरील अविश्वास ठरावाच्या संदर्भात
माननीय उपसभापतींचा निर्णय.

उपसभापती : आज सकाळी सभागृहात चर्चा चालू असताना माननीय सभापतींवरील अविश्वास ठरावाबाबत माननीय विरोधी पक्ष नेते तसेच सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी देखील तो मुद्दा उपस्थित केला होता. आताच कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली. त्या ठिकाणी देखील माननीय सभापतींच्या अनुपस्थितीमध्ये हा मुद्दा पुन्हा एकदा चर्चिला गेला आणि त्या ठिकाणी सर्वानुमते आता असे ठरलेले आहे की, या विषयी ती सगळी मंडळी पुन्हा चर्चा करणार आहेत. तोपर्यंत हा विषय या ठिकाणी चर्चेला घेणार नाहीत आणि हा ठराव प्रलंबित करण्यात आलेला आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : विदर्भात गेल्या वर्षभरात 1500 च्या वर शेतकऱ्यांच्या झालेल्या आत्महत्या

मु. शी. : विदर्भात गेल्या वर्षभरात 1500 च्या वर शेतकऱ्यांच्या झालेल्या आत्महत्या याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, मधुकर चव्हाण, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री पाशा पटेल, प्रकाश शेंडगे, गोपीकिसन बाजोरिया, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. अरविंद सावंत, ॲड. अनिल परब, सर्वश्री विनोद तावडे, जगदिश गुप्ता, केशवराव मानकर, सागर मेघे, सुरेश जेथलिया, परशुराम उपरकर व संजय केळकर, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

(चर्चा पुढे सुरु)

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, या सदनाचे माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेब आणि अन्य सर्व नेत्यांनी एका अतिशय महत्वाच्या प्रश्नाच्या संदर्भात, राज्याच्या गंभीर समस्या आणि त्यातून निर्माण झालेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या संदर्भात जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सदनातील अनेक ज्येष्ठ नेत्यांची भाषणे मी ऐकलेली आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या संदर्भात बोलत असताना सन्माननीय सदस्य डॉ. कमलकिशोर कदम साहेब यांनी कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या संदर्भात होणारा खर्च हा एक वेगळा विषय मांडण्याचा प्रयत्न केला. मी त्यासंदर्भात फारसा बोलणार नाही. परंतु त्यासंदर्भात दोन गोष्टी मी जाणीवपूर्वक मांडणार आहे. पहिली गोष्ट अशी की, कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या संदर्भातील करार राज्य शासनाने तत्कालीन युनियनच्या प्रतिनिधींबरोबर केला. सन्माननीय सदस्यांनी ज्यांचा जाणता राजा म्हणून उल्लेख केला त्या आदरणीय श्री. शरद पवार साहेबांनी मध्यस्थी करुन तो करार केला. त्यावेळी असे ठरले की, यापुढे केंद्रात जी वेतनवाढ होईल, केंद्रात जे आयोग येतील ते आयोग आपल्या राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना दिले गेले पाहिजेत. तसा करार करण्यात आला. दुर्दैवाने हे सत्य आहे की, त्याची रक्कम खूप आहे. परंतु ते आपणच लागू केले. आता पुन्हा या सदनामध्ये आपण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सांवत .....

अशा पध्दतीने सांगत आहात की, जणू काही याला विरोधी पक्षच जबाबदार आहे. ही गोष्ट निषेधार्ह आहे. सन्माननीय सदस्यांनी वेतनाची बाजू सांगितली. शासनाच्या उत्पन्नामध्ये वाढ करण्याची गरज आहे. उत्पन्न वाढ करण्यासाठी वेगळे मार्ग आहेत. शेतकऱ्यांच्या संदर्भात मी वेगळेच दोन तीन मुद्दे मांडणार आहे. सर्व सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे मांडले ते मी पुन्हा मांडणार नाही. आपल्या राज्यामध्ये पूर्वी मुंबई राज्य होते. त्यावेळी बॉम्बे ॲग्रिकल्चरल डेब्ट रिलिफ फंड निघाला. त्याचा कायदा करण्यात आला. तो कायदा आजपर्यंत अस्तित्वात आहे. त्यानंतर महाराष्ट्र डेब्ट रिलिफ फंड ॲक्ट, 1975 हा कायदा झाला. तोही कायदा अस्तित्वात आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी 15 हजार कोटी रुपयंचा उल्लेख केला.

यानंतर श्री. भोगले .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

या कायद्याची मूळ प्रत माझ्याकडे उपलब्ध आहे. Maharashtra Act No. III of 1975 The Act provide for levied from indebtness to certain farmers, rural labourers and workers अशा प्रकारचा अध्यादेश काढून नंतर त्याचे कायद्यात रुपांतर केले होते. या कायद्यानुसार शेतकऱ्यांना किती कर्जापर्यंत माफी देता येईल याबद्दलची तरतूद केलेली आहे. माझी या निमित्ताने मागणी आहे की, या कायद्यामध्ये सुधारणा करावी आणि विद्यमान कर्जाची रक्कम पाहून शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर आधारित त्यामध्ये बदल केला तर आपल्या या कायद्यानुसार सुध्दा शेतकऱ्यांना मदत करता येईल. निधी उपलब्ध आहे. सातत्याने निधी कुठून आणायचा असे सांगण्यात येते. आता कर्जमाफीची ही रक्कम 6 ते 7 हजार वरुन 13 हजार कोटी रुपयांपर्यंत गेली आहे. आघाडी सरकारने कर्ज काढले. परंतु युती सरकारचे धिंडवडे काढण्यात आले. एक गोष्ट जाणीवपूर्वक सांगू इच्छितो की, ज्यावेळी युती सरकार सत्तेवर होते आणि पूर्वीच्या सरकारने 18 हजार कोटी रुपयांचा डोंगर युती सरकारच्या डोक्यावर ठेवला होता ते कर्ज घेऊन युती सरकारने राज्य चालविले. जरुर त्या कर्जाच्या रक्कमेमध्ये वाढ केली. परंतु कर्ज कुठे वापरले हे सदृश्य दिसून येते. अशा परिस्थितीत जाणीवपूर्वक कडवट टीका विरोधी पक्षात बसणाऱ्या काँग्रेस पक्षाच्या मंडळींकडून केली जात होती. परंतु हे राज्य तुम्ही देशोधडीला लावले, बुडविले आहे. त्यावेळी आम्ही सातत्याने सांगत होतो, राज्याची प्रतिमा खराब करु नका. युती सरकारने कर्ज काढले तरी ते फेडण्याची ताकद होती म्हणून कर्ज काढले. राज्य सरकारची बाजारातील पत प्लस एएए होती. ती पत घसरली आहे. आता राज्य सरकारची बाजारात पत सुध्दा शिल्लक राहिलेली नाही. हे काय होत आहे याचा विचार सरकारने केला पाहिजे. आज तुम्हाला कळून चुकले आहे म्हणून नाईलाजास्तव सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम सामोपचाराची भाषा करीत आहेत. आपण सगळे मिळून प्रयत्न करु या असे बोलले आहेत. त्यावेळी हे का सुचले नाही? तुम्ही आमच्यावर टीका करीत होतात, ती टीका सरकारवर होत नव्हती, त्या टीकेमुळे राज्य सरकारची बाजारातील पत कमी झाली. अनेक कायदे एकत्र करण्याचे प्रयत्न चालले आहेत. इकडचा निधी तिकडे वळविण्याचा प्रयत्न चालू आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी उल्लेख केला. जिल्हयातून आपण विकासाची कामे करतो. प्रत्येक जिल्हयात आज सम्राट तयार झाले आहेत. मुळाप्रवरा सोसायटीचे 350 कोटी रुपये माफ करण्यात आले. यापूर्वी ही

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

संस्था 950 कोटी रुपये तोट्यात होती. त्या मुळाप्रवरा सोसायटीच्या निवडणुकीसाठी जो खर्च होतो तो पाहिला तर आपल्याला आश्चर्याचा धक्का बसल्याशिवाय राहणार नाही. वेगवेगळी पॅनेल निवडणुकीसाठी उभी राहतात. शेतकऱ्यांना वीज पुरवठा मुळाप्रवरा सोसायटीच्या माध्यमातून केला

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.उल्हास पवार)

जातो. त्या संस्थेवर ताबा मिळविण्यासाठी फार मोठी स्पर्धा निर्माण होते. जिल्हा बँका, साखर कारखाने, दूध संघ यांच्या निवडणुकीसाठी देखील तयार होणाऱ्या सम्राटांची, दिग्गजांची नावे देता येतील. या सम्राटांनी आज या संस्थांचे वाटोळे केले आहे. शेतकऱ्यांना नाडले आहे. पुणे जिल्हयाचे उदाहरण म्हणून सांगायचे झाले तर सहकारी दूध संघामध्ये एखादा शेतकरी कोणत्या राजकीय विचाराचा आहे हे पाहून त्या शेतकऱ्याचे दूध घ्यायचे किंवा नाही हे ठरविले जाते. साखर कारखान्यांमध्ये देखील तीच परिस्थिती आहे. वेगळया राजकीय विचाराच्या सभासद शेतकऱ्याचा ऊस स्वीकारला जात नाही. त्या त्या सम्राटांकडून शेतकऱ्यांची पिळवणूक केली जाते. तुमची कोणती संस्कृती आहे? तुमची संस्कृती शेतकऱ्यांना नाडणारी आहे, त्यांची पिळवणूक करणारी आहे. त्यांना ओलीस ठेवणारी आहे. शेतकऱ्यांना ओलीस ठेवून त्यांना राज्यकर्त्यांच्या मागे यावयास लावणारी आहे. त्याला कळते मी हतबल आहे, त्याला जाणीवपूर्वक हतबल केले जाते. वेठीस धरले जाते. मग तो तुमच्यामागे आला की काही केले तरी तुम्हाला माफ आहे. त्यामुळेच शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात.

(नंतर श्री.जुन्नरे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

सभापती महोदय, रिलीफ फंड ॲक्ट 1958 आणि 1976 मध्ये करण्यात आलेला आहे. या कायद्यामध्ये सुधारणा करुन शेतक-यांना मदत करणे आवश्यक आहे. परंतु आपण रिलीफ फंड ॲक्ट मध्ये सुधारणा करीत नाहीत. यासंदर्भात रंगनाथन समिती होती. इनकम रिस्क मॅनेजींग कमिटी 2005 मध्ये बसविण्यात आली होती. या कमिटीचे काय झाले ? या कमिटीमध्ये कुमार केतकर साहेब सुध्दा होते, रंगनाथन सुध्दा या कमिटीमध्ये आहेत. इनकम रिस्क मॅनेजमेंट कमिटी कशासाठी करण्यात आली होती? शेतक-यांना रिस्क मिळावयास पाहिजे होती. खूप पाऊस पडला तरी शेतक-यांना रिस्क आहे, कमी पाऊस पडला तरी शेतक-यांना रिस्क आहे, ओला किंवा सुका दुष्काळ पडला तरी शेतक-यांना रिस्क आहे. अशा प्रकारची परिस्थिती ओढवली तरी आपण शेतक-यांना मदत देण्याचा उल्लेख करीत असतो. खर्चाच्या आधारावर शेतक-याच्या मालालाला भाव दिला मिळणे आवश्यक आहे. पाश्चिमात्य राष्ट्रातील उदाहरण द्यावयाचे झाले तर अमेरिकेमध्ये शेतक-याला एका एकरात किती उत्पन्न निघेल, एका एकरात किती क्वींटल कपाशी होईल, एका क्वींटलला 1700 किंवा 2200 रु. भाव दिला आणि त्यातून एकरी 1 लाख रुपये उत्पन्न मिळाले आणि त्याच्या पुढील वर्षी एका एकरात कपाशिचे उत्पादन कमी झाले तर जो काही तोटा येतो, जी काही घट येते ती घट शासन शेतक-याला भरुन देत असते. पाश्चिमात्य देशात शेतक-याला एकरी जो काही तोटा होत असतो तो तोटा तेथील शासन भरुन देत असते त्यामुळेच पाश्चिमात्य देशातील शेतकरी आत्महत्या करीत नाहीत. त्यामुळे आपल्या देशातील शेतक-याचे उत्पन्न निश्चित झाले पाहिजे. आम्ही, तुम्ही नोकरदार मंडळींचे उत्पन्न हे निश्चित असते, शेतक-याचे उत्पन्न हे अनिश्चित असते. नोकरदार माणसाला माहिती असते की, महिना संपला की, आपल्याल एवढा एवढा पगार मिळणार आहे परंतु शेतक-याचे तसे नसते. शेतक-याचे उत्पन्न निश्चित नसते. शेतक-याचे उत्पन्न हे विविध गोष्टीवर अवलंबून आहे. ज्या दिवशी शेतक-याला राज्यसरकारकडून हमी मिळेल की, तुझ्या वार्षिक उत्पन्नामध्ये जर तफावत आली, उत्पन्न कमी झाले तर तो तोटा सरकार भरुन देईल अशी हमी मिळाली तर त्या दिवसापासून शेतकरी आत्महत्या करणार नाही. सभापती महोदय, या ठिकाणी संस्कृतीचा उल्लेख करण्यात आला परंतु आम्ही केवळ चार-साडेचार वर्षे राज्य केलेले आहे परंतु

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

आपण जवळ 40 वर्षे सत्ता भोगलेली आहे. संस्कृती कोणी वाढवली, कोणी रुजवली, कोणी खाल्ली हे आम्हाला माहिती आहे. सन्माननीय सदस्य श्री. गणपतराव देशमुख यांच्या साखर कारण्याला दिवसाला 5 लक्ष रुपयांचे उत्पन्न होते आणि दुस-या बाजूला तुमचे कारखाने बुडीत निघत आहेत. कारखाने आणि बँका बुडीत निघत आहेत. कारखाने आणि बँका कोणी कोणी बुडीत काढले हे आपण खाजगीत सुध्दा मान्य करता. . साखर कारखाने आणि बँका बुडीत काढणारी माणसे कोण आहेत? जे साखर कारखाने 100 कोटी रुपयांनी बुडीत निघालेले आहेत अशा कारखान्यांना आपण अजून 25-25 कोटी रुपये देत आहात. कारखाने आणि बँका बुडीत काढणारी माणसे शासनाकडे पुन्हा पुन्हा मदत मागतात. 300-400-900 कोटी रुपयांनी बुडीत असलेल्या मुळा प्रवरासाठी पुन्हा पैसे दिले जात आहे. शासन साखर कारखान्यांना जे पैसे देते ते पैसे कोठे जातात? साखर सम्राट, बँक सम्राट कसे काय उभे राहिलेले आहेत? साखर कारखान्याचे सम्राट, बँकाचे सम्राट राज्यातील शेतक-यांना वेठीस धरत आहेत. राज्यामध्ये शेतकरी वेठबिगार आहे. त्यामुळे या सत्ताधीश मंडळींचे आपण काही करणार आहात की, नाही? शेतक-यांना मदत करण्यासाठी, त्यांना कर्जमुक्त करण्यासाठी सरकारकडे पैसे नाहीत असे चित्र शासनाने निर्माण करु नये. सरकारकडे पैसे नाहीत अशी स्थिती नसून या सरकारकडे शेतक-यांना मदत करण्याची मानसिकताच नाही हा महत्वाचा भाग आहे आणि हेच आमचे दुर्दैव आहे. खरे म्हणजे, आपण जे चित्र निर्माण करीत आहेत त्यामुळे "राजा भिकारी माझी टोपी घेतली" अशी परिस्थिती आहे. आपणच सांगत आहात की, आम्ही भिकारी आहात म्हणून, परंतु राज्यकर्त्यांना असे करता येणार नाही.

सभापती महोदय, मला अजून एक गोष्ट नमूद करावयाची आहे की, मागच्या निवडणूकीत 7/12 चा ऊतारा कोरा करण्यात येईल परंतु शेतक-यांचा ऊतारा आपण कोरा केला नाही परंतु आम्ही आता शेतक-यांचा ऊतारा कोरा करु अशी अशी मागणी करणार आहोत. आपण सुध्दा तशाच प्रकारची घोषणा कराल परंतु करणार मात्र काही नाही. कारण तुम्ही मतासाठी काहीही करण्यास कमी करीत नाहीत. मागील निवडणूकीत शेतक-यांचे वीज बील आम्ही माफ करु अशी घोषणा केली होती परंतु आपण सुध्दा तशाच प्रकारची घोषणा केली आणि निवडून आल्यानंतर

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

दोन तीन महिन्यातच शेतक-यांना वीज बील दिले गेले. महाराष्ट्रातील शेतक-याला तुमची मानसिकता काय आहे हे माहिती आहे. महाराष्ट्रातील शेतक-याचा तुमच्यावर विश्वास राहिलेला नाही. पंतप्रधान महाराष्ट्रात येऊन शेतक-यांसाठी त्यांनी पॅकेज दिले होते परंतु ते पॅकेज देऊन सुध्दा शेतक-यांच्या आत्महत्या काही थांबल्या नाहीत. तुम्ही शेतक-यांच्या विश्वासाला पात्र ठरलेले नाहीत. त्यामुळे तुमच्यावर आता शेतक-यांचा विश्वास राहिलेला नाही. आपण विश्वासास पात्र नसल्यामुळेच आम्हाला "देता की, जाता" अशी भाषा बोलावी लागत आहे. ही भाषा कोठून आली तर तुमच्यावर विश्वास न राहिल्यामुळे आम्हाला अशी भाषा करावी लागली. शेतक-यांचा आपल्यावर विश्वास असता तर, "हे मायबाप सरकार आम्हाला काही तरी मदत करील" असे शेतक-याला वाटले असते परंतु आपण हा विश्वास ठेवला नाही. आपण असा आव आणता की, आपण सर्वांनी सोबत जाऊ या. आपण आठवून पहा, लालबहादूर शास्त्री पंतप्रधान असतांना त्यांनी "जय किसान, जय जवान" म्हटल्या बरोबर देशातील जनता एका विश्वासाने त्यांच्या मागे गेली.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत .....

रेशनवरील गहू खात राहिली, हा त्यांच्यावरील विश्वास होता. परंतु या राज्य सरकारने विश्वास गमावलेला आहे. सरकारने जनतेचा विश्वास गमावला म्हणून जनतेकडून अशाप्रकारची मागणी होत आहे.

सभापती महोदय, या संदर्भात मी एक उदाहरण देतो. हे उदाहरण ऐकल्यानंतर आपण येथून निघून जाल. कृषि परिहार, कर्माळा जिल्हा सोलापूर या संस्थेने महामहीम राष्ट्रपती व माननीय पंतप्रधान यांना एक पत्र पाठविले. त्या पत्रामध्ये त्यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी काय करता येईल याचा दहा पानी कृती आराखडा पाठविला. महामहीम राष्ट्रपती आणि माननीय पंतप्रधांनानी तो कृती आराखडा वाचल्यानंतर त्यांना तो आराखडा योग्य असल्याचे दिसून आले. तेव्हा माननीय पंतप्रधानांनी तो कृती आराखडा राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडे पाठविला. माननीय मुख्यमंत्र्यांनी तो आराखडा कृषि मंत्र्यांकडे पाठविला. कृषि मंत्र्यांनी तो आराखडा कृषि सचिवांकडे पाठविला. कृषि सचिवांनी तो उप सचिवाकडे पाठविला. उप सचिवांनी आत्महत्येचा विषय म्हणून तो आरोग्य विभागाकडे पाठविला. आरोग्य विभागाने आरोग्य संचालकांकडे पाठविला. संचालकांनी तो उप संचालकांकडे पाठविला. उपसंचालकांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्ये संदर्भातील विषय आहे म्हणून तो कृती आराखडा संबंधित संस्थेकडे पाठवून दिला. महामहीम राष्ट्रपतींनी व माननीय पंतप्रधानांनी पाठविलेल्या पत्राची अशाप्रकारे दखल घेण्यात आली. यावरून या राज्यास शेतकऱ्यांबद्दल किती कळवळा आहे हे दिसून येते.

सभापती महोदय, या निमित्ताने दोन मागण्या करीत आहे. पहिली मागणी म्हणजे सात-बाराचा उतारा कोरा करावा. आपण सात-बाराचा उतारा कोरा केल्यानंतर, शेतकऱ्यांना कर्ज मुक्त केल्यानंतर शेतकरी 100 टक्के आत्महत्या करणार नाहीत असे आपणास ठामपणे म्हणता येणार नाही. मी या निमित्ताने उल्लेख करतो की, शेती तज्ज्ञ श्री.बुधाजीराव मुळीक यांचे भाषण दोन्ही सदनाच्या सदस्यांसमोर ठेवू या. राज्य सरकारला 13 हजार कोटी रूपये कसे सहजपणे देता येतील याबाबत त्यांचे विचार ऐकू. आपण शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी रंगनाथन समिती नेमली. त्या समितीचे पुढे काय केले त्याची माहिती नाही. ती रिस्क मॅनेजमेंट आहे तर मग आपण रिस्क घेणार आहे की नाही ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत .....

माझी दुसरी मागणी अशी आहे की, आपण डेबट रिलिफ ॲक्टमध्ये सुधारणा करावी. कारण त्या ॲक्टमध्ये जी रक्कम दिलेली आहे ती 20 हजार इतकी आहे. हा कायदा फार जुना आहे. आताच्या घटकेला ती रक्कम साधारणत: 2 ते 3 लाखाच्या घरात जाईल. तेव्हा त्या रकमेमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे त्यासाठी आपल्याला कायद्यामध्ये सुधारणा करावी लागेल.

सभापती महोदय, नदीच्या गाळा संदर्भातील प्रश्न आहे. आपण रोहयोचे पैसे शिल्लक राहतात म्हणून ओरड करतो. आपल्याला रोहयोच्या माध्यमातून आपणास नदीचा गाळ साफ करता येईल. रोहयोच्या कामांमध्ये कुशल कामांचा समावेश केलेला आहे त्यामध्ये सुधारणा करून गाळ काढण्याचे काम केले आणि बंधारा बांधून पाणी थांबविता आले तर तशाप्रकारची कामे घेण्यास काही हरकत नाही. रोहयोच्या निधीवर सरकारचा डोळा आहे. तो निधी वेगळ्या पध्दतीने वापरला जात आहे.

सभापती महोदय, जाता जाता एवढेच सांगू इच्छितो की, सावकारी कायदा करण्याअगोदर ऑर्डीनन्स काढावा, शेतकऱ्यांची रिकव्हरी ताबडतोब बंद करावी. हे सर्व करीत असताना नॅशनलाईज बँकेच्या उल्लेखा बरोबर सहकारी बँका, पतपेढ्या, सरकार मान्य सावकर या सर्वांचा त्या कायद्यामध्ये उल्लेख आला पाहिजे. शेवटी एवढेच म्हणेन की, "शेतकरी जगवा आणि महाराष्ट्र जगवा. " एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

यानंतर श्री.पुरी.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गिरिष गांधी (नामनियुक्त) : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो शेतकऱ्यांच्या आत्महत्येसंबंधीचा प्रस्ताव चर्चेला आणला आहे, त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आज सकाळपासून एका अतिशय महत्वाच्या विषयावर चर्चा होत आहे. सकाळपासून मी अतिशय गंभीरतेने प्रत्येक वक्त्याला ऐकण्याचा आणि समजून घेण्याचा प्रयत्न करीत आहे. विरोधी पक्षाचे सर्वच सन्माननीय सदस्य अशा अविर्भावात बोलत आहेत की, शेतकऱ्यांच्या संदर्भातील सर्व काळजी त्यांनाच आहे व सत्ताधारी पक्षातील जे सदस्य आहेत, ते याबाबतीत उदासीन आहेत. विरोधी पक्षनेत्यांनी या विषयास अतिशय चांगली सुरुवात केली. त्यांना मी धन्यवाद देऊ इच्छितो की, त्यांनी आपल्या भाषणामध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या नावाचा उल्लेख केला. राष्ट्रपिता महात्मा गांधी असे म्हणाले होते की, "Villages are the hearts of the Nation. Hearts supplies blood to our bodies. Villages are supplying food to our Nation." महात्म्याने स्वातंत्र्यपूर्व काळात नीट शेती करण्याच्या दृष्टीकोनातून शेतक-यांसाठी आंदोलन केले होते आणि तोच वारसा या लोकांना मिळालेला आहे, हे मी याठिकाणी अतिशय नम्रपणे सांगू इच्छितो. याही गोष्टीचा मला आनंद झाला की, या विदर्भाच्या भूमीमधून सन्माननीय रावते साहेबांनी दिंडीची सुरुवात केली. त्यांनी दिंडीची सुरुवात गुरुकुंज आश्रमातून केली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जे स्वातंत्र्य लढयातील स्वातंत्र्यसेनानी होते, ते सर्वधर्मसमभाव यावर श्रध्दा ठेवणारे संत होते. त्यांनीही महत्वाचे योगदान महाराष्ट्रासाठीच नाहीतर देशासाठी दिले. त्यांनी ग्रामगिता लिहिली, त्या माध्यमातून त्यांनी ग्रामीण व्यवस्था, सामाजिक व्यवस्था, आर्थिक व्यवस्था आणि शेतकऱ्यांच्या संदर्भात जे लिहून ठेवलेले आहे, ते त्या पुस्तकात आहे. मी या सर्व पार्श्वभूमीवर विचार करीत होतो. मी पहिल्यांदाच नमूद करु इच्दितो की, मी नवीन सदस्य आहे, माझ्याकडून जर काही तांत्रिक चूक झाली तर ती मनाला लावून घेऊ नये, अशी माझी विनंती आहे. याठिकाणी सकाळी 289, 260 नियमांच्या संदर्भात संबंध घोळ चालू होता, तो आपल्याला आठवत असेल. माननीय रावते साहेबांनी अतिशय परिश्रमाने शेतकऱ्यांच्या समर्थनार्थ दिंडी काढली, त्यांचा सन्मान राखावा, शेतकऱ्यांच्या भावनांचा आदर राखावा म्हणून या सभागृहामध्ये उपस्थित असलेले सन्माननीय मंत्री महोदय, श्री.दिलीप

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गिरिष गांधी.....

वळसे-पाटील यांनी, माननीय विरोधी पक्षनेते, श्री.भाऊसाहेब फुंडकर यांनी उपस्थित केलेल्या चर्चेस आपली संमती प्रदर्शित केली व चर्चेस मंजुरी दर्शविली, असे झाले असताना काल कै.नवलकरांचे निधन झाले, त्यामुळे सभागृह स्थगित झाले. आज सकाळी विशेष बैठक बोलावून नियम 260 अन्वये चर्चा उपस्थित करण्यात आली व त्यास जे वेगळे वळण देण्याचा प्रयत्न झाला, तो माझ्यासारख्या सदस्याला काही बरोबर वाटला नाही. आपण केवळ कायद्याची गोष्ट दाखवत असाल तर अशा अनेक गोष्टी आपल्याला दाखवता येतील. माननीय रावते साहेब, मी अतिशय नम्रपणे सांगू इच्छितो की, मी या सभागृहाचा सदस्य झाल्यानंतर प्रथम ग्रंथालयात जाऊन, ज्या काळात युतीचे शासन होते, त्यामध्ये आमच्याकडून बोलणार काय बोलले व आपल्याकडून कोणती उत्तरे आली, हे सर्व वाचण्याचा व समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्या काळात शेतकऱ्याच्या संदर्भात उपस्थित झालेला मुद्दा मी मुद्दाम सांगू इच्छितो. त्यावेळी असणारे सन्माननीय सदस्य आताही कदाचित याठिकाणी असतील. त्यावेळी कांद्याच्या संदर्भात अतिशय बिकट प्रश्न महाराष्ट्रामध्ये निर्माण झाला होता. त्यावेळी नाफेडनेही अर्धी रक्कम देण्याचे कबुल केले होते. परंतु त्यावेळचे पणनमंत्री, माननीय श्री.जयप्रकाश मुंदडा यांनी याबाबतीत असमर्थता दर्शविली होती. अशाप्रकारे त्यावेळी शेतकऱ्यांच्या बाबतीत वेगळा न्याय आणि आज त्यांच्या बाबतीत काही प्रश्न निर्माण झाले तर वेगळया न्याय, हे योग्य नाही. अशाप्रकारे काही विशिष्ट पिढीच्या लोकांना दोष देण्याची मानसिकता बरोबर नाही.

नंतर श्री.रोझेकर.....

असुधारित प्रत / ऑफ दि रेकॉर्ड नाही

श्री.गिरीष गांधी.....

मला या गोष्टीचा आनंद झाला की, पुढे ही चर्चा अतिशय चांगल्याप्रकारे झाली आणि त्यातून कसा मार्ग काढता येईल, विरोधी पक्षाला श्रेय घ्यावयाचे नाही, असे विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर व ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितले, त्यांचेही मी अभिनंदन करतो. मी शेतक-याचा मुलगा आहे, स्वत: शेतकरी आहे, अतिशय नम्रपणे सांगू इच्छितो की, सन्माननीय विरोधी पक्षनेते जे म्हणाले ते सत्य आहे की, शेतकरी कर्जामध्ये जन्माला येतो, कर्जामध्ये वाढतो आणि कर्जामध्येच त्याला मृत्यू येतो. हे सर्व सांगत असतांना त्यांनी आत्महत्यांच्या संदर्भात, शेतक-यांच्या समस्यांसंदर्भात जो आढावा घेतला तो फक्त सन 2000 पासून सन 2007 पर्यन्तचा होता. असे दाखविण्याचा प्रयत्न केला की, जे काही केले त्याला जबाबदार तुम्ही आहात. असे कधीही झालेले नाही. मी शेतक-याचा मुलगा म्हणून, शेतकरी म्हणून आपल्याला सांगू इच्छितो की, प्रश्न त्यावेळीही तसेच होते, समस्या अशाच होत्या फक्त त्यावेळी शेतक-यांकडे कॅपिटल होते. ते विकले म्हणून ते जीवंत राहिले. 100 एकर जमीन असेल तर 50 एकर विकली, पुढे कोणा शेतक-याकडे जमीन विकण्यास राहिली नाही म्हणून घरात 10 गाई असतील तर 5 गाई विकल्या, दोन बैलजोडया असतील तर एक विकली आणि एक राहिलेली बैलजोडी चांगली असेल तर ती विकून विदर्भात ज्याला खाटयाबैल म्हणतात त्या बैलांची जोडी घेतली. म्हणजे त्यातूनही अडीच हजार रुपये वाचविण्याचा प्रयत्न शेतक-याने केला. ॲल्युमिनियम शिट घराला लावली असेल तर ते विकून कौलारु छप्पर घातले. सांगण्याचा माझा उद्देश हा आहे की, ज्यावेळपर्यन्त शेतक-याकडे भांडवल होते तोपर्यन्त तो ते विकत होता. कदाचित त्या काळात आत्महत्यांची टक्केवारी कमी असेल. असे असले तरी शेतक-याला आत्महत्या करावी लागणे हे देशाला काय किंवा राज्याला काय, शोभणारे नाही. या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम यांनी काही आकडेवारी येथे सांगितली. आपण सर्वांनी मिळून विचार केला पाहिजे की, निवृत्त झाल्यानंतर पेन्शनची गरज सर्वांना लागते, आपल्यालाही पेन्शन पाहिजे, आपल्याला फार मेहनत करावी लागते, आपली हाडे कमजोर होतात. शेतावर राबणारा शेतकरी 60 वर्षानंतर तरुण होतो, मजबूत होतो, असा गैरसमज आहे. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत हे आपल्या भाषणात सांगत होते की, आम्ही चार-साडेचार वर्षे सत्तेत होतो, आपण चाळीस वर्षे सत्तेत होता. परंतु, त्यात आमचा काही

...2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गिरीष गांधी.....

दोष नाही, तुम्ही प्रयत्न खूप करता, तरीही अशी केविलवाणी स्थिती आहे, ती अजूनही तशीच आहे. डोळयासमोर अशा गोष्टी ठेवून 'देता की जाता' अशा घोषणा देता. 'देता का ? हा प्रश्न जरुर विचारा पण 'जाता का ?' हा प्रश्न विचारण्याचा तुम्हाला हक्क नाही कारण तुमच्या मेहरबानीवर आम्ही आलेलो नाही आणि तुम्ही म्हटले म्हणून आम्ही जाणार नाही. लोकशाही प्रणालीमध्ये तो शेतकरी ठरविल, त्याच्यासाठी आम्ही काही करु शकलो नाही तर लोकशाही प्रमाणालीमध्ये त्याला अधिकार आहे आणि तो मान्य करण्याइतपत मोठेपणा आमच्यामध्ये आहे.

सभापती महोदय, आपणच काल-परवा या सभागृहात एक उदाहरण दिले, कशासंदर्भात दिले ते मला आता आठवत नाही. आपण असे उदाहरण दिले की, पंडित नेहरुंबरोबर इंदिरा गांधी चर्चिलना भेटण्यासाठी गेल्या होत्या. त्यावेळी इंदिरा गांधीना असे विचारले की, मी तुमच्या बापाला जेलमध्ये टाकल्यामुळे तु रागावली असशील. त्यावेळी सन्माननीय इंदिरा गांधी यांनी त्यांना उत्तर दिले की, ज्यांनी आमचा छळ केला असेल त्यांच्याविषयी द्वेष ठेवायचा नाही, असे आम्हाला बापुजींनी शिकविले आहे.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गिरीष गांधी .....

तत्वज्ञान सांगण्याचा सर्व ठेका तुमच्याकडेच आहे, हे तुम्ही आम्हाला वारंवार सांगत आहात. मुद्दा असा आहे की, शेतक-यांच्या आत्महत्यांच्या संदर्भात तुम्ही ते प्रयत्न करीत आहात. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांचे मी अभिनंदन करतो. त्यांनी अतिशय कष्ट घेतलेले आहेत. जे कोणी यासंदर्भात प्रामाणिक प्रयत्न करीत असतील त्या सर्वांचे मी स्वागत करतो. आमच्याकडून ज्या चुका झाल्या असतील त्या आम्ही पडताळून पाहिल्या पाहिजेत. प्रशासनातील काही दोष असतील मग ते प्रशासन तुमच्या कारकिर्दीतील असो किंवा आमच्या कारकिर्दीतील असो. नोकरीशाही ही नोकरशाहीच असते, हे एकाच बाबतीत नाही तर अनेक बाबतीत आपल्याला अशी उदाहरणे देता येतील. माझी आग्रहाची विनंती आहे की, हा गंभीर विषय आहे. तुमच्या आमच्या संवेदना प्रामाणिकपणे त्यांच्या बरोबर असतील याचा विचार वेगवेगळ्या पातळीवर व्हावयास पाहिजे. ज्यावेळी एखादा प्रश्न आपण पक्षीय पातळीवर किंवा श्रेय लाटण्याच्या प्रयत्नाने घेत असतो त्यावेळी त्यातील गांभीर्य निघून जाते. आमच्या पैकी कोणालाही असे वाटणार नाही की, शेतक-यांचे कर्ज माफ होऊ नये. या विषयासंदर्भात तुमच्या भावना जेवढया तीव्र आहेत तेवढयाच आमच्या भावना देखील तीव्र आहेत. कदाचित तुम्ही जेवढया आक्रमकतेने बोलता, तसे आम्ही शिकलो नसेल. तुमच्या त्या शाळेमध्ये येण्याची आम्हाला संधी मिळाली नाही किंवा तुमच्या त्या शाळेमध्ये येण्याची आमची इच्छाही झाली नाही. पण ती आक्रमकता न स्वीकारताही जे जे काही शक्य होते, केवळ तुम्हीच शेतक-यांचा पुळका आणणारे आहात असे नाही. तुम्हालाच शेतक-यांविषयी प्रेम आहे, असे कृपा करुन समजू नका. शेतक-यांविषयी आमच्याही भावना तुमच्या सारख्याच आहेत एवढेच मी सांगतो आणि कर्ज मुक्तीच्या ठरावाला माझ्या पक्षाच्यावतीने अनुमोदन देतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर इतके चांगले बोलल्यानंतर आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी इतके उत्कृष्ट विवेचन केल्यानंतर बोलण्याची आवश्यकता नाही. सन्माननीय सदस्य श्री.कलम किशोर कदम आणि सन्माननीय सदस्य श्री.गिरीष गांधी यांच्याबद्दल माझ्या मनात अतिशय आदर आहे. सन्माननीय सदस्य श्री.कमल किशोर कदम यांनी धारिष्ट्याने बोलण्याची हिंमत केली त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. मी फक्त दोन-तीन मिनीट बोलणार आहे. 80 टक्के रक्कम पगारावर खर्च होते असे त्यांनी सांगितले. माझे आपल्याला आवाहन आहे. तुम्ही सत्ताधारी पक्षाचे सदस्य आहात. यासंबंधी आपण एक सर्वंकष प्रस्ताव आणा की, आपण राज्यात पैसे कसे वाचवू शकतो आणि ते पैसे वाचून आपण शेतक-यांना कसे कर्ज मुक्त करु शकतो. राज्याला कसे लुटले जाते याचे मी तुम्हाला एक उदाहरण देतो आणि दोन-तीन मिनिटात माझे बोलणे संपवितो. तुम्ही सांगितले की, नोटा छापता काय ? आता तुम्ही गांधीवादाची भाषा केली. मी कोणाचाही द्वेष करीत नाही. महात्मा गांधींनी लोकांना फसवावे असे शिकविलेले नाही. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी जनतेला मोफत वीज देतो असे सांगितले होते. श्री.कमल किशोर कदम साहेब त्यावेळी तुम्ही नोटा घरी छापणार होतात काय ? महात्मा गांधींनी लोकांना उल्लू बनवून मते घेण्यास शिकविले काय ? त्यामुळे तुम्ही महात्मा गांधींची तेवढीच शिकवण लक्षात ठेऊ नका, सर्वच शिकवण लक्षात ठेवा. आमच्या शाळेत आल्यानंतर तुम्ही अजून हुशार व्हाल आणि तुम्ही हेच बोलाल, असे मला सांगावयाचे आहे. सभापती महोदय, पैशांची भाषा करण्यात आली. मी अतिशय प्रामाणिकपणे बोलतो. मी सुध्दा सुदैवाने एका कॉलेजचा चेअरमन आहे. आम्ही कॉलेजच्या प्राध्यापकांना 30-32 हजार रुपये पगार द्यायला लावतो. मला हे मान्य आहे की, संबंधीत माणूस त्या ठिकाणी अतिशय लूट करतो. मुंबईमध्ये शंकर विलास हॉटेल होती. सकाळी चार वाजता तो मुलगा चहाच्या कपबशा विसळण्यासाठी उठायचा. रात्री 12 वाजेपर्यंत काम करुन त्याला दोन वेळचे जेवण देऊन 15 ते 20 रुपये पगार मिळायचा. आज शिक्षक 32 हजार रुपये पगार का मागतो ? कारण तुम्ही ॲडमिशनसाठी 10 लाख रुपये घेता आणि रिसीट देत नाहीत. त्याला सांगायला कारण आहे की, तुम्ही ॲडमिशनसाठी एवढे पैसे घेता मग आम्हाला का देत नाहीत ?

.3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ प्रथम श्री.रोझेकर 18:05

श्री.मधुकर चव्हाण .....

तुम्ही ॲडमिशनसाठी पैसे घेणे बंद करा. मग तो पैसे कमी मागेल. पैसे कसे वाचवता येतील याचे मी एक उदाहरण सांगतो. सभापती महोदय, सभागृहामध्ये काल 5 हजार कोटी रुपयांची सप्लीमेंटरी डिमांड मांडण्यात आल्या. तुम्हाला राज्यही चालवता येत नाही. तुम्ही 5 हजार कोटी रुपयांची सप्लीमेंटरी डिमांड मांडता आणि त्या सप्लीमेंटरी डिमांडमध्ये शेतीसाठी लागणा-या अवजारांसाठी केवळ 52 हजार कोटी रुपयांची तरतूद करता.

यानंतर कु.जयश्री.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

आपण ते उद्या चर्चेच्या वेळी बोलू. आम्ही शहरात आलेले लोक असलो तरी आमची देखील कोकणामध्ये अर्धा-एक एकर भातशेती आहे. तुम्ही लोकांना किती फसविता ? येथे आपण आश्वासन दिले की, आम्ही नुकसान भरपाई देऊ. दिलीत ? आपल्याला महात्मा गांधींनी असत्य बोलावयाला शिकविल का ? चुकीची आश्वासन द्यायला शिकविलं का ? "गिरे तो भी टांग उपर" असे शिकविले का ? असे असत्य बोलून तुम्ही लोकांना का फसविता ? तुम्ही नोटा घरी छापणार होता का ? यासंदर्भातील माजी मुख्यमंत्री, श्री.सुशीलकुमार शिंदे यांचे भाषण मी आणलेले आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, सर्वांनी एकत्र बसून विचार करु व त्यातून मार्ग काढू. "नवा काळ" या वृत्तपत्रामध्ये याविषयी दिवंगत विधानपरिषद सदस्य श्री.प्रमोद नवलकर यांनी लिहिलेले सर्व मी वाचून दाखवित नाही. आपण या शासनाला संवेदनशील असे संबोधता, परंतु या ठिकाणी विरोधी पक्षाच्या आमदारांनी केलेल्या सूचनांना, विधायक सूचनांना त्या ठिकाणी कधीही पाठिंबा दिला नाहीत. तुम्ही माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतदादा पाटील यांचे उदाहरण दिले. त्याच स्वर्गीय वसंतदादा पाटील यांचे मी एक उदाहरण देतो. त्यावेळी श्री.द.म.सुखटणकर हे मुंबई महानगरपालिकेचे कमिशनर होते. एक गोष्ट त्यांनी आठवण म्हणून सांगितली. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर ज्यावेळी आय.ए.एस.ऑफिसर्सबरोबर ते चर्चा करीत होते त्यावेळी त्यांनी सांगितले की, तुम्ही बैठकीत काय बोलत होतात, हे मला कळत आहे. मी शेतक-यांच्या हितासाठी ज्या सूचना केल्या त्या सूचना जर आपल्या चौकटीत बसत नसतील तर तुमची चौकट मोठी करा आणि मी सांगितलेल्या सूचनांवर अंमल करा. अशी तुमची हिम्मत आहे, चौकट मोठी करा सांगण्याची ? आणि तुम्ही संवेदनशीलतेची भाषा करत आहात. यासंबंधी कै.प्रमोद नवलकर यांनी सुंदर म्हटलेले आहे. कामकाजाच्या संबंधी आपण विरोधी पक्षाच्या सदस्यांची कधी दखल घेता ? या सगळयांची उदाहरणे लोकसभेमध्ये देखील दिलेली आढळून येतील. त्यांनी असे म्हटले आहे की, सर्वोच्च आणि सार्वभौम असणा-या या सभागृहाच्या संवेदना आता नष्ट झाल्या आहेत आणि आता विधीमंडळाच्या सत्राची कोमात गेल्याप्रमाणे परिस्थिती निर्माण झालेली आहे. म्हणजे तेथे आता चांगले निर्णय घेतले जात नाहीत आणि चांगले निर्णय घेतले गेले तर त्यांची अंमलबजावणी होत नाही आणि अशा निर्णयांची अंमलबजावणी झाली तर सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुखांसारख्या

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

अन्य जागरुक सदस्यांशिवाय कोणीही त्याची झाडाझडती घेत नाही. म्हणून विधीमंडळाचे होणारे सत्र आता फक्त एक उपचार उरलेला आहे आणि आपण म्हणता की, पैसे छापावयाचे कसे ? आपण पैसे कसे लुटले याचे आणखी एक उदाहरण मी या ठिकाणी सांगतो.छोटया लुटवणुकीपासून ते मोठया लुटवणुकीपर्यंत होणारी लुबाडणूक थांबवा. आपण राज्याला अनेक प्रकारे लूटत आहात परंतु राज्यातील शेतक-यांच्या कर्जमाफीसाठी आपण 13,000 कोटी रुपयांची तरतूद करु शकत नाही. परवा मी पाहिले की, एका ठिकाणी माननीय मंत्री श्री अजितदादा पवार यांच्या विभागामध्ये सगळयात जास्त पैसे 1100 कोटी रुपये कसे अडकविले ? गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळामध्ये अंदाजपत्रक तयार करतांना 11 व्या बंधा-याचे काम 200 ते 300 कोटी रुपयांपर्यंत होते, याप्रकरणी माननीय मुख्यमंत्र्यांनी स्क्रुटिनी करुन संबंधितांवर ॲक्शन होणे सहज शक्य होते परंतु तसे झाले नाही. यावरुन असे दिसून येते की, आपले शासन खरोखरच संवेदनाहीन झालेले आहे. यासारखे आणखी एक उदाहरण देऊन त्यातून पैसा वाचवून शेतक-यांना कसे वाचविता येईल याचा उपायही मी सांगणार आहे आणि माझे भाषण मी दोन ते तीन मिनिटांमध्ये संपविणार आहे. अपेक्षित नसतांना देखील गोदावरी खो-याचा 11 वा बंधारा बांधण्यासाठी 1,000 कोटी रुपयापर्यंत कंत्राट वाढविले कारण यामध्ये 5-7 किलोमीटर खोलीवर कठीण खडक आढळला असूनही तो 15 ते 18 किलोमीटर अंतरावर आढळला असे सांगून 300 कोटी रुपये दिले. अशा प्रकारे तुम्ही लुटत आहात. यामधून ज्या नोटा तुम्ही छापत आहात त्या तुमच्या घरामध्ये पसरविण्यासाठी छापत आहात. 7.12 टी.एम.सी.पाण्यासाठी 140 कोटी रुपये लागले आणि 7.3 टी.एम.सी.पाण्यासाठी 11 व्या बंधा-यासाठी 200 कोटी रुपये लागणार होते परंतु नातेवाईकांना त्याचे कंत्राट देण्यासाठी रिव्हाईज्ड एस्टिमेट केले आणि त्याचे काम थांबविण्यात आले आणि त्यासाठी एकूण 1000 कोटी रुपये देण्यात आले. अशा प्रकारे जनतेचे पैसे आपण वाचवित आहात. तेलगीने खाल्ले ते वाचविले का तुम्ही ? हे केवळ व्यक्तिगत पातळीवर बोलत नसून या विषयावर वेगळी चर्चा व्हावयाला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम यांच्या धारिष्टयाचे मी यासंदर्भात कौतुक करु इच्छितो की, ते सभागृहात कमी बोलतात परंतु कधी कधी आम्हाला टाचणी लावून बोलतात पण योग्य बोलतात.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कमलकिशोर कदम : सभापती महोदय, यासंदर्भात माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण सारखे मला उद्देशून बोलत आहेत. त्यांना जी काही आकडेवारी द्यावयाची आहे किंवा जे काही बोलावयाचे आहे ते माननीय सभापतींना उद्देशून बोलावे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, बाण योग्य ठिकाणी लागलेला आहे. या ठिकाणी मी ज्या काही गोष्टी करीत आहे त्या सर्व हे सरकार कसे कसे आणि कोठे कोठे पैसे वाचवू शकते यासंबंधी सांगत आहे. गेली चार वर्षे शेतक-यांच्या आत्महत्येविषयी सभागृहात सन्माननीय सदस्य बोलतात. परंतु आम्हाला मान्य आहे "We are worried." हेही सत्य कोणीतरी एकदा सांगावयालाच पाहिजे. आम्ही सुध्दा मुंबई महानगरपालिकेमध्ये काम केलेले आहे म्हणून आम्हालाही कल्पना आहे की, मुंबई महानगरपालिकेमध्ये मुंबई शहराच्या नागरिकांच्या सुखसोईंवर जो खर्च होतो तो खर्च कमी होतो "Unfortunately it is universal truth."

यानंतर श्री.गागरे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण .....

सभापती महोदय, कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता का द्यावा लागतो ? कारण भरमसाठ बाजारभाव वाढविले आहेत. देशात महागाईचा किती सुकाळ झालेला आहे ?. सेन्सेक्स कसा वाढला आहे ? सरकार परदेशी लोकांना इन्व्हेस्टमेंट करायला परवानगी देत आहे. सरकारी कर्मचाऱ्याला दुधाची बाटली 2 वर्षापूर्वी 2 रुपयाला मिळत होती आता 20 रुपयाला मिळत आहे. गोडतेल महाग झालेले आहे. भारतात पुन्हा एकदा चांगली विधेयके आणा, याचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. हे मी अतिशय चांगल्या शब्दात सांगत आहे. लोकप्रतिनिधींनी सभागृहात एक टर्म काम केल्यानंतर 10500 पेंशन मिळणार आहे. परंतु शेतकऱ्याला पेंशन नाही. त्याच्या मुलाला पेंशन नाही. शेतकरी वारला तर त्याच्या पत्नीला पेन्शन नाही. हे मान्य आहे का ? आपण सत्य सांगितले पाहिजे. आपण सर्वजण एकदा सभागृहात 2-3 दिवस बसू आणि सर्व बजेट एकत्र करु. बजेटला जे लुपहोल्स ठेवले आहेत, ते कमी करु. हे लुपहोल्स पार्टी फंड, लोकांना लुटण्यासाठी, दलालांना देण्यासाठी ठेवलेले असून ते लुपहोल्स कमी केले पाहिजेत. हे केले तर यामध्ये एक पंचवार्षिक योजना होईल. मंत्रीमंडळाचे सदस्य एकमेकांत भांडतात की, माझ्या खात्याला जास्तीत जास्त निधी मिळाला पाहिजे. याचे समान वाटप का करत नाहीत ? तेथे प्रायोरिटी का फिक्स करीत नाहीत ?. 5000 कोटी रुपयांचे सप्लीमेंटरी बजेट देता. मंत्री सोडून प्रधान सचिव श्री.सुबोधकुमार हे बजेट ठरवितात. सभापती महोदय मला एकच मुद्दा आपल्या लक्षात आणून द्यावयाचा आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीबाबत श्रीमती भावना गवळी यांनी उत्तर दिलेले आहे की, अशा प्रकारचे प्रप्रोजल आलेले नाही. त्यांनी एवढे म्हटल्यानंतर गदारोळ वाढला. माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे शब्द कदाचित तिखट असतील, हे मला मान्य आहे परंतु त्यांच्या भावना लक्षात घ्या. त्यांच्या भावना एवढया तीव्र आहेत कारण ते भरपूर किलोमीटर फिरले आहेत. आपण सर्वजण कुटुंबवत्सल आहोत. भावनाविवश होऊन राजकारण करता येत नाही. सर्व गोष्टीचे सोंग आणत येते परंतु पैशाचे सोंग आणता येत नाही हे मान्य आहे. परंतु पोटच्या दोन पोरी एक दुपट्टा बांधून विहीरीत जीव देतात. कारण त्यांच्या लग्नाचे ओझे बापाला पडू नये. राज्यकर्त्यांनी संवेदनशील असले पाहिजे की नाही ?. आपली मुलगी मेली आहे, अशी कल्पना केली तर काय होते पहा. एका बलात्कारी माणसाने न्यायाधिशाला सांगितले होते की, माझी चूक झाली आहे, मला कमी शिक्षा द्या. परंतु न्यायाधिश म्हणाले की, Just imagine की, तुझ्या मुलीवर असा प्रकारे

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/

श्री.मधुकर चव्हाण .....

बलात्कार झाला असेल अशी कल्पना कर आणि मला सांग. काही गोष्टी बोलायला ठिक वाटतात. महात्मा गांधींनी दारु सोडायला सांगितले परंतु लोक सोडयात दारु घ्यायला लागले. म्हणजे यातून पाहिजे तो अर्थ काढला जातो. हिम्मत ठेऊन तुम्ही जीवनातील सत्य स्वीकारा. दोन-दोन दिवसात अधिवेशन गुंडाळता, कशावर चर्चा करु देत नाही. उद्या पुरवणी मागण्या आहेत, त्या लवकर लवकर बोला असा आग्रह धरला जातो. ज्या न्यायालयाची इमारत झालेली नाही, त्यासाठी दोन कोटी रुपयांची तरतूद पुरवणी मागण्यामध्ये ठेवली आहे. दोन दिवसात अधिवेशन गुंडाळता, उद्या आम्हाला वेळ द्या. शासनाला सांगा. आपण प्रत्येक आमदार सुमारे 55 हजार रुपये पगार घेतो. आपण जनतेला काय देतो. आम्ही सांगतो की, पैसे कसे वाचवायचे ते. केवळ 2000 नव्हेतर 20 हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार गेल्या दीड वर्षात या राज्यात झालेला आहे. त्याची चौकशी झालेली नाही. श्री.सुभाष घई यांना 20 कोटी रुपयांची जमीन 3 कोटी रुपयात देता. माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम यांनी सांगितले की, कर्जमुक्तीसाठी पैसे कोठून आणायचे. शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी पैसे कोठून आणायचे यासाठी 12 तासांचे एक सत्र घ्यावे. या सत्रात आम्ही सांगू की की, शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी पैसे कसे व कोठून आणायचे. सभापती महोदय, आता मंत्री महोदय उत्तर देतील. परंतु आम्हाला फक्त पोटतिडकीने बोलल्याचे समाधान आणि तुम्हाला आम्हाला टोपी कशी लावली याचे समाधान. दुसऱ्या दिवशी दोघांचीही नावे वर्तमानपत्रात येतील व आपण जाऊत. जसे स्मशानात गेल्यानंतर स्मशानवैराग्य येते. काय हे जीवन आहे, यात काही अर्थ नाही, हे सर्व निरर्थक आहे, खोटे कधी बोलू नये, पाप कधी करु नये. आणि घरी येऊन अंघोळ केली की, दुसऱ्या दिवशी पाप करायला मोकळे. सत्ता तुम्हाला दिलेली आहे, आणि आता सांगू नका की, आमच्या मेहेरबानीमुळे आहे. माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणात एक वाक्य सांगितले आहे ते मी बरोबर लक्षात ठेवले आहे. ठिणगीतून आग निर्माण होते आणि आगीतून जी ठिणगी निर्माण होते. म्हणजे 1977 ची सत्ताधारी पक्षाची परिस्थिती होईल. 1977 ची परिस्थिती का आली ?. उत्तरप्रदेशातील 85 जागापैकी इंदिरा गांधी यांना शुन्य जागा मिळाल्या. दिल्लीतील 6 जागापैकी इंदिरा काँग्रेस शुन्य जागा मिळाल्या. चुकीचे वागल्यामुळे कसा त्रास होतो. सत्तेचा मुकुट अव्याहतपणे आईच्या पोटातून जन्माला आल्यापासून मरेपर्यंत आपल्याच डोक्यावर ठेवण्याचा अधिकार गांधी घराण्याला दिलेला आहे असे काही समजू नका.

नंतर कु.धनश्री.....

अशासकीय प्रत / अशासकीय नाही

श्री. मधुकर चव्हाण....

आपणाला देखील कदाचित गांधी या नावाचा फायदा झालेला आहे हे माझ्या लक्षात आले आहे. माझी आपणास अशी विनंती आहे की, यासंदर्भात निर्णय घेण्याकरिता आपण एकत्र बसू या.....

तालिका सभापती : आणखी 16 सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. आता 6 वाजून 15 मिनिटे झालेली आहेत. वेळेच्या संदर्भात आपणाला काही तरी ठरवावे लागेल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या प्रस्तवावरील उर्वरीत चर्चा आपण उद्या सकाळी ठेवावी. आज सकाळी 10 वाजल्यापासून सभागृह सुरु झालेले आहे. आपण तेव्हापासून बसलो आहोत. आणखी किती वेळ आम्ही बसायचे ?

तालिका सभापती : माझी आपणास अशी विनंती आहे की, सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी येथे ज्याप्रमाणे 14 मुद्दे अतिशय गतीने मांडले त्याप्रमाणे सर्व सन्माननीय सदस्यांनी फक्त मुद्दयांचा उल्लेख करावा. मुद्दयांची पुनरावृत्ती करु नये.

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय.....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सकाळी 10.00 वाजल्यापासून सभागृहाचे कामकाज सुरु आहे. आता संध्याकाळचे 6.15 वाजले आहेत. आम्ही किती वेळ सभागृहामध्ये बसायचे ? आपण उर्वरित चर्चा उद्या घ्यावी....

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज रोज किती तास व्हावे यासंदर्भात काही नियम आहेत. आपण सकाळी 10.00 वाजल्यापासून सभागृहाचे कामकाज सुरु केलेले आहे. आता संध्याकाळचे 6.00 वाजून गेलेले आहेत.

तालिका सभापती : आपले म्हणणे अगदी बरोबर आहे. परंतु मागील काही दिवसांमध्ये सभागृहाचा बराचसा वेळ वाया गेला आहे. त्यामुळे आपल्याला सभागृहाची वेळ बदलता येणार नाही. सर्व सन्माननीय सदस्यांनी केवळ महत्वाचे मुद्दे मांडावे. आता सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी त्यांचे भाषण पुढे सुरु करावे.

श्री. मधुकर चव्हाण : शेतकऱ्यांना कर्ज मुक्ती देण्यासाठी निधी कसा उभारता येईल याच्यावर आपण विचार करावा. माझी विनंती आहे की, शासनाने या चर्चेला उत्तर देताना शेतकऱ्यांना कर्जमुक्ती दिल्याचे जाहीर करावे. धन्यवाद.

.....

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एन. पी हिराणी (यवतमाळ स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा विषय अत्यंत महत्वाचा व गंभीर स्वरुपाचा आहे. कालपासून सभागृहामध्ये या विषयावर चर्चा घेण्यासंबंधी बरीच घासाघीस झाली. खरे म्हणजे हे लोकशाहीचे प्रतीक आहे. लोकशाही जीवंत असल्याचे ते एक लक्षण आहे. आपल्या शेजारील राष्ट्रामध्ये आपण बघतच आहोत कसे धिंडवडे निघत आहेत, ते पाहता आपण खूप नशिबवान आहोत. आपल्या देशामध्ये अत्यंत चांगल्या पद्धतीने चर्चा सुरु आहे.

अध्यक्ष महोदय, काही वर्षापूर्वी विदर्भातील वऱ्हाडमधील शेतकरी आनंदी होता. त्याच्या घरामध्ये सुबत्ता नांदत होती. वऱ्हाड म्हणजे सोन्याची कुऱ्हाड असे पूर्वी म्हटले जात असे. तेथील शेतकरी श्रीमंत नसला तरी समाधानी होता. त्याच्या शेतात वर्षभराकरिता ज्वारी पिकायची. कापसा बरोबरच तूर डाळीचेही पिक निघत असे. त्याचा वर्षभराचा खर्च भागविण्याकरिता कापसाचे नगदी पिक तेथे होत असे. कापूस म्हणजे पांढरे सोने म्हटले जायचे. त्या वेळच्या शेतकऱ्यांच्या गरजा, आावश्यकता कमी होत्या , त्यामुळे शेतकरी समाधानी होते असे म्हटले तरी चालेल. त्यानंतर काळ बदलला. काळानुरुप त्यांची आवश्यकता बदलली.

यानंतर श्री. सुंबरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुलाबाळांची शिक्षणे जास्त होत गेली. जमिनी खराब होत गेल्या, प्रत्येक वस्तुंचे भाव वाढत गेले आणि अशा परिस्थितीमध्ये गेल्या काही वर्षांपासून शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत दयनीय झालेली आहे यामध्ये वाद नाही. अशा परिस्थितीत लोकसंख्या वाढ हाही प्रश्न आहेच म्हणजे प्रत्येक कुटुंबात जास्त तोंडे भरवावी लागतात. त्याच्या घरी खाणाऱ्यांची संख्या वाढली. ...

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, सभागृहामध्ये रॉकेलचा वास मोठ्या प्रमाणात येतो आहे तसेच धुराचा देखील त्रास होतो आहे. तरी आपण याबाबत खात्री करून घ्यावी.

तालिका सभापती (श्री.उल्हास पवार) : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, विधान भवनामध्ये औषध फवारणी केली जात असल्याने हा त्रास होत आहे. तरी त्यात काळजी करण्यासारखे काही नाही.

डॉ. एन.पी.हिराणी : सभापती महोदय, आजूबाजुची मुले शिक्षण घेऊ लागल्याने शेतकऱ्याला देखील वाटू लागले की, आपल्या मुलाबाळांनी देखील शिक्षण घ्यावे. त्यामुळे त्याची मुले शिक्षण घेऊ लागली. तोही खर्च वाढला. त्यात भरीस भर म्हणून त्याचा शेतातील उत्पादन खर्च देखील वाढला. आधी त्याचे उत्पादन खर्चावर मर्यादा होती, त्याचा कंट्रोल होता परंतु आज तो खर्च इतका जास्त वाढला आहे की त्याला आज सर्व खर्चाची तोंडमिळवणी करता येत नाही, किंबहुना त्याला ते अशक्य होऊन राहिले आहे. त्यात आणखी एक गोष्ट म्हणजे निसर्गाचा लहरीपणा देखील वाढला आहे. आधी निसर्गाचे टाईमटेबल अचूक असायचे. पावसाळ्याच्या दिवसात पाऊस असायचा आणि तो नियमित वेळेत यायचा. उन्हाळ्यात चांगले ऊन असायचे, थंडीमध्ये थंडी जाणवली पाहिजे इतपत थंडी असायची. अशा प्रकारे निसर्गाचा त्यावेळेस कल असायचा. परंतु गेल्या काही वर्षामध्ये निसर्ग बदलला आहे, अर्थात त्याला काही प्रमाणात आपण देखील जबाबदार आहोत. झाडे कमी झाली, डोंगर उजाड झाले आणि आपण बघतो आहोत की, परिणामत: निसर्गदेखील बदलू लागला. निसर्गाच्या लहरीपणामुळे पाऊस कधी येईल याचा नेम राहिला नाही, केव्हा थंडी पडेल, केव्हा ऊन येईल याचाही भरवसा राहिला नाही. त्यामुळे शेतकऱ्याचे देखील सगळे टाईम-टेबल बदलले. त्याचे अर्थशास्त्र विस्कळीत झाले. त्यामुळे शेतकरी अत्यंत त्रासात गेला. प्रथमत: माननीय श्री.शरद पवार यांनी शेतकऱ्याला कर्जमाफी दिली, त्यानंतर माननीय श्री.अंतुले साहेबांच्या काळामध्ये देखील शेतकऱ्याला कर्ज माफ केले गेले. आणि आता

..... 4आय 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. हिराणी ....

आपण पुन्हा शेतकऱ्याला कर्जमाफी देण्याच्या प्रश्नावर येथे चर्चा करीत आहोत. माननीय पंतप्रधानांनी देखील त्या दृष्टीने इंडिकेट केले आहे. त्यानंतर मध्यंतरी श्री.शरद पवार यांनी देखील अकोल्याच्या सभेमध्ये त्याचे सूतोवाच केले. म्हणजे केंद्रीय शासन आणि महाराष्ट्र राज्य शासन याबाबत गंभीरतेने विचार करीत आहे. शेतकऱ्यांच्या सुदैवाने कदाचित ही कर्जमाफी होईल देखील. पण पुढे काय ? प्रथम श्री.शरद पवारांनी शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले, त्यानंतर अंतुले साहेबांच्या काळात शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली गेली आणि आज आपण पुन्हा तीच चर्चा करीत आहोत. आज आपण समजा शेतकऱ्याला कर्ज माफी दिली तरी उद्या भविष्यात किती दिवसांनी हा प्रश्न पुन्हा उभा ठाकेल याचा भरवसा काय ? म्हणून या संदर्भात सगळ्यात महत्त्वाचे काम कोठले करावयाचे असेल तर ते म्हणजे आजच्या शेतकऱ्याच्या दयनीय स्थितीचा विचार करून कर्जमाफ करायला हरकत नाही. आज कर्जाच्या गर्तेमध्ये अडकलेल्या शेतकऱ्याला, सावकाराच्या आणि बँकेच्या कर्जपाशामध्ये अडकलेल्या शेतकऱ्याला त्यातून बाहेर काढून रस्त्यावर आणून उभा करून केवळ चालणार नाही तर तो पुन्हा त्या कर्जाच्या विळख्यात सापडणार नाही आणि पुन्हा त्याची अवस्था दयनीय होणार नाही याची काळजी आपल्याला घ्यावी लागेल. म्हणजे आज माननीय श्री.विलासराव देशमुख यांच्या सरकारने आणि पंतप्रधान डॉ.मनमोहनसिंग यांच्या राजवटीमध्ये कर्जमाफी झाली तरी पुढच्या पिढीला पुन्हा कर्जमाफी देण्याची पाळी येऊ नये म्हणून सगळ्यात महत्त्वाचे कार्य कोणते करावयाचे असेल तर शेतकऱ्याला सगळ्याच बाबतीत सशक्त बनविले पाहिजे. त्यासाठी त्याच्या पाठीमागे उभे राहिले पाहिजे आणि त्याच्या काय काय आवश्यकता आहेत त्या लक्षात घेऊन, तो पुन्हा कर्जामध्ये अडकू नये म्हणून तुम्ही आम्ही प्रयत्न करणे आवश्यक आहे.

(यानंतर श्री. सरफरे .... 4जे 1 ..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंद

डॉ. एन. पी. हिराणी...

याबाबत अधिक सांगण्याची आवश्यकता नाही इतका हा महत्वाचा विषय आहे. आपल्याकडे असलेल्या फॅक्टरनुसार आज दोन ते चार टक्के इरिगेशन होते. परंतु गुजरात राज्यामध्ये 40 टक्के इरिगेशन होते. त्यामुळे त्या राज्यामध्ये सुबत्ता आहे. गुजरात राज्यातील 40 टक्के इरिगेशनला त्या राज्यातील नैसर्गिक स्थिती देखील कारणीभूत आहे. त्या राज्यामध्ये असलेल्या नद्यांमुळे आणि सरदार सरोवरमुळे सुबत्ता वाढली आहे ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. त्यामुळे त्यांना श्रेय आणि आपल्याला दोष देण्याचे कारण नाही. गुजरात राज्याचे सन 2001 मध्ये कृषि उत्पन्न 9 हजार कोटींचे होते, सन 2003 मध्ये 27 हजार कोटी झाले आहे. आज जवळपास 30 हजार कोटींच्या जवळपास कृषी उत्पन्न वाढले आहे. इतकी जास्त प्रगती हे गुजरात राज्य करीत आहे. तशाप्रकारची प्रगती विदर्भामध्ये करण्यासाठी येथील जलसंपत्तीचा वापर करुन 2-4 टक्क्यावरुन 10 टक्क्यापर्यंत आपण सरफेस इरिगेशन नेले पाहिजे. त्याकरिता विहिरीवरील इरिगेशन वाढविले पाहिजे, इरिगेशनमध्ये असलेला बॅकलॉग पूर्ण केला पाहिजे, विजेच्या पंपाचा बॅकलॉग पूर्ण केला पाहिजे, आर्थिक बॅकलॉग लवकरात लवकर पूर्ण केला पाहिजे. असे झाले तर त्याचा फायदा शेतकऱ्याला झाल्याशिवाय रहाणार नाही. ही सर्व व्यवस्था याठिकाणी केल्यानंतर त्याला चांगले बियाणे, चांगले खत आणि तत्संबंधित सर्व गोष्टी वापरण्याची जाण त्यांच्यामध्ये निर्माण करण्याची त्यांना प्रबोधन करण्याची आवश्यकता आहे. आपल्या शेतामध्ये कापसाचे एकच पर्यायी बियाणे लावले पाहिजे याबाबत शेतकऱ्याला माहिती नाही. परंतु दुकानदाराच्या भरंवशावर तो 3-4 प्रकारची बियाणे वापरतो. शॉर्ट स्टेपल, मिडियम स्टेपल आणि लॉंग स्टेपलसाठी किती भाव मिळतो याचे त्याला ज्ञान दिले जात नाही. त्यामुळे तो बियाण्यांची सरमिसळ करतो. त्यामुळे त्याचा लांब धाग्याचा कापूस असतांना सुध्दा त्याला 2030 रुपयापेक्षा जास्त भाव मिळत नाही. आखूड धाग्याचा कापूस असतांना 1700 रुपयांचा भाव मिळतो. यामुळे एका क्विंटलमागे शेतकऱ्याला 300 ते 400 रुपयांचे नुकसान सोसावे लागते. याबाबत कृषी विद्यापिठांनी शेतकऱ्यांमध्ये अशाप्रकारची जाण निर्माण करण्याची आवश्यकता आहे. आपल्या शेजारच्या आंध्र राज्यामध्ये सुध्दा शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या होत होत्या. त्या राज्यामध्ये बोलमवाडी नावाची योजना करण्यात आली. त्याव्दारे स्थानिक भाषेमध्ये शेतकी शाळा सुरु करण्यात आल्या. आणि 7 हजार मॅट्रिक्युलेट मुलांना सहा-सहा महिन्यांचे प्रशिक्षण देऊन प्रत्येक गावामध्ये दोन-दोन मुलांना पाठविण्यात आले. त्या मुलांनी शेतकऱ्याच्या शेतावर जाऊन आणि आजूबाजूच्या सर्व शेतकऱ्यांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

डॉ. एन. पी. हिराणी...

गोळा करुन त्यांना शेतीविषयी आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती समजावून सांगावयाची. शेतातील मातीचे निरीक्षण करुन त्याप्रमाणे त्या शेतामध्ये कशाप्रकारचे पिक घ्यावयास लावायचे याची माहिती प्रत्येक शेतकऱ्याला समजावून सांगावयाची. या योजनेचा त्या राज्यात चांगला परिणाम झाला. यामुळे त्या राज्यातील आत्महत्त्यांचे प्रमाण अत्यंत कमी झाले. अशाप्रकारची व्यवस्था आपल्या राज्यामध्ये निर्माण करुन आणि आपल्या शेतकऱ्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे रहाण्याचे काम राज्य शासनाने करावे. येथील विजेच्या भारनियमनामुळे शेतकऱ्यांना सळो की पळो करुन सोडले आहे. याबाबत माझी शासनाला विनंती आहे की, आपल्याकडे विजेची मागणी जास्त आहे परंतु पुरवठा कमी आहे. त्यामुळे भारनियमन करणे आवश्यक आहे. परंतु 24 तासापैकी 16 तास जर आपल्याला लोड शेडींग करावयाचे असेल तर सलग त्यांना 8 तास वीज देण्यात येईल अशाप्रकारे आगाऊ जाहीररित्या कळविण्याची आवश्यकता आहे. तशाप्रकारची व्यवस्था आपण केली तर या लोड शेडींगचा शेतकऱ्याला त्रास होणार नाही.

(यानंतर श्री. बरवड)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एन. पी. हिराणी .....

शेतकऱ्यांना अडचणीत आणणारा आणखी एक फॅक्टर आहे आणि तो म्हणजे मजूर न मिळणे. सध्या अजिबात मजूर मिळत नाहीत त्यामुळे गरीब शेतकरी खूप त्रस्त झालेले आहेत. कापूस वेचण्याची मजुरी खूप वाढलेली आहे. अशा परिस्थितीमध्ये शासनाला माझी विनंती आहे की, शेतकऱ्यांच्या शेतीवर रोजगार हमी योजना राबविता आली तर आणि शेतकऱ्यांच्या मजुरीचा खर्च रोजगार हमी योजनेतून करता आला तर त्याचा फार मोठा फायदा शेतकऱ्यांना मिळू शकतो आणि आत्महत्या कमी होण्यामध्ये त्याची मदत होऊ शकते. बाकी सर्व बाबतीत बोलण्यापेक्षा मी एकच सांगेन की, फक्त कापसाच्या पिकावर जर केंद्र शासनाने आणि आपल्या राज्य शासनाने वऱ्हाडात लक्ष घातले तर या कापसाच्या पिकामध्ये त्या शेतकऱ्याला कर्जातून मुक्त करण्याकरिता सक्षम करण्याची ताकद आहे. म्हणून कापसाच्या बाबतीत आज आपल्याकडे जी परिस्थिती आहे ती सुधारणे आवश्यक आहे. आपल्याकडे कापसाचे उत्पादन अत्यंत कमी होते. मी बी.टी.कॉटनला धन्यवाद देतो. बी.टी.कॉटन मार्केटमध्ये आले. 10 वर्षे उशिरा का होईना परंतु केंद्र शासनाने बी.टी.कॉटन भारतामध्ये आणले. महाराष्ट्र शासनालाही धन्यवाद दिले पाहिजेत. त्यांनी 1500 रुपये असलेला भाव 750 रुपयांपर्यंत आणला. बी.टी.कॉटन हे शेतकऱ्यांसाठी वरदान आहे. कोरडवाहू शेतीमध्ये 3 क्विंटलपेक्षा जास्त उत्पन्न होत नव्हते. एका क्विंटलला 250 रुपये खर्च करीत होतो. 2000 ते 2200 रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न मिळत नव्हते आणि शेतकऱ्यांना क्विंटलमागे 300 ते 400 रुपये तोटा होत होता. आता कोरडवाहू शेतीमध्ये 8 ते 10 क्विंटल उत्पादन यावयास लागले. ज्या ठिकाणी सिंचनाची व्यवस्था आहे त्या ठिकाणी 15 ते 20 क्विंटल पर्यंत उत्पादन गेले आहे. उत्पन्न वाढलेले आहे पण आता गुणवत्तेच्या बाबतीत लक्ष देण्याची आवश्यकता आहे. दुर्दैवाने आपल्या महाराष्ट्रामध्ये आणि विशेषकरुन कापूस उत्पादन करणाऱ्या वऱ्हाडातील सहा जिल्हयात किंवा संपूर्ण विदर्भ, खानदेश आणि मराठवाड्यात कापसाच्या गुणवत्तेबद्दल खूपच अज्ञान आहे. आजच्या स्पर्धेच्या युगामध्ये गुणवत्ता असल्याशिवाय आपण टिकू शकणार नाही. स्पर्धेमध्ये उभे राहावयाचे असेल तर आपल्याला अमेरिकेशी स्पर्धा करावी लागणार आहे. आपल्याला चायनाशी स्पर्धा करावी लागणार आहे तसेच प्रसंगी पाकिस्तानशी सुध्दा स्पर्धा करावी लागणार आहे. अशा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एन. पी. हिराणी .....

वेळेला आपला कापूस जर गुणवत्तेचा नसेल, त्यामध्ये बाकीची सरमिसळ असेल, त्याचे कंटॅमिनेशन झाले असेल, त्यामध्ये काडीकचरा असेल तर आपला कापूस जगामध्ये कोणीही घेणार नाही. जगामध्ये तर सोडाच पण जे भारतीय ग्राहक आहेत, भारतातील जे मिलमालक आहेत ते सुध्दा आपल्या कापसाला हात लावणार नाहीत. ते बाहेरुन कापूस आयात करतील. 50 लाख गाठी आयात करणारा आपला भारत देश आज 50 लाख गाठी निर्यात करीत आहे. कापसाच्या बाबतीत देशात अत्यंत चांगले चित्र आहे. परंतु त्या ठिकाणी आपल्या राज्याची स्थिती काय आहे ? त्या चांगल्या चित्रामध्ये आमचा वऱ्हाड कोठे आहे ? आमचा वऱ्हाड एक काळा डाग म्हणून त्या चित्रामध्ये दिसतो. जगात अमेरिकेमध्ये सगळ्यात जास्त कापूस पिकावयाचा. याबाबतीत क्रमांक दोनवर चायना आणि आणि क्रमांक तीनवर भारत देश होता. मला सांगण्यास आनंद होतो की, आता भारत देश क्रमांक 2 वर पोहोचलेला आहे. क्रमांक एकवर चायना आहे आणि अमेरिका क्रमांक तीनवर आहे. भारत पहिल्या क्रमांकावर जाण्याचा दिवस दूर नाही. परंतु गुणवत्तेच्या बाबतीत शेतकऱ्यांमध्ये जाणीव निर्माण केली नाही तर त्यांना चांगला फायदा मिळू शकणार नाही. त्यामुळे त्यांच्या अर्थशास्त्रामध्ये बदल होण्याची शक्यता फार कमी राहील. आपण सगळ्यांनी मिळून यादृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. तो प्रयत्न आपण केला नाही तर आज कर्जमाफी करुनही पुन्हा तो शेतकरी कर्जबाजारी होणार नाही याची शाश्वती देता येणार नाही. कर्जमाफी केलीच पाहिजे परंतु त्यासोबत हे सगळे प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सदनाची आणि सरकारची बांधिलकी ही शेतक-यांच्या होणा-या आत्महत्या थांबविणे आणि त्यांना कर्जमुक्त करणे या विषयी आहे असे मी मानते. 2001 पासून जवळ जवळ 3600 पेक्षाही जास्त शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहे. इतकेच नव्हे तर शेतक-यांच्या नक्की किती आत्महत्या झालेल्या आहेत याच्या आकडेवारीसंबंधीचे विवाद सातत्याने आपल्यापुढे येत असतात. या संपूर्ण परिस्थितीचे गांभीर्य ओळखून शेतक-यांना कर्जमुक्ती देणे ही अंतिम नव्हे तर नितांत महत्वाची बाब आहे. म्हणून "देता की जाता" हे आंदोलन शिवसेनेच्या माध्यमातून केले. सन्माननीय विरोधी पक्षनेता श्री. पांडुरंग फुंडकर आणि आमच्या इतर पक्षाच्या प्रतिनिधींनी मिळून या ठिकाणी हा प्रस्ताव दिलेला आहे. या प्रस्तावामध्ये खासकरुन शेतक-यांच्या कर्जमुक्तीसाठी आग्रह धरलेला आहे. या प्रस्तावावर सकाळपासून अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले आणि फार चांगल्या प्रकारे विश्लेषण केले. अनेक प्रश्नांची उत्तरे त्यांनी आपल्या भाषणातून शोधली. समर्थ रामदास स्वामींचा एक श्लोक आहे, "मरे एक त्याचा दुजा शोक वाहे, अकस्मात तोही पुढे जात आहे", अशी आज शेतक-याची अवस्था झालेली आहे. म्हणून माझ्या भाषणाच्या सुरुवातीलाच मी मागील डिसेंबरमध्ये झालेल्या नागपूरच्या अधिवेशनापासून या नागपूरच्या अधिवेशनापर्यन्त ज्या शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत, तसेच आता अधिवेशन सुरु झाल्या पासून 10 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत त्या सर्वांना मी श्रध्दांजली अर्पण करते आणि काही महत्वाच्या मुद्याकडे या सभागृहाचे लक्ष वेधू इच्छिते.

सभापती महोदय, शेतक-यांच्या आत्महत्येसंबंधी, त्यांच्या प्रश्नासंबंधी अनेक सन्माननीय सदस्यांची भाषणे मी ऐकलेली आहेत. परंतु ज्या काही मुद्यांना स्पर्श झालेला नाही तेवढेच मुद्दे मी मांडणार आहे. एक विचारवंत श्री. पी. साईनाथ यांनी शेतक-यांच्या आत्महत्येसंबंधी आकडेवारी सादर केलेली असून ती दैनिक लोकसत्ता, दैनिक सकाळ, दैनिक हिंदू आदी वर्तमानपत्रातून प्रसिध्द झालेली आहे. त्यांनी असे सांगितलेले आहे की, 1991च्या जनगणनेनुसार शेती करणा-या लोकांची संख्या 111 दशलक्ष इतकी होती. 2001मध्ये ती संख्या 103 दशलक्ष इतकी झालेली आहे. थोडक्यात सांगायचे तर केन्द्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी दिलेला सल्ला लोकांनी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. नीलम गो-हे....)

ऐकलेला आहे. शेती किफायतशीर नाही म्हणून मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागातील लोक आज शेती व्यवसाय सोडून दुस-या व्यवसायाकडे वळत आहेत. सभापती महोदय, 2005मध्ये आत्महत्यांचे प्रमाण हे 2.18 प्रतिलाख होते त्या तुलनेमध्ये शेतक-यांच्या आत्महत्येचे प्रमाण 2.90 प्रतिलाख इतके झालेले आहे. याचा अर्थ असा आहे की एकूणच समाजामध्ये आत्महत्या होत असल्यातरी शेतक-यांच्या आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे आणि ही वस्तुस्थिती आहे. श्री. पी. साईनाथ यांनी जी आकडेवारी सादर केलेली आहे त्यामध्ये त्यांनी चार गट केलेले आहेत. पहिल्या गटामध्ये एकूण आत्महत्येचे प्रमाण आणि त्यामध्येही शेतक-यांच्या आत्महत्येचे प्रमाण हे जास्त दाखविलेले आहे. दुस-या गटामध्येही आत्महत्या जास्त दिसतात. तिस-या गटामध्ये हे आत्महत्येचे प्रमाण मध्यम दाखविलेले आहे आणि चौथ्या गटात आत्महत्येचे प्रमाण कमी दाखविलेले आहे. त्यामध्ये शेतक-यांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी दाखविलेले आहे. महाराष्ट्रातील आत्महत्येसंबंधी जी आकडेवारी दिलेली आहे त्यामध्ये शेतक-यांच्या आत्महत्येचे प्रमाण जास्त दिसते. या आकडेवारी नुसार हे प्रमाण 1.7 प्रतिलाख आहे.म्हणजे ते जास्त आहे. याबाबतीत ब-याच उपायोजना करण्यात आल्या. पंतप्रधानांचे पॅकेज जाहीर झाले. शेतक-यांच्या आत्महत्येबाबत या सभागृहामध्ये चर्चा झाली नाही असे कोणतेही अधिवेशन आजपर्यन्त झालेले नाही. काहीनी असाही उल्लेख केला की, शिवसेना-भाजप युतीचे शासन असताना देखील आत्महत्या होत होत्या आणि नंतर देखील त्या होत आहेत. परंतु 2000 सालानंतरचा प्रवाह पाहिला तर शेतक-यांच्या आत्महत्येचे प्रमाण हे वाढत असल्याचे चित्र दिसून येते. तसेच शेतक-यांच्या कर्जाच्या थकबाकीचे प्रमाण देखील जास्त दिसते. या विषयावर सकाळपासून जी जी भाषणे झाली त्यामधून आत्महत्येची अनेक कारणे समोर आलेली आहेत. पदवीधर असलेला शेतकरी ज्याची मुले कॉलेजमध्ये शिकत आहेत, ज्यांची काही स्वप्ने आहेत, अशा सुशिक्षित कुटुंबातील शेतक-यांनी सुध्दा आत्महत्या केल्याचे दिसून येते.

...नंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

आणि म्हणून ज्यावेळेला कर्जमुक्ती ही दिंडी घेऊन आम्ही वेगवेगळया भागामध्ये गेलो, वर्धा, अमरावती, नागपूर याठिकाणी लोकांशी संवाद साधला आणि इतर जिल्हयांमध्ये बरेचसे कार्यक्रम घेतले गेले. 2 डिसेंबर रोजी कस्तुरचंद पार्क येथे शिवसेनेचे कार्याध्यक्ष माननीय श्री.उध्दवजी ठाकरे यांच्या उपस्थितीत खास मेळावा घेणार आहोत. आमचे या गोष्टीकडे लक्ष आहे. मघाशी सांगितले गेले, "देता की जाता" अशी भाषा आम्हाला येत नाही वगैरे. दादा, आपण तालिका सभापती या नात्याने सभापतीस्थानी बसलेले आहात. आपण पुणे जिल्हयाचे आहात. मी पुणे जिल्हयामध्ये जी मानसिकता काही वर्षापूर्वी बघत होते ती आताच्या सत्ताधारी वर्गाची मानसिकता हळूहळू बदलत चाललेली दिसते. रस्त्याजवळच्या जमिनी कशा कमीत कमी किफायतशीरपणे शेतकऱ्यांच्या होतील, जेणेकरुन त्या जमिनीचे भाव वाढतील आणि वाढलेल्या भावावरील जमिनीवरचे शेतकरी हुसकावले जाऊन त्यांना देशोधडीला लावले जाईल याची शेकडो उदाहरणे देता येतील. एखादा मालक असतो आणि त्याच्याकडे एखादे जनावर असते. ते जनावर मालकावर आणि मालक जनावरावर प्रेम करीत असतो. हळूहळू मालकाला वाटते हे जनावर हाताबाहेर जाते की काय? अशा वेळेला तो मालक मुळातच गरीब असणाऱ्या जनावराला कारणाशिवाय बदडतो. त्या जनावराला कळेनासे होते. तो मालक का बदडतो हे जनावराला कळत नाही. पुणे जिल्हयाचे उदाहरण द्यायचे झाले तर शेतकऱ्यांवर माण येथे गोळीबार झाला. बजाज कंपनी बंद करण्यात आली. पश्चिम महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण विदर्भ आणि अनेक जिल्हयातील शेतकऱ्यांची कर्जमाफी करा. कर्जमाफी तुम्ही करणार नाही मग घोषणा करुन जखमेवर मीठ तरी चोळू नका. कुठेतरी गरीब जनावर आहे म्हणून बदडायचे ही तुमची मानसिकता आहे. तुम्ही क्राईम अँड पनिशमेंट ही कादंबरी वाचली तर सत्ताधारी कसे शेतकऱ्यांना गुलामगिरीत जोखडवू शकतात तसे राजकारणी राष्ट्रवादी आणि काँग्रेस पक्ष करतात की काय? पाणी मागणाऱ्या शेतकऱ्यांवर गोळीबार होतो आणि गृहमंत्री खाजगीमध्ये म्हणतात आम्ही रेटून नेऊ. गोळ्या झाडून रेटून नेणार का? पाणी प्रश्नावर महाराष्ट्रात ठिकठिकाणी गोळीबार झाला. ज्या भागामध्ये अधिवेशन भरते, या विषयावर चर्चा घेतली जाते, अतिशय मानहानीकारक गोष्ट आहे, याठिकाणी माननीय मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी उत्तर देण्याऐवजी कधी शिक्षणमंत्री, एखादे दुस-या विभागाचे मंत्री नोट्स घेतात. पी.ए.ने घेतलेल्या नोट्सच्या आधारे माननीय विरोधी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 18:40

डॉ.नीलम गोऱ्हे.....

पक्षनेत्यांच्या दोन-तीन महत्वाच्या मुद्यांना थातूरमातूर उत्तरे दिली जातात. सहकार विभागाचे उत्तर मी मान्य करते. पटो अथवा न पटो सहकार मंत्री सातत्याने सभागृहात उपस्थित असतात. जो विषय त्यांचा नाही, त्या विषयाला ते उत्तर देतील. बाकी विषयामध्ये शासनाचा चेहेरा उत्तरामध्ये दिसला पाहिजे असे उत्तर न देता पुन्हा पुन्हा विधानपरिषदेची अवहेलना करण्याचा कार्यक्रम केला जातो. याचे महत्वाचे कारण म्हणजे कोणत्याही परिस्थितीत मघाशी म्हटल्याप्रमाणे गरीब जनावराला पाहिजे तसे बदडायचे आणि त्याला हवे तसे वापरायचे ही भावना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांची झालेली आहे. जो कधीच तुमच्या विरोधात बंड करणार नव्हता त्यांचे उद्योगधंदे बंद पडतात. तुमच्या विरोधात जाणार नव्हते तेथे एसईझेड आणता. विदर्भामध्ये एसईझेड पाहिजे तेथे ते नाकारले जातात आणि विदर्भातील शेतकऱ्यांना आळशी बोलले जाते. परंतु साखर कारखान्यांना किती मोठ्या प्रमाणात मदत दिली जाते, कोट्यावधी रुपयांची मदत दिली जाते. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सांगितले. सहकारी बँकांमार्फत मदत केली जाते. सन्माननीय श्री.विखे पाटील यांच्या संस्थेचे कोट्यावधी रुपयांचे कर्ज माफ केले. विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना वेगवेगळ्या कारणामुळे मदत नाकारीत असताना त्यांना केलेली अकार्यक्षमता आपण दाखविता. या भागाची अकार्यक्षमता दाखविली जाते. जेव्हा एखाद्या विभागात सातत्याने आत्महत्या होतात आणि पुढच्या दोन-तीन वर्षात संयुक्त महाराष्ट्राला 50 वर्षे पूर्ण होतील.....

(नंतर श्री.जुन्नरे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाची नाही

डॉ. नीलम गो-हे.....

मला तर काही वेळेला काळजी वाटते की, जसे सायबेरिया किंवा सहार अरण्य, किंवा दक्षिण अफ्रिका यांच्याकडे कुपोषण होणारा आणि आत्महत्या होणारा भाग म्हणून पाहिले जाते तसाच दृष्टीने, शेतक-यांच्या आत्महत्या आणि कुपोषण होणारा भाग म्हणून विदर्भाकडे पाहिले जाईल की, काय अशी भिती वाटावयास लागलेली आहे. महाराष्ट्राची सोमालिया सारखी परिस्थिती होते की, काय असे आता वाटायला लागले आहे. या शासनाला याबद्दल कोणत्याही प्रकारची खंत किंवा खेद नाही. यासंदर्भात राज्य सरकार कोणत्याही प्रकारची घोषणा करु शकत नाही. कर्जमुक्ती दिंडीला श्रेय मिळेल म्हणून आम्ही कर्ज मुक्ती करणार नाही असे म्हणण्यास सुध्दा हे शासन मागे पुढे पाहणार नाही. मला तर असे वाटते की, या ठिकाणी श्रेयाचा कोणताही प्रश्न नाही. यासंदर्भात मी मुद्दामहून सांगेन की, पंतप्रधान पॅकेजचे पैसे शेतक-यांना का मिळाले नाही याचा शोध घेण्यासाठी आता सी.बी.आय. महाराष्ट्रात येत आहे त्याला आपण काय म्हणावयाचे? पंतप्रधान पॅकेज कोठे गेले हे या सरकारला कळत नाही. पंतप्रधान पॅकेज मध्ये केवळ 6 जिल्हेच घेतले गेले आहेत. इतर जिल्हयामध्ये शेतकरी आत्महत्या करीत आहेत त्यांना या पॅकेजचा काही सुध्दा उपयोग झालेला नाही. तरी देखील हे पॅकेज लोकांपर्यंत का पोहचले नाही याचेही उत्तर हे सरकार देत नाही. दुसरी गोष्ट अशी की, आयात केलेल्या सडक्या गव्हाला हे शासन जास्त दर देऊन तो लाल गहू विकत घेत आहे परंतु येथील गहू उत्पादकाला आपण वा-यावर सोडत आहात त्यामुळे मला असे वाटते की, राजकारणातील अपरिहार्यता, राजकारणातील नाईलाज आपण कोणालाही म्हणू शकता. परंतु ती जी व्यक्ती आहे त्याच व्यक्तीवर तुम्ही अवलंबून राहणार असाल तर कर्जमुक्तीला टाळेच लागेल. सभापती महोदय, मला तर अशी काळजी वाटते की, गेल्या निवडणूकीत जशी प्रिंटींग मिस्टेक झाली होती, निवडणुकीच्या तोंडावर सांगितले गेले की, वीज माफी दिली जाईल, कर्ज माफी दिली जाईल तसाच प्रकार आपण यावेळी सुध्दा कराल. मागच्या वेळेस जसे केले होते तसेच आपण ढकलत ढकलत 2009 सालापर्यंत न्याल आणि शेवटच्या क्षणी घोषणा कराल, परत जनावर आपल्या गोठयात बांधले की, लाथा मारायला लागाल, जे प्रामाणिक आहेत त्यांना कुठलीही किंमत न देता, खेचत खेचत न्याल अशा त-हेने आपण जनतेला न्याय मिळवून देणार आहात काय याबद्दल स्वत:च स्वत:चा विचार करावा अशी परिस्थिती आहे. आम्हाला नेहमी वेळ कमी पडतो म्हणून

....2

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे.....

आम्ही विधानमंडळात रथ आणण्याचा प्रयत्न केला होता. या सगळया प्रश्नांचा आपण जेव्हा विचार करावयास लागतो तेव्हा मला असे वाटते की, कर्जमुक्ती हा काही एका पक्षाचा प्रश्न नसून संपूर्ण महाराष्ट्राच्या शेतक-यांच्या जीवनाचा प्रश्न आहे. खरे सांगावयाचे म्हटले तर आपण जर भ्रष्टाचाराची गळती थांबवली असती तर सामान्य शेतक-याला न्याय मिळू शकला असता. मोठ मोठया वर्तमानपत्राचे संपादक, विचारवंत आम्हाला येऊन प्रश्न विचारतात की, अनहिस्टॉरिकल आंदोलन करुन कर्ज मुक्ती देणे कसे काय शक्य होणार आहे? जे प्रामाणिकपणे कर्ज फेडतात त्यांच्या संदर्भात आपण काय करणार आहात? जसे आपण शेतक-यांच्या संदर्भात बोलता तर तोच नियम साखर कारखान्यांना सुध्दा लागू होतो. जे साखर कारखाने चांगल्या प्रकारे सुरु आहेत त्यांच्यामध्ये सुध्दा अशाच प्रकारचा संघर्ष सुरु आहे. काही साखर कारखाने खरोखर चांगल्या प्रकारे चालतात परंतु जे बदमाश लोक आहेत, बदमाश साखर कारखानदार आहेत ते प्रत्येक गोष्टीमध्ये, प्रत्येक मशिनरीमध्ये कंत्राट करीत करीत शेतक-यांना देशोधडीला लावतात आणि परत वरुन सबसिडी मागतात? मग अशा ठिकाणी आपण कानाडोळा करतातच ना? अशा वेळेला ज्या शेतक-याचे 10-20 हजाराचे कर्ज आहे त्याच्यासाठी आपण राजा हरिश्चंद्राचा अवतार व्हावयास निघाले आहात. जो प्रामाणिक शेतकरी आहे त्याचे काय होणार आणि इतर कर्ज ज्या लोकांनी घेतलेले आहेत त्यांचे काय होणार ? कार लोन, होम लोन, बाकीच्या गोष्टींसाठीचे कर्ज आणि माणूस जीवंत राहण्यासाठी जे कर्ज लागते अशी 20-25,50 हजारापर्यंतची कर्जे, कोठे बियाणे खराब झालेली आहेत, कोठे नापिकी झालेली आहेत अशा लोकांना आधार देणारी कुठलीही यंत्रणा आज शासनाकडे नाही. कर्जवसूलीमुळे त्रस्त होऊन जेव्हा शेतकरी आत्महत्या करण्यास निघाला आहे अशा वेळेला त्याला सलाईनचे इंजेक्शन देण्याची आवश्यकता आहे. कर्जमाफिचा विचार शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या मनामध्ये आलेला आहे तो विचार आम्ही आपल्या समोर मांडीत आहे. कर्जमुक्ती हाच शेतक-यांच्या दृष्टीने अंतिम उपाय आहे. शेतीचे व्यवस्थापन करु नये असे आमचे अजिबात म्हणणे नाही. मघाशी काही सन्माननीय सदस्य बोलत होते की, तुमच्या राज्यात काय झाले, तुमच्या राज्यात काय झाले? यासंदर्भात मी एवढेच म्हणेन की,

"मेरे सीने में नहीं, तेरे सीनेमे सही,
हो कंहीं भी आग, आग जलनी चाहिए.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही